सन १९५५
म. ग्रं. सं. ठाणे
विषय इतिहास-१
सं. नं. ६३६६

# महान परिवर्तन

REFBK-0008693
REFBK-0008693

सन् १९५५

# महान् परिवर्तन

[ The Big Change या पुस्तकाचा अनुवाद ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ८६९३

लेखक
फ्रेड्रीक ल्युइस ॲलन

९८.३९२
२४. ३।५७
११।५।५४

अनुवादक
शंकर लक्ष्मण चिटणीस

REFBK-0008693

व्होरा आणि कंपनी, पब्लिशर्स लिमिटेड
३ राउंड बिल्डिंग, मुंबई २.

*Published by arrangements with*
*Harper & Brothers, New York*
*Copyright, 1952, by Fredrick Lewis Allen.*

*First Edition 1955*

किंमत रु. १-८-०

मुद्रक : जयराम दिपाजी देसाई, राष्ट्रवैभव प्रेस, गिरगांव, मुंबई ४
प्रकाशक : एम्. के. वोरा, वोरा आणि कंपनी, पब्लिशर्स लिमिटेड,
३ राउंड बिल्डिंग, काळबादेवी रोड, मुंबई २.

# फ्रेडरिक लेवीस ॲलन

याचा जन्म बोस्टन येथें १८९० मध्यें झाला. त्याचें सारें शिक्षण ग्रॉटन व हार्वर्ड या शिक्षणसंस्थांत झालें.

शिक्षणक्रम पुरा झाल्यावर हार्वर्डमध्येंच त्यानें सन १९१२ तें १९१४ पर्यंत इंग्रजीचा अध्यापक म्हणून काम केल्यावर १९१४ तें १९१६ पर्यंत तो 'अटलांटिक मंथली' या नियतकालिकाचा दुय्यम संपादक होता. त्यानंतर त्यानें एक वर्ष 'सेंच्युरी' मासिकाचा कार्यकारी संपादक म्हणून काम केलें. सन १९२३ मध्यें तो 'हार्पर्स-मॅगझिन'च्या संपादक मंडळावर गेला व सन १९३१ मध्यें तो त्या मासिकाचा सह-संपादक व सन १९४१ मध्यें मुख्य संपादक झाला. सन १९५३ मध्यें त्यानें लेखनाला अधिक वेळ देतां यावा यासाठीं सदर नियतकालिकाच्या मुख्य संपादकाची जागा सोडून केवळ सल्लागार संपादकाची जागा स्वीकारली. ॲलन हा 'हार्पर्स ब्रदर्स' या प्रकाशन कंपनीचाहि एक संचालक आहे. याच कंपनीतर्फे 'हार्पर्स मॅगझिन' प्रसिद्ध होतें.

सन १९३१ मध्यें त्याचें 'ओन्ली यस्टरडे' हें पुस्तक प्रसिद्ध झालें. या पुस्तकांत सन १९२० नंतरचा अमेरिकेचा इतिहास आला असून या पुस्तकाच्या पांच लाख प्रति खपल्या. यानंतर त्याचीं इतर पुस्तकें म्हणजे 'दि लॉर्डस ऑफ क्रिएशन' (१९३५), 'सीन्स येस्टरडें' (१९४९), 'दि ग्रेट पीरपॉंट मॉर्गन' (१९४९), हीं होत. 'दि लॉर्ड्स ऑफ क्रिएशन'मध्यें सन १९०० नंतरचा अमेरिकेचा आर्थिक इतिहास असून, 'सीन्स येस्टरडे' हें पुस्तक सन १९३०–४० मधील अमेरिकेसंबंधी आहे 'दि ग्रेट पीरपॉंट मॉर्गन' हें पुस्तक म्हणजे प्रख्यात पेढीवाला मॉर्गन याचें चरित्र.

याशिवाय त्याची पत्नी ॲग्नीस रॉजर्स हिनें जीं तीन सचित्र पुस्तकें लिहिलीं, तींतहि ॲलननें सहकार्य केलें. त्याचें 'महान् परिवर्तन' (दि बिग चेंज) हें अमेरिकेंतील सध्याच्या दांडग्या खपाच्या पुस्तकांपैकीं एक आहे.

# प्रस्तावना

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत अमेरिकेंत जे महत्त्वाचे बदल झाले तें रेखाटण्याचा या पुस्तकांत प्रयत्न करण्यांत आला आहे. परदेशी वाचकांच्या सहज लक्षांत येईल कीं हें पुस्तक म्हणजे कादंबरी नसून वस्तुस्थितीचें चित्रण आहे. होलिवूडमधून बाहेर पडणाऱ्या ठराविक सांच्याच्या ठोकाठोकी, खून–दरोडेखोरी चित्रपटांपेक्षां या पुस्तकांत रेखाटलेलें अमेरिकेचें चित्र अगदीं वेगळें आहे. हें अमेरिकन जीवन म्हणजे एक नाटिकाच. या नाटकांतील मुख्य पात्र म्हणजे खुद्द परिवर्तनच. या पुस्तकांत नमूद केलेले बदल खुद्द अमेरिकनांनाहि अनपेक्षित होते. बाकीच्या जगाप्रमाणेंच आम्ही अमेरिकन लोकहि परिस्थितीच्या प्रवाहांत सांपडलों असून, सर्वांबरोबरच वाहात चाललो आहोंत. पण एक आशादायक चिन्ह म्हणजे लोकशाही रचना कायम ठेवून या अपरिहार्य परिवर्तनाला आम्ही तोंड देत आहोंत. दुसरी गोष्ट म्हणजे व्यक्तिगत स्वातंत्र्याची अत्यंत प्रिय अशी महान् परंपराहि आम्ही जतन केली आहे.

पुस्तकांत उल्लेखलेलें एक मोठें परिवर्तन म्हणजे अलगवादाचा शेवट. आज खुद्द अमेरिकन लोकांनाहि अलगवाद संपला आहे, याची जाणीव आहे. या पुस्तकांत सदर घटनेचा राजकीय इतिहास निवेदन करण्याचा या ठिकाणीं हेतू नाहीं. पण हें परिवर्तन घडून आलें आहे, याकडे जगाला किंवा अमेरिकेला दुर्लक्ष करून चालणार नाहीं. या परिवर्तनामुळें आलेल्या जबाबदारीला तोंड देण्याची कितीहि नाखुषी असली तरी काळाचा ओघ उलटा फिरवितां येणार नाहीं हें उघड आहे. सर्व परिवर्तनांत कदाचित हेंच परिवर्तन महत्त्वपूर्ण ठरेल.

या काळांत इतर देशांनींहि उल्लेखनीय प्रगति केली आहे, याची मला जाणीव आहे. तसेंच केवळ अमेरिकाच परिवर्तन व प्रगति करूं शकते, हें दाखविण्याचाहि माझा हेतू नाहीं. पण हें पुस्तक अमेरिकन जीवनांतील स्थित्यंतरांसंबंधीं असल्यामुळ त्यांत अमेरिकेंतील परिस्थितीचाच उहापोह असणें क्रमप्राप्त आहे.

—फ्रेडरीक ल्युइस ॲलन

ग्रं. क्र. ८९३

# भाग पहिला

# जुनी समाज रचना

## प्रकरण १ : नवीन शतकाचा आरंभ

ता. १ जानेवारी १९०० ची सकाळ. थंडी कडाक्याची होती, पण तीमुळें आदल्या दिवशीं रात्रीं न्यूयॉर्कच्या लोअर ब्रॉडवेमध्यें जमलेल्या प्रचंड जनसमुदायाच्या उत्साहावर कांहीं विरजण पडलें नव्हतें. विसाव्या शतकाचें म्हणा किंवा एकोणीसाव्या शतकांतील शेवटच्या वर्षाचें म्हणा स्वागत करण्याकरितां हे लोक जमले होते.

न्यूयॉर्क टाईम्स आपल्या ता. १ जानेवारी १९०० च्या अग्रलेखांत म्हणतो, "सन १८९९ हें व्यापार व उत्पादन या दोन्ही बाबतींत आश्चर्यकारक वर्ष होतें. नवीन वर्ष तर गतवर्षापेक्षांहि उज्ज्वल जाईल, असें दिसतें."

या वेळचें एक बडें प्रस्थ म्हणजे जॉन पी. मॉर्गन. तो जगांतील सर्वांत मोठ्या बँकेचा प्रमुख व अमेरिकन उद्योगधंद्यांतील सर्वांत प्रभावी माणूस होता. नूतन वर्षारंभीं, मॉर्गन-जवळ आपण येत्या बारा महिन्यांत काय उलाढाली करणार आहोंत याची रूपरेखा नसेलहि. पण याच काळांत यूरोपच्या दौऱ्यावर जाऊन तो विपुल प्रमाणांत चित्रें, ग्रंथ व हस्तलिखितें खरेदी करणार होता; मुलीच्या विवाहासाठीं जमणाऱ्या चोवीसशें पाहुण्यासाठीं आपल्या वाड्यानजीकच एक मोठें नृत्यदालन ( बॉलरुम ) बांधणार होता; आणि याच वर्षीं म्हणजे सन १९०० मध्यें विना प्राप्तीकर दोन कोटि तीस लाख डॉलर उत्पन्न असलेल्या व पोलादाचा राजा म्हणून प्रसिद्ध असलेल्या ॲन्ड्र्यू कार्नेगीबरोबर, जगांतील सर्वांत मोठ्या अशा युनायटेड स्टेट्स स्टील कार्पोरेशन या कारखान्याची उभारणी करण्याकरितां वाटाघाटी करणार होता. मॉर्गनला कशाचीहि ददात नव्हती. मॉर्गनचा भावी जांवई व त्याचा एक सहृदय चरित्रकार म्हणतो,

"मॉर्गनचें घर त्याला पाहिजे तेथें, व त्याच्या रहाणीला योग्य असेंच होतें. सौ. मॉर्गन एक सुगृहिणी असून त्यांच्या लुईसा व ॲनी या दोन्ही अविवाहित मुली

त्यांच्याजवळ होत्या. त्यांचीं विवाहित मुलें व नातवंडें सारीं सुखांत होतीं. मॉर्गनची प्रकृति चांगली होती. त्याचे मित्रहि जवळपास होते. त्याच्या सामाजिक जगांतील लोक त्याच्यासारखेच होते. त्याचा ज्या पेढीवाल्यांशीं व व्यवसायी मंडळीशीं सहवास येई, त्यांच्याहि कल्पना व दृष्टिकोन मॉर्गनपेक्षां फारसा भिन्न नव्हत्या. एकंदरींत न्यूयॉर्क शहर त्यांना अद्यापहि रहाण्याच्या दृष्टीनें रम्य वाटे. ”

पण याच न्यूयॉर्क शहरांत हजारों लोक असे होते कीं, त्यांना तें शहर खायला येत आहे, असें वाटे. शहराच्या पूर्व बाजूस आज आपला विश्वास बसणार नाहीं इतकें दारिद्र्य, घाण व हालअपेष्टा दिसून येई. अमेरिकेंतील अनेक शहरें व औद्योगिक केंद्रांत पोटासाठीं आलेलीं जीं अनेक परदेशी कुटुंबें रहात होतीं, त्यांचे हाल तर कुत्रा खात नव्हता. शिकॅगो येथील अशा पोल, लिथुआनियन, स्लोव्हॅक वगैरे कामगारांच्या भीषण परिस्थितीविषयीं अप्टन सिंक्लेअर यानें रेखाटलेलें हें हृदयद्रावक चित्र पहा :

“ युरोपांतील शिरजोरी सत्तेमुळें बेजार होऊन हे बिचारे अडाणी लोक अमेरिकेंत आले. पण अमेरिकेंतील बेपर्वाई वागणुकीमुळें त्यांचे पुरे धिंडवडे निघाले. घरमालकांचे दलाल, राजकीय दुष्टाचार्य...आणि त्यांचे हक्क न मानणारे न्यायाधीश यांनीं त्यांना पुरें फशीं पाडलें. बिचाऱ्यांचीं अर्भकें त्यांच्या भिकार झोंपड्याभोंवतालच्या घाणेरड्या पाण्याच्या डबक्यांत बुडून मेलीं, त्यांच्या मुलीबाळींना कुंटिणखान्यांत जावें लागलें, आणि मालकांनीं संरक्षणाची कांहींच योजना न केल्यामुळें त्यांचे मुलगे काम करतांना उकळत्या पिपांत पडले तरी ना दाद ना फिर्याद. ”

ना दाद ना फिर्याद—असं कां ? कारण तो काळच मुळीं जें जें होईल तें तें पहावें, अशा तऱ्हेचा होता. एकोणिसाव्या शतकांतील मंदीचा शेवट झाल्यावर, अमेरिकेंतील आर्थिक विषमतेविरुद्ध उठणारे आवाजहि दुबळे झाले होते.

आगामी काळाबद्दल मॉर्गनसारखे लोक मोठे आशावादी होते. या काळांत स्थैर्य येईल, कर्तबगारीला वाव मिळेल, असा त्यांना विश्वास वाटत होता. त्यावेळीं समानतेच्या कल्पना मूर्खपणाच्या समजल्या जात व राज्यकारभारांत त्यांचा शिरकाव होऊं नये यावर कटाक्ष. अमेरिकन उद्योगधंद्यांचीं सूत्रें राजकारणी लोकांच्या हातांत न रहातां तीं आपल्या-सारख्या सधन व प्रतिष्ठित लोकांच्या हातांत राहिलीं पाहिजेत, असें मॉर्गनला वाटे.

पण या पुढच्या अर्ध शतकांत अमेरिकेंत ज्या गोष्टी आल्या त्यांची मॉर्गनला अगाऊ जाणीव झाली असती तर तो दिङ्मूढ झाला असता. १९०० मधील अमेरिका

व अनेकविध आणि अनेक वेळां परस्परविरोधी प्रवृत्तींनीं निर्माण केलेली आजची अमेरिका यांत किती अंतर! मॉर्गनच्या कल्पनासृष्टींतहि आजची अमेरिका येणें शक्य नव्हतें. पण आजच्या याच अमेरिकेंत आश्चर्यकारक उत्पादन आणि भरभराटीची जास्तींत जास्त विभागणी यांचा मिलाफ झाला आहे.

नंतर झालेल्या या प्रचंड स्थित्यंतराचें स्वरूप समजावून घेण्याकरितां प्रथम आपण सन १९०० मधील अमेरिकेंतील परिस्थिति व रहाणी पाहूं.

## २

समजा, कांहींतरी चमत्कार होऊन तुम्ही सन १९०० च्या अमेरिकेंत गेला आहात व आजच्या डोळ्यांनीं ती पहात आहात. अमेरिकन शहरांतील मुख्य रस्त्यावर आल्यावर तुमच्या तोंडून पहिलेच आश्चर्योद्गार बाहेर पडतील, " अरेच्या, जिकडे तिकडे घोडेच घोडे ! "

सन १९०० मध्यें साऱ्या अमेरिकेंत फक्त १३८२४ मोटारी होत्या. (सन १९५० मध्यें मोटारींची हीच संख्या ४ कोटि ४० लक्षांवर गेली होती.) सन १९०० मध्यें मोटारी म्हणजे धाडशी व खेळाडू श्रीमंतांचा खेळ समजला जाई. कोणत्याहि क्षणीं या अगम्य यांत्रिक वहानानें हाडें मोडून घेण्याची ज्यांची तयारी असे, असेच हौशी श्रीमंत मोटारी बाळगत. शहरें सोडलीं तर त्यावेळीं इतरत्र फरसबंदी असे प्रशस्त रस्ते जवळजवळ नव्हतेच. तसेंच रस्त्यांच्या कडेकडेला मोटारींचे तबेले किंवा पेट्रोल पंप नव्हते. प्रत्येक मोटारवाल्याला स्वतःच मोटार दुरुस्त करण्याची माहिती असणें आवश्यक असे.

त्या काळीं वहातुकीकरितां लोकांना सर्वस्वी आगगाड्या, घोडे आणि खटारे यावर अवलंबून रहावें लागे. टेलिफोन तुरळक होते व रेडिओ तर अस्तित्वांतच नव्हते. अशा स्थितींत समाजांतील भिन्नभिन्न लोक एकमेकांपासून किती दुरावलेले असत याची कल्पनाच केलेली बरी. रेल्वेमार्गावर नसलेलीं गांवें खरोखरीच लांब पल्ल्यावर असत. सहाजिकच त्यावेळीं प्रत्येक प्रदेश, प्रत्येक गांव इतकेंच काय पण प्रत्येक शेत हें उत्पादन, सामाजिक दळणवळण, करमणूक वगैरे गरजांबाबत आपल्याच साधन-सामुग्रीवर प्रामुख्यानें अवलंबून असे. प्रवास व वहातुकीच्या दृष्टीनें विचार केला तर अमेरिका म्हणजे फारच अफाट देश वाटे.

आज आटोक्यापलीकडील आर्थिक, राजकीय व आंतरराष्ट्रीय घटनांच्या धकाधकींत आपण सांपडूं कीं काय अशी आपल्याला नेहमीं धास्ती वाटते. आज जीवन असुरक्षित झालें आहे. पण अशी धास्ती त्यावेळीं फारशी नव्हती. त्यावेळीं लोकांचीं क्षितिजें नजीकच होतीं. ते आपल्या परिचयाच्या लोकांत आणि परिचयाच्या वातावरणांत रहात. आपल्यासारख्याच मंडळीशीं, कुटुंबांशीं व ग्रामस्थांशीं त्यांचा बव्हंशीं संबंध येई. परस्परांना समजतील असे त्यांचे विचार असत. माणसाचें यशापयशहि त्यावेळीं नंतरच्या काळापेक्षां त्याच्या दृष्टिक्षेपांतील प्रवाह व घडामोडीवरच अवलंबून असे. आज आपलें भवितव्य इतकेंच नव्हे तर आपलें जीवनहि वॉशिंग्टन, बर्लीन किंवा मॉस्कोमध्यें घेण्यांत येणाऱ्या निर्णयांवर अवलंबून आहे ही जाणीव आढळून येते. पण त्या काळच्या लोकांना तसें क्वचितच वाटत असे. त्यांच्या भोंवतालचें जग कदाचित् मित्रत्वाचें नसेल, पण तें निदान आकलनीय तरी खासच होतें.

## ३

सन १९०० मध्यें आणखी जरा इकडे तिकडे फिरल्यावर तुमच्या तोंडून दुसरे आश्चर्योद्गार बाहेर पडले असते, "काय हे पायघोळ झगे!"

त्यावेळच्या प्रत्येक शहरवासीय स्त्रीचा पोषाख पायघोळ असे. रस्त्यावरून फरफटत जाणारे त्यांचे पायघोळ झगे हे झाडूंचेंच काम करत असें म्हणाना! झग्यांचीं टोकें हातांत धरून चालले नाहीं तर त्यांच्या किनारी धुळीनें माखून काळयाकुट्ट व्हाव-याच्याच. सन १९०० मधील अमेरिकन स्त्री केवळ पायघोळ झगे घाली असें नव्हे तर ती एकावर एक अशा अनेक कपड्यांत गुरफटलेली असे. खेडूत–इतकेंच नव्हे तर गोल्फ किंवा टेनिस खेळणाऱ्या स्त्रियांचे झगे फार तर जरा आंखूड अगर जमिनीपासून दोन तीन इंचापर्यंत लोंबणारे असत. त्यांच्या टोप्याहि खलाशी पद्धतीच्या व दणकट असत व अगदीं नाइलाज म्हणून त्या टोप्या वापरत. कोणताहि ऋतु असो, तत्कालीन स्त्री कपड्यांत गुरफटलेली असे. तत्कालीन स्त्रियांच्या कांचोळ्या तर अक्षरशः तुरुंगच.

आजच्या मानानें पाहिलें तर पुरुषांचे पोषाखहि औपचारिक व दुःसह होते. प्रतिष्ठित लोक तर नेहमींच्या बोजड पेहेरावाशिवाय वर आणखी एक कडक शर्ट चढवीत. पेढीवाले, उद्योगव्यवसायांतील अंमलदार बहुधा कचेऱ्यांत जातांना लांब

कोट व उंच टोप्या घालत. मोकळ्या प्रदेशाशिवाय इतरत्र उघड्या माथ्यानें हिंडणें ही प्रतिष्ठित पोषाख केलेल्या व्यक्तीला कल्पनाच करवत नसे.

त्या वेळच्या अमेरिकन पोषाखावरून स्त्री–पुरुषांचे परस्पर संबंध कसे असावेत, यासंबंधींच्या कल्पनांवर प्रकाश पडतो. आदर्श स्त्री म्हटली कीं तिला पुरुषाचा आधार पाहिजेच आणि ती केवळ वस्त्रप्रावरणांत गुरफटलेली अशी न रहातां तिच्या ठिकाणीं पावित्र्य व औचित्य यांचा विकास झाला पाहिजे. आणि आदर्श पुरुषानें—मग तो सच्चेपणाचा पुतळा असो कीं रंगेल स्वैराचारी असो-जागरूकपणें आपल्यावर जिचा भार अशा या नाजूक ललनेचें व तिच्या प्रतिष्ठेचें संरक्षण केलें पाहिजे. अविवाहित मुलगी त्यावेळीं कोणातरी प्रौढ विवाहित स्त्रीला सोबतीला घेतल्याशिवाय संध्याकाळनंतर घराबाहेर पडूं शकत नसे.

अर्थात् ज्या राष्ट्रांत एकंदर स्त्रियांपैकीं २०·४ टक्के स्त्रिया पोटाकरितां काम करत, त्या राष्ट्रांत स्त्रियांविषयींच्या वरील कल्पना टिकविणें अर्थातच कठीण होतें. आणि डोळ्यांसमोर असलेल्या या सत्य परिस्थितीमुळें तत्कालीन नीत्युपदेशक बरेच चिंताक्रांत झाले होते. लोकांची अशी समजूत होती कीं प्रतिकूल आर्थिक परिस्थितीमुळें व गरीब बिचाऱ्या बापांना पोसण्याची ताकद नसल्यामुळें कचेऱ्यांतून काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या वाढत आहे. कचेऱ्यांतील धटिंगण पुरुषांशी आलेल्या सहवासामुळें या नोकरीवाल्या स्त्रियांचें पावित्र्य न बिघडो, अशी आशा केली जाई. आणि दुकानें आणि कारखान्यांतून आठवड्याला जेमतेम सहा डॉलर्स वेतनावर काम करणाऱ्या लाखों कामकरी स्त्रिया ! त्यांच्याबद्दल बोलावयासच नको. त्यांच्यापुढें भयंकर मोह सदा आ वासून उभा आहे, असें वाटे. या नोकरीवाल्या स्त्रियांशिवाय मोलकरणींचीं कामें करणाऱ्या मुलीहि अनेक होत्या. पण शहरांतील मोलकरणी या स्थलांतरित किंवा नीग्रोमधून आलेल्या असल्यामुळें त्यांची परिस्थिति सुधारण्याचा प्रश्नच नव्हता. त्यांचें मोहापासून संरक्षण करण्याकरितांच जणूं काय त्यांना फुरसतहि थोडीच दिली जाई !

जर एकाद्या खानदानी मुलीला निर्वाहाकरितां काम करण्याची पाळी आली तर तिनें शाळामास्तरीण, संगीतशिक्षिका, नर्स म्हणून काम करावयास समाजाची हरकत नव्हती. निसर्गदत्त देणगी असलेल्या बाईनें लेखिका किंवा कलावंत किंवा गायिका होण्यासहि आक्षेप नव्हता. कांहीं स्त्रिया आपलें सामाजिक स्थान गमाविण्याचा धोका पत्करून रंगभूमीवरहि गेल्या. तसेंच कांहीं आत्यंतिक कळकळीच्या स्त्रियांनीं समाजाचा

सर्व प्रकारचा विरोध पत्करून डॉक्टरीसारखे व्यवसाय पत्करले. नवलाची गोष्ट म्हणजे हे धंदे स्त्रियांच्या दृष्टीनें वावगे समजण्यांत येत नव्हते. पण त्यांच्याबाबतींत एक हमखास मुद्दा मांडण्यांत येत असे व तो म्हणजे या पोरी पैसे मिळविण्याच्या मागें लागून आपल्या बापाला निष्कारण पेंचांत टाकतात. मुलीला पोसण्याची बापांत ताकद नाहीं, असें त्यामुळें कोणाला वाटायचें ! मुलीच्या बाबतींत उत्तम मार्ग म्हणजे तिनें घरीं राहून आईला घरकामांत मदत करावी व योग्यवेळीं अनुरूप नवरा मिळून संसार थाटण्याची वाट पहावी.

४

यानंतर थोडासा प्रवास केल्यावरहि, सन १९०० च्या अमेरिकेंतील शहरें व गांवें किती लहान आहेत, हें तुमच्या नजरेस आलें असतें. पुढच्या पन्नास वर्षांच्या मानानें पहातां त्यावेळीं अमेरिकेची ( युनायटेड स्टेट्सची ) लोकसंख्या सुमारें निम्मी होती. सन १९५० मध्यें अमेरिकेची लोकसंख्या पंधरा कोटिंहून अधिक झाली तर सन १९०० मध्यें ती सात कोटि साठ लाखांहूनहि कमी होती. आणि आज जेथें खेडीं आहेत तेथें उघडीं मैदानें आणि शहरें आहेत तेथें खेडीं दिसलीं असतीं. विशेषतः त्यावेळचीं शहरें व उपनगरें यांच्यांतील भेद ठळकपणें लक्षांत आला असता.

अमेरिकेच्या पश्चिम भागांतील तुरळक वस्ती पाहून तुमच्या लक्षांत आलें असतें कीं त्या काळीं अमेरिकन औद्योगिक व सांस्कृतिक केंद्रें कितीतरी दूर अशा पूर्व भागांत होतीं. आणि या पूर्वेकडील शहरांतूनसुद्धां अद्यावत् शहरीं जीवनांतील आजच्या कित्येक सर्वसामान्य गोष्टी आढळून आल्या नसत्या. उदाहरणार्थ स्कायक्रेपर्स किंवा गगनचुंबी इमारती. त्यावेळची देशांतील सर्वांत उंच इमारत म्हणजे न्यूयॉर्क येथील आयव्हिन्स सिंडीकेटची इमारत. ती २९ मजली असून टॉवर धरून तिची उंची फार तर ३८२ फूट झाली असती. इतर शहरांतून तर दहा बारा मजली इमारती कौतुकाचा विषय बनल्या होत्या.

त्यावेळीं रस्त्यावर विजेचे दिवे जवळजवळ नव्हतेच. बत्तीवाला आपली शिडी दिव्याच्या खांबाला लावून शिडीवर चढला आहे व गॅसची बत्ती पेटवत आहे असें दृश्य बहुतेक शहरांतून संध्याकाळीं दिसावयाचेंच. तसेंच त्यावेळीं प्रसिद्धिकलेंतहि रोषणाईचा उपयोग फारसा आढळून येत नव्हता.

92392
27.1.55



शहरांतील वहातुकीबाबत बोलावयाचें म्हणजे त्यावेळीं जमिनीखालचा असा एकच रस्ता व तोहि बॉस्टन येथें छोटासाच होता. मात्र सन १९०० मध्यें तसा दुसरा रस्ता तयार करण्याच्या हेतूनें न्यूयॉर्कमधील जमीन खणण्यांत आली होती. बहुतेक शहरवासी लोक शहरांत ट्रॉलीमधून फिरत. कोपऱ्यावर वळणें घेतांना त्यांच्या चाकांचा होणारा कर्कश आवाज म्हणजे आधुनिक युगाची नौबत, असें खेडूत लोक मानत.

रेल्वे किंवा ट्रॉलीमार्गापासून अगदीं नजीकच शहरांतील घरें बांधलेलीं असत. पहाणाराला सभोंवारच्या रिकाम्या मैदानांत एकेक किंवा दोनदोन कुटुंबांच्या घरांच्या लांबलचक रांगा भकासपणें डोकावत आहेत, असा भास होई. अधिक सुस्थितींतील लोकांच्या घरांभोंवतीं हिरवळी किंवा लॉन्स असत. त्यावेळींहि उपनगरांतील अनेक लोक रेल्वेनें शहरांत कामावर येत. पण हीं शहरें नंतरच्या मोटारयुगांतील शहरांपेक्षां अगदींच वेगळीं होतीं. ज्यांना घोडागाडी ठेवण्याची ऐपत होती किंवा ज्यांची प्रकृति काटक होती, त्यांनाच रेल्वे किंवा ट्रॉलीमार्गापासून दूर वास्तव्य करणें परवडे. याचमुळें उपनगरें लहान असून त्यांच्यामागें उघडीं मैदानें पसरलेलीं असत. ज्या मोकळ्या मैदानांत व झाडांझुडपांत आपण रविवारीं मौजेनें फेरफटका करत असूं तोच भाग पुढें उपनगरांतील शेंकडों कुटिरांनीं गजबजून जाईल व तेथें मोटारींचा सुळसुळाट होईल अशी सन १९०० मध्यें कोणाला कल्पनाहि नसेल!

सन १९०० च्या सुमारास अमेरिकेंत खेळण्याकरितां खूपच विस्तृत प्रदेश होता. हजारो मैलांचा समुद्रकिनारा, शेंकडो तलाव, नद्या व डोंगर रिकामे होते. कोणाचीहि पर्वा न करतां तेथें तुम्ही मनमुराद मौज करूं शकत होता; छावण्या ठोकूं शकत होता, पोहण्याचा आनंद लुटूं शकत होता, शिकार करूं शकत होता आणि मासेमारीचा षोक भागवूं शकत होता. अमेरिकन लोकांनीं जमिनींची नासाडी चालविली आहे, जंगलांची बेगुमान मोडतोड होत आहे, शेतजमिनींचा दुरुपयोग आणि त्याबरोबर फाजील उपयोग केला जात आहे, साधनसामुग्रीची वाटेल तशी नासधूस चालली आहे, अशी दूरगामी अमेरिकन शेती–तज्ञांची पिढ्यान्‌पिढ्या ओरड होती. पण ही ओरड बहुतेकांना निरर्थक वाटे. अरे, एक जंगल गेलें म्हणून झालें काय, इतर कित्येक जंगलें पडलीं आहेत, असें लोक म्हणत. निसर्गसंपत्ति अपरंपार आहे, अशी लोकांची समजूत.

त्यावेळच्या शहरांत वाढलेल्या मुलांना खेड्यांतील शेतकरी म्हणजे भाषेव्यतिरिक्त इतर सर्व दृष्टींनीं एक वेगळीच जमात वाटे. आणि तसें तरी कां वाटूं नये? मोटारी नव्हत्या, रेडिओ नव्हते, खेड्यांत टपालाची व्यवस्था नव्हती, दांडगा खप असलेलीं नियतकालिकें नव्हतीं आणि बऱ्याच ठिकाणीं तर अगदीं प्राथमिक शिक्षणाशिवाय पुढच्या शिक्षणाची व्यवस्था नव्हती. खेडुतांना शहरांत जाण्याचे प्रसंग अगदीं दुर्मिळ असत. थोडक्यांत आपल्याच खेड्यांत स्थानबद्ध करून ठेविल्यासारखी या खेडुतांची स्थिति असे. भावी पिढ्यांच्या मानानें त्यांचें जग अधिक आकलनीय व म्हणून कमी भीतिदायक होतें. पण त्याबरोबरच तें विश्वास न बसण्याइतकें मर्यादित होतें.

५

सन १९०० च्या निरीक्षणांत तुम्हांला क्षणोक्षणीं आढळून आलें असेल कीं ज्या वस्तू आज सामान्य गरजेच्या वाटतात, त्यांचा त्यावेळीं सर्वस्वी अभाव किंवा टंचाई होती.

उदाहरणार्थ विजेची सोय व साधनें. जे खरोखरीच सधन होते, त्यांच्या घरींहि वीज नव्हती. नव्यानें घरें बांधणारे लोक आतां कोठें विजेचे दिवे बसवूं लागले होते. पण विजेचा प्रवाह एकदम थांबल्यास घोटाळा होऊं नये, यासाठीं ते वीजेबरोबरच गॅसचीहि सोय करत. पण शहरांतील बहुतेक लोकांच्या घरांतील दिवे अद्यापहि गॅसवर चालत व खेड्यांत तर दिव्याकरितां तेल वापरत.

अर्थात् त्यावेळीं विद्युत् शीतपेट्या ( रेफ्रिजरेटर्स ) नव्हत्या आणि विद्युत् धुलाई-यंत्रें, हिमपेट्या वगैरेबद्दल बोलावयासच नको. त्यावेळीं जीं हिमगृहें होतीं त्यांत हिंवाळ्यांत गोठलेल्या नद्या व तलावावरील कापलेले किंवा उत्तरेकडील प्रदेशांतून आयात केलेले बर्फाचे मोठमोठे तुकडे लांकडाच्या भुश्यांत खोल पुरून ठेवण्याची व्यवस्था असे. जरूर तेव्हां भुस्सा झाडून हा बर्फ उपयोगांत आणण्यांत येई. शहरांत रहाणाऱ्या लोकांच्या दारांत बर्फ कंपनीची गाडी येई व बर्फवाला त्यांच्या हिमपेटींत भला मोठा बर्फाचा तुकडा टाकून निघून जाई.

यावेळीं, अमेरिकेच्या रेल्वेवरून शीतसाधक गाड्या ( रेफ्रिजरेटर कार्स ) धांवावयास लागून बरींच वर्षें झालीं होतीं. पण ताजी फळें व ताजी भाजी यांची व्यापक प्रमाणा-

वरील राष्ट्रीय वहातुक अद्याप बाल्यावस्थेंतच होती. सन १९५० च्या माणसाला सन १९०० चा आहार पाहून धक्काच बसला असता. देशाच्या बहुतेक भागांत वर्षांतून जवळजवळ पांचसहा महिने ताजी फळें व हिरवी भाजी पहायला मिळत नसे. या काळांत ते पोळी, बटाटे, गरम पाव यासारख्या केवळ पिठूळ आहारावर असत. आज केवळ असें अन्न कोणाला तोंडांत घालवणार नाहीं.

गेलें शतक संपण्याच्या सुमारास सर्व शहरांतील बहुतेक सधन लोकांच्या घरांतून पाण्याचे नळ, आंघोळीचीं छोटीं पिंपें ( बाथटब ) व पैखाने दिसूं लागले होते. असें असलें तरी हमरस्त्यांवरील अनेक सुंदर घरांतून अद्यापहि आंघोळीची एकच खोली असे. आणि कारखान्यांतील कामगार व शेतकरी ( कदाचित् मोठ्या शेतीचे मालक सोडल्यास ) यांना स्वप्नांतहि या सुखसोयी पहावयास मिळत नव्हत्या. इतकेंच काय पण शहराच्या ज्या भागांत पाण्याचे नळ आणि नाले गेलेले नव्हते, तेथील सुखवस्तू लोकांच्या घरांतहि आंघोळीच्या खोल्या असणें मुष्किलीचें होतें.

एखाद्या विलासी हॉटेलमध्यें तुम्ही जादा आकार दिला तर खासगी आंघोळीची व्यवस्था असलेली खोली मिळूं शके. पण प्रत्येक पाहुण्याला माफक दरांत खासगी आंघोळीच्या सोयीसह खोली मिळण्याची प्रथम व्यवस्था सन १९०७ मध्यें एल्सवर्थ एम्. स्टॅटलरनें बांधलेल्या हॉटेलमध्येंच केली गेली.

त्याकाळीं व्यक्तिगत स्वच्छतेची कल्पना कदाचित् इतकी रुळली नसेल. मात्र त्या वेळची एक संवय तुम्हांला घाणेरडी वाटेल. ती म्हणजे तंबाखू चघळण्याची. पूर्व अमेरिकेंतील शहरांत अधिकाऱ्यांच्या टेबलाजवळ पिकदाण्या ठेवलेल्या असत. तरीहि इतर लोकांच्या समोर तंबाखू खाऊन थुंकणें प्रतिष्ठित लोकांना पसंत नसे. पण पश्चिम व दक्षिण भागांत थुंकण्याच्या बाबतींत विधिनिषेधच नसे. विशेषतः दणकट पुरुषांचा तो एक हक्कच समजला जाई. पाहिजे त्या जागेची ते पिकदाणी करून पचकन् थुंकत.

सन १९०० पासून ही जुनी अमेरिकन संवय कमी कमी होत जाण्याचें एक कारण म्हणजे तंबाखूचा निराळा उपयोग केला जाऊं लागला हें असावें. सन १९५० च्या मानानें सन १९०० मध्यें अमेरिकेची लोकसंख्या निम्मी असतां लोक थोडेसे अधिक चिरूट ओढत, चिलिमीकरितां बरीच तंबाखू वापरत आणि कितीतरी अधिक प्रमाणांत तंबाखू चघळत. त्यावेळीं पुढच्या पन्नास वर्षांच्या मानानें ते फक्त शंभरावा हिस्सा

सिगारेटी ओढत. सन १९०० मध्यें अमेरिकेंत चार अब्ज सिगारेटी तयार झाल्या, तर सन १९४९ मध्यें तीनशें चौऱ्यांशीं अब्ज सिगारेटी तयार झाल्या.

सन १९०० मध्यें अमेरिकेंतील टेलिफोन म्हणजे एक किचकट काम असून त्यांची संख्याहि अगदींच तुरळक होती. त्यावेळीं प्रामुख्यानें व्यापारी कचेऱ्या आणि ज्यांना नवीन यांत्रिक उपकरणांशीं प्रयोग करण्याची हौस असे सुखवस्तू लोक यांच्याच घरीं टेलिफोन होते. त्यावेळीं सर्व देशांत फक्त १३,३५,९११ टेलीफोन होते. त्याच ठिकाणीं सन १९५० मध्यें ४,३०,००,००० टेलीफोन झाले.

आणि नंतरच्या काळांत, सर्व वर्गांच्या व दर्जाच्या अमेरिकनांना एकाच प्रकारच्या बातम्या, माहिती व मनोरंजनात्मक कार्यक्रम पुरविणारीं अशीं सार्वत्रिक दळणवळणाचीं जीं साधनें, त्यांचाहि त्यावेळीं बहुतेक अभाव होता. अमेरिकेंत रेडिओ यावयाला आणखी वीस वर्षें होतीं. ज्या टेलीव्हिजनचा प्रसार आजहि अगदीं मर्यादित आहे, तो टेलिव्हिजन येण्यासहि अद्याप पंचेचाळीस वर्षें अवकाश होता. त्यावेळचे चित्रपटहि ओबडधोबड होते. कथानक असलेला असा "दि ग्रेट ट्रेन रॉबरी" हा पहिला चित्रपटहि पुढें तीन वर्षांनीं तयार झाला. दहा लाखांवर खप असलेलें एकहि नियतकालिक त्यावेळीं नव्हतें.

यामुळें सर्व भागांतील व सर्व क्षेत्रांतील लोकांच्या माहितीचें व सामान्य ज्ञानाचें क्षेत्र मर्यादित होतें. त्यावेळीं मेन येथील कोळी, ओहिओ येथील शेतकरी आणि शिकॅगोचा व्यापारी एकमेकांशीं राजकारणाची चर्चा करूं शकत, पण ती अगदींच जुजबी असे. सार्वत्रिक खप असलेल्या वर्तमानपत्राभावीं त्यांची माहिती बव्हंशीं परस्पर-विरोधी अशा स्थानिक वृत्तपत्रांवर अवलंबून असे. तसेंच त्या वेळीं आजच्याप्रमाणें हा हॅरी ट्रूमन, हा बॉब होप, हा व्हॅन जॉन्सन, ही बेट्टी हटन याप्रमाणें प्रसिद्ध व्यक्ति ओळखण्याचें सामान्य साधन नव्हतें.

ज्याप्रमाणें सार्वत्रिक दळणवळणाच्या साधनांचा अभाव होता, त्याचप्रमाणें आज गृहीत मानल्या जातात अशा अनेक सामाजिक संस्थाहि त्यावेळीं नव्हत्या. अमेरिका म्हणजे व्यक्तिनिष्ठांचें राष्ट्र. प्रत्येकाला तेथें स्वतंत्र घटक म्हणून वावरण्याची संवय झाली होती अशा स्थितींत आपलें राष्ट्र परस्परावलंबित्वाच्या काळांत प्रवेश करत आहे, हें दिसत असूनहि या नव्या कालाला अनुरूप अशा संस्थांची जरूरी आहे हें मान्य करण्याची व त्याहिपेक्षां त्या उभारण्याची भारीच ढिलाई दिसून येत होती.

उदाहरणार्थ पश्चिम विभागांतील एकाद्या शहरांत मुलांच्या खेळण्याची व शिक्षणाची काय व्यवस्था होती ? आतांपर्यंत मुलांनीं ल्हर लागेल त्या तलावांत जाऊन पोहावें व ल्हर लागेल तेथें खेळावें, असा प्रकार होता. पण कारखानदारीमुळें नद्यांचे पाणी बिघडण्यास सुरुवात झाली होती, उघड्या प्रदेशांत बांधकाम व मशागत होऊं लागली होती, पूर्वींचीं नैसर्गिक क्रीडांगणें जात चालली होतीं आणि जुन्यांच्या जागीं नव्यांची तर फारशी व्यवस्था होत नव्हती.

त्यावेळीं हायस्कुलांतील छोटीं छोटीं वाचनालयें सोडलीं तर सार्वजनिक असें वाचनालय नव्हतेंच. तसेंच त्यावेळीं बालवीर संघटना, शाळेचें बॅन्ड पथक, शाळेचा ऑर्केस्ट्रॉ किंवा शालेय गंमत-जमत क्लब नव्हते.

६

सामुदायिक खेळांच्या विकासाबाबतींतहि हीच रडकथा होती. जुने रीतिरिवाज आणि व्यक्तिवाद अमेरिकनांच्या अंगीं अगदीं मुरलेले होते. बहुतेक अमेरिकन मुलें व माणसें उघड्या प्रदेशांत जशी सोय असेल त्याप्रमाणें शिकार, मासेमारी, पोहणें, अश्वारोहण वगैरे षोक भागवून घेत. लक्ष्यवेधांच्या ( टार्गेट शूटींग ) सामन्यांत भाग घेऊनहि बरेचजण आपली करमणूक करून घेत. बेसबॉल यापूर्वींच राष्ट्रीय खेळ बनला होता व लाखो अमेरिकन मुलें तो खेळायला शिकलीं होतीं. पण तो खेळायची चांगली सोय नव्हती. जे त्यांत प्रावीण्य संपादन करत, त्यांना गांवच्या संघांतून शेजारच्या गांवाविरुद्ध खेळण्याची संधि मिळे. आणि मुलींना तर या खेळांत वावच नव्हता. त्यांच्या नाजूक बांध्याला हा दणकट खेळ योग्य नाहीं, असें मानलें जाई.

असें असलें तरी, फुटबॉल, बेसबॉल, सॉसर वगैरे सामुदायिक खेळांचा शाळा-कॉलेजांतून झपाट्यानें प्रसार होऊं लागला होता. बास्केट बॉल हा खेळ मात्र अद्यापहि फारच थोड्या लोकांना माहीत होता. म्हाताऱ्या लोकांनाहि आवडणाऱ्या गोल्फ, टेनीस यासारख्या खेळांची लोकप्रियताहि झपाट्यानें वाढत होती. हजारों स्त्रीपुरुष सायकलींचा वापर करूं लागले होते. पण तत्कालीन खेळांचें निरीक्षण करतांना एक गोष्ट ठळकपणें लक्षांत येते व ती म्हणजे हे सारे खेळ प्रामुख्यानें पूर्व अमेरिकेंत व तेहि बव्हंशीं सुखवस्तू लोकांतच खेळले जात.

उदाहरणार्थ टेनिसचा प्रसार बव्हंशीं पूर्व अमेरिकेंत असून टेनिसचे वार्षिक सामनेहि पूर्वेकडील न्यूपोर्ट येथें होत. शिकॅगो येथें सन १८९३ मध्यें जागतिक जत्रा भरली.

होती, त्यावेळीं गोल्फचा खेळ तेथें जाऊन पोंहोचला होता. कॅलिफोर्नियांत यावेळीं कमींत कमी वीस तरी गोल्फ क्लब होते. गोल्फमधील निष्णात हौशी खेळाडूहि प्रामुख्यानें पूर्व अमेरिकेंतील सुखवस्तू वर्गांतून आलेले असून, उत्कृष्ट धंदेवाईक गोल्फ खेळाडू बहुतेक स्कॉच लोकच असत. उद्योगधंदेवाल्या लोकांना मात्र हा खेळ मूर्खपणाचा वाटत असे. “मैदानावर एक लहानशा पांढऱ्या चेंडूचा पाठलाग करणें हा काय खेळ म्हणायचा!” अशी ते या खेळाची चेष्टा करत.

१९ वें शतक संपण्याच्या सुमारास मैदानी खेळांचा प्रसार पूर्व अमेरिकेंतच होता. सामान्य लोक खेळ म्हणजे एक फॅशनच समजत. अद्याप म्युनिसिपल कचेऱ्यांतून टेनिसपटू, सार्वजनिक व्यवसायांतून गोल्फपटू उदयास येऊं लागले नव्हते. तसेंच निष्णात कॉलेज विद्यार्थ्यांचें संघ प्रचंड आखाड्यांत खेळण्याचे दिवसहि अद्याप दूर होते. पण असें दिसून येतें कीं पुढच्या काळांत अशा संघांतूनच अखिल अमेरिकन संघ निवडण्यांत येऊं लागले. खेळांमागून खेळांत कॅलीफोर्निया आघाडीवर येत चालला. देशाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत हायस्कूलच्या विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्यामधून निवडलेले हजारो संघ अस्तित्वांत आले.

# प्रकरण २ : श्रीमंत व गरीब

सन १९०० मधील अमेरिकन जीवन व पुढच्या अर्धशतकानंतरचें जीवन यांतील एक ठळक फरक म्हणजे श्रीमंत व गरीब यांच्यांतील तफावत. उसन्न, रहाणी व समाजांतील दर्जा या सर्वच दृष्टींनीं ही तफावत जाणवत होती. १९ वें शतक संपण्याच्या वेळीं संपत्ति आणि दारिद्य यांच्यांतील अंतर फारच मोठें होतें.

या तफावतीचें एक उदाहरण देतों. ॲन्ड्र्यू कार्नेगीच्या प्राप्तीचा मी या पूर्वीच उल्लेख केला आहे. सन १९०० मध्यें कार्नेगीचें त्यानें उभारलेल्या मोठ्या पोलाद कंपनींत साडे अठ्ठावन टक्के भांडवल होतें. त्या वर्षी या कंपनीला चार कोटि डॉलर फायदा झाला. म्हणजे कार्नेगीला एकट्याला दोन कोटि तीस लाख डॉलर मिळाले व हा फायदा विना प्राप्तीकर होता. सन १८९६ तें १९०० या पांच वर्षांच्या काळांत त्यांचें केवळ याच कंपनींतील वार्षिक सरासरी उत्पन्न एक कोटि डॉलर होते. शिवाय इतर मालमत्तेपासून मिळालेलें उत्पन्न वेगळेंच.

ज्यावेळीं कार्नेगीला विनाकर हें नबाबी उत्पन्न मिळत होतें, त्यावेळीं सर्व अमेरिकन कामगारांचें सरासरी वार्षिक उत्पन्न चारशें तें पांचशें डॉलरच्या घरांत होतें. एका तज्ञानें हें उत्पन्न वार्षिक ४१७ डॉलर ठरवलें तर दुसऱ्यानें तें ५०३ डॉलर असल्याचा अंदाज केला आहे. हे आंकडे सरासरी उत्पन्नाचे आहेत, किमान उत्पन्नाचे नव्हेत, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

थोडक्यांत कार्नेगीचें वार्षिक उत्पन्न सर्वसाधारण अमेरिकन कामगारांच्या उत्पन्नाच्या किमान वीस हजार पट होतें.

या ठिकाणींच मूलभूत तफावत आहे. कार्नेगी हा त्यावेळच्या अत्यंत सधन गृहस्थांपैकीं होता. पण त्याच्यासारखे लक्षावधि डॉलर उत्पन्न असणारे अनेक सधन लोक होते. त्यांच्या रहाण्यावरून हें स्पष्टच होतें. ही रहाणी कशी होती तें पाहूं.

पहिली गोष्ट म्हणजे या लक्षाधीशांनीं राजवाडेवजा इमारती बांधल्या. १९ व्या शतकाच्या शेवटच्या वर्षांत बऱ्याच अमेरिकन लक्षाधीशांना असें वाटूं लागले होतें कीं, सधन म्हटला कीं त्यानें रहाण्याकरितां नबाबी इमले उठविलेच पाहिजेत. ताबडतोब धनाढ्य व्हॅन्डरबिल्ट कुटुंबानें त्याप्रमाणें सुरवात केली आणि १८९० पर्यंत न्यूयॉर्कमध्यें या कुटुंबांचें सात भव्य इमले उठले.

यानंतर विल्यम के. व कार्नेलियस या लक्षाधीशांनीं फ्रेंच पद्धतीचे इमले बांधले. हे दोन्ही इमले उत्कृष्ट होते, न्यूयॉर्कमधील फिफ्थ ॲव्हेन्यू विभागाचे ते अलंकार समजण्यांत येत असत. पण या इमारतींची परदेशी रचना लुईस सुलीव्हॅन या शिल्प–शास्त्रज्ञाच्या करमणुकीचा विषय होऊन बसली होती. कोणतीहि इमारत, तींत वास्तव्य करणाऱ्या लोकांच्या जीवनाशीं अनुरूप असली पाहिजे, असें सुलीव्हॅनचें मत होतें. तो म्हणतो, " या इमारती पाहून तुम्हांस हसू येत नाहीं कां ?...शरीरानें मालक तींत रहात असेल...पण नैतिक, मानसिक व आध्यात्मिक दृष्ट्यां तो तींत राहूंच शकत नव्हता. थोडक्यांत मालक व त्याचें घर म्हणजें असत्यभाव, विसंगति व हास्यास्पदता यांचें प्रदर्शनच. "

१९ व्या शतकाच्या शेवटीं बांधण्यांत आलेल्या इमारतींत सर्वोत्कृष्ट इमारत म्हणजे जॉर्ज डब्ल्यू व्हॅंडरबिल्ट याचा उत्तर कॅरोलिनांतील ॲशव्हिल येथील बादशाही वाडा. या वाड्याला बिल्टमोर असें नांव देण्यांत आलें होतें.

या वाड्याचीहि बांधणी फ्रेंच होती. या वाड्यांत चाळीस शयनगृहें, भोजनाचें विस्तृत दालन, एक मुद्रणगृह, बुटीदार सज्जा, अडीच लाख ग्रंथ असलेलें ग्रंथालय व इतर अनेक सोयी होत्या. या वाड्याभोंवतीं २०३ चौरस मैलांची त्याच्याच मालकीची शेती होती. व्हॅन्डरबिल्ट हा शास्त्रीय शेतीचा व जंगलवाढीचा मोठा भोक्ता असल्यामुळें तेथें त्याला मनाप्रमाणें प्रयोग करण्यास वाव होता. जंगलाची निगा राखण्याकरितां त्यानें पिन्शॉट नांवाच्या एका तरुण अधिकाऱ्याची नेमणूक केली होती. व्हॅन्डरबिल्टच्या या शेती व जंगलविषयक प्रयोगाचे त्या वेळचा अमेरिकन शेतीखात्याचा सेक्रेटरी पॉल मॉर्टन यानें कौतुक केलें, पण त्याबरोबरच त्यानें त्याबद्दल पुढील खोंचक उद्गार काढलेः " अमेरिकन कॉंग्रेस शेतीखात्यासाठीं जेवढा पैसा खर्च करते, त्यापेक्षां व्हॅन्डरबिल्ट हा शेतीवर अधिक पैसा खर्च करत आहे. "

अर्थात् व्हॅन्डरबिल्ट कुटुंबानेंच तेवढे मोठमोठे वाडे व इमले बांधले होते, असें नव्हे. न्यूपोर्टजवळील गोएलेट, बेलमॉंट व बरवुईड, पामबिचजवळील फ्लॅगलर, लेकवूड येथील गोल्ड, फिलाडेल्फीयानजीकचा वाईडनर, पिटस्बर्ग येथील फिप्स वगैरे नांवांनीं विख्यात असलेले कांहीं इमले त्या काळच्या लक्षाधीशांनीं बांधलेल्या भव्य इमल्यांपैकींच होत.

पॉल बुर्जे या फ्रेंच कादंबरीकाराच्या मतें या बादशाही इमारतींतील सजावटींत नेमस्तपणा व संयम आढळून येत नसे. तो म्हणतो, " या वाड्यांतील फरसबंदी

जमिनीवर भरमसाट किंमतीचे उंची पर्शियन व पौर्वात्य देशांत बनविलेले गालिचे पसरलेले आढळून आले. तसेंच बुटीदार कापडाची जिकडे तिकडे खैरात करण्यांत आली असून भींतीवर अत्यंत मौल्यवान चित्रें टांगलेलीं होतीं. तसेंच जिकडे तिकडे दुर्मिळ फर्निचर व जेवणाच्या टेबलावर फुलें, कांचेचीं व चांदीचीं भांडीं यांची गर्दी दिसे."

हॅरी डेस्मॉंड व हर्बर्ट क्रॉली यांनीं "अमेरिकेंतील बादशाही वाडे" या पुस्तकांत इमारतींसंबंधीं जे विचार प्रदर्शित केले आहेत, तेहि समर्पक आहेत. लेखकांच्या मतें, अमेरिकन लक्षाधीशांनीं युरोपियन धर्तीवर बांधलेले इमले म्हणजे केवळ खासगी निवास-स्थानेंच नसून ते म्हणजे सार्वजनिक इमारतीसारखेच होते. ते म्हणतात, "या इमल्यांत कुळांची व आश्रितांची नुसती गर्दी झालेली असे. म्हणून या इमल्यांना भव्य अशा सार्वजनिक इमारतीच समजणें अधिक समर्पक ठरेल." ज्या देशांत कूळपद्धतीचा अभाव, त्या देशांत असे इमले म्हणजे विरोधाभासच होते.

कांहीं लक्षाधीशांना असे नबाबी थाटाचे वाडे पसंत नसत. उदाहरणार्थ जॉन मॉर्गन जरी राजाप्रमाणें रहात असला तरी रंगीबेरंगी भपक्यापेक्षां मर्दानी षोक त्याला आवडत असे. याला अपवाद फक्त एकच व तो म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं त्यानें आपल्याजवळील दुर्मिळ पुस्तकें व उत्कृष्ट कलाकृतींचा अपूर्व संग्रह ठेविण्यासाठीं बांधलेलें सुंदर संग्रहालय. मॉर्गनचा न्यूयॉर्क येथील वाडा शोभिवंत असण्यापेक्षां प्रशस्त होता. त्याचा हायलँड फॉल्स येथील वाडाहि विस्तीर्ण पण साधा होता. अमेरिकेंतील आजच्या बऱ्याच गांवांतील क्लबांच्या इमारतीहि त्यापेक्षां मोठ्या आहेत. त्याच्या लंडन येथील घरांत डच, फ्रेंच, स्पॅनिश, इंग्लिश वगैरे कलेच्या चहात्यांनाहि थक्क करणारा चित्रसंग्रह होता. पण बाहेरून हें घर कांहीं बादशाही वाड्यासारखें वाटत नव्हतें. या प्रमुख इमारती सोडतां मॉर्गनचें लंडनबाहेर परगण्यांत एक मोठें घर, ॲडीरॉनडॅक्स येथें हजार एकर जमीन, न्यूपोर्ट येथें मासेमारीकरितां खास व्यवस्था असून त्याला पाहिजे तेव्हां वापरतां याव्यात यासाठीं पॅरीस येथील ब्रिस्टॉल व रोम येथील ग्रँड हॉटेलमध्यें खास खोल्या राखून ठेविण्यांत आल्या होत्या. याशिवाय त्यानें ३०२ फूट लांबीची जी नौका बांधली होती, तिचाहि अटलांटिक किनाऱ्यावर किंवा भूमध्य समुद्रांत निवासस्थानासारखा उपयोग होई. मॉर्गननें इजिप्तमध्यें केव्हांहि असतांना विहाराकरितां उपयोगी पडावी म्हणूनहि एक नौका नाईल नदीवर ठेविली होती.

अमेरिकेंतील दुसरा एक धनाढ्य गृहस्थ म्हणजे जॉन डी. रॉकफेलर. त्याचा न्यूयॉर्क राज्यांतील टॅरीटाउन गांवाजवळ पोकॅंटिको हिल्स येथें एक इमला होता. पण तो पाहूनहि कांहीं राजवाड्याचा भास होत नव्हता. रॉकफेलरला भपका आवडत नसे. त्याच्या आवडीनिवडी साध्या होत्या.

अर्थांत रॉकफेलरचा हा इमला म्हणजे राजवाडा नसेल. पण तो त्याच्या मालकीच्या तेथील अफाट शेतीवरील पंचाहत्तर इमारतीपैकीं एक होता. त्यानें स्वतः एकच मोटार-गाडी पंधरा वर्षें वापरली असेल, पण तेथील त्याच्या मोटारींच्या तबेल्यांत पन्नास मोटारींचा काफिला असे. याशिवाय याच ठिकाणीं त्याला गोल्फ खेळण्याकरितां सत्तर मैलांचें क्रीडांगण असून तेथें तो सकाळीं गोल्फ खेळे. हंगामाच्या दिवसांत तेथें हजार पंधराशें नोकर कामावर असत.

हे झाले रॉकफेलरच्या एके ठिकाणच्याच मालमत्तेसंबंधीं. याशिवाय इतरत्रहि त्याची अफाट मालमत्ता होती. पण रॉकफेलरप्रमाणें इतक्या अवाढव्य प्रमाणावर पण इतक्या काटकसरीनें दुसरा कोणी राहिला नसेल.

## २

पण रॉकफेलर मितव्ययी असला तरी इतर कांहीं लक्षाधीश तसे नव्हते. सन १८९० च्या न्यूपोर्ट येथील जीवनाची कल्पना आणून देण्याकरितां बुर्शेनें एका प्रतिष्ठित समाजांतील तरुण मुलीचा एक दिवसाचा सर्वसाधारण कार्यक्रम वर्णन केला आहे. सकाळीं नऊ वाजण्यापूर्वीं ती घोड्यावरून रपेट करण्याकरितां बाहेर पडे. परत आल्यावर तात्वडतोब कपडे करून कॅसिनो येथें टेनिसचा सामना पहाण्यास जाई. त्यानंतरचा कार्यक्रम म्हणजे नौकाविहाराचा. तिचा दुपारचा उपहार नौकेंतच होई. साडेचारच्या सुमारास ती नौकाविहाराहून परत येऊन पोलोचा सामना पहाण्यास जाई. त्यानंतर घरीं येऊन स्नान करी व कपडे बदलून भोजनाच्या कार्यक्रमास जाई. भोजनाचा कार्यक्रम फार तर रात्रीं साडेदहा वाजेपर्यंत चाले. कारण उघड्या हवेंत विहार करण्याकरितां आलेल्या या प्रतिष्ठितांना त्यानंतर डोळे उघडे ठेवणें जरा जडच जाई. भोजनानंतर सदर मुलगी नृत्याच्या कार्यक्रमांत भाग घेण्यास जाई. बुर्शे अशा नृत्याच्या कार्यक्रमास कधीं उपस्थित नव्हता, असे दिसतें. नाहीं तर अमेरिकेंतील घरांच्या सजावटींत जसें त्याला औचित्य दिसून आलें नाहीं, तसेंच न्यूपोर्ट येथील

चैनीच्या कार्यक्रमांतहि आढळून आलें नसतें. या लोकांजवळ इतका चिकार पैसा होता कीं त्याचें काय करावें, हेंच त्यांना समजत नसे. पैसा जास्तींत जास्त भपक्यानें कोण उधळतो याची जणूं काय त्यांच्यांत स्पर्धा लागलेली असे.

ता. ११ फेब्रुवारी १८९९ रोजीं रॅन्डॉल्फ गुगनहिमर यानें वॉलडॉर्फ-ॲस्टोरिया या आपल्या निवासस्थानीं चाळीस मंडळींना जी थाटाची मेजवानी दिली, तो एक मोठा विक्रमच होता. या मेजवानीकरितां या इमारतींतील एका दालनाचें अक्षरशः बगीच्यांत रुपांतर करण्यांत आलें होतें. जिकडे तिकडे सुवासिक फुलांचे ताटवे व देवदार वृक्षांचीं कुंपणें दिसत होतीं. या कृत्रिम बगीच्यांत गाणाऱ्या पक्षांचें मधूर कूजन ऐकूं येत होतें. (मेजवानी समारंभाकरितां प्राणिसंग्रहालयांतून कांहीं गाणारे पक्षी मोठ्या हिकमतीनें आणण्यांत आलें होते.) टेबलांची रचना लताकुंजासारखी करण्यांत येऊन डोक्यावर द्राक्ष-वेलींनीं आच्छादलेल्या जाळ्या लोंबत होत्या; पायाखालीं हिरव्या गार अशा गवतांचा जणूं गालिचाच पसरला होता. घासून गुळगुळीत केलेल्या नारळावर भोजनांतील पदार्थांचीं नांवें सोनेरी अक्षरांत मोहक रीतीनें लिहिण्यांत आलीं होतीं. स्त्रियांना जे पंखे देण्यांत आले होते, त्यावर मद्यांचीं नांवें सुबक रीतीनें नमूद केली होतीं. या प्रसंगाची भेट म्हणून स्त्रियांना कोरीव सुवासिक पेट्या व पुरुषांना रत्नजडित काड्याच्या-पेट्या देण्यांत आल्या. पाहुण्यांना संगीताचा आस्वाद देण्याकरितां नेपल्सहून खास आणलेले सहा कलावंत देशी पेहराव करून आपल्या वीणांतून मधुर झंकार काढत होते आणि पाहुण्यांना सुवर्णाच्या ताटांतून दिलेल्या मेजवानीसाठीं किती पदार्थ केले होते? एकवीस! हे पदार्थ करण्याकरितां लांबलांबच्या प्रदेशांतून एक्सप्रेस गाड्यांनीं खास बकरीं, बदकें आणण्यांत आलीं होतीं.

त्या रात्रींच्या या चैनीकरितां खर्च किती आला? एकंदर दहा हजार डॉलर किंवा माणशीं अडीचशें डॉलर. हा झाला सन १८९९ चा हिशोब. आजच्या हिशोबानें या मेजवानीला माणशीं ७५० डॉलर खर्च आला असता.

## ३

" अमेरिकेंतील त्या वेळचा प्रतिष्ठित समाज हा लंडनप्रमाणें किंवा पॅरीसप्रमाणें एकाच ठिकाणीं गोळा झालेला नसून तेथील प्रत्येक शहरांतील प्रतिष्ठित समाजाचें वैशिष्ट्य निरनिराळे आहे. मात्र न्यूयॉर्कचा प्रतिष्ठित समाज जरा जास्त उठावदार दिसतो, "

असें परदेशी पाहुण्यांचें मत होई. ज्यांचें उत्पन्न किंवा भांडवल यांची ठोकळ मानानें कां होईना माहिती मिळत नसे, त्यांना प्रतिष्ठित समाजांत प्रवेश मिळत नसे. अशा प्रतिष्ठित समाजांत निवडक अशा चारशें मंडळीपेक्षां अधिक लोक असूं नयेत, असें मत सन १८९२ मध्यें वॉर्ड मॅकअॅलीस्टर यानें प्रगट केलें होतें.

यापूर्वी कांहीं वर्षें अगोदर हेन्री क्लुजनें न्यूयॉर्कविषयीं पुढील उद्गार काढले होते. "न्यूयॉर्क हें अमेरिकन प्रजासत्ताकाचें खरोखरीच महान् सामाजिक केंद्र आहे. मोहक चालीरीतींचा चकचकाट, उत्कृष्ट सरबराईकरितां अफाट इतमाम व जणूं काय अमेरिकेचें नंदनवन म्हणतां येईल, असें सेंट्रल पार्क याच शहरांत आहे." त्या वेळीं अगोदर प्रतिष्ठित ठरलेल्या लोकांचा समाजांत नव्या लक्षाधीशांचा शिरकाव होऊं नये यासाठीं खटाटोप, तर या नव्या लक्षाधीशांची प्रतिष्ठित समाजांत शिरून प्रतिष्ठा मिळविण्यासाठीं बेसुमार धडपड. याकरितांच ते पाण्यासारखा पैसा खर्च करून पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणें मेजवान्या देत. त्यावेळीं अशा कांहीं स्त्रिया होत्या कीं त्यांना अशा मेजवानीचें आमंत्रण म्हणजे जणू काय स्वर्गप्रवेशाचा परवानाच वाटे.

देशांतील इतर शहरांतसुद्धां हाच प्रकार दिसून येत होता. वैंचक लोकांच्या प्रतिष्ठित समाजांत प्रवेश मिळावा म्हणून कोण धडपड! आजहि ही धडपड अर्थात् निराळया रीतीनें चालू आहे. फरक एवढाच कीं सामाजिक प्रतिष्ठा मिळविण्यासाठीं अशा नाटकांची जरूरी आहे, असें मानणारे फारच थोडे लोक आहेत. याशिवाय नियतकालिकांचे छायाचित्रकार, वार्ताहार, प्रसिद्धीकरितां हपापलेले हॉटेल मालक यांना प्रथम वाव देण्याची जी प्रथा अलीकडे पडली आहे, त्यामुळें प्रतिष्ठेचा हा सारा डोलारा गुंतागुंतीचा झाला आहे. सन १९०० मध्यें प्रतिष्ठित समाज हा खरोखरीच प्रतिष्ठित होता. त्याला वर्तमानपत्राविषयीं तिटकारा वाटे. "वर्तमान-पत्रांत माणसाचें नांव फक्त तीन वेळां येई. एक त्याच्या जन्माच्या वेळीं, दुसरें त्याच्या विवाहाच्या वेळीं व तिसरें त्याच्या मृत्यूच्या वेळीं," ही त्यावेळीं अशा प्रतिष्ठित लोकांची वर्तमानपत्रांविषयीं भावना होती. आपण म्हणजे सर्वांत घरंदाज, सर्वांत बुद्धिवान् व सर्वांत महत्त्वाच्या अशा अमेरिकन जीवनाचे प्रतिनिधि आहोंत, अशी त्यांची समजूत होती.

प्रतिष्ठेच्या याच कल्पनेमुळें त्यावेळीं अनेक अमेरिकन धनाढ्य मालकिणींनीं परदेशी उमरावांशी विवाह केले. अशा तऱ्हेचा पहिला उल्लेखनीय विवाह म्हणजे न्यूयॉर्कची

जेनी जेरोमी व लॉर्ड रॅन्डॉल्फ चर्चिल यांचा. ( याच दांपत्यानें आजच्या काळांतील प्रख्यात महापुरुष विन्स्टन चर्चिल याला जन्म दिला. ) सन १८९० पर्यंत तर अशा विवाहांची सांथच पसरत चालली होती. नोव्हेंबर १९०३ च्या " मॅक्कॉल " मासिकांत त्या वेळेपर्यंत झालेल्या अशा ५७ विवाहांची यादी देण्यांत आली आहे.

४

समृद्धीच्या अगदीं गौरीशंकर शिखरावर बसलेल्या या लक्षाधीशांच्या कांहींसे खालीं पण ज्यांची श्रीमंत व सुखवस्तू वर्गांत गणना करतां येईल, असे इतरहि हजारो अमेरिकन लोक होते. हे लोक म्हणजे, यशस्वी कारखानदार, व्यापारी, वरिष्ठ उद्योग-व्यवसायी लोक यांच्यापासून तों धंद्यांतील खालचे अधिकारी, दुकानदार, गिरण्यांचे वकील व डॉक्टर, चांगल्या पगाराचे प्राध्यापक व मंत्री हे होत. या वर्गाला आपण स्थूलपणें वरिष्ठ मध्यमवर्ग म्हणू. धंदा, उत्पन्न व रहाणी यांच्या दृष्टीनें विचार करतां या वर्गांत इतक्या विविध तऱ्हांचे लोक होते कीं त्यांना एकाच चौकटींत बसविणें जरा धाडसाचें होईल. पण इतकी विविधता असूनहि त्यांच्यांत एक गोष्ट समान होती. जरी या वर्गांतील अनेक लोकांना अधुनमधून आर्थिक अडचणींचे फटके बसत, तरी त्यांची सामान्य परिस्थिति आपल्यापेक्षां पुष्कळच चांगली होती, असें आजच्या वरिष्ठ मध्यम वर्गांतील लोक मानतात.

त्यावेळीं बांधकामाची मजूरी आणि बांधकामाला लागणाऱ्या मालाच्या किंमती आजच्यापेक्षां पुष्कळच कमी असल्यामुळें त्यांचीं घरें आजच्यापेक्षां बरींच प्रशस्त असत. नोकऱ्यांकरितां उमेदवार खूप व पगार कमी यामुळें नोकरचाकरांची वाण नव्हती. याशिवाय आज जो खर्च नित्याचा होऊन बसला आहे, असा खर्च त्यावेळीं नव्हता. उदाहरणार्थ, मोटार गाड्या ( घोडागाड्यापेक्षां जास्त खर्चाच्या ), विद्युत शीत पेट्या ( रेफ्रिजरेटर ), धुलाई-यंत्रें, रेडिओ, टेलिव्हिजन, तसेंच मुलांमुलींचें कॉलेज–शिक्षण वगैरे खर्चाच्या बाबी आज कितीतरी वाढल्या आहेत. म्हणून ज्या पगारदाराला आज अडचणीच्या जागेंत रहावें लागतें, त्याला त्यावेळीं मोठ्या घरांत रहाणें परवडलें असतें.

आजचीं बरींच म्हातारीं माणसें तत्कालीन परिस्थितींतील आपलें बालजीवन आठवून " गेले ते रम्य बालपणाचे दिवस " असें कांहीं वेळां हळहळत असतात. तत्कालीन जीवनाच्या गरजा साध्या असून त्या सहजसुलभ होत्या. त्यावेळीं कुटुंबांतील जिव्हाळा

राखणेंहि सोपें होतें, असें या मंडळीचें मत आहे. आकुंचित जागेंत रहाणाऱ्या कुटुंबां-पेक्षां प्रशस्त घरांत रहाणाऱ्या कुटुंबांना म्हातारेकोतारे, अपंग व निकामी नातेवाईकांची काळजी अधिक चांगल्या रीतीनें घेणें शक्य होतें. खरोखरच पुष्कळ कुटुंबांना आज आपल्यावर अवलंबून असणाऱ्या मंडळींना आश्रय देतां येत नसल्यामुळेंच निवृत्ति-वेतन, वैद्यकीय विमा, बेकारीचा विमा वगैरे आजचे सामाजिक सुरक्षिततेचे प्रश्न उद्भवले असावेत. हे प्रश्न उद्भवण्याचें दुसरें एक कारण म्हणजे, सामाजिक कल्पनांत झालेली क्रांति (या पुस्तकांत याच क्रांतीचें स्वरूप रेखाटण्याचा प्रयत्न आहे.). सन १९०० मध्यें उपलब्ध नसलेल्या अनेक गोष्टी आज आपणांस सहजासहजीं मिळतात, हें खरें असलें तरी एकंदरींत आज नाराज होण्याला कारणहि आहे, हें मान्य करणें भाग आहे.

मात्र याचबरोबर आपण हें लक्षांत घेतलें पाहिजे कीं मोठमोठ्या घरांत ऐसपैस रहातां येत होतें, याचें कारण घरीं चोवीस तास राबणाऱ्या मोलकरणीचें वेतन अगदीं दरिद्री होतें; जे कारखाने माल उत्पादन करत आणि जीं दुकानें हा माल विकत, त्यांतील कामगारांचें वेतन तुटपुंजे होतें. वार्षिक १,५०० डॉलर मिळणाऱ्या कुटुंबाला ऐसपैस घरांची आणि नोकरचाकरांची वाण नसे, याचें कारण त्या वेळचे वेतनाचे सार्वत्रिक कमी दर.

आतां या आर्थिक व सामाजिक रचनेच्या दुसऱ्या टोंकाला जाऊन तेथील जनतेच्या जीवनाचें निरीक्षण करूं.

# प्रकरण ३ : हें पहा तें जिणें !

इंग्लंडमध्यें कारखानदारी आली, त्यावेळीं डेव्हीड रिकार्डो यानें एक भयंकर सिद्धांत प्रतिपादन केला. या सिद्धांताला त्यानें "वेतनाचा लोखंडी सिद्धांत" (आयर्न लॉ ऑफ वेजीस) असें नांव दिलें. हा सिद्धांत असा कीं, अतिशय अनाडी किंवा अत्यंत गरजू माणूस जें वेतन स्वीकारील, त्या पातळीपर्यंत इतर सर्व वेतनाचे दर खालीं येतात. कारखानदारीच्या पूर्वकाळांत या सिद्धांताचा अंमल बरेच वेळां अनिर्बंध होऊं शकत नव्हता. नालायक, आजारी किंवा संकटग्रस्त अशा गरजूंना त्यावेळीं राजा किंवा उमराव किंवा शेजारीपाजारी साहाय्य करत. अमेरिकेंत कारखानदारी येण्यापूर्वी पिकें बुडाल्यामुळें, व्यापार बसल्यामुळें अगर वंशपरंपरागत दौलत नाहींशी झाल्यामुळें जे लोक भयंकर गोत्यांत येत, त्यांना तुटपुंज्या वेतनावर कां होईना काम मिळे किंवा फिरून यत्न करून पहाण्यासाठीं इतरत्र जातां येत असे. पण कारखानदारी-मुळें युरोपप्रमाणेंच अमेरिकेंतहि बदल घडून आला. गिरण्या किंवा कारखाने उभारल्यावर त्यांच्याभोंवतीं गिरणगांवें उठूं लागलीं. या गिरण्यांत किंवा कारखान्यांत काम करण्याकरितां जीं माणसें येत त्यांनीं बऱ्याच प्रमाणांत आपण होऊन स्थानबद्धता पत्करलीं. गिरणीनें दिलेल्या कामावरच त्यांना अवलंबून राहावें लागे. आणि वेतन जरी खरोखरींच कमी असलें तरी त्यांना दुसरीकडे नोकऱ्या पहाणें शक्य नसे. थोडक्यांत ते आपलें स्वातंत्र्य गमावून बसले होते.

त्याचप्रमाणें शहरांच्या दाट व गलिच्छ वस्तींत रहाणारे कामगारहि परिस्थितीचे गुलाम बनले होते. या वस्तींत, कंगाल, अडाणी, अशिक्षित, अनोळखी व देशांतील भाषेचा गंध नाहीं अशा हजारों परदेशी लोकांची नुसती रीघ लागून राहिली होती. तात्त्विक-दृष्ट्यां त्यांना सर्व व्यवसाय खुले होते; तत्त्वतः ते कोणत्याहि एका मालकावर अवलंबून नव्हते. पण प्रत्यक्ष व्यवहारांत मात्र दारिद्र्य, मर्यादित कसब व अज्ञान यामुळें त्यांना किंवा त्यांच्यापैकीं प्रचंड बहुसंख्यांक लोकांना, वर्षानुवर्षें जें कांहीं दरिद्री वेतन मिळेल त्यावर गुजराण करत एकाच ठिकाणीं खितपत रहावें लागत असे.

इंग्लंडमध्यें कारखानदारीस सुरवात झाली, त्यावेळचीं तेथील नवीं औद्योगिक शहरें आणि खाण विभागांतील वेतन, कामाचे तास व कामाची परिस्थिति पाहून अंगावर कांटा उभा राही. अमेरिकेंत १९ व्या शतकाच्या मधल्या काळांत इतकी भयंकर परिस्थिति कोठेंहि नव्हती. पण तरीहि जी परिस्थिति होती ती वाईट होती, हें

प्रामाणिकपणें कबूल केलें पाहिजे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत न्यू इंग्लंडमधील वेतनाचे दर खालीं येऊं लागले होते व सन १८५० मध्यें दर आठवड्यास माणशीं फक्त चार डॉलर इतक्या दरिद्री वेतनावर सारीं कुंटबेंच्या कुटुंबें यंत्रांवर राबत होतीं. सरासरी रोज बारा तास काम करावें लागे, पण बरेच वेळां चौदा तासहि काम चोपून घेण्यांत येई, आणि एका बाजूला मालकांना प्रचंड नफे होत असतांनाच ही परिस्थिति होती. जेथें नवी औद्योगिक भांडवलशाही अतिशय झपाट्यानें प्रगति करत होती, तेथील कामगारांची ही दैना पाहूनच कार्ल मार्क्सला नवीन समाजरचनेचें तत्त्व प्रतिपादन करण्याची प्रेरणा मिळाली.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत अमेरिकेंत कारखानदारीनें अगदीं हरणासारख्या उड्या मारत प्रगति केली. अनेक शोध आणि तांत्रिक सुधारणा यांनीं या प्रगतीला हातभार लागला. पूर्वीचा शेतकऱ्यांचा व खेडूतांचा हा प्रदेश सन १९०० पर्यंत अधिकाधिक प्रमाणांत शहरें आणि गजबजलेलीं औद्योगिक केंद्रें यांचा देश बनला, संपत्तीच्या व सुखसोयींच्या राशींवर राशी पडूं लागल्या आणि माणसांना मनसोक्त काम आणि क्रीडा करण्यासाठीं जणू काय नवें जग निर्माण केलें गेलें आहे, असें भासूं लागले. पण ही सारी संपत्ति कांहीं थोड्या लोकांच्या खिशांत जात होती.

साऱ्या एकोणिसाव्या शतकांत युरोपांतून बेसुमार कामगार अमेरिकेंत येत होते. प्रथम हे सारे कामगार बव्हंशीं आयरिश होते. सन १८४० तें १८५० या काळांत या आयरिश कामगारांनीं खंदक व चर खणले, धरणें बांधलीं आणि गिरणी कामगार म्हणून अगदीं क्षुद्र वेतनावर गिरण्यांतून रोजीं बारा तेराच नव्हे तर चौदा चौदा तास काम केलें. पुढें आयरिश लोकांची परिस्थिति सुधारत चालली व त्याचवेळीं इटालीयन लोक येऊं लागले, आणि इटालीयनांच्या मागोमाग पूर्व युरोपांतील ज्यू व स्लाव्ह लोकांची मोठ्या प्रमाणावर आयात होऊं लागली.

हळूहळू अमेरिकेंतील स्वातंत्र्य व महत्वाकांक्षा यांचा संसर्ग या परकीय लोकांनाहि झाला व दारिद्र्यांतून त्यांनीं डोके वर काढावयास सुरवात केली. पण ते वरच्या पातळीवर गेल्यावर त्यांची खालच्या आर्थिक पातळीवरील जागा, युरोपांतून नव्यानेंच आलेल्या स्थलांतरितांनीं घेतली. हे स्थलांतरित इतक्या झपाट्यानें येत राहिले कीं लवकरच न्यूयॉर्क, बोस्टन, फिलाडेल्फीया, शिकॅगो येथील दाट गलिच्छ वस्त्या व न्यू इंग्लंड, पेन्सिल्व्हानिया व ओहायओ मधील कारखानदारीं शहरें त्यांनीं भरून टाकलीं

आणि परिणामीं काम कमी व माणसें जास्त अशी परिस्थिति निर्माण झाली. सन १९०० या एकाच वर्षांत ४,४८,५७२ स्थलांतरित अमेरिकेंत आले; सन १९०१ मध्यें हाच आंकडा ४,८७,९१८ वर गेला. पुढें हा आंकडा आणखी वाढत जाऊन सन १९०७ मध्यें तर त्यानें उच्चांक गांठला. ह्या एकाच वर्षी १२,८५,३४९ स्थलांतरित आले.

कोणीहि असें विचारील कीं यावेळीं कामगार संघटनांची काय परिस्थिति होती ? याला उत्तर म्हणजे त्यावेळीं कामगार संघटना थोड्या होत्या. आणि कांहीं विशिष्ट धंद्यांतील संघटना सोडतां बाकीच्या कमजोर होत्या. त्यांच्यावर सदैव कायद्याची टांगती तरवार असे. मालकानें काय वेतन द्यावें व कामगारानें काय वेतन स्वीकारावें हा त्या दोघांचा प्रश्न आहे, त्यांत इतरांना ढवळाढवळ करण्याचा अधिकार नाहीं, असें कायदा मानत असे. कामगार संघटनांविषयीं त्यावेळीं लोकांना एक प्रकारची धास्ती व तिरस्कार वाटे.

सन १९०० मध्यें एकंदर कामगार संघटनांच्या सभासदांची संख्या ८,६८,५०० होती. यापैकीं " अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर " या संघटनेची सभासद संख्या ५,४८,३२१ होती. चिरुट कारखान्यासारख्या कांहीं कारखान्यांतील यशस्वी संघटनेमुळें कामगारांचे पगार वाढले होते. बोस्टन येथील रॉबर्ट ए. वुड्स या चिकित्सक निरीक्षकानें सन १९०२ मध्यें वेतनाविषयींची पुढील माहिती नमूद केली आहे. बोस्टनमधील बिनकसबी कामगारांना ते कामावर असतांना दर आठवड्यास ९ तें १२ डॉलर वेतन मिळतें. कसबी कारागिरांना सामान्यतः दर आठवड्यास सरासरी १३.५० तें १९.५० डॉलर वेतन मिळतें. पण चिरुट कारखान्यांतील कामगारांना करारान्वयें दर आठवड्यास सरासरी १५ तें २५ डॉलर वेतन मिळे.

बहुतेक मोठ्या धंद्यांत कामगार संघटना मुळीं नव्हत्याच आणि जेथें संघटना होत्या किंवा संघटना करण्याचा प्रयत्न होई, तेथें भयंकर स्वरुपाचे आततायी झगडे उद्‌भवत. या झगड्यांना एका बाजूला बंडखोर कामगार व दुसऱ्या बाजूला ताठर मालक व त्यांचा पाठपुरावा करणारे हस्तक यांच्यांतील तीव्र हातघाईचें स्वरुपहि येई. कांहीं कांहीं वेळां अशा प्रसंगीं मालक लष्कराचीहि मदत घेत.

सन १८९८ मध्यें संघटित खाणी कामगारांनीं आपला पहिला महत्त्वाचा संप वरचढ ताकदीच्या जोरावर यशस्वी केला. त्यांनीं सशस्त्र संपफोडे व कंपनीचे रक्षक

यांच्यावर बंदुका व रिव्हॉल्व्हर घेऊन हल्ला चढविला. या धुमश्चक्रींत दोन्ही बाजूंची प्राणहानि होऊन अखेर मालकांच्या बाजूचा पुरा फडशा उडाला. " अमेरिकन लेबर " ( अमेरिकन कामगार चळवळीचा इतिहास ) या ग्रंथांत हर्बर्ट हॅरीस म्हणतो, " आपल्या सरस ताकदीनें या संघटनेनें आपल्या सर्व मागण्या मान्य करून घेतल्या. " त्यावेळच्या कामगार व मालक यांच्यांतील झगड्यांमागील प्रवृत्तीवर यामुळें प्रकाश पडतो.

आतां आपण त्यावेळच्या खालच्या पातळीवरील लोकांच्या जीवनांतील कांहीं वस्तुस्थितीनिदर्शक बाबींचा विचार करूं.

## २

खालील आंकडे पहा :

१ **वेतन**—त्यावेळीं अमेरिकन कामगारांचें सरासरी वार्षिक वेतन ४०० तें ५०० डॉलर होतें. बिनकसबी कामगारांना यापेक्षां कमी म्हणजे उत्तरभागांत ४६० डॉलर व दक्षिणभागांत ३०० डॉलर वेतन मिळे. बिनकसबी कामगाराच्या वेतनाचा दर जेव्हां तो कामावर असे तेव्हां रोज दीड डॉलर हा ठरलेला होता.

सन १९०२ मध्यें रॉबर्ट ए. वुड्स यानें असें नमूद केलें आहे कीं उत्तर व पश्चिम विभागांतील दुकानांत नोकरी करणाऱ्या मुलींचें साप्ताहिक वेतन ५ तें ६ डॉलर होतें. दक्षिण भागांतील कापड गिरण्यांतील सुमारें एकतृतीयांश कामगार सोळा वर्षांवरील वयाचे असून त्यांना साप्ताहिक ६ डॉलरपेक्षांहि कमी वेतन मिळे. अर्थात् हेंहि किमान वेतन नव्हतें. " फेडरल ब्यूरो ऑफ लेबर " या संस्थेनें याच सुमारास शिकॅगो येथील कामगारांच्या केलेल्या पहाणींत असें आढळून आलें कीं, त्यांच्यांतील कांहीं बिनकसबी कामगारांना साप्ताहिक ४·३७ डॉलर वेतन मिळे. वुड्सनें असेंहि नमूद केलें आहे कीं बोस्टन येथील कपड्यांच्या दुकानांतील स्त्री कामगारांना साप्ताहिक ५ डॉलरपासून तें खालीं ३ डॉलर वेतन मिळे. वुड्स पुढें लिहितो, " घरीं शिवणकाम करणाऱ्या स्त्रियांना खूप काम करूनहि दिवसाला ३० तें ४० सेंटपेक्षां अधिक मजूरी मिळत नाहीं. "

२ **कामाचे तास**—कामाचे रोजचे तास १० च्या आसपास असत. ६ दिवसांचा व ६० तासांचा आठवडा असे. व्यापारी कचेऱ्यांतून दर शनिवारीं अर्धी सुटी मिळावी,

अशी वाढती मागणी होती. पण कोणी पांच दिवसांचा आठवडा करा, अशी सूचना केली असती तर त्याची वेड्यांत गणना झाली असती. ज्यावेळीं "इंटरनॅशनल् लेडीज गार्मेंट वर्कर्स युनियन" या शिवणकाम कामगार संघाची सन १९०० मध्यें स्थापना झाली, त्यावेळीं न्यूयॉर्कमध्यें या धंद्यांत आठवड्यांचे कामाचे तास ७० होते.

**३. मुलामुलींची रोजंदारी :** दहा तें पंधरा वर्षें वयाच्या मुलांपैकीं जवळ-जवळ २६ टक्के मुलगे मोलमजूरीवर लावण्यांत आले होते. याच वयाच्या एकंदर मुलींपैकीं सुमारें दहा टक्के मुलीहि मोलमजूरी करत होत्या. मुलांपैकीं बहुतेक शेतीवर राबत, पण २,८४,००० मुलें गिरण्या–कारखान्यांतहि काम करत असत. समाधान-कारक परिस्थिति असती तर हींच मुलें शाळेंत शिक्षण घेत असलेली दिसलीं नसतीं कां ?

**४. अपघात :** हल्लींच्या मानानें त्यावेळीं सुरक्षिततेची व्यवस्था फारच निकृष्ट दर्जाची होती. ही आंकडेवारी पहा : सन १९०१ या एकाच वर्षांत प्रत्येक ३९९ रेल्वे कामगारामागें एक कामगार रेल्वे अपघातांत ठार झाला व प्रत्येक २६ कामगारांमागें एक जखमी झाला. इंजिनियर, कंडक्टर, ब्रेकमेन वगैरेमध्यें तर अपघातांचें हें प्रमाण अधिक होतें. त्या एकाच वर्षीं या प्रकारच्या रेल्वे नोकरांतील प्रत्येक १३७ नोकरांमागें एक नोकर अपघातांत ठार झाला.

उद्योगधंद्यांत काम करणाऱ्या मुलांना तर अपघात होण्याची विशेष धास्ती असे. सन १८९७ मध्यें "मदत व सुधारणा राष्ट्रीय परिषदें"त ( नॅशनल कॉन्फरन्स ऑफ चॅरिटीज अँड करेक्शन ) बोलतांना प्रो. विल्यम ओ. क्रॉन यानें "शिकॅगो येथील कांहीं कारखान्यांत तर मुलांना अपघात होऊन कोणी निकामी होत नाहीं, असा एकहि दिवस जात नाहीं," अशी माहिती सांगितली.

**५ दारिद्य व भिकारी :** सन १९०४ मध्यें रॉबर्ट हंटर याचें "पॉव्हर्टी" ( दारिद्य ) हें पुस्तक प्रसिद्ध झालें. या पुस्तकांत अमेरिकेंतील अर्धपोटीं, अंगावर धड चिरगुटें नसलेल्या व भिकार घरांत रहात असलेल्या लोकांच्यासंबंधीं उद्बोधक माहिती आहे; "जास्तींत जास्त श्रम करूनहि शारीरिक कार्यक्षमता राखण्यासाठीं पुरेशा गरजा मिळत नाहींत, अशी अवस्था म्हणजे दारिद्य," अशी हंटरनें दारिद्याची व्याख्या केली आहे. शक्य ती सर्व आंकडेवारी तपासून, त्यावेळीं सर्व अमेरिकेंत एक कोटी दरिद्री व त्यांच्यापैकीं निदान चाळीस लाख सार्वजनिक भिकारी असावेत, असा त्यानें अंदाज केला आहे. हंटरच्या मतें हा अंदाज वस्तु-

स्थितीपेक्षां पुष्कळच कमी असून सर्व अमेरिकेंत असे दरिद्री लोक दीड तें दोन कोटींच्या दरम्यान असावेत.

वरील सर्व आंकडेवारी काय दर्शविते ? बहुतेक माननीय निरीक्षकांनीं तत्कालीन भीषण दारिद्र्याचें वर्णन करतांना, करंटेपणा, गर्दी, घाण, उपासमार, अपुरें पोषण, असुरक्षिता व टंचाई वगैरे वेंचक शब्द वापरलें आहेत.

सन १८९८ मध्यें न्यूयॉर्कमधील आपल्या इटालियन बंधूंची वसाहत पाहून जी. गियाकोसा हा इटालीयन नाटककार म्हणतो, " तेथील चिखल, घाण, दुर्गंधी, कुचटपणा, उपद्रव व रस्त्यावरील अव्यवस्था यांचें वर्णन शब्दांनीं करणें अशक्य आहे."

बोस्टनच्या उत्तर व पश्चिम भागांतील कांहीं घरांसंबंधीं मार्च १८९९ मध्यें सदर शहराच्या शिल्पज्ञ सल्लागारांनीं जो अहवाल सादर केला होता, त्यांतहि हीं घरें आरोग्यांच्या दृष्टीनें अतिशय खराब, मोडकळीस आलेलीं व धोक्याचीं आहेत, असें नमूद केलें होतें.

या निरीक्षकांच्या अहवालांत, कामगारांची संख्या जादा असून कसेंतरी पोट भरण्याकरितां कोणत्याहि परिस्थितींत कोणतेंहि काम करण्याची त्यांची बेदरकार तयारी असते, असेंहि नमूद करण्यांत आलें आहे. शिकॅगो येथील कामगारांच्या परिस्थिती-बद्दल रॉबर्ट हंटर लिहितो,

" पावसाळ्यांतील ते झोंबरें दिवस. रस्त्यांवरील बुटांच्या खडखडाटानें मी नेहमीं-पेक्षां लवकर अगदीं भल्या पहांटेस जागा होई. कारखान्यांत कामाकरितां जमावानें चाललेल्या मजुरांच्या बुटांचा तो खडखडाट असे. बोजड शरीराचे विचारमग्न पुरुष, शिणलेल्या चिंताग्रस्त स्त्रिया, अंगावर लक्तरें अशा अव्यवस्थित छोट्या मुली व किडकिडीत निस्तेज छोकरें कांहींसे अर्धवट झोंपेंत एक चकार शब्दहि न बोलतां कारखान्याकडे घाईघाईनें चालले होते. याशिवाय इतर शेंकडो क्षुधाग्रस्त कंगाल लोक कारखान्याच्या बंद दरवाजासमोर अगोदरच तिष्ठत उभे होते. शेवटीं लांब दाढीचा असा एक मनुष्य बाहेर आला व त्यानें सर्वांत ताकदवान् व उमदे दिसणारे तेवीस पुरुष निवडले. या लोकांना दरवाजाच्या आंत घेण्यांत आले आणि बाकीचे खालीं माना घालून इतरत्र काम मिळविण्याकरितां, किंवा घरीं बसण्याकरितां किंवा कोठेंतरी वेळ घालविण्याकरितां चालूं लागले ! !

या दुर्दैवी परिस्थितींतहि आशेचे कांहीं किरण दिसत होते, हें या निरक्षिकांनींहि मान्य केलें आहे. विशेषतः परदेशांतून आलेल्या निरीक्षकांना येथील अत्यंत क्षुधापीडित लोकांचेहि पोषाख अपेक्षेबाहेर चांगले असल्याचें आढळून आलें. रुमानियाहून नुकत्याच आलेल्या एम. इ. रॅव्हेज नांवाच्या लेखकानें येथें कोणाच्याहि कपड्यांना ठिगळें लावलेलीं दिसत नाहींत, असें नमूद केलें. तो म्हणतो, "तुम्ही नुसत्या पोषाखावरून पहाल तर बँकेचा अध्यक्ष कोण व शिपाई कोण हें समजावयाचें नाहीं."

याच दाट गलिच्छ वस्तींतील अनेक स्थलांतरितांनाहि समाधानकारक अशा कितीतरी नव्या गोष्टी आढळून आल्या होत्या, हेंहि आपण विसरतां कामा नये. तेथें रोजच्या उपयोगाकरितां साबण, हिवाळ्यांत वांगीं व टोमॅटो वगैरे पाहून रॅव्हेजला सानंद आश्चर्य वाटलें. रशियांतून नुकतीच आलेली मेरी ॲन्टीन ही बालिका तेथील डबाबंद खाण्याचे पदार्थ, लोखंडी शेगड्या, धुण्याची व्यवस्था, बोलण्याच्या नळ्या व रस्त्यावरील दिवे पाहून आनंदानें बेहोष झाली. ती उद्गारली, "किती हे दिवे आणि शिवाय ते रात्रभर जळत असतात. मग आतां लोकांना कंदील घेऊन जायला नको." ती व तिच्या आईबापांच्या दृष्टीनें सर्वांत अपूर्व गोष्ट म्हणजे मोफत सार्वजनिक शिक्षण. अर्जांची जरूरी नाहीं, चौकशी नाहीं कीं फी नाहीं! या मुलीच्या बापानें आपल्या मुलांना जणूं काय एका पवित्र कार्याला अर्पण करत आहोंत, अशा भावनेनें शाळेंत घातलें.

एकंदरींत या गलिच्छ वस्त्यांतील भयंकर परिस्थिति हळूहळू नाहींशी करण्यांत येत होती, हेंहि खरें आहे. सन १८९० मध्यें जेकब ए. रीस याचें "हाउ दि अदर हाफ लिव्हज्" हें संस्मरणीय पुस्तक प्रसिद्ध झालें. या पुस्तकासारख्या माहितीनें लोकांत बरीच जागृति झाली. पुढें दहाच वर्षांनी न्यूयॉर्कमधील अत्यंत खराब घरें गेल्याचें व पूर्वेकडील भागांत दारिद्रय व घाण केवळ अपवादात्मक राहिली असल्याचें रीसला दिसून आलें. तसेंच यावेळीं न्यूयॉर्कमधील गरीब वस्तींत उद्यानें, क्रीडांगणें व व्यायामशाळांची तरतूद करण्यास सुरवात झाली होती. तसेंच केवळ न्यूयॉर्कमधीलच नव्हे तर इतर शहरांतील कारखान्यांतील कामाची परिस्थिति व रहाण्याच्या जागा या बाबतींत कायद्यानें सुधारणा होऊं लागली होती.

मात्र परदेशी स्थलांतरितांचा लोंढा येऊं लागल्यावर उद्योगधंदे भरभराटींत असूनहि रिकार्डोच्या सिद्धांतानुसार वेतनाचे दर खालीं आले. पुनः जिकडेतिकडे घाणेरडी व

मोडकळीस आलेलीं घरें दिसूं लागलीं. परिस्थिति इतकी बिघडली कीं, अमेरिकेंतील दारिद्र्याशीं टक्कर देण्याचा ज्यांनीं विडा उचलला त्यांची सुधारणा घडवून आणण्याच्या बाबतींत निराशा वाटूं लागली. वुड्स लिहितो, "याबाबतींत खरी अडचण म्हणजे एकाद्या कर्मगतीच्या चालीप्रमाणें पुढें सरकणाऱ्या सामाजिक प्रवाहांवर येथील जनतेचें जन्मापासून तें मृत्यूपर्यंतचें जीवन अवलंबून असतें, हीच आहे." थोडक्यांत जें घडत होतें, तें म्हणजे लोकशाही समाजरचनेची चेष्टाच नव्हती काय ?

---

# प्रकरण ४ : भांडवलशाही खरीच

सन १८९९ मध्यें न्यूयॉर्क येथें एक गृहस्थ मरण पावला. या गृहस्थानें अर्थशास्त्राचा कधींहि अभ्यास केला नव्हता. पण अमेरिकेन उद्योगपतींवर अर्थशास्त्राच्या साऱ्या प्राध्यापकांचें मिळून जेवढें वजन नसेल तेवढें जबर वजन या गृहस्थाचें होतें. या गृहस्थाचें नांव होरॅशिओ आल्जर (ज्यू.). त्यानें " यशाचा मार्ग " या मालिकेंत बालवाचकांसाठीं सुमारें शंभरवर पुस्तकें लिहिलीं. त्या पुस्तकांच्या दोन कोटिंवर प्रति संपल्या.

सुशिक्षित लोकांच्या दृष्टीनें हीं पुस्तकें निरुपयोगी होतीं. पण अमेरिकन यादवी युद्ध व पहिलें महायुद्ध या दरम्यानच्या काळांत त्याच्या पुस्तकांवर अमेरिकन बाल-वाचकांच्या उड्या पडत. अमेरिकेन मुलांना अमेरिकन आर्थिक जीवनाची पहिली स्पष्ट कल्पना आल्जरमुळेंच मिळाली असावी.

आल्जरच्या सर्व पुस्तकांतील नायक ठराविक सांच्याचा असे. तो नायक म्हणजे बाप नसलेला असा सुमारें पंधरा वर्षांचा एखादा मुलगा असे. त्याला पोटाकरितां मोलमजूरी व तीहि बहुधा न्यूयॉर्कमध्यें करणें भाग पडे. या आमच्या नायकाला खलपुरुषांचा तीव्र विरोध व्हावयाचाच. नायक हा नेहमींच खंबीर, चतुर व शूर असून खल पुरुष मूर्ख व भेकड असावयाचेच. शेवटीं चिकाटी, सचोटी, काटकसर वगैरे गुणांच्या जोरावर नायक सधन व्हावयाचा, हें ठरलेलें असें. आल्जरचा निष्कर्ष स्पष्टच होता. खडतर श्रम व पैशांत बचत हाच यशाचा मार्ग आणि आल्जरचा हा सिद्धांत कांहीं अमेरिकन महाभागांनीं खराहि करून दाखविला हें नाकारण्यांत अर्थ नाहीं. उदाहरणार्थ जॉन डी. रॉकफेलर. त्यानें साप्ताहिक चार डॉलर वेतनावर कारकून म्हणून जीवनास सुरवात केली आणि विसाव्या शतकाच्या आरंभीं तो जगांतील सर्वांत धनाढ्य मनुष्य बनला. ॲन्ड्र्यू कार्नेगीनें साप्ताहिक सव्वा डॉलरवर सुरवात केली व तो सर्वांत मोठा पोलाद कारखानदार बनला. एडवर्ड एच हॅरिसननें साप्ताहिक पांच डॉलर वेतनावर सुरवात करून पुढें रेल्वे मार्गांचें अफाट जाळेंच विणलें. काटकसरीच्या बाबतींत प्रख्यात पेढीवाला जॉर्ज फिशर बेकर याचें उदाहरण उल्लेखनीय आहे. त्यानें कारकून म्हणून आयुष्याला सुरवात केली. बेकर पति-पत्नीनें प्रारंभींच्या वैवाहिक जीवनांत निम्म्या प्राप्तीवर चरितार्थ चालवून निम्मी बचत करावयाची असें स्वतःवर बंधन घालून घेतलें होतें. यशस्वी झालेल्या लोकांचीं हीं कांहीं उदाहरणें होत. आल्जरच्या

सिद्धांताचा थोडक्यांत उपसिद्धांत असा कीं; गरीब लोक हे केवळ आळशीपणा, मूर्खपणा किंवा उथळेपणा या दोषांमुळेंच गरीब रहातात.

स्वाभाविकपणेंच यशस्वी उद्योगपति अर्थशास्त्राचीं हींच मूलतत्त्वें समजत. यावर कोणी असें विचारील कीं, "अर्थशास्त्र हें यापेक्षां थोडें अधिक गुंतागुंतीचें आहे, हें त्यांना शाळा–कॉलेजांत शिकविण्यांत आलें नव्हतें काय ?"

या प्रश्नांचीं दोन उत्तरें आहेत. एक म्हणजे सन १९०० च्या वेळच्या बड्या उद्योगपतींपैकीं अगदींच थोड्यांनीं शाळा कॉलेजांत जाऊन अर्थशास्त्राचा अभ्यास केला होता. आणि ऐन उमेदींतहि त्यांचें अर्थशास्त्राशीं कधीं सूत जमलें होतें कीं नाहीं यांची शंकाच आहे. उलट ते अर्थशास्त्राच्या प्राध्यापकांची अत्यंत अव्यवहारी सिद्धांती म्हणून हेटाळणीच करत. त्यावेळीं जगांत पुढें आलेला मनुष्य स्वतःचें धक्काधक्कीच्या शाळेंतून बाहेर पडलेला विद्यार्थी असें वर्णन करी.

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं कॉलेज शिक्षण घेऊन हजारों विद्यार्थी बाहेर पडले होते. पण या विद्यार्थ्यांपैकीं थोडेच विद्यार्थी अभ्यासक्रमांत अर्थशास्त्र हा विषय ठेवण्याइतपत अद्यावत् अशा शिक्षणसंस्थांत गेले होते. आणि ज्यांनीं या विषयाचा अभ्यास केला होता, असे अगदींच मोजके विद्यार्थी होते. या विद्यार्थ्यांना आर्थिक जीवनाबद्दल काय शिकविण्यांत आलें होतें ?

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या पंचवीस वर्षांत अर्थशास्त्राचें आधुनिकीरण करून, नवीन आर्थिक व औद्योगिक युगांतील बदलत्या परिस्थितीशीं त्यांचा मेळ घालण्याचा कांहीं स्वतंत्र बुद्धीच्या विचारवंतांनीं प्रयत्न चालविला होता. असें असूनहि या कॉलेज पदवीधरांच्या डोक्यांत जुनीं आर्थिक तत्त्वेंच भरण्यांत आलीं होती. हे प्राध्यापक अनिर्बंध आर्थिक व्यवहाराचें शास्त्र (लेसे फेअर) विद्यार्थ्यांना शिकवीत व या अर्थशास्त्राच्या नियमांत उलथापालथ करणारी कोणतीहि गोष्ट वाईट असें त्यांचें मत होतें. ढवळाढवळ करूं नका कीं सर्व कांहीं ठीक होईल, अशी त्यांची विचारसरणा होती. वेतन व कामाचे तास यांत सरकारनें हात घालतां कामा नये, असें ते प्रतिपादन करी.

येल विद्यापीठांतील राजकीय अर्थशास्त्राचा विख्यात प्राध्यापक विल्यम ग्रॅहॅम समूनर हा अर्थशास्त्राच्या सिद्धांतांत सरकारनें ढवळाढवळ करतां कामा नये, या मताचा प्रभावी पुरस्कर्ता होता. सन १८८३ मध्यें प्रसिद्ध झालेल्या आपल्या "व्हॉट

सोशल क्लासेस ओ टु ईच अदर " या ग्रंथांत त्यानें सुधारणावादी अर्थशास्त्रज्ञांची रेवडी उडविली आहे.

आर्थिकदृष्ट्या निराधार अशा लोकांना कायद्यानें कांहीं बाबतींत संरक्षण देतां येतें, हें समूनरला मान्य असावें. पण बहुतेक सुधारणा–कायदे अज्ञानामुळें व मूर्खपणानें केले जातात, अशी त्याची विचारसरणी होती. येल विद्यापीठांतील विद्यार्थ्यांना तो म्हणे, " सरकारनें देशावर राजकीयदृष्ट्या ईश्वरी सत्ता गाजविणें आवश्यक आहे, असें मानूं नका. परमेश्वरानें राजकीय अर्थशास्त्राच्या द्वारें तें कार्य कितीतरी अधिक प्रमाणांत चांगल्या प्रकारें केलें आहे. "

समूनरचे हे विचार प्रामाणिक होते. जॉन डी. रॉकफेलरलाहि तसेंच वाटत असे. तो म्हणे, " परमेश्वरानें मला हें धन दिलें. " या लोकांच्या दृष्टीनें अर्थशास्त्राचे सिद्धांत ही ईश्वरी कृपा असून ते अनिर्बंधपणें चालू दिले पाहिजेत. अनेक लोक हॉटेलच्या दारांत भाकरीच्या तुकड्यांसाठीं दीनवाणें याचना करीत असतां, एखादा माणूस संपत्तीच्या राशीवर रहावा, हा म्हणे ईश्वरी संकेत !

चमत्कारिक भाग एवढाच कीं, पिढ्यान् पिढ्या लोक स्वतःच्या फायद्याच्या दृष्टीनें आर्थिक सिद्धांतांना आकार देण्याचा प्रयत्न करत आले आहेत व असें करत असतानांच त्यांनीं ज्यांना खास परमेश्वरी संकेत म्हणतां येणार नाहीं, अशा संस्था निर्माण केल्या आहेत. उदाहरणार्थ कार्पोरेशन किंवा सामायिक भांडवलाच्या कंपन्या म्हणजे कांहीं परमेश्वरी संकेत नसून मानवाचा शोध होता. सरकारी कायद्यानेंच त्यांचे हक्क, मर्यादा नमूद करण्यांत आल्या होत्या. उद्योगधंदे व व्यापार यांच्या वाढीसाठीं स्थापन झालेल्या या कंपन्या म्हणजे एकोणिसाव्या शतकांतील एक मोठा शोध असून त्यांचे महत्वहि अमाप आहे. पण कंपनी कायद्याचा हिकमतीनें फायदा घेऊन एकाद्याला त्यांत पळवाटा काढतां येतात व दुसऱ्याला लुबाडण्यांत येतें. अशा स्थितींत आर्थिक सिद्धांताच्या नैसर्गिक प्रवाहावर निर्बंध नकोत, असें म्हणून या क्लुप्त्यांचें समर्थन करणें मूर्खपणाचें नाहीं कां ?

आल्जरच्या कथांतील नायक शेवटीं सधन कसा होतो, हें पहाण्याठीं मी गंमतीनें त्याच्या अनेक गोष्टी वाचल्या. आल्जरच्या नायकाचें प्रारंभीचें यश म्हणजे त्याच्या खडतर श्रमांचेंच फळ होतें, हें स्पष्ट्व आहे. पण यामुळें त्याची फार तर पांच डॉलर

वेतनावरून दहा डॉलर वेतनापर्यंत प्रगति झाली असती. पण ही प्रगति म्हणजे कांहीं श्रीमंती नव्हे. पुस्तकाच्या शेवटीं मला असें आढळून येई कीं, नायकाला कोठून तरी अचानक असें घबाड मिळे. त्याच्या सर्व गोष्टींचें तात्पर्य हें कीं जो खूप काम करतो, काटकसर करून बँकेंत पैसे टाकतो व संयम राखतो, त्याच्यावर परमेश्वर प्रसन्न होऊन भांडवलाची खैरात करतो. एकूण काय तर काम करा, बचत करा, चांगल्या तऱ्हेनें रहा, म्हणजे लक्ष्मी तुमच्यावर प्रसन्न होऊन तुमचें कोटकल्याण होईल.

त्या पिढींतील उद्योगपति संपत्ती म्हणजे सद्गुणाचें फळ व दारिद्र्य म्हणजे आळशी-पणाची निष्पत्ति असून कोणत्याहि नैसर्गिक आर्थिक सिद्धांतांत ढवळाढवळ करूं नये, अशा प्रामाणिक मताचे होते. पण त्याच वेळीं हेच उद्योगपति अगदीं वेगळया तऱ्हेच्या भासणाऱ्या व अधिक जोमदार अशा आर्थिक व सामाजिक संस्था मूर्त स्वरूपांत आणत होते.

सन १९०० मध्यें भांडवलशाही ही खरोखरच भांडवलशाही होती. धंद्यांत ज्यांनीं भांडवल घातलेलें किंवा संपादन केलेलें असेल तेच लोक मालक म्हणून त्याचा कारभार पहात. पॉल हॉफमनच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे "निर्णयात्मक सत्तेचा फैलाव" त्यावेळीं अगदींच कमी झालेला होता. कंपनींत ज्याचें अल्प भांडवल, त्यानें तिचा कारभार करावा, ही कल्पनाच त्यावेळीं गैर वाटली असती. त्यावेळीं सामायिक कंपन्या देशांतील एकंदर पक्कया मालपैकीं दोनतृतीयांश मालच तयार करत. बाकीचा एकतृतीयांश माल भागीदारी धंदे किंवा व्यक्तिगत मालक यांच्याकडून तयार केला जाई. त्यावेळीं कोणत्याहि कंपनीचे साठ हजारांहून अधिक भागीदार नव्हते. ज्या अमेरिकन टेलिफोन व टेलिग्राफ कंपनीचे सन १९५१ मध्यें दहा लाख भागीदार होते, त्याच या कंपनीचे सन १९०० मध्यें फक्त ७,५३५ भागीदार होते. त्यावेळीं "पेन-सिल्व्हानिया रेलरोड" कंपनीचे ५१,५४३, "युनियन पॅसिफिक" चे १४,२५६ व "युनायटेड स्टेट्स स्टील" कंपनीचे सन १९०१ मध्यें ५४,०१६ भागीदार होते.

कंपनीचा प्रवर्तक व त्याचप्रमाणें तींत कांहींतरी भांडवल गुंतविलेला गृहस्थच बहुधा तिचा प्रमुख असे. जर कंपनी जुनी असेल तर तींतील बहुतेक भाग त्याच्याकडे वारसा हक्कानें किंवा खरेदी हक्कानें आलेले असावयाचे. कंपनीचा कारभार हवा तसा करण्याचें त्याला स्वातंत्र्य असे. फक्त कायद्यानें किंवा रिवाजानें जें जुजबी नियंत्रण घातलेलें असें तेवढेंच.

कंपनीचा कारभार कसा करावा, याशीं इतरांचा संबंध नाहीं, असें हे प्रमुख मानत. कांहीं कंपन्या अल्पसंख्यांक भागीदारांना कंपनीच्या व्यवहारासंबंधीं भरपूर माहिती देत, तर कांहींचें अहवाल अगदींच त्रोटक असत. कांहीं कंपन्या तर आपल्या व्यवहाराचा अजिबात थांगपत्ता लागूं देत नसत. "वेस्टिंगहौस कंपनी" नें सन १८९७ तें १९०५ या काळांत भागीदारांची एकदांहि सभा बोलावली नव्हती. "युनायटेड स्टेट्स एक्स्प्रेस कंपनी" नें वर्षानुवर्षें कधीं भागीदारांची सभा घेतली नाहीं कीं अहवाल दिला नाहीं. "अमेरिकन शुगर रिफाईनिंग कंपनी" फार मोठी असून तिचे दहा हजार भागीदार होते. पण कंपनीनें त्यांना कधींच अहवाल पुरविले नाहींत. कंपनीचे व्यवहार चालू ठेविण्याच्या दृष्टीनें सरकारकडे प्रतिवर्षी कंपनीला जीं ताळेबंद पत्रकें सादर करावीं लागत, तेवढ्यावरून जी कांहीं माहिती मिळे तेवढीच. पण या ताळेबंद पत्रकांतहि जमेच्या बाजूला सामन्यतः चार व खर्चाच्या बाजूला तीन बाबी असत.

अल्पसंख्यांक भागीदारांप्रमाणें सरकार किंवा न्यायकोर्टें यांनाहि कंपन्यांच्या कारभाराविषयीं कांहीं कर्तव्य नाहीं, असें मानलें जाई. सरकार किंवा न्यायकोर्टें यांना कोणतीहि माहिती देण्याचें कंपन्या सरळ नाकारत.

अमेरिकेंत पुष्कळ वर्षांपासून रोखे बाजारवाल्यांचा ( स्टॉक मार्केट ऑपरेटर्स ) वर्ग आहे. या रोखे बाजारवाल्यांना कंपन्यांच्या प्रत्यक्ष व्यवहाराची माहिती असण्याची आवश्यकता वाटत नाहीं. त्यांना फक्त नफा मिळविण्याच्या दृष्टीनें रोख्यांच्या खरेदी–विक्रीचे व्यवहार करण्यांत रस वाटतो. विसाव्या शतकाच्या आरंभीं, रेल्वे धंद्यांतील सर्वांत धाडसी उद्योगपति म्हणजे इ. एच. हॅरिमन. त्यानें एका जेमतेम चालणाऱ्या रेल्वे कंपनीचे बहुसंख्य शेअर्स, त्या कंपनीच्या मालमत्तेचें पुनर्जीवन करून ती "पेन्सिल्व्हानिया" किंवा "न्यूयॉर्क सेंट्रल" रेल्वे कंपनीला नफ्यांत विकण्याच्या इराद्यानें विकत घेतले व कांहीं वर्षांनीं तसें केलेंहि. रोखेबाजारांतील व्यवहारांचा हा झाला एक प्रकार. पण सगळेच व्यवहार कांहीं अशा स्तुत्य हेतूनें करण्यांत येत नसत. उदाहरणार्थ जे. गोल्ड हा मोठा उलाढाल्या, एकाद्या कंपनीचे नियंत्रक हक्क विकत घेई आणि कंपनीला चरकांत घातल्याप्रमाणें पिळून काढून नंतर तिला आर्थिकदृष्ट्या दिवाळखोरींत लोटी.

कधीं कधीं विशीष्ट मालमत्तेचें नियंत्रक हक्क रोखेबाजारांत खरेदी करण्यासाठीं दोन प्रतिस्पर्धी गटांत जी स्पर्धा होई तीमुळेंहि मोठी उलथापालथ होई. सन १९०१ मध्यें

मॉर्गन गट व हॅरिमन गट या दोघांतहि "बर्लिंगटन रेल्रोड" कंपनी विकत घेण्याकरितां मोठी स्पर्धा होती. मॉर्गनला आपली "उत्तर पॅसिफिक" रेल्वे वाढविण्या-साठीं सदर कंपनी विकत घ्यावयाची होती, तर हॅरिमन ती विकत घेऊन आपली "युनियन पॅसिफिक" रेल्वे वाढविणार होता. शेवटीं हॅरिमननें "उत्तर पॅसिफिक" रेल्वेंतील नियत्रणदृष्ट्या पुरेसे रोखे विकत घेऊन तिचा कारभारच आपल्या बेसावध प्रतिस्पर्ध्याच्या हातून काढून घेण्याचा धाडशी घाट घातला. त्यानें मुळींच गाजावाजा न करतां "उत्तर पॅसिफिक" रेल्वेचे रोखे झपाट्यानें खरेदी केले. मॉर्गन गटाचें धाबे दणाणलें व त्यानेंहि नंतर बेफामपणें खरेदी चालविली. रोखेबाजारांतील सट्टेवाल्यांना "उत्तर पॅसिफिक" रेल्वेच्या रोख्यांचे भाव भलतेच भडकणार असें वाटलें व त्यांनीं या कंपनीचे जे रोखे आपल्या ताब्यांत नव्हते, अशा रोख्यांचीहि विक्री चालविली. हे रोखे पुढें कमी भावांत घेऊन खरेदीदारांच्या ताब्यांत द्यावयाचें असा त्यांचा विचार होता. पण सट्टेबाजांच्या या धोरणाचा परिणाम असा झाला कीं अस्तिवांत असलेल्या रोख्यांपेक्षां अधिक रोखे मॉर्गन व हॅरिमन गटांनीं विकत घेतले! रोखे बाजारांत "उत्तर पॅसिफिक" च्या रोख्यांचा भाव एक हजार डॉलरपर्यंत कडाडला. अखेर सट्टेबाजांनीं स्वतःचा बचाव करण्याकरितां असेल नसेल तें विकण्यास सुरवात केली व बाजारांत घबराट उडाली.

आज रोखेबाजारांवर इतकीं नियंत्रणें आहेत कीं, अशी घबराट आपणांस अशक्य वाटते. पण सन १९०१ मध्यें रोख्यांचे खरेदी-विक्रीदार पाहिजे तें करूं शकत, मग परिणाम कांहींहि होवो.

बहुतेक उद्योगपतींचा तात्त्विकदृष्ट्या स्पर्धेवर विश्वास असे. पण व्यवहारांत मात्र स्पर्धा टाळण्यासाठीं आटोकाट प्रयत्न करण्यांत येई. त्यामुळें विशीष्ट धंद्यांतील सर्वच कंपन्यांना किंमती वाढवून वाटेल तसे नफे फुगवितां येत.

सन १८७९ मध्यें जॉन डी. रॉकफेलरचा वकील सॅम्युएल सी. टी. डॉड यानें पुढाकार घेऊन निरनिराळ्या चाळीस तेल कंपन्यांना आपलें भांडवल रॉकफेलरच्या नेतृत्वाखालीं नियामक मंडळाच्या स्वाधीन करण्यास प्रवृत्त केलें. यामुळें या कंपन्यांना एक विश्वस्त मंडळ (ट्रस्ट) या नात्यानें वाटेल ते भाव लावून प्रतिस्पर्ध्यांना हैराण करणें शक्य होई. तेलकपन्यांच्या मंडळाचें अनुकरण करून इतर अनेक धंद्यांनींहि मंडळें बनविली. पण पुढें विरोधी उद्योगपतींच्याच नव्हे तर लोकांच्या सार्वत्रिक

विरोधामुळें मंडळें बनविण्यास कायद्यानें बंदी घालण्यांत आली. अशा तऱ्हेचा महत्त्वाचा कायदा म्हणजे सन १८९० चा " शेरमन ॲन्टी ट्रस्ट " कायदा.

मध्यंतरी जेम्स बी. डील नांवाच्या दुसऱ्या एका वकीलानें आणखी एक नामी शक्कल काढली. सन १८८९ मध्यें न्यूजर्सीच्या गव्हर्नरानें त्याला राज्याचें उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीनें एक योजना तयार करण्यास सांगितले. डीलनें, न्यूजर्सींत स्थापन झालेल्या कंपन्यांना इतर कंपन्यांत रोखे विकत घेण्यास व भांडवल घालण्यास परवानगी देणारा कायदा करावा, अशी सूचना केली. त्यावेळपर्यंत असें करणें सामान्यतः बेकायदेशीर समजलें जाई. न्यूजर्सीनें हा कायदा केला व तेथें कंपन्या स्थापन करण्याची रीघ लागली व त्याचा परिणाम म्हणजे नोंदणी फीच्या रूपानें न्यूजर्सी राज्याला खूप उत्पन्न मिळालें. अमेरिकन भांडवलशाहीच्या इतिहासांत एका नवीन युगास सुरवात झाली. यापुढें बाजारपेठा मिळविण्याकरितां व स्पर्धा दाबून टाकण्याकरितां निरनिराळया प्रतिस्पर्धी कंपन्यांना मंडळें ( ट्रस्ट ) बनविण्याची जरुरी राहिली नाहीं. त्यांना नवीन समाईक कंपनी काढून आपल्या इतर कंपन्यांचे रोखे खरेदी करणें अगर अधिक काटेकोरपणें सांगावयाचें म्हणजे रोख्यांची अदलाबदल करणें शक्य होऊं लागले व या समाईक कंपनीला इतर कंपन्यांच्या कारभारावर नियंत्रण ठेवतां येऊं लागले.

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं अशा कंपन्या स्थापन करण्याची सांथच आली होती. विशेषतः पोलादाच्या धंद्यांत तर तिला अगदीं उतच आला होता. यांतूनच " युनायटेड स्टेट्स स्टील कार्पोरेशन " ही अवाढव्य व जगांतील सर्वांत मोठी कंपनी स्थापन झाली.

केवळ पोलादी धंद्यांतच नव्हे तर इतरत्रहि अशा मोठया कंपन्या काढण्याला जोराची चालना मिळण्याचें कारण त्यामुळें अल्पावधींतच विपुल पैसा मिळविणें शक्य होई. वैयक्तिक घटक कंपन्यांच्या रोख्यांची जी एकंदर किंमत त्यापेक्षां कितीतरी अधिक किंमतीस या नव्या समाईक कंपन्यांचे रोखे घेण्यास लोकांना उत्तेजन देतां येई. कंपन्या एकवटल्या कीं त्यांच्या रोख्यांची किंमत वटे. समजा, एकाद्या जेमतेम चालणाऱ्या पोलादी कंपनींत एकाद्याच्या मालकीचे रोखे आहेत. कंपन्या एकवटल्या कीं तो–उदाहरणार्थ " अमेरिकन टिन प्लेट " सारख्या कंपनींतील महत्वाच्या रोख्यांचा मालक बने व पुढें एकदोन वर्षांत कितीतरी अधिक महत्त्वाच्या अशा " युनायटेड स्टेटस स्टील कार्पोरेशन " च्या रोख्यांचाहि मालक होई. जे पेढीवाले नवीन भांडवल विक्रीस

काढत त्यांना तर अफाट नफा होई. ज्या कंपनीनें "युनायटेड स्टेट्स स्टील" चे रोखे बाजारांत आणलें, त्या कंपनीला त्या वर्षी सहा कोटि डॉलर फायदा झाला. त्यापैकीं सदर कंपनीचा कारभार पहाणाऱ्या मॉर्गन गटाला किमान एक कोटि वीस लाख डॉलर फायदा झाला असावा.

३

*या अवाढव्य कंपन्याबाबत दोन गोष्टी लक्षांत ठेवण्याजोग्या आहेत.* एक म्हणजे त्या स्थापन करण्याच्या बाबतींत संस्थापेक्षां व्यक्तिगत धनाढ्य लोकांचाच अधिक भाग असे. त्यावेळीं अमेरिकन उद्योगधंद्यांत सधन् संस्थापेक्षां सधन लोकांनाच भाव होता.

दुसरी गोष्ट म्हणजे अशा कंपन्यांनीं जीं माणसें वर चढवलीं तीं. उदाहरणार्थ नवीन "स्टील कार्पोरेशन" च घ्या. वस्तुतः अँन्ड्रयू कार्नेगी हा आद्य व आघाडीचा पोलाद कारखानदार, पण तो त्यांत नव्हता. या "स्टील कार्पोरेशन" मध्यें सूत्रधार व्यक्ति कोणी एकादा कारखानदार नसून जे. मॉर्गन हा पेढीवाला होता. मॉर्गनचा उजवा हात एल्बर्ट एच. गॅरी हाहि कोणी पोलाद कारखानदार नसून कंपनी कायद्यांत निष्णात असा वकील होता.

अनिर्बंध भांडवलशाहीच्या त्या काळांत, ज्याच्या मालकीची कंपनी, तो ती चालवी. पण अशा मालकांना धंद्यांत प्रचंड यश लाभलें नाहीं किंवा त्यांनीं होणारा नफा धंदा अधिक वाढविण्याकरितां त्यांतच घातला नाहीं तर ( पुढें कांहीं वर्षांनीं हेन्री फोर्डनें केलें त्याप्रमाणें ) त्यांनाहि एका गटाच्या मेहेरनजरेवर अवलंबून रहावें लागे. हा गट म्हणजे पेढीवाल्यांचा. धंदा भरभराटींत नसेल त्यावेळीं, कंपनीची पुनर्घटना करते वेळीं, रोखे विकण्याच्या सुमारास, त्यांना पेढीवाल्यांकडून कर्जाची जरुरी लागे. आणि स्वतः भांडवलदार असण्यापेक्षां भांडवल पुरविण्याची ऐपत असणें हें फार महत्त्वाचें असे.

स्वतः मॉर्गन हा धंद्याचा प्रवर्तक व पेढीवाला होता. गॅरी हाहि प्रवर्तक व वकील होता. मोठ्या उद्योगधंद्यांत हा पेढीवाला व त्याचा वकील यांना वर्चस्व मिळालें होतें.

विसावें शतक सुरू होण्याच्या सुमारास मॉर्गन जरी अमेरिकेंतील सर्वांत प्रबळ असा नागरिक नसला तरी, उद्योगधंद्यांतील एक बडें प्रस्थ होता. तसेंच पेढीवाल्यांतहि त्याचें मोठें वर्चस्व होतें. सन १९०१ मध्यें एका मोठ्या पोलादी कंपनीचीं सूत्रें त्याच्या हातांत आलीं होतीं व आणखी अनेक कंपन्या हातांत आणण्याच्या दृष्टीनें त्याच्या हालचाली सुरू होत्या. त्याची सत्ता संदिग्ध होती, पण ती अचाट व वाढती होती.

रोखेबाजारांत थैमान घालणारी सट्टेबाजी मॉर्गनला पसंत नसे. आपण धंद्यांत घातलेली साधनसामुग्री टिकली पाहिजे अशी त्याची अपेक्षा असे. त्याची सचोटी खडकासारखी भक्कम होती. जो मनुष्य विश्वासार्ह नसेल त्याला पैसा न देण्याचें त्याचें कडक धोरण होतें. सचोटीच्या व्यापाराचा मॉर्गन म्हणजे मोठा आधार होता. पण त्याबरोबरच वाढत्या प्रमाणांत अमेरिकन उद्योगधंद्यांचीं सूत्रें थोड्या लोकांच्या हातांत केंद्रित करण्याच्या कामांतहि त्याची जबरदस्त शक्ति उपयोगी पडत होती.

*सन १९०१ मध्यें जेव्हां त्यानें "स्टील कॉर्पोरेशन" स्थापन केल्याची बातमी* प्रसिद्ध झाली तेव्हां जुन्या मताच्या लोकांनींहि निराशेचे सूर काढले. येल विद्यापीठाचा अध्यक्ष हेडली म्हणाला, "या कंपन्यावर नियंत्रण घालण्याचा मार्ग शोधून काढला नाहीं तर पंचवीस वर्षांच्या आंतच वॉशिंग्टनमध्यें बादशहाची सत्ता येईल." याउलट "कॉस्मॉपॉलिटन मॅगझिन"चा संपादक जॉन ब्रिस्बेन वॉकर यानें अशामुळें घातक स्पर्धा, लबाडी, श्रमशक्तीची नासाडी व उद्योगधंद्यांतील परस्परविरोधी गटांतील नेहमींची लाथाळी थांबेल अशी आशा व्यक्त केली. कांहींनीं असेंहि मत व्यक्त केलें कीं, ही एकीकरणाची प्रथा अशीच चालू राहिली तर लोक क्रांति करून समाजवादाला मिठी मारतील.

या निरीक्षकांनीं धास्ती घेतलेली क्रांति खरोखरीच झाली आहे—पण ती अमेरिकेंत नव्हे !

---

काढत त्यांना तर अफाट नफा होई. ज्या कंपनीनें "युनायटेड स्टेट्स स्टील" चे रोखे बाजारांत आणलें, त्या कंपनीला त्या वर्षी सहा कोटि डॉलर फायदा झाला. त्यापैकीं सदर कंपनीचा कारभार पहाणाऱ्या मॉर्गन गटाला किमान एक कोटि वीस लाख डॉलर फायदा झाला असावा.

३

या अवाढव्य कंपन्याबाबत दोन गोष्टी लक्षांत ठेवण्याजोग्या आहेत. एक म्हणजे त्या स्थापन करण्याच्या बाबतींत संस्थापेक्षां व्यक्तिगत धनाढ्य लोकांचाच अधिक भाग असे. त्यावेळीं अमेरिकन उद्योगधंद्यांत सधन संस्थापेक्षां सधन लोकांनाच भाव होता.

दुसरी गोष्ट म्हणजे अशा कंपन्यांनीं जीं माणसें वर चढवलीं तीं. उदाहरणार्थ नवीन "स्टील कार्पोरेशन" च घ्या. वस्तुतः अँन्ड्र्यू कार्नेगी हा आद्य व आघाडीचा पोलाद कारखानदार, पण तो त्यांत नव्हता. या "स्टील कार्पोरेशन" मध्यें सूत्रधार व्यक्ति कोणी एकादा कारखानदार नसून जे. मॉर्गन हा पेढीवाला होता. मॉर्गनचा उजवा हात एल्बर्ट एच. गॅरी हाहि कोणी पोलाद कारखानदार नसून कंपनी कायद्यांत निष्णात असा वकील होता.

अनिर्बंध भांडवलशाहीच्या त्या काळांत, ज्याच्या मालकीची कंपनी, तो ती चालवी. पण अशा मालकांना धंद्यांत प्रचंड यश लाभलें नाहीं किंवा त्यांनीं होणारा नफा धंदा अधिक वाढविण्याकरितां त्यांतच घातला नाहीं तर ( पुढें कांहीं वर्षांनीं हेन्री फोर्डनें केलें त्याप्रमाणें ) त्यांनाहि एका गटाच्या मेहेरनजरेवर अवलंबून रहावें लागे. हा गट म्हणजे पेढीवाल्यांचा. धंदा भरभराटींत नसेल त्यावेळीं, कंपनीची पुनर्घटना करते वेळीं, रोखे विकण्याच्या सुमारास, त्यांना पेढीवाल्यांकडून कर्जाची जरुरी लागे. आणि स्वतः भांडवलदार असण्यापेक्षां भांडवल पुरविण्याची ऐपत असणें हें फार महत्त्वाचें असे.

स्वतः मॉर्गन हा धंद्याचा प्रवर्तक व पेढीवाला होता. गॅरी हाहि प्रवर्तक व वकील होता. मोठ्या उद्योगधंद्यांत हा पेढीवाला व त्याचा वकील यांना वर्चस्व मिळालें होतें.

विसावें शतक सुरू होण्याच्या सुमारास मॉर्गन जरी अमेरिकेंतील सर्वांत प्रबळ असा नागरिक नसला तरी, उद्योगधंद्यांतील एक बडें प्रस्थ होता. तसेंच पेढीवाल्यांतहि त्याचें मोठें वर्चस्व होतें. सन १९०१ मध्यें एका मोठ्या पोलादी कंपनीचीं सूत्रें त्याच्या हातांत आलीं होतीं व आणखी अनेक कंपन्या हातांत आणण्याच्या दृष्टीनें त्याच्या हालचाली सुरू होत्या. त्याची सत्ता संदिग्ध होती, पण ती अचाट व वाढती होती.

रोखेबाजारांत थैमान घालणारी सट्टेबाजी मॉर्गनला पसंत नसे. आपण धंद्यांत घातलेली साधनसामुग्री टिकली पाहिजे अशी त्याची अपेक्षा असे. त्याची सचोटी खडकासारखी भक्कम होती. जो मनुष्य विश्वासार्ह नसेल त्याला पैसा न देण्याचें त्याचें कडक धोरण होतें. सचोटीच्या व्यापाराचा मॉर्गन म्हणजे मोठा आधार होता. पण त्याबरोबरच वाढत्या प्रमाणांत अमेरिकन उद्योगधंद्यांचीं सूत्रें थोड्या लोकांच्या हातांत केंद्रित करण्याच्या कामांतहि त्याची जबरदस्त शक्ति उपयोगी पडत होती.

सन १९०१ मध्यें जेव्हां त्यानें "स्टील कॉर्पोरेशन" स्थापन केल्याची बातमी प्रसिद्ध झाली तेव्हां जुन्या मताच्या लोकांनींहि निराशेचे सूर काढले. येल विद्यापीठाचा अध्यक्ष हेडली म्हणाला, "या कंपन्यावर नियंत्रण घालण्याचा मार्ग शोधून काढला नाहीं तर पंचवीस वर्षांच्या आंतच वॉशिंग्टनमध्यें बादशहाची सत्ता येईल." याउलट "कॉस्मॉपॉलिटन मॅगझिन" चा संपादक जॉन ब्रिस्बेन वॉकर यानें अशामुळें घातक स्पर्धा, लबाडी, श्रमशक्तीची नासाडी व उद्योगधंद्यांतील परस्परविरोधी गटांतील नेहमींची लाथाळी थांबेल अशी आशा व्यक्त केली. कांहींनीं असेंहि मत व्यक्त केलें कीं, ही एकीकरणाची प्रथा अशीच चालू राहिली तर लोक क्रांति करून समाजवादाला मिठी मारतील.

या निरीक्षकांनीं धास्ती घेतलेली क्रांति खरोखरीच झाली आहे—पण ती अमेरिकेंत नव्हे!

# प्रकरण ५ : अमेरिकन सरकार

आतां कोणीहि असें विचारील कीं या अरिष्टसूचक घटना घडत असतां, अमेरिकन सरकार काय करत होतें ?

सन १९०० मध्यें अमेरिकन सरकार किती छोटें व त्याचें कार्यक्षेत्र आणि अधिकार किती मर्यादित होते, याची आज कल्पना येणें कठीण आहे. अमेरिकन सरकारचा वार्षिक खर्च त्यावेळीं पन्नास कोटि डॉलर होता. पुढें पन्नास वर्षांनीं (कोरियन युद्धामुळें खर्चांत वाढ होण्यापूर्वी) अमेरिका दरसाल जो खर्च करूं लागली त्याच्या सव्वा टक्क्याइतका खर्च त्या काळीं ती करीत असे. इतकेंच काय पण सन १९५० मध्यें एकट्या न्यूयॉर्क राज्यानें जेवढा खर्च केला, त्यापेक्षांहि सन १९०० मध्यें अमेरिकेच्या मध्यवर्ती सरकारनें कितीतरी कमी खर्च केला. सन १९०० मध्यें अमेरिकेचें राष्ट्रीय कर्ज फक्त सव्वा अब्जांहून थोडेसें जास्त होतें. सन १९५० मध्यें हें राष्ट्रीय कर्ज २५७ अब्जांपर्यंत गेलें होतें.

त्यावेळीं अमेरिकन सरकारांत व्यापार खातें, मजूर खातें, मध्यवर्ती व्यापारमंडळ, मध्यवर्ती राष्ट्रीय गंगाजळी वगैरे विभाग नव्हते व त्याचें कारणहि अगदीं साधें होतें. व्यापार हा सरकारच्या अखत्यारींतील प्रश्न नव्हे, असें मानलें जाई. रेल्वे कंपन्यांवर नियंत्रण ठेवण्याकरितां एक " आंतरराज्य व्यापार मंडळ " होतें, पण त्याचे अधिकार अगदींच क्षुल्लक व अनिश्चित होते. उद्योगधंद्यांतील स्पर्धा कायम ठेवण्याच्या दृष्टीनें अमेरिकन सरकारनें जो कायदा केला होता, तोहि सुप्रीम कोर्टाच्या निर्णयामुळें अगदींच बोथट झाला होता. सन १९०० मध्यें या कायद्याखालीं सरकारनें एकहि खटला भरला नसल्याचें आढळून येतें.

उद्योगधंद्यांच्या बाबतींत सरकारची भूमिका किती गौण असे, याचीं दोन उदाहरणें पुरी आहेत. सन १८९५ मध्यें अमेरिकन सरकारजवळील सुवर्णसांठा खलास होत चालला होता व आपली धोक्यांत आलेली चलनपद्धति सांवरून धरण्याच्या दृष्टीनें अधिक सोनें खरेदी करण्यासाठीं सरकारला कर्जाची अतिशय जरूरी होती. या आणि-बाणीच्या प्रसंगीं सरकारनें देशांतील सर्वांत बलाढ्य पेढीवाल्याचें, अर्थात् जे. मॉर्गनचे, पाय धरले. सरकारला निर्धास्तपणें कर्ज द्यावयास हरकत नाहीं, अशी इतर पेढीवाल्यांना व धनाढ्य लोकांना फक्त मॉर्गनच हमी देऊं शकत होता. थोडक्यांत भांडवलवाल्यांच्या मदतीशिवाय सरकार असहाय होतें.

दुसरें उदाहरण सन १९०२ मध्यें अमेरिकेचा अध्यक्ष थिओडोर रूझवेल्ट यानें मालक व कोळसा खाणी कामगार यांच्यांत मध्यस्थी करून संप मिटविला तें. गेलीं कित्येक वर्षें मालक व कामगार आपसांतील मोठे तंटे मिटविण्याकरितां वॉशिंग्टनला जात असल्याचें किंवा त्यांना जाणें भाग पडत असल्याचें पहाण्याची आपणांस संवय झाली आहे. अशा स्थितींत अमेरिकेच्या अध्यक्षांनीं सन १९०२ मध्यें प्रथमच संपांत तडजोड केली, यावर आपला विश्वासच बसत नाहीं. " न्यूयॉर्क सन " या नियतकालिकानें सदर संपाबाबत लिहितांना " रूझवेल्टच्या सूचना अभूतपूर्व व विघातक आहेत, " असा शेरा मारला होता. " न्यूयॉर्क जर्नल ऑफ कॉमर्स " या दुसऱ्या नियतकालिकानें पुढील टीका केली होती :

" अध्यक्षांच्या धोरणामुळें कामगार संघाचें महत्त्व व अधिकार यांना लोकांत भलताच भाव मिळतो, मालकांचा दर्जा आणि हक्क यांच्यावर निष्कारण ठपका येतो व प्रचलित अशा अनेक अप्रिय राजकीय आर्थिक प्रश्नांना कामगार–संघटनात्मक रंग चढतो. आणि कोणत्याहि संभाव्य संपापेक्षांहि वाईट गोष्ट म्हणजे यावरून, रूझवेल्टला लहरीप्रमाणें आगंतुकी करण्याची अनिवार चट लागल्याचें दिसून येते. "

२

पण ही झाली सन १९०२ ची गोष्ट. थिओडोर रुझवेल्ट हा साहसी होता. त्याच्यापूर्वी सन १९०० मध्यें विल्यम मॅकिनली हा अमेरिकेचा अध्यक्ष होता. मॅकिनली हा धोरणी मनुष्य होता. संप मिटविण्याची कल्पना त्याच्या स्वप्नांतहि आली नसती. सरकारच्या अधिकारक्षेत्राबद्दल त्याचें मत वेगळेंच होतें. ज्यांत फौजदारी स्वरूपाच्या गुन्ह्यांचा संबंध येत नाहीं, अशा व्यापारी प्रश्नांत सरकारनें ढवळाढवळ करतां कामा नये ( आणि त्यावेळीं कायद्यानें फौजदारी गुन्ह्यांत समाविष्ट केलेल्या बाबी अगदींच थोड्या होत्या. ), उलट शक्यतोंवर सरकारनें आपल्या मगदुरीप्रमाणें उद्योगधंद्यांची सेवा केली पाहिजे, असें त्याचें प्रामाणिक मत होतें.

मॅकिनलीला त्यावेळचा रिपब्लिकन पक्षाचा एक मोठा पुढारी मार्क हॅना याचा पाठिंबा होता. तो मॅकिनलीचा मोठा चहाता असून मॅकिनलीनें कोणतें व्यवहारी धोरण स्वीकारावें याचा सल्ला देई. हॅना हा एक यशस्वी कारखानदार असून तो ओहायओ येथून वरिष्ठ सभागृहाचा ( सीनेट ) सभासद म्हणून निवडून आला होता.

रिपब्लिकन पक्षाच्या "राष्ट्रीय समिती"चा तो अध्यक्ष होता. सधन व हितसंबंधी लोकांकडून पैसा काढण्याची कला त्याला चांगली साधली होती. स्वभावतः मोठे कारखानदार व मोठ्या पेढीवाल्यांशीं त्याचें सूत जमत असे. मुत्सद्दीपणाच्या व्यवहार्य चाकोरींत राहून तो त्यांची करतां येईल तेवढी प्रामाणिक व निष्ठेनें सेवा करी.

सन १९०० च्या अध्यक्षीय निवडणुकींत विल्यम जेनिंग्ज ब्रायन हा मॅकिनलीचा प्रतिस्पर्धी होता. यापूर्वी १८९६ च्या निवडणुकींत मॅकिनलीनें त्याचा पराभव केला होता. ब्रायन हा मानवी हक्कांचा मोठा पुरस्कर्ता होता. त्याची विचारसरणी उथळ असली तरी भाषणशैली मोहक होती. ज्या काळांत रेडियो व टेलीव्हिजन नव्हते आणि वक्तृत्व ही एक मोठी कला मानली जाई त्या काळांतहि श्रोत्यांवर ब्रायनइतका इतर कोणीहि छाप पाडूं शकत नव्हता.

सन १९०० च्या निवडणुकींत ब्रायनचा मुख्य भर साम्राज्यशाही विरोधावर होता. स्पॅनिश युद्धामुळें अमेरिकेच्या ताब्यांत आलेलीं बेटें तेथील मूळच्या रहिवाश्यांकडेच सोंपवावीत, असें तो प्रतिपादन करी, तसेंच विश्वस्त मंडळ ( ट्रस्ट ) पद्धतीवर टीकेची झोड उठवून समाईक कंपन्यांच्या बाबतींत मध्यवर्ती सरकारनें परवानापद्धत सुरवात करावी अशी त्याची मागणी होती. इतकेंच नव्हें तर प्राप्तीवर कर बसविण्यांत यावा अशीहि त्याची सूचना होती. पण ब्रायनला अर्थशास्त्राचें तितकेसें ज्ञान नव्हतें आणि लाखो अमेरिकनांना विश्वस्त मंडळ ( ट्रस्ट ) पद्धत जरी धोक्याची वाटत असली तरी एकंदरींत ब्रायन त्यांना चेतवूं शकला नाहीं. याचें कारण, गेल्या कित्येक हंगामांत अमेरिकनांना मिळाला नव्हता एवढा पैसा सन १९०० च्या हंगामांत त्यांच्या खिशांत पडला होता.

हॅनाच्या दृष्टीनें सन १९०० च्या निवडणुकींतील क्षितीजावर फक्त एकच ढग होता व तो म्हणजे रिपब्लिकन पक्षानें उपाध्यक्षपदाकरितां निवडलेला उमेदवार थिओडोर रूझवेल्ट. रूझवेल्ट हा स्वतंत्र वृत्तीचा असून, हॅनाला त्याच्याविषयीं गैरविश्वास वाटत असे. रिपब्लिकन पक्षाच्या वार्षिक बैठकींत हॅना एका सहकाऱ्याजवळ कडाडला, " हा वेडसर माणूस व अध्यक्षपद यांच्यामध्यें फक्त एकच माणूस उभा आहे. "

" उद्योगधंद्यांच्या फायद्याकरितां सरकार व उद्योगपति यांच्यांतील दोस्ती " ही विचारसरणी हॅनाची भारी लाडकी होती. कंपन्यांना मन मानेल तसा कारभार करण्यास मुभा दिली तर त्यांनीं सांठवलेली संपत्ति खालच्या कमनशिबवान् लोकांपर्यंत झिरपेल,

उलट कंपन्यांना भरभराट करूं देण्याच्या दृष्टीनें अधिक सवलती दिल्या नाहींत तर गुंडगिरी व विध्वंसाचा मार्ग खुला होईल, अशी त्याची समजूत होती. पण इतर लोक म्हणत, मेहेरनजर व पैसा याद्वारें भांडवलवाल्यांनीं सरकार शीलभ्रष्ट करून टाकलें आहे. मोठ्या कंपन्या आपले पाश वाढविण्याकरितां दोन्ही पक्षांना निवडणुकांच्या मोहिमांकरितां भरपूर पैसा देत, एवढेंच नव्हे तर आमदार व खुद्द न्यायमूर्तींनाहि तैनातच नव्हे तर लांचहि देत.

यावेळीं रेल्वे कंपन्या आमदार, अधिकारी, पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांना फुकट पास देत. घटक राज्यांत एकादा प्रतिकूल कायदा होण्याची धास्ती किंवा अनुकूल कायदा होण्याचा संभव आहे, असें दिसलें कीं, कंपन्या आपल्या हस्तकांकरवीं वाटेल तसा पैसा सोडत. वरिष्ठ सभागृह (सीनेट) तर यावेळीं हितसंबंधीं वर्गाच्या संरक्षणाचा बालेकिल्लाच बनलें होतें. या सभागृहाचे बहुतेक सभासद स्वतः सधन किंवा सधनवर्गाचे दोस्त वा हस्तक असत. “ कामगारांना भरपूर घांस मिळाला पाहिजे ” अशा थाटाची ते भाषणें करत पण त्यांनीं आपलें अंतःकरण मात्र बड्या भांडवलदारांना दिलेलें होतें.

या सभासदांना व आमदारांना काखेंत मारण्याचे भांडवलदारांचे अनेक मार्ग होते. सूचना, इषारे, कर्जें, म्हणजे वस्तुतः देणग्याच किंवा प्रसंगीं गुप्तपणें लांच देऊनहि कोणतीहि मोठी कंपनी आमदार, अधिकारी व खुद्द न्यायाधीशांकडूनहि पाहिजे तें काम करून घेऊं शकत. सोव्हिएट प्रचारक नेहमीं “ भांडवलवाल्यांच्या खिदमतगारां ”—विषयीं प्रचार करतात. सन १९०० मध्यें अमेरिकन सरकारांत ज्यांना भांडवलदारांचे खिदमतगार म्हणतां येईल, असे बरेच लोक होते. त्यावेळीं सार्वजनिक जीवनांत वावरणें हें कल्पवृक्षाच्या आसपास वावरण्यासारखेंच होतें. तुम्ही इच्छा व्यक्त करण्याचा अवकाश कीं तिची पूर्तता होई. कारण तिकडे कोणाचें फारसें लक्ष असल्याचें दिसत नव्हतें.

## २

पण कोणी लक्ष कां देत नव्हता ? अमेरिकन भांडवलशाहीचें स्वरूप व कारवाया यांत मोठमोठे राजकीय प्रश्न उद्भवतात व म्हणून आपण आपल्या राजकीय प्रतिनिधींची नीतिमत्ता व कामगिरी याकडे डोळयांत तेल घालून लक्ष दिलें पाहिजे, याची लोकांना जाणीव नव्हती काय ?

याला कारणें अनेक आहेत. पहिलें कारण म्हणजे तत्कालीन विश्वस्त मंडळांना ( ट्रस्ट ) असलेल्या विरोधाला समाजवादाचा रंग चढला होता. समाजवाद हा युरोपियन अपत्य असल्यामुळें लोकांना तो परकीय वाटत होता. अमेरिकन लोकांना तात्त्विक मतप्रणालीविषयीं फारशी आस्था वाटत नाहीं व आपली परिस्थिति कितीहि खराब असली तरी स्वतःला सामान्य कामगार मानण्यास त्यांची तयारी नसे. शिवाय प्रतिकार व रक्तपातानें नसेना कां पण एकंदरींत आमूलाग्र उद्योगधंदे पद्धती बदलण्याच्या या विचारसरणींत अमेरिकन लोकांना क्रांतिचा वास येत होता.

यापेक्षांहि अधिक महत्त्वाचें कारण म्हणजे मोठे भांडवलवाले व समाईक कंपन्या यांच्या अंतर्वर्तुळाबाहेर फारच थोड्या लोकांना, या कंपन्या कशाकरितां उभारतात, त्यांचें कामकाज काय, त्या राजकीयदृष्ट्या कसें दडपण आणतात वगैरेची कल्पना नसे. आपल्या दृष्टीनें उद्योग, व्यापार वगैरे आर्थिक बाबी जिव्हाळयाच्या आहेत, यांचीं सर्वसाधारण लोकांना जाणीव नव्हती. त्यांना तसें शिक्षणच नव्हतें. लोक एकंदरींत त्याबाबत अंधःकारांत होते.

अध्यक्षीय निवडणुकीबाबत लोकांत अत्यंत उत्साह असे. पण तात्त्विक उहापोहापेक्षां ते उमेदवाराच्या वैयक्तिक लायकी–नालायकीचीच चर्चा करत. तसेंच त्यावेळची बहुतेक नियतकालिकेंहि राजकीय शिक्षण देण्यापेक्षां एकतर्फीच विचारसरणी प्रदर्शित करत.

पण या परिस्थितींत बदल होऊं लागला होता व चमत्कारिक गोष्ट म्हणजे या बदलाचा आघाडीचा पाईक एक अडाणी व वेडा खूनी होता. ता. ६ सप्टेंबर १९०१ रोजीं झोल्गॉस नांवाच्या माणसानें अध्यक्ष मॅकिनली याचा गोळी घालून खून केला.

मार्क हॅनाचा प्रिय व माननीय सहकारी नाहींसा झाला. उपाध्यक्षपदाकरतां रूझवेल्टची उमेदवार म्हणून निवड झाल्यावर त्याला क्षितिजावर एक ढग आल्यासारखें वाटलें होतें, त्याच ढगानें आतां निम्मे आकाश व्यापलें होतें. तो एका मित्राजवळ उद्गारला, “ अरे हा क्षुद्र गुराखी आतां अमेरिकेचा अध्यक्ष झाला कीं ! ”

# भाग २ रा

# परिवर्तनाची गति

## प्रकरण ६ : वैचारिक बंड

१९०१ च्या हिंवाळयांत थिओडोर रूझवेल्टनें अध्यक्षपदाचीं सूत्रें हातीं घेतलीं, तेंव्हां वादळाची कसलीहि चिन्हें दिसत नव्हतीं. स्वतः रूझवेल्टनें मॅकिनलीचेंच धोरण पुढें चालविण्याचें जाहीर केलें. अध्यक्ष या नात्यानें त्यानें आरंभीं जीं भाषणें केलीं त्यांत आर्थिक व औद्योगिक धेंडांना घाबरण्याजोगें कांहींहि नव्हतें.

पण अधिकारसूत्रें घेऊन कांहीं महिने झाल्यावर नवीन युगाचा पहिला भडका उडाला. फेब्रुवारी १९०२ मध्यें रूझवेल्ट सरकारनें " शेरमन ट्रस्ट विरोधी कायद्या " खालीं " नॉर्दर्न सिक्युरिटिज कंपनी " चा कारभार गुंडाळण्याबद्दल खटला भरला.

" नॉर्दर्न पॅसिफिक रेल्वे"तील खळबळीनंतर जॉन मॉर्गन व एडवर्ड हॅरिमन यांनीं आपसांत समेट करून ही संयुक्त कंपनी उभारली होती. ही कंपनी कायद्याच्या कचाट्यांतून बचावली असती तर तिचें अनुकरण करून वॉलस्ट्रीटवरील कांहीं मोजक्या भांडवलदारांनीं देशांतील बहुतेक मोठे रेल्वेमार्ग घशांत घातले असते. रूझवेल्टनें हा खटला भरून आर्थिक साम्राज्य निर्माण करण्याच्या प्रवृत्तीवरच नव्हे तर खुद्द मॉर्गनच्या एका मौलिक संस्थेवरच घाव घातला होता.

टेलिफोनवरून या खटल्याची बातमी मिळाली तेंव्हां मॉर्गन भोजन करत होता. बातमी ऐकून त्याला धक्का बसला. तो रागानें पाहुण्यांना उद्देशून म्हणाला, " रूझवेल्ट सभ्य गृहस्थ आहे, अशी माझी समजूत होती. पण सभ्या गृहस्थ काय एकदम खटला भरतो ? निदान मला त्यानें खासगीरीत्या कंपनीची पुनर्घटना करण्यास किंवा ती गुंडाळण्यास सांगावयास पाहिजे होतें."

रुझवेल्टनें नवोदित भांडवलशाही प्रभावळीविरुद्ध पुकारलेल्या या लढ्यांत पुढें कांहीं वर्षें फारसा नेट व जोम नव्हता, त्याचें कारणहि उघड होतें. रुझवेल्ट हा रिपब्लिकन पक्षातर्फें निवडून आलेला अध्यक्ष होता. पक्षाच्या शिस्तीला तो बांधलेला होता. त्याच्या

पक्षांत बहुसंख्यांक लोक सधन असून निवडणूक मोहिमेच्या काळांत, पक्षाला त्यांच्या आर्थिक साहाय्याची जरुरी असे. " सिक्युरिटीज कंपनी " वर हल्ला करण्याचें प्रथम त्यानें जें धाडस दाखविलें तसें धाडस आपल्या साडेसात वर्षांच्या कारकीर्दीत पुनः केव्हांहि दाखविलें नाहीं. त्याच्यानंतर आलेल्या टाफ्टच्या जुन्या वळणाच्या राजवटीनेंहि " शेरमन कायद्या " चा अधिक उपयोग करून खटले भरले, हें खरें असलें तरी अमेरिकन इतिहासांत रुझवेल्टनें जी महत्त्वाची भूमिका वठविली, तिकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. या तडफदार अध्यक्षानें देशापुढें उद्योगधंदे, व्यापार, सरकार व सार्वजनिक हितसंबंध यासंबंधीं एक नवा, रोमांचकारी व सर्वत्र फैलावणारा असा दृष्टिकोन ठेवला.

आतांपर्यंत अशी परिस्थिति होती, कीं भांडवलशाही प्रभावळीनें दुखावले गेलेले लोकच तीविरुद्ध ओरड करत असत. या प्रभावळीला लोकांचा असलेला विरोध हा प्रामुख्यानें निर्धनांचा सधनांना विरोध, अशा स्वरूपाचा होता. तसेंच हा विरोध क्रांतिकारक नसला तरी जहाल होता. विरोधकांच्या आघाडींत मंत्री, समाजसेवक, भावनाशील प्रागतिक वगैरे लोक होते. पण आतां अमेरिकन अध्यक्षपदावरून, यापैकीं कोणत्याहि चौकटींत न बसणारी व्यक्ति विरोध करण्यास पुढें सरसावली होती.

रुझवेल्टला निर्धन म्हणतां येत नव्हतें. त्याला स्वतःला वॉलस्ट्रीटचा कधीं धक्का बसला नव्हता. आपल्या दृष्टीनें तो एका परीं सधनच होता. तो नखशिखांत लष्करी पेशाचा, क्रियाशील असून, त्याचा उत्साह कणखर होता. सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीनें त्याचें व्यक्तिमत्व विलोभनीय होतें.

" संपत्तीचा दुरुपयोग, " " योग्य वांटणी, " वगैरेवरील त्याचा भर आर्थिक नसून नैतिक होता. त्याला धंदेवाईक जगताचें नैतिक पुनरुज्जीवन करावयाचें होतें. त्याला नैतिक मूल्यें प्रस्थापित करावयाचीं होतीं. कांहीं लोकांनीं लांडीलबाडी करून धंद्यांत व राजकारणांत पाय रोंवून बसावें, इतरांना संधिहि मिळूं नये, हें उघडउघड चूक आहे, असें तो प्रतिपादन करी. तत्त्वप्रणाली, आर्थिक सिद्धांत वगैरे भाषेचें साधारणतः वावडेंच असलेल्या लाखों अमेरिकन लोकांना रुझवेल्टची ही भाषा तात्रडतोब समजली. रुझवेल्टनें ज्या कायद्याचा पुरस्कार केला, त्या कायद्याचा परिणाम किरकोळच दिसून आला असेल. पण त्याचें व्यक्तिमत्व व शिकवणूक यांचा एकात्र सबंध अमेरिकन पिढिवर ठसा उमटला. त्याच्या शिकवणुकीचे प्रतिध्वनि सर्व अमेरिकेभर उमटले.

खालील कांहीं घटना लक्षांत घ्या:—फेब्रुवारी १९०२ मध्यें रुझवेल्टनें "नॉर्दर्न सिक्युरिटीज कंपनी" ला तडाखा दिला. त्यापूर्वीच कु. आयडा टर्बेल हिनें स्टँडर्ड ऑईल कंपनी" च्या कारभारावर प्रकाश टाकणारा इतिहास लिहण्यास सुरवात केली होती. हा इतिहास नोव्हेंबर १९०२ पासून "मॅक्लुअर" नियतकालिकांत प्रसिद्ध होण्यास सुरवात झाली. त्यापूर्वी लिंकन स्टीफन्सचा म्युनिसिपल लांचलुचपतीसंबंधीचा पहिला लेखहि याच मासिकांत ऑक्टोबर १९०२ मध्यें प्रसिद्ध झाला होता. या दोन पत्रकारांनीं अमेरिकन उद्योगधंद्यांची व राजकीय घटनांची निर्विकार, सडेतोड व सत्य माहिती देण्यास सुरवात करून अमेरिकन वृत्तपत्रसृष्टींत नवें युग सुरू केलें. याशिवाय, यावेळीं उत्साही समाजसुधारकांपैकीं, कोणी नगराध्यक्ष, तर कोणी गव्हर्नर झाले. हे लोक अमेरिकन राज्य सरकारें व स्थानिक स्वराज्य संस्थांतील एका सबंध सुधारक पिढीचे एका परीनें पुढारी व मार्गदर्शक होते.

अशा रीतीनें अमेरिकेंत सुरु झालेल्या वैचारिक बंडाचा सन १९१५ पर्यंत प्रभाव होता. पहिल्या महायुद्धाच्या काळांत त्याच्या ओहोटीला सुरवात होऊन सन १९२० मध्यें तें बारगळलें. पण या बंडाचे वैचारिक प्रवाह व दृष्टिकोन आजहि अस्तित्वांत आहेत.

## २

अर्थात् हॅकर व केन्ड्राक या इतिहासकारांनीं दिग्दर्शित केल्याप्रमाणें हें बंड म्हणजे एक संघटित चळवळ नव्हती. त्यांत विस्कळितपणा होता. आणि निश्चित कार्यक्रम कांहींच नव्हता. या चळवळींत श्रीमंतांपासून गरीबांपर्यंत सर्व तऱ्हेचे लोक असून अनेक बाबतींत त्यांच्यांत आपसांतच तीव्र मतभेद होते.

या चळवळींतील कांहींजण सरकार अधिक लोकमतानुवर्ति करावें, भांडवलवाल्यांचें सरकारवर दडपण असूं नये, वरिष्ठ सभागृहाच्या निवडणुकी प्रत्यक्ष व्हाव्यात, सार्वमत असावें, असा पुरस्कार करत होते, तर कांहींजण म्युनिसिपल सुधारणांची मागणी करत होते. कांहीं आर्थिक तज्ञ होते. तर कांहींजण कामगारांकरितां नुकसान भरपाईचा कायदा व्हावा म्हणून झगडत होते. राष्ट्राच्या नैसर्गिक संपत्तिची, विशेषतः जंगलांची, नासाडी होऊं नये, यावर कांहींचा कटाक्ष होता. याशिवाय या चळवळींत स्त्रियांच्या मताधिकाराच्या पुरस्कर्त्या, शुद्ध अन्न व औषधें यासंबंधींच्या कायद्याचे आग्रही व

सन १९०७ च्या घबराटीनंतर एक मध्यवर्ती बँकिंग संस्था स्थापन करण्यासाठीं धडपडणारे पेढीवालेहि होते.

राष्ट्रानें केवळ कांहीं हितसंबंधी लोकांचेंच नव्हे तर सर्व जनतेचे हितसंबंध पाहिले पाहिजेत, या कल्पनेनें विविध क्षेत्रांतील इतर असंख्य लोकहि यावेळीं भारून गेले होते. समाजसेवेला प्रतिष्ठित स्वरूप येत चाललें होतें. "लेडीज होम जर्नल"सारखीं नियत-कालिकें लाखो अमेरिकन स्त्रियांना अल्प कमाईवरहि प्रतिष्ठेनें कसें रहावें, याचें शिक्षण देऊं लागलीं होतीं. "सॅटरडे एव्हिनिंग पोस्ट"सारखीं वाढत्या खपाचीं नियतकालिकें जाहिरातकला अधिकाधिक लोकप्रिय करून सर्वसामान्य लोकांपर्यंत प्रचंड प्रमाणावर उत्पादन होऊं लागलेल्या मालाचें लोण पोहोचवूं लागलीं होती. हेन्री फोर्ड हा केवळ श्रीमंतांचेंच खेळणें होईल अशी नव्हें तर सामान्य लोकांच्या दृष्टीनें कमी खर्चाची व सोयीची अशी मोटारगाडी बनवूं लागला होता. याच काळांत विल्फर्ड आय किंग यानें प्रथमच राष्ट्रीय उत्पन्नाची कल्पना अर्थशास्त्रज्ञांपुढें ठेवली.

यावेळीं सुधारणेची सांथ अत्यंत सधन आणि अत्यंत समर्थ लोकांपर्यंतहि जाऊन भिडली होती. हॅरी डेव्हिसन व पॉल एम्. वॉरबर्ग वगैरे लक्षाधीशांनीं मध्यवर्ती पत-पेढ्यांची व्यवस्था अमलांत आणण्याचा प्रयत्न चालविला होता. न्यू पोर्टच्या पोषाखी बायांमध्यें श्रीमती ओ. अेच. पी. बेलमॉंट ही लक्ष्मीकन्या स्त्रियांच्या मताधिकाराकरितां सभा घेऊं लागली होती. आणि जॉन डी. रॉकफेलर हा लक्षाधीश विविध प्रकारच्या सत्कार्यांकरितां लाखो डॉलरची खैरात करूं लागला होता.

पण एकंदरींत या बंडाला अतिरंजित स्वरूप न देणेंच बरें. सन १९१३ मध्यें अमेरिकन सरकारनें स्वतंत्र मजूरखातें निर्माण केलें; सन १९१४ च्या "क्लेटन कायद्या" नें निदान तत्त्वतः तरी सामुदायिक करारांना कायदेशीर दर्जा प्राप्त झाला होता व सामान्यतः संघटित कामगारांचा दर्जा सुधारत चालला होता. तरी अद्यापहि बऱ्याच उद्योगधंद्यांतून कामगार पूर्णपणें असंघटित होते. कांहीं धंद्यांत तर मालक व कामगार यांच्यामधील लढ्याला एका बाजूला जुलमी मालक व त्यांचे भाडोत्री ठग आणि दुसऱ्या बाजूला क्रांतिकारक किंवा खूनी किंवा दोन्हीहि यांच्यामधील लढाईचें स्वरूप प्राप्त होई.

सन १९०५ मधील "आंतरराष्ट्रीय जागतिक कामगार संघटने" च्या ( इंटरनॅशनल वर्कर्स ऑफ दि वर्ल्ड ) स्थापनेचें उदाहरण घ्या. या संघटनेच्या उद्देशपत्रिकेंत "कामगार व मालक यांच्यांत कसलेंहि साम्य नाहीं," असें म्हटले होतें. ही संघटना नेहमींच

कायदा धाब्यावर बसवत होती, अशांतला प्रकार नव्हता. पण या संघटनेनें सन १९१२ व १९१३ मध्यें घडवून आणलेले दोन्ही संप अत्यंत भीषण व तीव्र स्वरूपाचे असून तसे संप नंतर क्वचितच झाले असतील. या संघटनेचे मुख्य पुढारी मनापासून क्रांतिकारक होते, हें नाकारतां येणार नाहीं.

दुसरी गोष्ट म्हणजे याच काळांत समाजवादी पक्षाचें वजन वाढत गेलें. अमेरिकन उद्योगधंद्यांच्या व्यवस्थापनेंत आमूलाग्र बदल करणें हें या पक्षाचें ध्येय होतें. सन १९१२ च्या अध्यक्षीय निवडणुकींत तर या पक्षाचा उमेदवार यूजीन डेब्ज यानें ८,९७,००० मतें मिळविलीं होतीं.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे अमेरिकन उद्योगधंद्यांतील प्रचलित पद्धतींत बदल करूं पहाणारे सर्वच लोक कांहीं नेमस्त किंवा प्रागतिक नव्हते.

दुसरी नमूद करण्याजोगी गोष्ट म्हणजे अद्यापहि मॉर्गनसारख्यांचे व्यापार, बँका व समाईक कंपन्यांत जबरदस्त प्रस्थ होतें. सन १९१२–१३ मध्यें कॉंग्रेसनें नेमलेल्या चौकशी समितीनें केलेल्या पहाणींत वॉलस्ट्रीटचें अमेरिकन उद्योगधंद्यांत किती व्यापक नियंत्रण होतें, हें आढळून आलें.

१९ वें शतक संपून बरींच वर्षें झालीं होतीं तरी सट्टेबाजीचा ऊत ओसरला नव्हता, " स्टॅंडर्ड ऑइल कंपनी "चा सट्टेबाज गट रोखेबाजारांत सफाईचे व्यवहार करून लाखो डॉलर कमावत होता. लुटारु धंदेवाल्यांच्या कारवायांना आळा बसलेला नव्हता, लोकांना ते अक्षरशः लुटत होते. वॉलस्ट्रीटवरील बड्या धेंडांना एकंदरींत सुधारणा नको होत्या.

पण एकंदरींत सुधारणांचे प्रवाह जोरदार होते व सन १९१२ च्या निवडणुकींत तर त्यांचा जोर कमालीचा वाढला.

या निवडणुकीपूर्वी चार वर्षें अगोदर थिओडोर रुझवेल्टनें पुनः निवडणूक न लढविण्याचें ठरवून विल्यम एच. टॅफ्ट याच्या उमेदवारीला पाठिंबा दिला. टॅफ्ट आपलें प्रगतिप्रिय धोरणच पुढें चालवील असें रुझवेल्टला वाटत होतें. पण टॅफ्टनें जुनेंच धोरण पुढें चालविलें. रुझवेल्टनें टॅफ्टवर कडाडून हल्ला चढविला व सन १९१२ च्या अध्यक्षीय निवडणुकीसाठीं रिपब्लिकन पक्षाचें तिकीट मिळावें, म्हणून त्यानें टॅफ्टशी सामनाहि दिला. या सामान्यांत रुझवेल्ट हरला. तेव्हां त्यानें प्रोग्रेसिव्ह पक्ष या नांवाचा नवा पक्ष काढून निवडणूक लढविण्याचें ठरविलें.

पण या निवडणुकींत डेमोक्रॅटिक पक्षाचा उमेदवार वुड्रो विल्सन हा निवडून आला. विल्सन हा एक माजी प्राध्यापक असून सरळ वृत्तीचा, हुषार व तडफदार होता.

विल्सननें आपल्या स्वातंत्र्य कार्यक्रमांतील ( फ्रीडम प्रोग्रॅम ) सुधारणा धडाक्यानें अंमलांत आणावयास सुरवात केली होती. पण तो अधिकारावर येऊन दीड वर्ष झालें नाहीं तोंच युरोपांत अचानक युद्ध सुरू झालें. या युद्धानें उपस्थित केलेल्या प्रश्नांनीं अमेरिकेलाहि ग्रासून टाकलें व सुधारणा मागें पडल्या. सन १९१७ मध्यें अमेरिका जर्मनीविरुद्ध रणांगणांत उतरली. हें महायुद्ध स्वातंत्र्यासाठीं किंवा वुड्रो विल्सननें म्हटल्याप्रमाणें जगांत लोकशाहीचा मार्ग निर्धास्त करण्यासाठीं होतें, अशा तीव्र भावनेनें या युद्धांत अमेरिकन लोकांनीं हिरिरीनें भाग घेतला. पहिलें महायुद्ध शेवटेंच ठरेल व त्यांतून जागतिक स्वातंत्र्याचें नवें युग निर्माण होईल अशी प्रचंड बहुसंख्यांक अमेरिकनांना खात्री वाटत होती.

ही भावना युद्ध संपेपर्यंत कशीबशी टिकली. या काळांत स्त्रियांच्या मताधिकाराचा कायदा पास करण्यांत आला. पण युद्ध संपल्यानंतर नवें राष्ट्र व नवें जग उभारण्याची भावना ओसरल्याचें आढळून आलें. उच्च ध्येयांनीं प्रेरित होऊन उदात्त त्याग केलेल्या या लोकांनीं जीवनाचा आनंद उपभोगण्याचें ठरविलें. अद्यापहि तत्त्वनिष्ठा न सोडणारे अनेक अमेरिकन होते. पण तेहि शिणले होते व त्यांची संख्याहि अल्प होती.

## ५

अर्थात् हें वैचारिक बंड संपुष्टांत आलें तरी त्यानें अमेरिकेच्या भवितव्याच्या दृष्टीनें महत्त्वाचा असा राजकीय व आर्थिक प्रश्नांकडे पहाण्याचा एक विशीष्ट दृष्टिकोन लोकांपुढें ठेविला होता. हा दृष्टिकोन असा : राज्यकारभाराचा गाडा नादुरुस्त झाला असतां किंवा आर्थिक रचनेंत बिघाड झाला असतां त्यांत योग्य ते फेरफार व सुधारणा केल्या तर कार्यभाग होऊं शकेल, त्याकरितां क्रांतीसारख्या विध्वंसक शस्त्राचा वापर करून सर्वनाश करण्याची आवश्यकता नाहीं. हा दृष्टिकोन जुना असला तरी आतां काळाच्या कसोटीला उतरला होता. त्यावेळीं एकामागून एक असे जे कायदे करण्यांत आले ते किती प्राथमिक, तात्पुरते, किरकोळ पण दूरगामी स्वरुपाचे होते, यावरून या विचारसरणीची कल्पना येते. त्यावेळचा एक उपेक्षणीय वाटणारा पण अमेरिकन आर्थिक रचनेवर निश्चितपणें टिकाऊ परिणाम करणारा कायदा म्हणजे प्राप्तीवरील करासंबंधींचा.

प्राप्तीवर कर बसविण्याचा कायदा सामान्यतः जुन्या विचारांचा समजला जाणारा अध्यक्ष टॅफ्ट यानें कॉंग्रेसमध्यें पास करून घेतला. या कायद्याला फारसा विरोध झाला नाहीं. लोकांनीं तो लागूं करण्याची वेळ आली आहे, हें ओळखलें होतें. सन १९१३ मध्यें हा कायदा अमंलांत आला तेंव्हां प्राप्तीवरील कराचे दर फारच कमी होते. वीस हजार डॉलर उत्पन्नापर्यंत प्राप्तीवरील कर फक्त एक टक्का असून, त्यापेक्षां अधिक उत्पन्नावर अगदीं जुजबी सरटॅक्स ठेवण्यांत आला होता. तीन हजार डॉलरखालीं उत्पन्न असलेल्या कोणत्याहि अविवाहित माणसाला व चार हजार डॉलरखालीं उत्पन्न असलेल्या कोणत्याहि विवाहित माणसाला कर द्यावा लागत नसे. विश्वास ठेवा अगर नका ठेवूं, पण दहा हजार डॉलरच्या उत्पन्नावर विवाहित माणूस फक्त साठ डॉलर व वीस हजार डॉलर उत्पन्नावर फक्त १६० डॉलर कर देई. सन १९१७ पर्यंत अमेरिकन सरकारला जकातीपासून जेवढें उत्पन्न मिळे, तेवढेंहि उत्पन्न प्राप्ति-करापासून मिळत नसे. पण सन १९२० पर्यंत प्राप्ति-कराचें उत्पन्न जकातीपेक्षां दहा पटीनें वाढलें. सरकारचा खर्च प्रचंड प्रमाणांत वाढत चालला होता. या खर्चाची सोय करण्याच्या बाबतींतच नव्हे तर अमेरिकन संपत्तीच्या फेरवांटणींतही क्रमशः वाढता प्राप्ति-कर ( ग्रॅज्युएटेड इन्कमटॅक्स ) म्हणजे एक महत्त्वाची बाब ठरली.

अर्थात् या सुधारणायुगांत पास झालेले विशिष्ट कायदे किंवा पुरीं करण्यांत आलेलीं चांगलीं कामें किंवा झालेल्या चुका, यांवरच भर न देतां लोकांत दृढमूल झालेल्या मूलभूत विचारसरणीचाच विचार करणें अगत्याचें आहे.

पुष्कळ लोकांचें असें म्हणणें आहे कीं आज अमेरिकेंत जवळजवळ समान कार्य-क्रमाचे पक्ष आहेत, त्याऐवजीं तेथें जुन्या चाकोरींतून जाणारा एक पक्ष, एक प्रागतिक पक्ष किंवा जहाल पक्ष अशासारखे स्पष्ट तर्कशुद्ध कार्यक्रम असणारे पक्ष पाहिजे होते. लोकांचा दुसरा मुद्दा असा कीं आर्थिक सुधारणांचीं ठिगळें जोडत बसणें चूक व कमकुवतपणाचें असून. उद्योगधंद्यांचें स्वरूप पालटण्यांकरितां लोकांचे उठावच घडवून आणले पाहिजेत. एकवेळ या विचारसरणीचा जोर होताहि, पण नंतर तिला ओहोटी लागली.

अखेर असे आर्थिक व सामाजिकदृष्ट्या स्पष्ट असे विरोधी पक्ष असणें हा अमेरिकन लोकशाही तत्त्वांचा अपमान आहे, या विचारसरणीचा विजय झाला. सर्वांच्या समान हिताकरितां सर्व प्रकारच्या लोकांनीं सहकार्यानें काम केलें पाहिजे; मालक-कामगार

झगड्यांत कामगारांना दाबून टाकणें किंवा मालकांना दडपून टाकण्यासाठीं कामगारांना मदत करणें हा मार्ग नव्हे; उलट कामगारांना विकास करून घेण्याची समान संधि द्यावी व त्यांना मध्यम वर्गीयांच्या सर्व सुखसोयी उपलब्ध करून मध्यम वर्गीयांच्या पातळीवर आणावें, तसेंच सामान्य कामगारांचा वर्गच अस्तित्वांत न रहातां अमेरिका म्हणजे स्वाभिमानी व सुशील नागरिकांचा देश बनावा व राष्ट्रांचा गाडा सुरळीत चालावा, या मताचा अमेरिकनांवर पगडा बसला. ज्यांत अखंड सहकार्य आहे, प्रयोगांना वाव आहे व ज्यांत केवळ कोरड्या सिद्धांतवादावर भर नाहीं, अशा परिवर्तनाची इष्टता अमेरिकनांना कळून चुकली होती.

---

92392
अ. क्रि
65 ...
21/5/54

# प्रकरण ७ : हेन्री फोर्डचा उदय

डिट्रॉईट येथील एका छोट्याशा मोटार कारखान्यांत हेन्री फोर्ड या नांवाचा गृहस्थ नोकरीस होता. सन १९०३ मध्यें त्यानें स्वतःच मोटारी तयार करण्याचा कारखाना काढण्याचें ठरविलें. यावेळीं फोर्डचें वय ४० वर्षांचें होतें. फोर्डनें कारखाना काढल्यानंतर प्रथम एक मोठी व दणकट अशी शर्यतीची गाडी (रेसिंगकार) तयार केली. वस्तुतः फोर्ड वेगाला फारसें महत्त्व देत नव्हता. त्याला छोट्या, सुटसुटीत व उपयोगी अशा मोटारगाड्या तयार करावयाच्या होत्या. पण त्याला भांडवल पाहिजे होतें व भांडवल मिळविण्याकरितां प्रथम कीर्ति व्हावयाला पाहिजे होती. आणि त्या काळांत कीर्ति मिळविण्याचा एक मार्ग म्हणजे शर्यती जिंकू शकेल अशी गाडी बनविणें.

या नव्या शर्यतगाडीनें मोठ्या अंतरानें शर्यत जिंकली. फोर्डला कीर्ति व त्याचबरोबर रोख अठ्ठावीस हजार डॉलर मिळाले. "फोर्ड मोटार कंपनी" चालू करावयास एवढें भांडवल पुरेसें होतें. फोर्ड स्वतःच या नव्या कंपनीचा अध्यक्ष, जनरल मॅनेजर, प्रमुख कारागीर व सुपरिन्टेंडेंट वगैरे सर्व कांहीं होता.

या पुढच्या कांहीं वर्षांत फोर्डनें अनेक तऱ्हेच्या मोटारगाड्या तयार केल्या व त्याचा धंदा झपाट्यानें वाढला. सन १९०८ मध्यें त्यानें स्वतःच्या दृष्टीनें अत्यंत समाधान-कारक अशी अद्यावत् मोटारगाडी तयार केली. तिला त्यानें "मॉडेल टी" असें नांव दिलें. लवकरच त्यानें आपल्या सहकाऱ्यांना थक्क करणारा निर्णय घेतला. फोर्डच्या शब्दांतच हा निर्णय पुढीलप्रमाणें होता. "सन १९०८ मध्यें एके दिवशीं सकाळीं अगाऊ कसलीहि कल्पना न देतां, मी असें जाहीर केलें कीं यापुढें फक्त टी मॉडेलच्याच मोटारी तयार करावयाच्या व सर्व मोटारींचे सांगाडेहि एकाच तऱ्हेचे बनवावयाचे."

फोर्डला केवळ सुखवस्तू लोकांकरितां दिखाऊ गाड्या बांधावयाच्या नसून सर्वसामान्य लोकांकरितां उपयुक्त अशा कमी किंमतीच्या गाड्या तयार करावयाच्या होत्या. बरेच कारखानदार केवळ नफ्यावर दृष्टि ठेवतात आणि पेढीवाले कारखानदारांवर मालाचा वाण सुधारण्यापेक्षां नफा वाढविण्याच्या दृष्टीनें दडपण आणतात, हें चूक आहे, असें फोर्डचें मत होतें. मालाचा वाण व किंमती योग्य असतील तर आपोआपच नफा होईल, अशी त्याची विचारसरणी होती. आणि एकाच सांच्याच्या मोटारगाड्या तयार करण्यावर लक्ष केंद्रित करून उत्पादनाच्या किंमतींत खूप कपात केली तर सर्वसामान्य लोकांची अशा गाड्या खरेदी करण्याकरितां रीघ लागेल, अशी त्याची खात्री होती.

" मॉडेल टी " गाड्यांचा खप वाढल्यावर फोर्डनें मुद्दाम त्यांच्या किंमती कमी केल्या व त्यामुळें खप आणखी वाढला. जानेवारी १९१४ मध्यें फोर्डनें जगांत खळबळ उडविणारी एक घोषणा केली. त्यावेळीं मोटार धंद्यांत नऊ तासांच्या दिवसाकरितां कामगारांना सरासरी २·४० डॉलर वेतन मिळे. फोर्डनें आपल्या कामगारांना आठ तासांकरितां किमान पांच डॉलर वेतन देण्याचें जाहीर केलें. ही पगारवाढ करण्यामागें फोर्डचें विशिष्ट धोरण होतें. तो दरवर्षी कामगारांना बोनस देत असे. आतां नफ्यांत वाढ झाल्यावर त्यानें पगारवाढीच्या रूपानें कामगारांना नफ्यांत भागीदारी देण्याचा निर्णय घेतला. यामुळें कामगारांतील निरुत्साह जाऊन त्यांना हुरूप येईलच, पण शिवाय अधिक अमेरिकन लोकांना अधिकाधिक वेतन मिळूं लागले कीं त्याचा परिणाम म्हणजे आपल्या मोटारगाड्यांनाच नव्हे तर सर्वच औद्योगिक मालाला चांगली बाजारपेठ मिळेल, असा त्यानें विचार केला असावा.

थोडक्यांत फोर्डनें उत्पादनाचें तंत्र, किंमतींत कपात, वेतनांत वाढ याद्वारें अद्यावत् कारखानदारीचें एक महान् शास्त्र अभूतपूर्व रीतीनें लोकांच्या निदर्शनास आणलें व तें म्हणजे अफाट उत्पादनाचें तडफदार शास्त्र (डिनॅमिक लॉजिक ऑफ मास प्रॉडक्शन ). जितकें उत्पादन अधिक, तितका उत्पादन खर्च कमी आणि लोकांची परिस्थिति जितकी अधिक चांगली, तितकी त्यांची खरेदीशक्ति अधिक आणि त्याचा परिणाम म्हणजे भरपूर पण कमी खर्चांत उत्पादन करण्याची शक्यता अधिक.

सन १९०९–१० मध्यें फोर्ड मोटारीची किंमत ९५० डॉलर होती. ती कमीकमी होत ७८०, ६९०, ६००, ५५०, ४९०, ४४० व अखेर ३५० डॉलरवर आली होती. यानंतर पहिल्या महायुद्धांतील टंचाई व चलनवाढ यामुळें या किंमती कांहीं काळ चढून, युद्ध संपल्यावर पुनः घसरत गेल्या. इतक्या कीं, सन १९२४ मध्यें फोर्ड मोटारीची किंमत फक्त २९० डॉलर होती. मध्यंतरीं मोटारगाड्यांचें उत्पादन १८,६६४ वरून सन १९२०–२१ मध्यें १२,५०,००० पर्यंत गेलें.

सन १९२७ पर्यंत फोर्डचें एकाच तऱ्हेच्या स्वस्त गाड्या तयार करण्याचें धोरण होतें, पण पुढें दोन गोष्टींमुळें त्याला हें धोरण बदलावें लागलें. एक म्हणजे लोकांना केवळ स्वस्तच गाड्या नको असून त्यांना अधिक चांगल्या गाड्याहि हव्या होत्या. तसेंच प्रतिस्पर्धी मोटार कारखानदारांनींहि असें दाखवून दिलें होतें कीं जर दर वर्षी नवीन सुधारलेलें मॉडेल तयार केलें तर जुनें निकामी ठरतें व अशा रीतीनें जुन्या

ग्राहकांना नव्या गाड्या खरेदी करावयास लावता येतें. दुसरी गोष्ट म्हणजे नव्या व अद्यावत् गाड्यांच्या मागणीबरोबरच जुन्या गाड्यांनाहि उतरत्या किंमतींत चांगली बाजारपेठ मिळूं लागतें. त्याचा परिणाम म्हणजे बाजारांत केवळ "टी मॉडेल" गाडीचीच मक्तेदारी राहूं शकत नाहीं.

२

विसाव्या शतकांतील पहिल्या पंचवीस वर्षांत अमेरिकेची जी धवधवीत औद्योगिक प्रगति झाली तींत फोर्डचा महान् प्रयोग हा केवळ एक भाग होता. अमेरिकन राष्ट्र प्रौढावस्थेंत प्रवेश करूं लागलें होतें व त्याबरोबरच सामान्यतः उद्योगधंद्यांतहि विकास व परिवर्तन होत होतें.

रेल्वेधंद्याचें हें सुवर्ण युग होतें. पॅसिफिक महासागरापासून अटलांटीक महासागरापर्यंतच्या प्रदेशाला एकत्र जोडणारें रेल्वेचें विस्तृत जाळें जवळजवळ पुरें झालें होतें व रेल्वे मार्गें होणाऱ्या व्यापारांत अफाट वाढ झाली होती. सन १९२० पर्यंत रेल्वेनें मालाची वाहतुक कितीतरी वाढली होती. इतकेंच नव्हे तर १९०० च्या मानानें प्रवासी वहातुकीचें प्रमाणहि दुपटीपेक्षां अधिक वाढलें होतें. विद्युत् ट्रॉली मार्गांच्या दृष्टीनेंहि हा भरभराटीचा काळ होता.

हा काळ म्हणजे विद्युन्युगाचा प्रभातकाळच होय. सन १८८९ मध्यें उद्योगधंद्यांत फक्त दोन टक्के विद्युत्शक्ति वापरण्यांत येत होती. सन १९१९ पर्यंत हेंच प्रमाण ३१ टक्क्यांवर गेलें. पोलादाच्या धंद्यांतहि अजस्र वाढ झाली. सन १९०० च्या मानानें सन १९२० पर्यंत लोखंड व पोलादाचें माणशीं उत्पादन जवळजवळ तिपटीवर गेलें होतें. निरनिराळ्या शहरांतून गगनचुंबी इमारती (स्कायस्क्रेपर्स) उठूं लागल्या होत्या.

या गगनचुंबी इमारती प्रार्थनामंदिरांच्या टॉवरसारख्या दिसत होत्या, तर शहरांतील नवीन वस्तुभांडारें (डिपार्टमेंटल स्टोअर्स) राजवाड्यांसारखीं भासत होतीं. याच काळांत साखळी वस्तुभांडारेंहि (चेन स्टोअर्स) निघूं लागलीं होतीं. १९०० मध्यें "ए. अॅन्ड पी." कंपनी २०० वस्तुभांडारें चालवीत होती, सन १९१२ पर्यंत हीच संख्या ४०० वर व सन १९२४ पर्यंत ११,४१३ वर जाऊन धडकली. अफाट उत्पादनाचें तडफदार शास्त्र विक्रीच्या धंद्यांतहि दिसून येऊं लागलें होतें. एकाच प्रकारचीं अनेक वस्तुभांडारें काढून विक्री खर्च कमी केला तर लाखों ग्राहक भांडाराकडे

आपोआप खेंचले जातात आणि मोठ्या प्रमाणावर माल मागवून किंमती कमी केल्या तरी नफा मिळवितां येतो, हें सिद्ध झालें. असो.

मध्यंतरीं मोटारधंदा संक्रमणावस्थेंतून जात होता. या संक्रमणावस्थेचा पहिला टप्पा स्पर्धेचा होता. विसाव्या शतकाच्या पहिल्या पंचवीस वर्षांत शेंकडों यंत्रकार वृत्तीच्या लोकांनीं धडपड करून भांडवल जमविलें व मोटारी तयार करण्याचे छोटेछोटे कारखाने काढले.

एका बाजूला असे नवेनवे कारखाने निघत असतांनाच दुसरा टप्पा सुरू झाला. या वळीं कांहीं भांडवलदारांनीं होतकरू मोटार कंपन्या विकत घेऊन त्यांचें एकीकरण करण्याचा प्रयत्न चालविला. सन १९०८ मध्यें ज्यावेळीं फोर्ड हा "टी मॉडेल" मोटार तयार करत होता, त्याचवेळीं विल्यम सी. ड्युरँट यानें "ब्यूक," "ओल्डस" व इतर कांहीं कंपन्यांचें एकीकरण करून "जनरल मोटार्स" ही अवाढव्य कंपनी स्थापन केली. यानंतर तिसऱ्या टप्प्यांत एकामागून एक असे प्रतिस्पर्धी कारखाने जाऊन फक्त कांहीं थोड्या प्रचंड कंपन्या व किरकोळ कारखानदार शिल्लक राहिले.

मध्यंतरीं याच मोटार धंद्यानें लाखों लोकांच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या आणखी दोन वस्तू बाजारांत आणल्या. एक म्हणजे पुढें रेल्वेशीं तीव्र स्पर्धा करणारी मालमोटार (मोटार ट्रक) व दुसरी म्हणजे ट्रॅक्टर. सन १९०२ मध्यें पहिला ओबडधोबड ट्रॅक्टर तयार करण्यांत आला. सन १९१० पर्यंत ट्रॅक्टरचें उत्पादन दर वर्षी ४००० वर व सन १९२० पर्यंत तें दरसाल दोन लाखांवर गेलें. या वेळीं शेतीचें यांत्रिकीकरण व पडीक जमिनी गव्हाच्या लागवडीखालीं आणण्याचें काम झपाट्यानें चालू होतें.

ही वाढ व परिवर्तन सर्वांगीण व रोमांचकारी होतें, पण त्यांना जोराची चालना मिळण्यास एका नवीन कल्पनेचीहि मदत झाली होती. यावेळीं राष्ट्रव्यापी जाहिरात-कलेला प्रतिष्ठा व महत्त्व येत चाललें होतें. यापुढच्या वीस वर्षांत सायरस एच. के. कर्टिस व "सॅटरडे एव्हिनिंग पोस्ट" चा संपादक जॉर्ज होरॅस लॅरिमर व "लेडीज होम जर्नल" चा संपादक एडवर्ड बॉक यांनीं वृत्तपत्रीय क्षेत्रांतहि अफाट उत्पादनाच्या तडफदार शास्त्राचें भव्य स्वरूप निदर्शनास आणलें. या कालांत "सॅटरडे एव्हिनिंग पोस्टा" चा खप व जाहिरातींचें उत्पन्न यांवरून या क्षेत्रांतील त्यांच्या कर्तबगारीची कल्पना येईल. सन १९०२ मध्यें या नियतकालिकाच्या ३,१४,६७१ प्रति खपल्या व जाहिरातींचें उत्पन्न ३,६०,१२५ डॉलर आलें. पण सन १९२२ पर्यंत याच नियत-

कालिकाचा खप सातपट किंवा २१,८७,०२४ प्रतींवर गेला तर जाहिरातींचें उत्पन्न २,८२,७८,७५५ डॉलर झालें, म्हणजे १९०२ मधील उत्पन्नापेक्षां ७८ पटींनीं वाढलें.

हे आंकडे काय दर्शवितात ? एक म्हणजे, या व इतर तत्सम नियतकालिकांद्वारें लाखों अमेरिकन लोकांना मध्यमवर्गीय किंवा वर्गविरहित अमेरिकन (भांडवलशाही, सरंजामी किंवा कामगारशाही रहाणीपेक्षां वेगळी अशी) रहाणीचे व विचारसरणीचे साप्ताहिक किंवा मासिक पाठ मिळत होते, व दुसरी गोष्ट म्हणजे, याच नियतकालिकांच्या माध्यमाद्वारें मोटारी, टायर, टाईपरायटर, बोलकीं यंत्रें, अन्नपदार्थ वगैरे अमेरिकन कारखान्यांतून बाहेर पडणाऱ्या मालाची जनतेला ओळख करून देण्यांत येत होती.

## ३

याच काळांत कांहीं भावी उद्योगधंद्यांचाहि पाया घातला गेला. ता. १० जानेवारी १९०१ रोजीं अँथनी एम. ल्युकस यानें ब्यूमाँटनजीक ( टेक्सास ) स्पिंडलटॉप येथें तेल काढण्यास सुरवात केली. अशा रीतीनें नैऋत्य अमेरिकेंत नवीन युगास सुरवात झाली आणि त्यावेळीं नुकत्याच सुरू झालेल्या मोटारधंद्याच्या वाढत्या विकासाबरोबर त्याला भरपूर तेलपुरवठा होण्याची खात्री निर्माण झाली.

१७ डिसेंबर, १९०३ रोजीं उत्तर कॅरोलिनाच्या किनाऱ्यावरील किटीहॉकच्या वाळवंटावर, राईट बंधूंनीं स्वतः परिश्रमानें तयार केलेल्या विमानांतून उड्डाण करून दाखविलें. राईटबंधूंच्या या प्रयोगाची लोकांना कल्पना यावयास बरींच वर्षें जावीं लागलीं. राईट बंधूंच्या पहिल्या उड्डाणानंतर तब्बल साडेचार वर्षांनीं राईटबंधूंच्या हालचालींसंबंधी वृत्तपत्रांत रोमांचकारी विस्तृत बातमीपत्रें आलीं. जगाला कळून चुकलें कीं आकाशांत परिभ्रमण करणें मानवाला यशस्वीरीत्या साध्य झालें आहे. मध्यंतरीं राईटबंधूंनीं अनेकवार विमानोड्डाण केलें होतें व त्यांचें सर्वांत मोठें उड्डाण अडतीस मिनीटें टिकलें होतें. अशा रीतीनें वैमानिक धंद्याचें बीज सन १९०३ मध्यें रोविलें गेलें आणि सन १९०८ मध्यें उशीरा कां होईना त्याचें रोपटें फोंफावू लागलें.

बिनतारी संदेशवाहकाचा ( वायरलेस टेलिग्राफी ) शोध सन १८९५ मध्यें मार्कोनी या इटालियन संशोधकानें लाविला. त्यानंतर सन १९०० मध्यें रेजिनॉल्ड ए. फेसेन्डन यानें पहिलेंच भाषण बिनतारी संदेशवाहकावर प्रक्षेपित केलें. सन १९०४ मध्यें सर जॉन फ्लेमिंग यानें बिनतारी संदेश घेणारें पहिलेंच उपकरण ( रेडियो डिटेक्टर किंवा फ्लेमिंग व्हॉल्व ) तयार केलें. सन १९०७ मध्यें डॉ. ली डी फॉरेस्ट यानें श्रवणयंत्र ( ऑडिओ-

मिटर ) तयार केलें व सन १९१२ मध्यें एडवीन एच. आर्मस्ट्रॉंग यानें विद्युत् प्रवर्तक फेरी ( इलेक्ट्रीक जनरेटर सर्कीट ) शोधून काढली. पण या प्रगतिपर शोधांचे संभाव्य परिणाम मात्र त्यावेळीं कोणालाच आकलन झालें नव्हतें. सन १९१५ मध्यें "मार्कोनी वायरलेस टेलिग्राफ कंपनी"चा दुय्यम ट्रॅफिक मॅनेजर डेव्हिड सरनॉफ यानें "रेडियो संगीत पेटी"ची ( रेडियो म्युझिक बॉक्स ) कल्पना पुढें ठेवून सार्वजनिक नभोवाणीची शक्यता सूचित केली. तरीहि लोक आपलें थंडच. पण या सुमारास रेडिओ व टेलिव्हिजन धंद्याचें बीज रोंवलें गेलें होतें, हें वादातीत आहे.

१९०३ सालीं "ग्रेट ट्रेन रॉबरी" हा सुसंगत कथानकाचा पहिलाच चलत्‌चित्रपट तयार करण्यांत आला. सन १९०५ च्या सुमारास पहिली ओबडधोबड सिनेमागृहें अस्तित्वांत आलीं. हीं सिनेमागृहें बहुधा रिकाम्या गुदामांत उभारलेलीं असत. चलत्‌चित्रपटांच्या प्रगतीला अशा रीतीने सुरवात झाली.

सन १९०९ मध्यें लिओ एच. बेकेलँड यानें रसायनानें तयार केलेला एक पदार्थ बाजारांत आणला. या पदार्थाला त्यानें बेकेलाईट असें नांव दिलें. बेकेलाईट म्हणजे कांहीं पहिलें प्लॅस्टिक नव्हतें. तो मान त्यापूर्वी बराच काल अगोदर तयार करण्यांत आलेल्या सेल्युलाईडकडे जातो. पण बेकेलाईट म्हणजे प्लॅस्टिक धंद्याचा मूळारंभ असें म्हणावयास हरकत नाहीं. पुढें रेयॉन म्हणून प्रसिद्ध झालेलें कृत्रिम रेशीम सन १९२० पूर्वी जाड्याभरड्या स्वरुपांत निघूं लागलें होतें. कृत्रिम रेशमानें हें सिद्ध केलें कीं माणूस निसर्गाची केवळ नक्कलच करूं शकतो, असें नसून पुष्कळ वेळां निसर्गापेक्षांहि सरस वस्तू निर्माण करूं शकतो. निलॉनचा ( उंची कृत्रिम रेशीम ) आश्चर्यकारक शोध त्याचें द्योतक आहे.

आजच्या अमेरिकेची ओळख करून घेण्यासाठीं केवळ अमेरिकन वैचारिक बंडाचें स्वरूपच लक्षांत घेऊन चालणार नाहीं. या वैचारिक बंडानें कोणती कल्पना दृढमूल केली असेल तर ही कीं देशाचीं राजकीय व आर्थिक यंत्रें अजिबात बंद पाडण्याची जरुरी नाहीं. जरुर तर त्यांत दुरूस्ती करून तीं लोकांच्या कल्याणाच्या दृष्टीनें चालवितां येतात. दुसरीहि एक लक्षांत ठेविण्याजोगी गोष्ट म्हणजे वैचारिक बंडानें फारतर संपत्तीची फेरवांटणी होऊं शकली असती, पण संपत्तींत अनेक पटीनें भर टाकण्याचें कार्य तिनें केलें नसतें. हें कार्य अफाट उत्पादनाच्या तडफदार शास्त्रानें व नव्या नव्या शोधांनींच होऊं शकलें.

# प्रकरण ८ : मोटारक्रांति

सन १९०६ मध्यें प्रिन्सटन विद्यापीठाचा अध्यक्ष असतांना वुड्रो विल्सन म्हणाला, "या देशांत समाजवादाचा प्रचार मोटारीइतका इतर कोणीहि केला नसेल." मोटारी म्हणजे संपत्तीच्या उमटपणाचें चित्र" असेंहि त्यानें यावेळीं उद्गार काढले. पण वीस वर्षांच्या आंतच मिडलटाऊन येथील अमेरिकन रहिवाश्यांच्या सामाजिक पहाणींत म्युन्सी येथील दोन बायांनीं काय उत्तरें दिलीं होतीं, तीं पहा. या दोन्ही बायांची प्राप्ति जेमतेम होती. यापैकीं एका बाईला नऊ मुलें होतीं. ती म्हणाली, "मोटार काढून टाकण्यापेक्षां आम्ही नग्न रहाण्याचें पत्करू." दुसरी बाई म्हणाली, "गाडी काढून टाकण्यापेक्षां उपाशी राहीन." आणखी एका बाईच्या घरीं मोटार होती. पण आंघोळीचें पिंप नव्हतें. ही गोष्ट तिच्या निदर्शनास आणतांच ती उद्गारली, "पिंपांत बसून कांहीं शहरांत जातां येत नाहीं."

मोटारगाडी प्रथम थोड्या लोकांच्या चैनीची वस्तू होती, ती पुढें अनेकांची गरज होऊन बसली आणि त्याचा परिणाम एकंदर अमेरिकन समाज व लोकांच्या दैनंदिन संवयी व विचारांतहि पद्धतशीर बदल होत गेला. पण हा बदल कांहीं अचानक झाला नाहीं, कारण तो तीन गोष्टींवर अवलंबून होता. (१) खात्रीशीर, आटोपशीर व माफक किंमतीची मोटारगाडी, (२) चांगले रस्ते व (३) मोटारींचे तबेले व पेट्रोल पंप. आणि या तिन्ही गोष्टी हळुहळु आल्या. जर १९०६ मध्यें एकाद्यानें खेड्यांतील धूळीनें भरलेल्या रस्त्याच्या कडेला पेट्रोलपंप काढला असतां तर त्याचें दिवाळेंच वाजलें असतें. पण झालेल्या बदलाचा परिणाम सन १९२० पासून मात्र दिसून येऊं लागला.

किंमती कमी करण्याच्या फोर्डच्या धोरणामुळें मोटारगाड्या लोकप्रिय होत गेल्या. पण मोटारगाड्यांत होत गेलेल्या कांहीं महत्त्वाच्या तांत्रिक सुधारणाहि या वाढत्या लोकप्रियतेला कारणीभूत होत्या. सर्वांत महत्त्वाची सुधारणा म्हणजे बंदिस्त गाडया तयार होऊं लागल्या.

मोटारींतील सुधारणांचा परिणाम म्हणजे ज्यांना थोड्याच वर्षांपूर्वी मोटार मालक होण्याची कल्पना वेडगळ वाटली असती, अशा असंख्य लोकांची मोटारी खेरदी करण्यासाठीं प्रचंड रीघ लागली. सन १९१५ पूर्वी अमेरिकेंत नोंदलेल्या मोटारींची

संख्या अडीच लाखांहूनहि कमी होती. सन १९२० मध्यें हीच संख्या नव्वद लाखांवर, १९२५ मध्यें दोन कोटींवर व १९३० मध्यें दोन कोटि पासष्ट लाखांवर गेली होती.

सन १९१८ तें १९३० पर्यंत मोटारींच्या वाढत्या वहातुकीबरोबरच आज अमेरिकेंत रुळलेल्या अनेक नाविन्यपूर्ण गोष्टीहि प्रचारांत येऊं लागल्या. मोटारीचे आपोआप लागणारे दिवे, कॉंक्रीटचे रस्ते, बांध असलेलीं वळणें, एकतर्फी रहदारी, रस्त्यावरील अंतराच्या अधिकृत खुणा, प्रवाश्याकरितां गृहें व रस्त्याच्या कडेकडेला वसलेलीं छोटीं छोटीं शहरें वगैरे गोष्टी रूढ झाल्या. या छोट्याछोट्या शहरांत आवश्यक अशीं उपहार–गृहें, फळफळावळ व भाजीबाजार, पेट्रोल पंप व जुन्या मोटार सामानांची दुकानें दिसूं लागलीं.

मोटारींच्या कर्कश गोंगाटाचा व वाढत्या वाहतुकीचा शहरवासी यांना उपद्रव होऊं नये, म्हणून मोटारींचे रस्ते शहराबाहेरून काढण्यांत येऊं लागले. या रस्त्यांच्या बाजूला विस्तृत उद्यानें करण्यांत आली. रस्ते बाहेरून काढल्यामुळें पूर्वीं पंचवीस मैल वेगानें जातांना जी धास्ती वाटे, ती नव्या रस्त्यावरून साठ मैल वेगानें जातांनाहि वाटेनाशी झाली.

अर्थात् १९३१ मध्यें या सर्वच गोष्टी कांहीं अस्तित्वांत आल्या नव्हत्या. यावेळीं खूप बसगाड्या आल्या होत्या, पण ट्रॉलीगाड्यांचे मार्ग उखडून काढण्यास नुकतीच कोठें सुरुवात झाली होती. मालवाहू मोटारींनीं (ट्रक्स) रेल्वेची बरीच वाहतूक काबीज केली होती, पण अद्यापहि मालवाहू मोटारी, ट्रक टॅक्टर, किंवा चाकांवरील घरें (ट्रेलर्स) वगैरेंची रीघ लागल्याचें अद्याप दिसून येत नव्हतें. आणि अमेरिकेच्या राष्ट्रीय दळणवळणाचें पूर्ण प्रतिक असें जिला म्हणतां येईल, ती निवासगाडी (रेसिडेन्शील ट्रेलर) आतां कोठें दिसूं लागली होती. या प्रकारची पहिली निवासगाडी एका जंतुशास्त्रज्ञानें सन १९२९ मध्यें सहलीकरितां म्हणून बनवून घेतली होती. पण अशीं चाकांवरचीं घरें भरपूर प्रमाणांत यावयास अद्याप पांचसहा वर्षांचा अवधि होता. एक गोष्ट मात्र स्पष्ट होती व ती म्हणजे मोटार-युगाला सुरवात झाली होती.

## २

अर्थात् लोकांच्या संवयींत हा जो चकित करणारा बदल झाला, त्यांचा सामाजिकदृष्ट्या दूरगामी परिणाम झाल्याशिवाय कसा राहील ?

( १ ) मोटारयुगांत उपनगरांची झपाट्यानें वाढ झाली. यापूर्वी रेल्वेच्या टप्प्यांत येणारीं अशीं बरीच उपनगरें वसलीं होतीं. पण लांब पल्ल्यावरून रेल्वे स्टेशनवर जाणें-येणें जरा गैरसोयीचेंच असल्यामुळें या उपनगरांची फारशी वाढ झाली नव्हती. पण मोटारयुगांत त्यांची झपाट्यानें वाढ होऊं लागली. तेथें मोठमोठीं गांवें उठूं लागलीं. मुलांना भरपूर प्रकाश, मोकळी हवा व खेळण्याकरितां मुबलक जागा उपलब्ध झाली, शाळा निघाल्या व आईबापांना स्थानिक शाळाबोर्डाचें धोरण ठरविण्यांत हिरिरीनें भाग घेतां येऊं लागला.

( २ ) मोटारयुगामुळें व्यापारक्षेत्रांतहि प्रचंड उलाढाल झाली. रेल्वेपासून लांब-लांब असलेलीं गांवें व शेतें यांनाहि व्यापारीदृष्ट्या महत्त्व येऊं लागलें होतें. मोटारींच्या दळणवळणामुळें दूरदूरच्या भागांतहि नवीन नवीन हॉटेलें व दुकानें निघूं लागलीं. सामान्य लोकांनाहि आतां मोटारींतून लांबच्या पल्ल्यावर सहलीकरितां जातां येऊं लागलें. सामाजिक व आर्थिकदृष्ट्या हा फरक महत्त्वाचा होता.

मोटार वाहतुकीचा रेल्वे वाहतुकीवर खूपच परिणाम झाला. सन १९२० तें १९३० या दहा वर्षांच्या कालांत रेल्वे प्रवाश्यांची वाहतूक जवळजवळ निम्म्यानें कमी झाली.

( ३ ) मोटार-युगानें रस्त्यांवर मोटार कोठें लावावयाची ही समस्या निर्माण झाली. अनेक वेळां सोडविलेला ही समस्या प्रत्येक वेळीं नव्यानें अधिक बिकट स्वरूपांत उद्भवत असे. सन १९५० च्या शेवटींहि "मी गाडी कोठें लावू" ही समस्या मोटारयुगाच्या आरंभाइतकीच तीव्रतेनें भेडसावत होती.

( ४ ) मोटारींच्या आगमनानें अपघाती मृत्यूंची संख्याहि वाढली. सन १९२२ मध्यें अमेरिकेंत मोटार अपघातांत बळी पडलेल्या लोकांची संख्या १५,००० हून कमी होती, हीच संख्या १९३० मध्यें ३२,००० वर गेली. पुढें अठरा वर्षांनीं सन १९४८ मध्यें मोटार अपघातांत बळी पडलेल्यांची संख्या बरोबर १९३० सालाइतकीच होती. मोटारगाड्यांची शक्ति अधिकाधिक वाढत गेली, रस्ते सरळ व गुळगुळीत झाले, गति वाढली, त्याबरोबरच अपघाती मृत्यूंच्या प्रमाणांत भयानक वाढ झाली. या अपघाती मृत्यूंना आळा घालण्यासाठीं मोटारहाक्यांना परवाना देतांना व गाड्या तपासतांना अधिक खबरदारी घेण्यांत येऊं लागली, रस्त्यांवर इषारेवजा फलक लावण्यांत आले, "नॅशनल सेफ्टी कौन्सिल" व "ऑटोमोटिव्ह सेफ्टी

कौन्सिल " यासारख्या संस्थांकडून अपघात कां होतात व त्यावर इलाज काय याची छाननी करण्यांत येऊं लागली, पण इतकें असूनहि आजमुद्धां मोटार-अपघातांना हजारो स्त्री-पुरुष व मुलें बळी पडतात.

( ५ ) टेलिफोन, रेडियो वगैरे दळणवळणाच्या साधनांबरोबरच मोटारयुगानें शेतकऱ्यांच्या जीवनांतील एकाकीपणा संपुष्टांत आणला. सन १९०० मध्यें मध्य-पश्चिम भागांत जी भरभराटीची लाट आली होती, तिचें वर्णन करतांना, रे स्टॅनर्ड बेकर म्हणतो, " शेतकऱ्याची सुस्थिति असली कीं पहिल्या प्रथम तो धान्याचें कोठार, गुरांचा गोठा रंगवून घेई, यानंतर तो घराला ओटी बांधी, तिसरी गोष्ट म्हणजे पियानो विकत घेई व चौथीं गोष्ट म्हणजे मुलांना कॉलेजांत पाठवी. पण सन १९२५ च्या सुमारास भरभराटीच्या वेळीं मोटार खरेदी करण्याकडे त्याचा कल प्रथम दिसूं लागला, नवीन पियानो दुर्मिळ झाला. ट्रॅक्टरच्या वाढत्या उपयोगामुळें शेतीची वाढ होत गेली व जसजसे शेतीचें अधिकाधिक शास्त्रीय ज्ञान उपलब्ध होत गेलें, तसतसा शेतकरी हा राबणारा मजूर न रहातां जमिनीचा व्यापारी, यंत्रें चालविणारा कारागीर व तंत्रज्ञ बनला आणि हा बदल होत असतांनाच शेतकरी कुटुंबाच्या वागणुकींतील गांवढळपणाहि जात चालला.

( ६ ) मोटारयुगांत भौगोलिक मर्यादाहि व्यापक झाल्या. ज्यांना गरिबीमुळें प्रवास करतां येत नसे, त्यांनाहि आतां प्रवास करतां येऊ लागला. मोटारयुगाला सुरवात झाल्यानंतरहि ज्यांनीं घर सोडलें नाहीं असें लोक आढळून येत, पण त्यांची संख्या झपाट्यानें रोडावत चालली होती.

मोटारीमुळें कुटुंबाला एके ठिकाणींच जखडून ठेवणारी बंधनें ढिलीं झालीं. तसें पाहिलें तर पहिल्यापासून युरोपियन लोकांपेक्षां अमेरिकन लोक अधिक प्रमाणांत प्रवासी वृत्तीचे होते, आणि मोटारी व पुढें चाकांवरील घरें आल्यानंतर त्यांच्या प्रवासी वृत्तीला अधिकच वाव मिळाला. नोकरीधंद्याकरितां आतां ते दूरदूर जाऊं लागले. जुने लोक अमेरिकेंतील वाढत्या अस्थिर वृत्तीबद्दल ठपका देत आणि ज्या ठिकाणीं शेतकरी स्वतः व त्याचे वाडवडील जन्मले व लहानाचे मोठे झाले, त्या ठिकाणाला चिकटून रहाणाऱ्याची ते स्तुति करत. पण एकंदरीत मोटार ही अमेरिकनांच्या धाडशी प्रवृत्तीला योग्य अशीच होती. " गडगडत जाणारा दगड हा अनुभव, साहस,

शहाणपण व त्याचबरोबर सुसंधिहि प्राप्त करून घेतो," अशी सर्वसाधारण विचार-सरणी बनली.

( ७ ) मोटार क्रांतीमुळें स्वाभिमानाचीहि वाढ झाली. कोणीतरी असें म्हटलें आहे कीं, "आशियाई लोक आतांपर्यंत युरोपियनांनीं चालविलेली मानहानि निमूटपणें सहन करत आले, पण तेच आशियाई लोक एकदां ट्रॅक्टर चालवावयाला बसले कीं अशी मानहानि मुळीं सहन करणार नाहींत." त्याचप्रमाणें असेंहि म्हणता येईल कीं आतांपर्यंत दारिद्र्य, व्यापारीक्षेत्रांतील क्षुल्लक स्थान, वांशिक दर्जा वगैरे कोणत्याहि कारणांमुळें दीन झालेल्या अमेरिकनांना मोटार चालवावयास बसतांना एक प्रकारचा अधिकार प्राप्त झाल्यासारखे वाटते. आणि बऱ्याच मोठ्या शक्तीची अशी बस किंवा चाकांवरील घरें चालविणाऱ्या माणसाला तर आणखी जास्त अभिमान वाटत असतो.

मोटार क्रांतिच्या व्यापकतेची खालील आंकडेवारीवरून कल्पना येईल. सन १९५० मध्यें अमेरिकेंत एकंदर बिनलष्करी स्त्री-पुरुष नोकरांची संख्या पांच कोटि नव्वद लाख होती. याच वर्षांत एकदर मोटारहाक्यांची संख्या थोडी अधिक म्हणजे पांच कोटि त्र्याणव लाख होती. म्हणजे बिनलष्करी नोकरांपेक्षां मोटारहाके जास्त !

# प्रकरण ९ : आराम व मजा

सन १९१८ च्या तहानंतरच्या तीन चार वर्षांत अमेरिकन लोकांच्या मनोवृत्तींत बदल झाल्याचें दिसून आलें. त्यांना वैचारिक क्रांतीला प्रवृत्त करणारी ध्येयवादाची ज्योत आतां विझली होती. लोक शिणलेले होते. विशेषतः त्यांची सार्वजनिक वृत्ति, सदसद्विवेक बुद्धि व आशा यावर गंज चढला होता.

महायुद्धांत ते ज्या भावनेनें लढले होते, त्या भावनेचा भंग झाला होता. राष्ट्र–संघाविषयींचा अमेरिकन लोकांचा उत्साह ओसरला होता. अमेरिकनांनीं अलग-वादाचें धोरण स्वीकारलें. हें धोरण कदाचित् घातक असेल, पण तें अपरिहार्य होतें. इतर लोकांची–साऱ्या जगाची काळजी वहाण्यापेक्षां जरा आराम घ्यावा, मजा करावी, असें लोकांनीं ठरविलें. समाजसुधारकहि आतां शिणल्यासारखे दिसत होते. महान् राजकीय साध्याकरितां लढा करण्याच्या कल्पनेनेंच त्यांच्या पायांत गोळे येऊं लागले होते.

सन १९२० च्या निवडणुकींत शिणलेल्या अमेरिकनांनीं वॉरन जी. हार्डिंग याची अध्यक्ष म्हणून निवड केली. तो दिसायला देखणा व रुबाबदार असून प्रेमळ, मनमिळावू व नम्र होता. हार्डिंग एकंदरींत भला माणूस असला तरी त्याची बौद्धिक व नैतिक उंची यथातथाच होती आणि सुधारणा करण्याची त्याच्या ठिकाणीं फारशी आस्था नव्हती. पुढें तर त्याच्या अध्यक्षीय कचेरींतील सहकाऱ्यांत कांहीं अट्टल धूर्त लोक असल्याचेंहि आढळून आलें. त्याच्या कारकीर्दीतील कांहीं लबाडीचे प्रकार पूर्ण उजेडांत येण्यापूर्वीच तो मरण पावला आणि त्याच्यामागून काल्हीन कूलीज हा अध्यक्ष झाला. कूलीज हा प्रामाणिक, आस्थेवाईक व समंजस होता. पण अमेरिकन इतिहासांत इतक्या थोरपदाला चढलेला त्याच्याइतका निष्क्रीय मनुष्य क्वचितच दुसरा झाला असेल. कूलीजला सहजासहजीं कोणत्याहि राष्ट्रीय प्रश्नाचा उलगडा होत नसे.

माझा एक मित्र सन १९१८ मध्यें वयानें अगदीं लहान होता. बापानें त्याला तह झाल्याचें सांगितलें तेव्हां त्यानें विचारलें, "आतां लढाई संपली. मग वर्तमानपत्रांत काय छापतील?" बाप नुसता हंसला. पण या प्रश्नांत एकंदरींत बराच अर्थ होता. कारण हळुहळु लष्करी हालचाली, परराष्ट्रीय घडामोडी व राजकारण याऐवजीं लबाड्या, गुन्हे, अपघात, नाटकें, खेळ वगैरेंना वृत्तपत्रांत प्रमुख स्थान मिळूं लागलें होतें आणि जेव्हां चार्ल्स ए. लिंडबर्ग या तरूण वैमानिकानें न्यूयॉर्क व पॅरीस हा विमान प्रवास

एका दमांत न थांबतां पुरा केला, तेव्हां वर्तमानपत्रांनीं त्याच्या पराक्रमाचें कोण कौतुक केलें ! जणूं काय सृष्टि निर्मीतीनंतर जगांत खळबळ उडविणारा सर्वांत मोठा प्रसंग म्हणजे लिंडबर्गचा पराक्रमच होता !

२

आराम करावा, मजा लुटावी, या वृत्तीबरोबरच १९२० नंतर रूढीबंधनें व रीति-रिवाज झुगारून देण्याचीहि सार्वत्रिक लाट आली होती.

या बंडाचीं पूर्वचिन्हेंहि युद्धापूर्वीच दिसूं लागलीं होतीं. १९१२ च्या सुमारास नृत्य कार्यक्रमाला बहर येऊं लागला होता; १९१३ पासून रूढीभंजक अशा नव कलाकृतींचे वैशिष्ठ्यपूर्ण नमुने लोकांना पहायला मिळूं लागले होते. कवींनीं काव्यात्मक प्रथेविरुद्ध बंड पुकारून मुक्त छंदांत कविता करण्यास सुरवात केली होती. याशिवाय महायुद्धानें लाखो तरूण–तरुणींना परिचित वातावरणांतून बाहेर काढून स्वातंत्र्याची चटक लाविली होती. कांहीं झालें तरी सन १९२० च्या सुमारास रूढी–रिवाजां-विरुद्धच्या बंडाचीं चिन्हें व्यापक प्रमाणांत दिसूं लागून दिवसेंदिवस त्यांना जोर येत चालला होता.

या बंडाच्या अग्रभागीं मुली होत्या. मातांप्रमाणें केवळ चर्पटपंजरी न करतां त्या अनेक विषयांची–लैंगिक शास्त्राचीहि धैर्यानें चर्चा करूं लागल्या. आयांचे झगे पायघोळ असत, तर मुली आटोपशीर असे गुढग्यापर्यंत लांबीचेच झगे वापरूं लागल्या.

थोड्याच वर्षांत अमेरिकन स्त्रियांच्या बाह्य स्वरूपांत ओळखूं न येण्याइतका बदल झाला. त्या पुरुषांसारखे कैंस कापूं लागल्या, सौंदर्य प्रसाधनांचाहि वापर मोठ्या प्रमाणांत करण्यांत येऊं लागला. एकंदरींत स्त्रीवादानें नवीन स्वरूप धारण केलें होतें. स्त्रियांनीं यावेळीं मताधिकार मिळविला होता, पण त्यामुळें त्यांनीं मोठ्या संख्येनें राजकारणांत प्रवेश केल्याचें दिसत नव्हतें. उलट मताधिकारापेक्षां स्त्रिया मोठ्या प्रमाणांत मजा करण्याचाच हक्क बजावूं लागल्या होत्या.

या ठोकळ नियमाला काहीं टीपाहि जोडतां येतील.

पहिली टीप अशी कीं हा बदल झाला असला तरी त्या काळच्या सामाजिक वागणुकीला उच्छृंखल असें म्हणतां यावयाचें नाहीं. रूढीरिवाजांविरुद्ध तें एक बंड होतें, एवढेंच. सन १९२० नंतर सामाजिक वागणुकीच्या प्रस्थापित

नियमांत बराच बदल झाला असला तरी त्याच दशकांत सभ्यांच्या सामाजिक वागणुकीचे नियम बरेचसे रूळले गेले, असेंहि म्हणतां येईल. दुसरी टीप अशी कीं डॉ. किनस्ली याच्यासारख्या संशोधकानेंहि एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत नैतिक किंवा अनैतिक वागणुकींत प्रत्यक्ष असा फारच थोडा बदल होत असतो, असें मत व्यक्त केलें आहे. तिसरी टीप म्हणजे अमेरिकन लोकांची प्रचलित मनोवृत्ति स्वच्छंदी होती असें म्हणण्यापेक्षां अवखळ होती, असें म्हणणेंच अधिक सयुक्तिक होईल. आणि शेवटची टीप अशी कीं अमेरिकेंतील प्रत्येक जण कांहीं या नव्या मनोवृत्तींत गुरफटला गेला नव्हता. ही नवी मनोवृत्ति पसंत नसणारे असे लाखो अमेरिकन त्या वेळींहि होते.

यावेळीं सामाजिक नियमांतील शैथिल्याबरोबर नास्तिकवादाची लाट येऊन सुख हाच मानवी जीविताचा अंतिम हेतु मानला जाऊं लागला होता. ( नाहींतरी विज्ञानानें सनातन धर्माला आव्हान दिलेंच होतें. ) स्वतःला अद्यावत् समजणाऱ्या तरुण स्त्री-पुरुषांना असें वाटूं लागलें होतें कीं धार्मिक कृत्यें, सामाजिक सेवा किंवा ज्याला उद्धार हा शब्द लावतां येईल असें कोणतेंहि कृत्य अनिष्ट असून लोकांच्या खासगी जीवनांत ती निष्कारण ढवळाढवळ आहे. रविवारीं प्रार्थनामंदिरांत जाण्यापेक्षां मोटारमधून चक्कर मारण्यांत त्यांना अधिक मौज वाटे. यावेळच्या अनेक ध्येयवाद्यांच्या ध्येयांतहि फरक पडला होता. कोणी मानसशास्त्र-विश्लेषणाला वाहून घेतलें, तर कोणी पुरोगामी शिक्षणाला वाहून घेतलें तर कोणी मानवतावादाचा जयजयकार करूं लागले.

तत्कालीन वाङ्मयांतहि हा भ्रमनिरास व बंडखोरपणा दिसून येत होता. महायुद्धांत ज्या भावनेनें अमेरिकेनें प्रवेश केला होता, त्या भावनेचा तत्कालीन लेखकांच्या दृष्टीनें भंग झाला होता. तसेंच ऐन तारुण्यांत आपली सामाजिक मुस्कटदाबी झाली, या समजुतीनें ते जळफळत होतें तर त्यावेळच्या औद्योगिक संस्कृतितील तथाकथित हीन अभिरुचीबद्दल त्यांना तिरस्कार वाटत होता. एच्. एल्. मेनकेन, सिंक्लेअर ल्युइस, अर्नेस्ट हेमिंग्वे, ड्रेसर, यूजीन ओनील वगैरेचें तत्कालीन लिखाण या नव्या बंडखोर विचारसरणीचें प्रतीक होतें.

कांहीं लेखकांचा तर खुद्द भ्रमनिरासाबद्दलहि अपेक्षाभंग झाला होता व त्यामुळें, त्यांच्या वाङ्मयांत जवळजवळ नकारात्मक दृष्टिकोन प्रगट होई. पण सर्वसाधारणपणें लेखकांचा नवीन दृष्टिकोन निराशाजनक नसून तो अत्यंत आशावादी होता. पारंपारिक

बंधनें झुगारून देऊन आतांतरी सत्य सरळपणानें कथन करतां येईल, अशी भावना साऱ्या कला जगतांत दिसून येत होती. एकंदरींत हा काळ एक प्रकारचा बौद्धिक पुनरुज्जीवनाचाच होता. या काळांत ल्युइस, हेमिंग्वे, ओनील, ड्रेसर, डॉस पॅसॉस, शेरवूड ॲन्डरसन, मॅक्सवेल ॲंडरसन, विला कॅथर, एडना सेंट, व्हिन्सेन्ट मिले, एलन ग्लासगो, एफ्. स्कॉट फिट्‌जिराल्ड वगैरे अनेक कादंबरीकार, कवि व नाटककार उदयाला आले. या काळांत चित्रपटधंदा खूप वाढून दररोज लाखों प्रेक्षक चित्रपट पहात होते. तरी नाट्यकलाहि उत्कर्षाच्या शिखरावर होती. सन १९२७ या एकाच वर्षीं अमेरिकेंत २६८ नवीन नाट्यगृहें उघडण्यांत आली. अलीकडच्या मानानें हा आंकडा खूप मोठा होता. एक उल्लेखनीय गोष्ट म्हणजे अद्यापहि तरुण अमेरिकन लेखकांचे व कलावंतांचे आदर्श प्रौस्ट, जॉईस, टी. एस. एलीयट, गर्ट्रयुड स्टेन, तसेंच आधुनिक फ्रेंच चित्रकार, बॉहॉ शिल्पकार वगैरे परदेशी कलावंत होते. पण त्याबरोबर सांस्कृतिकदृष्ट्या अमेरिका यौवनांत प्रवेश करत असल्याचीं वाढतीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं.

३

वरील गोष्टीपेक्षांहि अधिक महत्त्वाची बाब म्हणजे सन १९२३ तें १९२९ पर्यंतची अमेरिकन कारखानदारी व व्यापाराची प्रचंड प्रगति.

हा काळ अत्यंत भरभराटीचा होता. मोटारधंद्यांत मोठी वाढ झाली होती. रेडिओ धंदा अचानक भरभराटला होता. बांधकाम जोरांत होतें. कचेऱ्यांकरितां भव्य सुंदर इमारती व शहरांतील दाटी कमी करण्याकरितां नवींनवीं घरें बांधण्यांत येऊं लागलीं. उपनगरें व सहलीचीं स्थळेंहि वाढूं लागली होतीं. रेयॉन किंवा कृत्रिम रेशीम धंद्यानें मोठी मजल मारली होती व सांखळीभांडारहि झपाट्यानें वाढत होते. तसेंच नवीन नवीन यंत्रांमुळें व योजनांमुळें उत्पादन कसें वाढेल, हें कारखानदार समजावून घेऊं लागले होते. सन १९२२ तें १९२९ या काळांत उत्पादनांत आश्चर्यकारक प्रगति दिसून आली. शेती, कारखाने, खाणी, बांधकाम मिळून सर्व उत्पादन ३४ टक्क्यांनीं वाढलें आणि सन १९२० तें १९३० या काळांत माणशीं उत्पादन २१ टक्क्यांनीं वाढलें.

हें ठीक होतें. मालाचें उत्पादन व्यवस्थित होत होतें. प्रश्न एवढाच होता कीं तो विकला जाण्याची कितपत शक्यता होती ? याचमुळें सन १९२० नंतर विक्रेत्याला ( सेल्समन ) अमेरिकेंत अनन्य साधारण स्थान प्राप्त झालें. या विक्रेत्यांवर ठराविक माल खपविण्याचें

बंधन असे. विक्री वाढावी म्हणून चढाओढीहि ठेवण्यांत येऊं लागल्या. गिऱ्हाईकांच्या केवळ मागण्या नोंदण्याचे दिवस संपले, गिऱ्हाईक येण्याची वाट न पहातां गिऱ्हाईक तयार केलें पाहिजे, यावर मालक भर देऊं लागले. माल लोकप्रिय करण्याकरितां जाहिरात-कलेचाहि वाढत्या प्रमाणांत उपयोग करण्यांत येऊं लागला.

४

व्यापार-उद्योगधंद्यांच्या या तुफान मुसंडीला कोणी अटकाव केला ? सरकारनें म्हणावें तर सरकार कूलीजबरोबर झोंपा काढत होतें. कामगारांनींहि अडथळा केला नाहीं. युद्धानंतर संपांची एक वावटळ आली होती, पण त्यानंतर संघटनावाद मंदावला होता. सन १९२० मध्यें कामगार संघटनांची सभासद संख्या पन्नास लाखांवर होती, ती सन १९२७ मध्यें चाळीस लाख व सन १९३१ मध्यें तेहेतीस लाख झाली होती. इतरांप्रमाणेंच यावेळीं कामगारांतहि आरामी वृत्ति आल्यामुळेंच ही सभासद संख्या कमी झाली असावी.

व्यापार-उद्योगधंद्यांची "आगे कूच" थांबण्याचें कारण म्हणजे अमेरिकन धंदेवाल्यांना पैशाची भुरळ पडली होती. त्यांच्या सट्टेबाजीला ऊत आला होता. भांडवलदार, व्यवस्थापक व कामगार यापैकीं कोणाचाच हुरुप खची न करतां औद्योगिक प्रगतीचीं फळें शक्य तितक्या व्यापक प्रमाणांत न्याय्य रीतीनें विभागण्याची ज्यावेळीं राष्ट्राची जास्तींत जास्त आर्थिक गरज होती, त्यावेळीं सट्टेबाजीची सांथ आली व ज्यांच्या हातांत भांडवल त्यांनीं झटपट पैसा केला. याशिवाय भरभराटीचा लाभ कांहीं थोड्यांच्या खिशांत पडावा यासाठींहि अनेक युक्त्याप्रयुक्त्या लढविण्यांत आल्या.

यावेळीं रोखेबाजारांत किती लोक सट्टेबाजी करत, याची नक्की आंकडेवारी नसली तरी जवळजवळ वीस लाख लोक तरी सट्टेबाजी करत असावेत. केवळ भांडवलवाले, मोठमोठे व्यापारीच सट्टेबाजी करत असत असें नव्हे तर गृहिणी, धनगर, स्टेनोग्राफर, धर्मगुरु थोडक्यांत ज्याच्या ज्याच्या हातांत पैसा असे, तो प्रत्येक जण कोणत्या ना कोणत्या तरी कंपनीचे रोखे खरेदी करी. रोखेबाजारांतील व्यवहारासंबंधीं पुढील गोष्ट प्रचलित आहे. एकदां एक तरुण एका भांडवलदाराकडे गेला व व्यापारी शिक्षणाबद्दल त्यानें त्याचा सल्ला विचारला. भांडवलदारानें त्याला अमुक अमुक कंपनीचे रोखे खरेदी कर व त्या रोख्यांचें पुढें काय होतें तें पहात रहा, असा सल्ला दिला. दोनएक

आठवड्यांनीं तो तरुण पुनः त्या भांडवलदाराकडे आला. "हें असें किती दिवस चाललें आहे ?" त्यानें आनंदानें बेहोष होऊन विचारलें. सन १९२८–१९२९ मध्यें खरेदीबाजार अतिशय तेजींत होता. किंमती सारख्या चढत होत्या. शेअर्सच्या किंमतींचा निर्देशांक सन १९२६ मध्यें सरासरी १०० होता. जून १९२७ मध्यें तो ११४, जून १९२८ मध्यें १२८, जून १९२९ मध्यें १९१ व सप्टेंबर १९२९ मध्यें तर २१६ वर गे

या भडकत चाललेल्या किंमतीबद्दल तीन प्रकारचे दृष्टिकोन दिसून येत. पहिला दृष्टिकोन असा कीं किंमती आतां निश्चित पातळीवर आल्या असून एकंदरींत नवयुग सुरू झालें आहे. दुसरा दृष्टिकोन असा कीं असंख्य लोक भागीदार झाल्यामुळें अखेरीस सारें राष्ट्रच सधन होईल. आणि तिसरा दृष्टिकोन म्हणजे बाजारांतील या बेफाम जुगारांत अनेक लोकांचें दिवाळें वाजेल, पण चिंता नाहीं. ढग नाहींसे झाले कीं आकाश आपोआप निरभ्र होईल. लोकांना हेंच उमगलें नाहीं कीं सट्टेबाजार आतां इतका अवजड बनला होता कीं, त्यावर जी यंत्रणा नियंत्रणें ठेवील असें वाटलें होतें, तीच यंत्रणा एकामागून एक अनर्थ आणील आणि सट्टेबाजाराशीं संलग्न असलेला अमेरिकन व्यापार एकदम ढांसळेल व त्या धक्क्यानें सारी अर्थरचना हादरून जाईल.

या अनर्थाला कोण आळा घालणार होता ? निदान त्या वेळीं तरी अशी खंबीर जबाबदार व्यक्ति दिसत नव्हती. अशा परिस्थितींतच सन १९२९ चा उन्हाळा संपून हिंवाळा आला.

या वेळची इतर कांहीं आंकडेवारी पाहूं.

याच १९२९ मध्यें "ब्रुकिंग्ज इन्स्टिटयूशन"नें जी पहाणी केली, तींत एकंदर अमेरिकन कुटुंबांपैकीं २·३ टक्के कुटुंबांचें उत्पन्न वार्षिक दहा हजार डॉलरवर असल्याचें आढळून आलें. फक्त ८ टक्के कुटुंबांचें उत्पन्न पांच हजार डॉलरवर होतें. जवळजवळ ७१ टक्के कुटुंबांचें उत्पन्न अडीच हजार डॉलरहूनहि कमी, ६० टक्के कुटुंबांचें उत्पन्न दोन हजार डॉलरहून कमी, ४२ टक्क्यांहून अधिक कुटुंबांचें उत्पन्न पंधराशे डॉलरपेक्षां कमी आणि ११ टक्क्यांहूनहि अधिक कुटुंबांचें उत्पन्न तर वार्षिक एक हजार डॉलरहूनहि कमी होतें.

" ब्रुकिंग्ज इन्स्टिटयूशन " पुढें म्हणते, " दोन हजार डॉलर वार्षिक उत्पन्न हें मूलभूत गरजा भागविण्याच्या दृष्टीनें पुरेसें मानतां येईल. " यावरून दोन हजार डॉलरपेक्षां कमी उत्पन्न म्हणजे दारिद्य, असा आपोआपच निष्कर्ष निघतो. सन १९२९ च्या सुवर्ण वर्षांतहि ६० टक्के कुटुंबें या दारिद्र्याच्या पातळीवर होती. " ब्रुकिंग्ज इन्स्टिटयूशन " ला असेंहि आढळून आलें कीं, " त्या दशकांत, उत्पन्नांतील विषमता वाढविण्याचीच प्रवृत्ति दिसून येत होती. "

# प्रकरण १० : प्रचंड मंदी

न्यूयॉर्कच्या रोखेबाजारांतील किंमती अलीकडे घसरत चालल्या होत्या. ता. २४ ऑक्टोबर १९२९ रोजीं तर भरभराटीच्या भव्य इमारतीला मोठमोठ्या भेगा पडल्याचें दिसून आलें. त्या दिवशीं सकाळीं बाजारांत जी घबराट सुरू झाली, ती ता. १३ नोव्हेंबरपर्यंत आवरतां आली नाहीं.

या मधल्या काळांत तीनशें कोटि डॉलरचें चलन कोठल्या कोठें गडप झालें! ही रक्कम त्यावेळच्या राष्ट्रीय कर्जापेक्षांहि मोठी होती. अमेरिकन आर्थिक पतीला कल्पने-पेक्षांहि मोठा धक्का बसला होता. वॉल स्ट्रीटवरील धंदेवाल्यांच्या नेतृत्वाला भगदाडें पडलीं होतीं. प्रचंड आर्थिक मंदी वाट चालूं लागली होती.

या आणीबाणीच्या परिस्थितीला तोंड देण्याचा हर्बर्ट हूवरनें प्रयत्न चालविला. (हूवर मार्च १९२९ मध्यें कूलीजच्या जागीं अध्यक्ष म्हणून निवडून आला होता.) हूवरनें प्रमुख भांडवलदारांना वॉशिंग्टनला बोलाविलें व राष्ट्रांत आशावाद निर्माण करण्या-साठीं त्यांना परिस्थिति पूर्णपणें आटोक्यांत आहे व वेतन कपात केली जाणार नाही, असें जाहीर करावयास लाविलें. पण त्याचा उपयोग झाला नाहीं. त्यानंतर बाजार आपोआप सुधारेल, असें समजून तो कांहीं काळ स्वस्थ राहिला, पण ही समजूतहि व्यर्थ ठरली. शेवटीं हूवरनें, त्यावेळीं युरोपांत उफाळलेली मंदी अधिक घातक आहे, असा निष्कर्ष काढून निरनिराळया राष्ट्रांना युद्धकर्जें व नुकसान भरपाईचे हप्ते भरण्यास सार्वत्रिक मुदत दिली. हूवरचें हें धोरण मुत्सद्देगिरीचें होतें व त्याचा तात्पुरता उपयोगहि झाला. हूवरचें पुढचें पाऊल म्हणजे अडचणींत सांपडलेल्या बँकांना व कंपन्यांना मदत देण्याकरितां हूवरनें "रिकन्स्ट्रक्शन फायनान्स कार्पोरेशन" ही मध्यवर्ती सरकारी संस्था स्थापन केलीं. एकंदरींत परिस्थिति सांवरल्याचीं लक्षणें दिसूं लागलीं असतांनाच सन १९३२–३३ च्या हिंवाळ्यांत अमेरिकन बँका गोते खावूं लागल्या. "रिकन्स्ट्रक्शन फायनान्स कार्पोरेशन"चाहि उपयोग झाला नाहीं. अमेरिकन इतिहासांतील एक अपूर्व योगायोग म्हणजे ता. मार्च १९३३ रोजीं हूवरनें खालीं ठेवलेली अधिकारसूत्रें फ्रँकलीन डी. रुझवेल्टनें हातांत घेतलीं व त्याच दिवशीं अमेरिकन बँकिंग पद्धत पूर्णपणें थंडावली होती.

रुझवेल्टचें उद्घाटनाचें पहिलेंच भाषण कणखर आशावादी होतें. तो म्हणाला, "आपल्याला कशाची भीति असेल तर ती फक्त भीतीचीच." रुझवेल्टनें उपाय-

योजनांची नुसती सरबत्तीच सुरू केली व तीमुळें कांहीं प्रमाणांत कां होईना परिस्थिति सांवरली.

अमेरिकन लोकांची भावी परिस्थिति समजावून घेण्यासाठीं या प्रचंड आर्थिक मंदीतील कांहीं गोष्टी समजून घेणें आवश्यक आहे.

( १ ) ही आर्थिक मंदी म्हणजे प्रचंड प्रमाणावरील एक दीर्घकालीन अरिष्टच. या मंदींनंतर अडीच वर्षांनीं सन १९३२ मध्यें वार्षिक उत्पादन सन १९२९ च्या मानानें निम्म्यावर आलें होतें. याच वर्षांत देण्यांत आलेलें एकंदर वेतन सन १९२९ च्या मानानें ६० टक्क्यांहूनहि कमी होतें.

१९३२ मध्यें बेकार अमेरिकनांची संख्या एक कोटि वीस लाखांवर होती. औद्योगिक शहरांत नोकऱ्या नसलेल्या लोकांचें प्रमाण धडकी भरविणारे होतें. एका बफेलो शहरांत काम करूं शकणाऱ्या व कामास तयार असणाऱ्या पंधरा हजार लोकांपैकीं ३१ टक्के लोकांना काम मिळत नव्हतें व जे कामावर होते, त्यांच्यापैकीं निम्म्याहून कमी लोकांनाच भरपूर काम होतें. शेतीमालाचे भावहि खूप घसरल्यामुळें शेतकरी अडचणींत आले होते.

( २ ) ही आर्थिक मंदी म्हणजे जागतिक आर्थिक मंदीचाच एक भाग होता. कार्ल पोलानी यानें म्हटल्याप्रमाणें ही मंदी म्हणजे एकोणिसाव्या शतकांत प्रस्थापित झालेल्या बाजारपेठी अर्थरचनेचाच अधःपात होता.

( ३ ) या आर्थिक मंदीमुळें लाखो लोकांना आपल्या रहाणींत बदल करावा लागला. मंदीमुळें अनेकांच्या नोकऱ्या गेल्या होत्या, त्यांच्या अपेक्षांचा चक्काचूर झाला होता. अनेकांच्या नशिबी उपासमार आली होती. होरॅशिओ आल्जरचा "यशाचा मार्ग" आतां लोकांच्या हेटाळणीस पात्र होऊं लागला होता. महत्त्वाकांक्षा मावळूं लागली होती, बिनधाडसाच्या पण निर्धास्त नोकऱ्या पकडण्याकडे लोकांची प्रवृत्ति होत चालली होती. लोकांना आतां सामाजिक विमा योजना, पेन्शन योजना हव्या होत्या.

( ४ ) आर्थिक मंदीमुळें वॉलस्ट्रीटवरील बड्या धेंड्यांना वरच्या स्थानावरून पदभ्रष्ट व्हावें लागलें. आर्थिक मंदी थांबविण्यास वॉलस्ट्रीटवाले असमर्थ ठरले होते.

( ५ ) आर्थिक मंदीमुळें भांडवलदारांची इभ्रतहि खूपच कमी झाली. विशेषतः जे पेढीवाले व दलाल यांना पूर्वी मान मिळत होता, तेच आतां लोकांच्या चेष्टेस व गैरविश्वासास पात्र झाले होते.

( ६ ) तरीहि एक घटना उल्लेखनीय आहे. जागतिक आर्थिक मंदीनें जर्मनींत हिटलरला अधिकारावर आणलें व इतर कांहीं देशांतहि भांडवलशाही अर्थरचनेला प्राणांतिक धक्का दिला. पण खुद्द अमेरिकेंत मात्र या परिस्थितींतहि क्रांति झाली नाहीं. आर्थिक परिस्थिति सुधारण्यासाठीं एकामागून एक सुधारणा जारी करण्यांत आल्या. शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिति खालावली होती, कामगार संघटनांत कम्युनिस्टांचें थोडेंफार वजनहि वाढल, ( अर्थात् त्यामुळें कम्युनिस्टांच्या मतांच्या संख्येंत वाढ झाली नाहीं. ) असंख्य अमेरिकनांना हाल सोसावे लागले, पण इतकें असूनहि क्रांतीचा अवलंब करण्यांत आला नाहीं.

रूझवेट अधिकारावर येऊन एक वर्ष झाल्यावर ता. ३१ डिसेंबर १९३३ च्या " न्यूयॉर्क टाईम्स " मध्यें जॉन मेनॉर्ड केन्स यानें रूझवेल्टला उद्देशून एक अनावृत पत्र प्रसिद्ध केलें होतें. केन्स या पत्रांत म्हणतो " प्रचलित सामाजिक चौकटींतच योग्य प्रयोग करून सध्यांच्या बिघडलेल्या परिस्थितीवर तोडगा काढण्याचा प्रत्येक देशांत प्रयत्न चालू आहे, पण तुम्ही तर स्वतःकडे त्यांच्या पालकाचीच भूमिका घेऊन बसला आहात. यांत तुम्ही अपेशी झालात, तर साऱ्या जगांत योग्य बदल घडवून आणण्याच्या मार्गांत गंभीर धोका उत्पन्न होईल. आणि त्याचा परिणाम धोपटमार्गी व क्रांतिवादी यांना लढा करूनच त्याचा निर्णय करून घ्यावा लागेल. " पण केन्सच्या इशाऱ्याप्रमाणें कांहीं घडून आलें नाहीं. प्रचलित सामाजिक रचनेच्या चौकटींतच प्रयोग करण्यांत आलें. अमेरिकन वैचारिक बंडाच्या काळाप्रमाणेंच यावेळींहि अमेरिकनांनीं हेंच दाखवून दिलें कीं राष्टीय यांत्रिक रचनेंत दिसून आलेले दोष दूर करण्याचा एकच मार्ग आहे व तो म्हणजे यंत्राची मोडतोड न करतां तें तसेंच चालू ठेवून त्यांत दुरुस्ती करणें.

अर्थात् या ठिकाणीं रूझवेल्टच्या सर्व परिचित अशा नव्या धोरणाविषयीं ( न्यू डील ) विस्तारानें सांगण्याची जरूरी नाहीं. या नवीन धोरणानें अमेरिकन आर्थिक रचनेंत अनेक दृष्टींनीं कायमचा बदल घडवून आणला आहे.

( १ ) नवीन धोरणानें अमेरिकेंतील प्रचलित असे अनेक आर्थिक नियम बदलून टाकले. उदाहरणार्थ १९२० नंतरच्या आर्थिक चुकांची पुनरावृत्ति होऊं नये यासाठीं व्यापारी बँकांची रोखेबाजारापासून फारकत करण्यांत आली. आवश्यक ती माहिती पुरविल्याशिवाय कंपन्यांना नवीन रोखे काढण्यास बंदी करण्यांत आली. रोखे बाजारांतील

व्यवहारांवर देखरेख करण्याकरितां एक सरकारी मंडळ स्थापन करण्यांत आलें. सरकारनें नवीन नियम केले, इतकेंच नव्हे तर त्याबाबत अंतिम अधिकार स्वतःकडे ठेविलें.

( २ ) नवीन धोरणान्वयें आर्थिक क्षेत्रांत सर्वसामान्य लोकांना संरक्षण देण्यांत आलें. उदाहरणार्थ मागणी तसा पुरवठा हा सिद्धांत शेतकऱ्यांना घातक होत आहे, असें आढळून येताच सरकारनें मध्यें पडून शेतकऱ्यांना ठराविक भाव मिळवून देण्याची हमी घेतली. याशिवाय सरकारनें आर्थिक अडचणींत असलेल्या समाईक कंपन्यांना हात दिला. शेतकरी व घरमालक यांना गहाण कर्जाचे हप्ते देण्यास मदत दिली. नवीन घरबांधणीच्या कामाला साहाय्य दिलें. बँकांतील ठेवींचे विमे उतरले. सामाजिक सुरक्षा योजनेद्वारें बेकार लोकांना व वृद्धांना मदत देण्याची योजना अमलांत आणली व कामगारांचें किमान वेतन व कामाचे तास याबद्दल कायदा केला.

( ३ ) रोजंदारी वाढावी म्हणून सरकारनें धरणें, पूल, उद्यानें, क्रीडागणें वगैरे कामें प्रचंड प्रमाणावर हातांत घेतलीं. तसेंच खासगी वीज कंपन्यांशीं स्पर्धा करण्याच्या, पुरांना अटकाव करण्याच्या व त्याचप्रमाणें जमिनीची धूप होऊं न देण्याच्या दृष्टीनें शेतकऱ्यांना शिक्षण देण्यासाठीं "टेनेसी व्हॅली ॲथॉरिटी" नांवाचें मंडळ उभारलें.

( ४ ) नवीन धोरणान्वयें कामगार संघटनांना चालना देण्यांत आली. या वेळ-पावेतों सामुदायिक करारांचा अधिकार देणारे क्लेटन कायद्यासारखे कायदे करण्यांत आले होते. पण कोर्टाकडून त्यावर वारंवार बोळा फिरविला जाई. नवीन धोरणांत संघटनेचा अधिकार अधिक निश्चित व स्पष्ट करण्यांत आला व त्याचा परिणाम म्हणजे कामगार संघटनांचे सभासद होण्याची नुसती रीघ लागली.

सन १९३३ मध्यें कामगार संघटनांच्या सभासदांची संख्या तीस लाखांहूनहि कमी होती, ती १९४० च्या सुमारास नव्वद लाखांवर गेली. कामगार संघटनांच्या दडपणामुळें उद्योगधंद्यांतील कामाचे तास ४९·३ वरून ४४ वर आले. तसेंच आठवड्याच्या शेवटीं दोन दिवस सुट्टी देण्याचीहि पद्धत पडूं लागली.

जे. केनेथ गालब्राईथ यानें एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें कामगारांविषयीं सामान्यतः सहानुभूति दर्शवून, नवीन धोरणानें अमेरिकन अर्थरचनेंत एका समतोलक शक्ति ( कौंटरव्हेलिंग फोर्स ) निर्माण केली.

आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे नवीन धोरणानें सर्व अमेरिकन अर्थरचनाच एक अविभाज्य घटक समजून तिचा कारभार करण्याचा प्रयत्न करण्यांत आला,

सुवर्ण परिणाम सोडून काहींसें व सूत्रबद्ध असें चलन अंमलांत आणलें. समतोल अंदाजपत्रकें तयार करणें हेंच केवळ सरकारचें कार्य आहे, असें न समजतां राष्ट्र-संवर्धक कार्यासाठीं तुटीचीं अंदाजपत्रकें तयार करण्याची केनची कल्पना स्वीकारली.

सरकारच्या या सर्व सुधारणा, मदत व हमी, सार्वजनिक कामें, कामगारांना प्रोत्साहन व सर्व आर्थिक रचना एकच समजून तिचा कारभार, करण्याचा प्रयत्न, या सर्व गोष्टी निश्चितपणे समाजवादाच्या द्योतक नव्हत्या. कारण खासगी उद्योग-धंद्यांत नियंत्रणें आलीं तरी त्यांचा कारभार खासगी मालकीकडेच होता. तसेंच हें धोरण म्हणजे अनिर्बंध अशी अर्थरचनाहि नव्हती, तें म्हणजे एक सुवर्णमध्य होतें. डागडुजी केलेली व सुधारलेली भांडवलशाही असें तिला म्हणतां येईल.

१९३० नंतरचा हा काळ कितीहि खडतर असला तरी त्यानें अमेरिकन लोकांच्या भवितव्याच्या दृष्टीनें महत्त्वाच्या अशा अनेक गोष्टींचा वारसा मागें ठेवला आहे.

यापैकीं पहिली मूलभूत गोष्ट म्हणजे अमेरिकन लोकांचें भवितव्य एकमेकांशीं निगडित आहे व सर्व एकाच नौकेंतून प्रवास करीत आहेत, ही जाणीव लोकांत निर्माण झाली. दुसरी गोष्ट म्हणजे कोणतीहि अमेरिकन व्यक्ति अडचणींत सांपडली तर सरकारमार्फत तिच्या मदतीला जाणें आपलें कर्तव्य आहे, ही कल्पना रूढ झाली व तिसरी गोष्ट म्हणजे गेल्या प्रचंड आर्थिक मंदीसारखी दुसरी आर्थिक मंदी कोसळूं नये, यासाठीं सरकारमार्फत व्यवस्था केली पाहिजे हेंहि लोकांना पटलें.

# प्रकरण ११ : नाखूष जागतिक सत्ता

सन १९३० नंतर आंतरराष्ट्रीय परिस्थितिहि बिघडत चालल्याच्या बातम्या येऊन धडकत होत्या. कांहीं राष्ट्रांचें आक्रमक धोरण जगाला खाईत लोटणार, अशीं चिन्हें दिसूं लागलीं. अमेरिकेला या राष्ट्रांचें धोरण अर्थातच बिलकूल पसंत नव्हतें, पण प्रचंड बहुसंख्यांक अमेरिकनांना परराष्ट्रांतील या उचापतींत आपण पडूं नये, असें वाटत होतें. देशांत अलगवादी भावना मोठ्या प्रमाणांत होती. अर्थात् हा अलगवाद एकाच प्रकारचा नव्हता. निरनिराळे लोक निरनिराळ्या मार्गांनीं या अलगवादाच्या निर्णयाला येऊन पोहोंचले होते. पहिला वर्ग म्हणजे सर्व परकीय गोष्टींवर सरसहा गैरविश्वास ठेवणाऱ्यांचा. दुसरा वर्ग म्हणजे आर्थिक मंदींत होरपळून निघालेल्यांचा. आपल्या दुःखाला भांडवलदार व बडे व्यापारी यांची अधाशी वृत्ति कारणीभूत असून आंतरराष्ट्रीय पेढीवाले व शस्त्रास्त्रांचें कारखानदारच धूर्त कारवाया करून युद्धें पेटवितात, अशी या लोकांची समजूत. तिसरा वर्ग म्हणजे कम्युनिस्टांचा. पक्षाच्या त्यावेळच्या आंतरराष्ट्रीय धोरणास अनुसरून कम्युनिस्टांनीं वॉल स्ट्रीट व दारुगोळ्यांचे कारखानदार यांच्याविरुद्ध आघाडीच उघडली होती. चौथा वर्ग म्हणजे रूझवेल्टविषयीं अतिशय गैरविश्वास असणाऱ्यांचा. देशावरील आपली पकड अधिक घट्ट करण्याकरितां रूझवेल्ट अमेरिकेला युद्धांत खेंचण्याचा प्रयत्न करत आहे, असा त्यांना संशय होता.

आणि शेवटचा वर्ग म्हणजे युद्धाविषयीं अत्यंत तिरस्कार वाटणाऱ्या तरुण पिढीचा. पहिल्या महायुद्धांतील अमेरिकेचा प्रवेश म्हणजे आपल्या पूर्वीच्या पिढीची अत्यंत घातक चूक होय, अशी या पिढीची ठाम समजूत बनली होती.

सन १९३५, १९३६ व १९३७ मध्यें अमेरिकन कॉंग्रेसनें तटस्थतेबद्दल लागोपाठ तीन कायदे पास करून आपलें अलगवादाचें धोरण जाहीर केलें. युद्धांत गुंतलेल्या राष्ट्रांना शस्त्रास्त्रें किंवा दारूगोळा विकण्यास अमेरिकेला बंदी करणें हा या कायद्याचा हेतू होता. रूझवेल्टला व अमेरिकन परराष्ट्रीय खात्याला हे कायदे पसंत नव्हते. सदर कायदे अवास्तव व अमेरिकेचे हात बांधून टाकणारे असून त्यामुळें राष्ट्राची परदेशांतील इभ्रत व हक्क यांवर बोळा फिरला आहे, असें त्यांचें मत होतें. पण लोकांचा विरोध फारच दांडगा होता, आणि त्याचा परिणाम म्हणजे ऑक्टोबर १९३७ मध्यें रूझवेल्टनें एका भाषणांत " आक्रमकांना पायबंद घातला पाहिजे, " असें जेव्हां उद्गार काढलें, तव्हां विरोधकांनीं कानठळ्या बसविण्याइतक्या मोठमोठ्या विरोधी गर्जना केल्या.

पण परिस्थिति झपाट्यानें बिघडत चालली होती; धोका वाढत चालला होता.

युरोपांतील चिंताजनक घटना–आणि त्यांतच, हिटलरच्या तुफानी आक्रमणाचें स्वरूप देशबांधवांना समजावून त्यांचीं मनें तयार करण्याबद्दलचे रूझवेल्टचे प्रयत्न–यामुळें अमेरिकन लोक हळुहळू पण निश्चितपणें बदलूं लागले होते. अमेरिका स्वतंत्रपणें एकटीच तग धरूं शकेल कीं नाहीं, याची लोकांना शंका वाटूं लागली.

जून १९४० मध्यें फ्रान्सचा पाडाव झाला. यावेळीं अमेरिकेनें आपल्या युद्ध-साहित्याचें उत्पादन झपाट्यानें वाढविण्यास सुरवात केली होती. अमेरिकेनें शस्त्रसंपन्न झालें पाहिजे, याबद्दल सर्वांचेंच एकमत होतें. फ्रान्सच्या पाडावानंतर थोड्याच आठवड्यांत रुझवेल्टनें ब्रिटनला तोफा व जुन्या विनाशिका पुरविण्यास सुरवात केली. १९४० च्या हिवाळ्यांत लष्करी नोकरीबाबतचा कायदा अंमलांत आला. त्याच वर्षी हिवाळ्यांत अमेरिकन अध्यक्षपदाचीहि निवडणूक झाली. या निवडणुकीस पूर्वीची प्रथा मोडून रुझवेल्ट हा तिसऱ्यांदा उभा राहिला होता व रिपब्लिकन पक्षानें ऐन वेळीं वेन्डेल विल्की याला उभे केलें होतें. युरोपला मदत दिली पाहिजे या बाबतींत दोघांचें एकमत असलें तरी अमेरिकेला युद्धांत लोटण्यास आपला विरोध आहे, असे दोघेहि आग्रहाने सांगत होते. त्यानंतर पुढच्याच वर्षी एका बाजुला हिटलरनें बॉंबवर्षाव करून ब्रिटिश शहरें बेचिराख केलीं, सारा बाल्कन प्रदेश पादाक्रांत केला व रशियावर हल्ला चढविला, तर दुसऱ्या बाजूला साऱ्या अतिपूर्व प्रदेशाला जपानचा धोका निर्माण झाला. युद्धांत अधिकाधिक प्रत्यक्ष हस्तक्षेप केला पाहिजे या मताकडे अमेरिकन लोकमत हळुहळूं झुकले. कॉंग्रेसमध्यें उधार उसनवार कायदा प्रचंड मताधिक्यानें पास झाला. अमेरिकन युद्धनौकांच्या संरक्षणाखालीं अमेरिकन साहित्य इंग्लंडकडे रवाना होऊं लागले व अमेरिकेचें जर्मनीशीं जवळजवळ अघोषित युद्ध सुरू झालें.

यावेळीं बहुसंख्यांक अमेरिकनांना युद्धांत प्रत्यक्ष सामील होण्याचा धोका पत्करूनहि हिटलरचा पराभव केला पाहिजे असें वाटत होतें. एका अल्पसंख्यांक गटाचें तर अमेरिकेनें युद्धांत सर्वस्व पणाला लावावें असें मत होतें. पण अद्यापहि रूझवेल्टच्या धोरणाविषयीं तीव्र नापसंति वाटणारा असा एक मोठा अल्पसंख्यांक गट होता. अर्थात् या गटांतहि हिटलर किंवा जपानी साम्राज्यवाद्यांविषयीं आपुलकी वाटणारे लोक मूठभरच असतील ! आक्रमणाविषयीं आपल्याला तिटकारा वाटत असला तरी तें थांबण्याकरितां किंवा अमेरिकेला आक्रमणाचा प्रत्यक्ष धोका निर्माण होईपर्यंत आपण युद्ध पुकारूं नये एवढेंच या गटाचें मत होतें.

पण ता. ७ डिसेंबर १९४१ रोजीं बसलेल्या फटक्यानें सर्व शंकाकुशंका गाडल्या गेल्या. जपाननें पर्ल बंदरावर हल्ला केला. अमेरिकेला हें आव्हान नाकारणें शक्य नव्हतें. आपण आपल्या खंडांत एकाकीच निर्धास्तपणें राहूं शकत नाहीं, एक जागतिक सत्ता या नात्यानें येणारी जबाबदारी उचललीच पाहिजे, हें आम्हांला नाखुषीनें कां होईना मान्य करावें लागलें. आतांपर्यंत स्वतःपुरतेंच पहाणें बरें असें आम्हांला वाटत होतें. पण आतां आमच्या पसंति–नापसंतिचा प्रश्न उरला नाहीं.

२

पहिल्या महायुद्धांत लोक ध्येयवादानें भारले होते व त्याचबरोबर युद्धाला बराच विरोधहि होता. दुसऱ्या महायुद्धांत विरोध नव्हता, पण ध्येयवादहि कमीच होता. पहिल्या महायुद्धानें केलेला भ्रमनिरास लोक विसरले नव्हते. तसेंच दुसऱ्या महायुद्धांत भाग घ्यावा कीं नाहीं यासंबंधींच्या वादाच्या खुणा अद्याप बुझलेल्या नव्हत्या. या शिवाय आर्थिक मंदीचे वणहि अद्याप बरे झालेले नव्हते. आर्थिक मंदींत होरपळून निघालेल्या लोकांना भवितव्य भेसूर आहे, असें वाटत होतें. युद्धावर जायला ते सज्ज होते, पण युद्ध संपल्यावर काय ? एकदां शत्रूला धूळ चारल्यावर आशेनें पुढें पहातां येईल, अशी त्यांची खात्री पटविण्याजोगे काय दिसत होतें ? लोक त्याबाबतींत अंधःकारांतच होते. युद्धहेतूंची भाषा त्यांना पोकळ वाटत होती. आशा न बाळगतां कर्तव्य करावयाचें एवढीच एक भावना दिसत होती.

तरीहि कांही अपवादात्मक प्रसंग सोडले तर अमेरिकन फौजांनीं युद्धांत अपूर्व पराक्रम गाजविला. सर्वसामान्य लोकांनींहि या सर्वकष युद्धांतील आपली कामगिरी चोखपणें पार पाडली. आपलें ध्येय न्याय्य आहे, याची अमेरिकन लोकांना खात्री वाटत होती. अमेरिकन लोक टिकाऊ शांततेविषयीं साशंक असतील, पण जेव्हां परिस्थिति अतिशय बिघडली होती, तेव्हांहि खुद्द लष्कराला व सर्वसामान्य जनतेला अंतिम विजयाविषयीं शंका वाटत नव्हती. अमेरिकन लोकांनीं आपल्या राष्ट्राचें व स्वातंत्र्यदेवतेचेंहि हिरिरीनें रक्षण केलें.

३

या निवेदनाचा हेतु अर्थातच दुसऱ्या महायुद्धाचा लष्करी इतिहास कथन करणें हा नाहीं. तो यापूर्वींच त्रुटित स्वरूपांत निवेदन केला आहे. पण आज आपल्या दृष्टीनें वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट म्हणजे त्या काळांतील मति गुंग करणारें अमेरिकन उत्पादन.

आर्थिक मंदीच्या तडाख्यानें एका गोष्टीचा विसर पडला होता व ती म्हणजे उत्पादनांतील झपाट्याची वाढ. या बाबतींत पुढील आंकडे उद्बोधक आहेत. सन १९००–१० मध्यें माणसी उत्पादन बारा टक्क्यांनीं वाढलें होतें. १९१०–२० या काळांत हेंच उत्पादन फक्त साडेसात टक्क्यांनीं वाढलें. यानंतर १९२०–३० च्या काळांत २१ टक्क्यांची ठळक वाढ दिसून आली. सन १९३०–४० च्या आर्थिक मंदीच्या काळांत अनेक धंदे बंद पडले होते किंवा अंशत: चालू होते; कार्यक्षमतेवरहि खूप ताण पडला होता, तरीहि या उत्पादनांत ४१ टक्क्यांची आश्चर्यकारक वाढ झाली.

वॉशिंग्टन येथील लष्करी नियोजक भव्य प्रमाणांत योजना आंखीत. दुसरें महायुद्ध संपलें तेव्हां अमेरिकन सैन्यांत एक कोटि वीस लाखांहून अधिक लोक होते. पहिल्या महायुद्धांत हीच संख्या पन्नास लाखांहूनहि कमी होती. या सैन्याला सर्वोत्कृष्ट शस्त्रास्त्रें, सर्वोत्कृष्ट साहित्य पुरविण्याची व त्यांना आत्यंतिक सवलती उपलब्ध करून देण्याची लष्करी श्रेष्ठींची योजना होती व प्रत्यक्ष तशी परिस्थितिहि होती. शिवाय केवळ आमच्या सैनिकांनाच नव्हे तर इतरांनाहि शस्त्रास्त्रें पुरवावयाचीं होतीं. याचा परिणाम म्हणजे मति गुंग करणारें उत्पादन व खर्च!

पहिल्या महायुद्धाच्या वेळीं आम्ही युद्धकार्यावर जो कमाल खर्च करत होतो, त्याच्या पांच पट खर्च सन १९४३ मध्यें केला. नवीन धोरणामुळें अमेरिकेचा खर्च क्रमशः सात–आठ व नऊ अब्जांवर गेला, तेव्हां टीकाकारांनीं कोण ओरड केली. या खर्चामुळें अमेरिका दिवाळखोर बनेल, असें त्यांचें भाकीत होतें. पण सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे सन १९४२ मध्यें अमेरिकेनें ३४ अब्ज, १९४३ मध्यें ७९ अब्ज, १९४४ मध्यें ९५ अब्ज, १९४५ मध्यें ९८ अब्ज व १९४६ मध्यें युद्ध संपल्यावरहि ६० अब्ज डॉलर खर्च केले.

युद्धकाळांत नवीन अवाढव्य कारखाने व तेहि झपाट्यानें उभारण्यांत आले. मोटारींच्या कारखान्यांतून प्रवासी गाड्या बाहेर पडण्याऐवजीं रणगाडे, मालमोटारी व शस्त्रास्त्रें बाहेर पडूं लागलीं. रबरापासून राडरपर्यंत, जहाजांपासून दारुगोळ्यापर्यंत, डी. डी. टी.–पेनिसिलीनपासून अणूबॉंब कारखान्याच्या सामुग्रीपर्यंत, सर्व तऱ्हेचें उत्पादन झपाट्यानें काढण्याच काम अमेरिकन कारखान्यांकडे सोंपविण्यांत आलें होते. वेग, अधिक वेग व भरपूर माल ही नेहमीं सरकारची मागणी असे.

याचा परिणाम असा झाला कीं सन १९४५ मध्यें लष्करी सामुग्रीसह, सर्व मालाचें उत्पादन दोनशें पंधरा अब्ज डॉलरचें झालें. सन १९३९ च्या मानानें हें उत्पादन

दुपटीन अधिक होतें. सन १९३९ मध्यें उत्पादन फक्त ९१ अब्ज डॉलर किंमतीचें झालें होतें. युद्धकालीन वाढलेल्या किंमती सोडल्या तरी १९४९ चें उत्पादन १९३९ पेक्षां दोनतृतीयांशांनीं अधिक असल्याचें दिसून येतें. अमेरिकेच्या वार्षिक इतिहासांत पांच वर्षांत जितकें उत्पादन वाढलें नसेल, तितकी आश्चर्यकारक वाढ या वेळीं अमेरिकन उद्योगधंद्यांनीं करून दाखविली.

४

अमेरिकन सरकार युद्धकार्याकरितां अब्जावधि डॉलर खर्च करत असतां राष्ट्रीय रहाणीचें मान कसें होतें ? तेथेंहि भरघोंस प्रगति दिसत होती.

अमेरिकेंत जी काय बेकारी शिल्लक होती, तीहि सन १९४३ पर्यंत नाहींशीं झाली होती. १९४४ मध्यें जिकडेतिकडे भरभराटीचीं चिन्हें दिसत होतीं. कोणत्याहि शहरांतील हॉटेलांत खोली मिळणें मुष्किलीचें होतें. पूर्वी कोणत्याहि हॉटेलांत उपहाराकरितां चटकन् जागा मिळूं शके. पण आतां बारा वाजल्यानंतर पांच दहा मिनिटांच्या आंतच सर्व जागा भरून जात. लोंकरीचे कोट, दागदागिने वगैरेंची विक्री झपाट्यानें वाढत चालली होती चैनीच्या वस्तूंना मध्यंतरीं गिऱ्हाईक मिळेनासें झालें होतें, पण आतां त्यांना अचानक मागणी येऊं लागली.

ज्या राष्ट्रानें आत्यंतिक युद्धकार्याकरितां कंबर कसली होती, त्या राष्ट्रांत भरभराटीचा लोंढा यावा, हा एक चमत्कारिक प्रकारच होता. सरकार खर्चांत काटकसर करून चलनवाढ कमी करण्याचा आटोकाट प्रयत्न करत होतें. मालाच्या किंमतीवर नियंत्रण होतें. वांटप पद्धति अमलांत आणण्यांत आली होती. वेतनश्रेणी थोपविण्यांत आली होती, जादा नफ्यावर कर बसविण्यांत आला होता व अफाट व्यक्तिगत उत्पन्नावरील कराचें प्रमाणहि भारी ठेवण्यांत आलें होतें, तरीहि भरभराट ओसंडत होती.

प्रश्न असा कीं पैसे कोणाला मिळत होते ?

साधारणपणें बोलावयाचें म्हणजे मोठमोठ्या समाईक कंपन्यांच्या भागीदारांना फारसा पैसा मिळत नव्हता. या कंपन्यांकडे सरकारची युद्धसाहित्याची प्रचंड मागणी असे. पण जादा नफ्यावरील कर, तसेंच अनिश्चित अशा भावी काळासाठीं तरतूद करण्याची दक्षता व १९१८ मध्यें युद्धनफ्याबाबत उठलेल्या अनेक भल्याबुऱ्या

अफवांची आठवण वगैरेमुळें डिव्हिडंड कमी वाटलें जाई. रोखेबाजारांत सुस्ती आली होती. एकंदरींत बड्या भांडवलदारांचा बहर संपला होता.

यापेक्षां ज्या लहान कंपन्या होत्या त्या आर्थिक मंदीच्या काळांत जेमतेम तग धरून होत्या. त्यांचेंहि उखळ युद्धकालीन मागण्यामुळें पांढरें झालें. पण त्यांच्या उत्पन्नापैकींहि बराच भाग कर रुपानें सरकारच्या तिजोरींत जाई. याशिवाय देशांत कापडधंद्यासारखे जे अनेक छोटेछोटे धंदे होते, त्यांना युद्धजन्य मागण्या येत नसल्या तरी एकंदरींत खूप फायदा होई. पण त्यांनाहि कर द्यावा लागे. यावेळींहि इतर कांहीं उद्योगधंद्यांची परिस्थिति खालावली होती.

सधन लोकांना बराच पैसा मिळे. पण जे सधन लोक प्रामाणिक होते, ते प्राप्तीवरील करामुळें स्वत:जवळ फारच थोडी पुंजी शिल्लक ठेवूं शकत. युद्धकाळांत कांहीं प्रामाणिक लोकहि लक्षाधीश झाले असले तरी एकंदरींत सधन पण प्रामाणिक लोकांना फारसा फायदा मिळाला नाहीं.

युद्ध कारखान्यांखेरीज इतर ज्या कारखान्यांतील लोकांचे पगार अगर वेतन "युद्ध मजूर मंडळानें" थोपवून धरलें होतें, त्यांनाहि अजिबात फायदा मिळाला नाहीं. फक्त कांहीं जणांचा त्यांच्या कामाचें फेरवर्गीकरण केल्यामुळें किंवा कांहींना, पात्रता सिद्ध केल्यामुळें, जी बढति मिळत असेल तेवढीच. जे लोक व्याज किंवा डिव्हिडंडवर अवलंबून होते, त्यांचा क्वचितच फायदा झाला असेल, उलट चलनवाढीमुळें त्यांची परिस्थिति खालावली.

युद्धामुळ ज्यांचा फायदा झाला ते लोक म्हणजे साधारणत: शेतकरी, इंजीनियर्स, तंत्रज्ञ, युद्धकार्याच्या दृष्टीनें ज्यांची विशेष जरूरी असे खास तज्ञ, युद्धधंद्यांतील कसबी किंवा कसबी धंदा शिकून कसबी कामगारांच्या रांगेंत जाऊं शकतील असे बिनकसबी कामगार. शेतकरी यावेळीं अगदीं मजेंत होते व त्यांत वावगें असें कांहींच नव्हतें. आतांपर्यंत ते बिकट आर्थिक परिस्थितीच्या भोंवऱ्यांत गुरफटलेले असत. पण आतां भाव चांगले होते, शेतीमालाला खूप मागणी होती, वातावरण अनुकूल होतें, शेतीपद्धतींत खूपच सुधारणा झाली होती. त्याचा परिणाम म्हणजे १९३० च्या मानानें सन १९४३ मध्यें त्यांची खरेदीशक्ति दुप्पट झाली होती.

पुढच्या काळांत आवश्यक धंद्यांतील कामगारांना त्यांच्या कामावरच थोपवून धरण्यांत येऊन युद्ध मजूर मंडळानें त्यांचे पगार मर्यादेंतच ठेवण्याचें धोरण स्वीकारलें

होतें, हें खरें असलें तरी या कामगारांना नवीन भरभराटीचा एकंदरींत फायदा मिळाला, हें वादातीत होते. कारखान्यांतील कामगारांसंबंधींची खालील आंकडेवारी. पहा. सन १९३९ तें १९४५ च्या दरम्यान त्यांचे साप्ताहिक सरासरी पगार ८६ टक्क्यांनी वाढले होते. तरीहि १९३९ च्या मानानें त्यांची परिस्थिति खूपच चांगली होती. त्यांच्या वास्तविक वेतनांत झपाट्यानें स्वागतार्ह वाढ झाली.

एकंदरींत बरेच अपवाद सोडून युद्धकालीन भरभराटीमुळें कमी उत्पन्नदारांना हात दिला, यांत शंकाच नाहीं.

५

या काळांत अमेरिकन मध्यवर्ती सरकारचा (फेडरल गव्हर्मेंट) व्याप, सत्ता व कारभारहि खूपच वाढला होता.

अर्थात् ही वाढ कांहीं सर्वस्वी नवी नव्हती. युद्धापूर्वीच्या काळांत मध्यवर्ती सरकार व त्याचप्रमाणें राज्य व स्थानिक सरकारचा व्याप सारखा वाढतच होता. (फरक एवढाच कीं युद्धकाळांत फक्त मध्यवर्ती सरकार तेवढें फुगतें व बाकीचीं तशीच रहातात.) उदाहरणार्थ सन १९१५ तें १९३० या काळांत मध्यवर्ती सरकारचा खर्च ३५२ टक्क्यांनीं वाढला होता. यापैकीं बराच खर्च लष्कर व सैनिकी कार्यावर होत असला तरी मुलकी कारभारखर्चसुद्धां २३७ टक्क्यांनीं वाढला होता.

यानंतर रूझवेल्टच्या नवीन धोरणानें या खर्चांत झपाट्यानें वाढ झाली व सन १९४१–४५ च्या महायुद्धानें त्यांत आणखी खूप भर पडली. सन १९३० मध्यें हूवर अध्यक्ष होता व आर्थिक मंदीला नुकतीच कोठें सुरवात झाली होती, त्यावेळीं मुलकी नोकरांची संख्या सुमारें सहा लाख होती. सन १९४० मध्यें नवीन धोरणाचा अंमल जोरांत होता व युद्धकालीन तेजीला नुकतीच सुरवात झाली होती. यावेळीं मुलकी नोकरांची संख्या सहा लाखांवरून दहा लाखांवर गेली. सन १९४५ मध्यें युद्ध संपण्याच्या सुमारास हीच संख्या पस्तीस लाखांवर गेली होती.

दुसरें महायुद्ध संपल्यावर ही संख्या पुनः दहा लाखांवर आली काय ? छे! मुळींच नाहीं. पहिल्या महायुद्धानंतरच्या कालाप्रमाणें ही संख्या थोडीशीच घटली. कोरियन युद्धापूर्वींहि सन १९४९ मध्यें मध्यवर्ती मुलकी नोकरांची संख्या वीस लाखांवर होती.

या बाबतींत कोणी रूझवेल्ट कारभाराची हुबेहूब नक्कल करूं पहाणाऱ्या ट्रूमन कारकीर्दीला दोष देवोत किंवा डोंगळयाप्रमाणें अधिकाराला चिकटून रहाण्याची नैसर्गिक प्रवृत्ति असलेल्या नोकरशाहीला दोष देवोत, पण या प्रकाराला कांहीं झालें तरी सोव्हिएट रशियाबरोबरची तणातणी हें प्रमुख कारण होतें. दुसरें कारण कदाचित् आमच्यांतील परस्परावलंबनाची वाढती प्रवृत्ति हें असावें.

६

सन १९४५ हें महान् घटनांचें वर्ष होतें. या वर्षाच्या प्रारंभींच आर्देनसच्या बर्फमय प्रदेशांतील जर्मन प्रतिहल्ला उलटविण्यांत आला. याच वेळीं जगाच्या दुसऱ्या भागांत जनरल मॅकॉर्थरच्या फौजा फिलीपाईन्समध्यें धडका मारत होत्या. मे १९४५ मध्यें मुसोलिनी मरण पावला, हिटलर मरण पावला व जर्मनीनें शरणागति दिली. जुलैमध्यें न्यू मेक्सिकोमध्यें पहिल्या अणूबॉंबचा स्फोट करण्यांत आला. ऑगस्टमध्यें जपानमधील दोन शहरांवर अणूबॉंब टाकण्यांत आले व जपान शरण आला. विजय मिळाल्याबद्दल आनंदीआनंद पसरला. आतां शांततेचें नवयुग दिसूं लागलें.

युद्ध संपल्यावर लोकांच्या जोरदार मागणीला अनुसरून आम्ही आमचें लष्कर देशांत परत आणावयास सुरवात केली आणि त्याच वेळीं आम्हांला आश्चर्याचे दोन धक्के बसले.

पहिला धक्का स्वागतार्ह होता. असंख्य लोकांना वाटलें, त्याप्रमाणें युद्धोत्तर आर्थिक मंदी आली नाहीं. उलट नवीन भरभराट तशीच टिकली. लोक पाण्यासारखा पैसा खर्च करत होते. यामुळें सरकारी नियंत्रणें शिथिल झाल्यावर युद्धकालापेक्षांहि अधिक मोठी चलनवाढ झाली. सन १९४० तें १९४५ पर्यंत माफक उत्पन्नाच्या लोकांच्या रहाणीचा खर्च २८·४ टक्क्यांनीं वाढला होता. सन १९४५ तें १९४९ पर्यंत हाच खर्च ३१·७ टक्क्यांवर गेला होता व किंमती अद्याप वाढतच होत्या. कामगारांनीं एकामागून एक असे संप केलें. या संपांत सरकारला मध्यस्थी करावी लागली व त्यांत कामगारांच्या मागण्या थोड्याबहुत प्रमाणांत कां होईना मान्य होत गेल्या. कामगारांना या काळांत अनेक वेळां पगारवाढ मिळाली. पण पगारवाढीमागोमाग किंमतींत वाढ होई, व शिल्लक जेमतेम उरे. सर्वच मालांच्या वाढत्या किंमतीमुळें कांहीं उद्योगधंद्यांवर व ठराविक उत्पन्न असलेल्या व्यक्तींवर खूप प्रतिकूल परिणाम

झाला. पण परिस्थिति भरभराटीची होती, याबद्दल शंकाच नव्हती. सरकारचा खर्चहि प्रचंड प्रमाणावर चालू होता. थोडक्यांत त्या वेळचा आर्थिक प्रश्न म्हणजे अमेरिका आपलें सर्व उत्पादन वापरूं शकेल कीं नाहीं हा नसून आपल्याला जरूर इतकें उत्पादन करूं शकेल कीं नाहीं हा होता.

दुसरा धक्का अत्यंत अस्वस्थ करणारा होता. हिटलरशाहीला मूठमाती मिळाली होती, जपान मॅकॉर्थरच्या सत्तेखालीं गोगलगाय बनला होता. आम्ही जरा शिथिल होण्यास सुरवात केली, पण त्या क्षणींच रशिया जगावर सत्ता प्रस्थापित करूं पहात आहे, हें भेसूर सत्य आम्हांला उमगलें. याचा परिणाम म्हणजे अमेरिकेला अतिपूर्व व युरोपांत मोठ्या व्याप्ति फौजा ठेवाव्या लागल्या. ब्रिटनला कर्ज देऊन सांवरावें लागलें, ग्रीस व तुर्कस्थान या राष्ट्रांना ट्रूमन योजनेनुसार मदत द्यावी लागली. पश्चिम युरोपांतील कम्युनिस्टेतर राष्ट्रांना व जनतेला मदत करण्यासाठीं मार्शल योजना तयार करून दर वर्षीं एक अब्ज डॉलर द्यावयाची सोय करावी लागली. बर्लिनची उपासमार करून त्याला शरण आणण्याचा कम्युनिस्टांचा डाव हाणून पाडण्यासाठीं बर्लिनमधील नागरिकांना विमानांनीं रसद पोहोंचविण्याचा धाडसी उपक्रम कित्येक महिने चालवावा लागला. पश्चिम युरोपच्या संरक्षणासाठीं खूप खर्चाची " अटलांटिक संरक्षण योजना " अंमलांत आणावी लागली आणि मध्यंतरी संयुक्त राष्ट्रसंघाच्याच अधिवेशनांत नव्हे तर प्रत्येक मंडळाच्या, प्रत्येक समितीच्या सभेंत सोव्हिएट प्रतिनिधींचे अडथळे आणण्याचे धोरण व दुष्ट आरोप यांना तोंड देण्याची आम्हांला पाळी येई.

या काळांत लष्करी नोकरीबाबतचा कायदा अंमलांत ठेवावा लागला. लष्करी कारभार यंत्रणा पुनः उभारावी लागली व त्यामुळें चलनवाढ तशीच राहिली. मध्यंतरीं आम्ही अमेरिकेच्या परराष्ट्रीय धोरणांत द्विपक्षीय धोरण ठेवण्याचा अधुनमधून यशस्वी प्रयत्न केला. पण आम्ही घेतलेली जबाबदारीच मोठी गोंधळाची असल्यामुळें झालेल्या किंवा तथाकथित चुकांबद्दल सारखे राजकीय संघर्ष उडत; दोषारोप केले जात व त्याचा कम्युनिस्टांनीं अनेक भागांत फायदा घेतला. खुद्द अमेरिकेंतहि कम्युनिस्टांनीं कामगार संघटना वगैरेंत इतकेंच नव्हे तर कांहीं सरकारी खात्यांतहि शिरकाव केल्याचा आम्हांला सुगावा लागला. अमेरिकेंत सोव्हिएट वातावरण अगोदरच इतकें तीव्र होतें कीं या सुगाव्यामुळें अगदीं पोकळ किंवा धडधडीत खोट्या साक्षीपुराव्यावर अनेक सन्माननीय लोकांचीहि कीर्ति कलंकित झाली. पण त्याचबरोबर सोव्हिएट रशियाविषयीं वाटणाऱ्या

गैरविश्वासामुळें युरोपच्या मदतीसाठीं व संरक्षणासाठीं एकामागून एक आणलेले कायदे प्रचंड मताधिक्यानें पास झाले.

आंतरराष्ट्रीय तणातणी वाढल्यावर आणखी एक आश्चर्यकारक प्रकार स्पष्ट झाला. खरा अलगवाद त्यामुळें संपुष्टांत आला होता. अलगवादाचा पुरस्कार करणारे लोकच अति पूर्व प्रदेशांत अमेरिकेनें हस्तक्षेप केला पाहिजे, असे प्रतिपादन करूं लागले. अटलांटिकच्या पलीकडे युरोपकडे पहाण्याची त्यांची दृष्टि साशंक होती. हे लोक ब्रिटनला मदत देण्याविरुद्ध मतें देत, युरोपची मदत कमी करण्याचा आग्रह धरत. पण पॅसिफिकपलीकडे पहातांना त्यांचा दृष्टिकोन साशंक नसे. चँग कै शेकवर त्यांचा पूर्ण विश्वास असून, त्याला सर्वतोपरी मदत करण्याची त्यांची मागणी होती.

थोडक्यांत आमच्यांत कोणी युरोपांत हस्तक्षेप करावा असें म्हणत होते, तर कोणी आशियांत हस्तक्षेप करावा अशा मताचे होते. पण खरेखुरे अलगवादी हाताच्या बोटांवर मोजण्याइतके तरी शिल्लक राहिले होते कीं नाहीं याची शंका आहे. आमच्या परराष्ट्रीय धोरणाबद्दल तीव्र मतभेद असतील. पण अमेरिकेवर कम्युनिस्टेतर जगाच्या प्रमुख पालकत्वाची व आर्थिक साहाय्य करण्याची अपरिहार्य जबाबदारी येऊन पडली आहे, याबद्दल सर्वसाधारणतः एकमत होतें.

---

# प्रकरण १२ : काळें चित्र उजळलें

सन १९५० च्या सुमारास अमेरिकन तंत्रज्ञ, मुत्सद्दी, विद्वान् व पत्रकार यांचा एक जथा आपली नवीन जागतिक जबाबदारी उचलण्यासाठीं रवाना झाला. परदेशांत अमेरिकनांना—अंशतः कम्युनिस्ट प्रचारामुळें नेहमीं विचारला जाणारा प्रश्न म्हणजे, " अमेरिकेंतील वर्णभेदाबद्दल काय ? " सर्वांपुढें उज्ज्वल जगाचें चित्र उभारणारी अमेरिका आपल्याच देशांतील भिन्न वर्णीयांना बरोबर वागवीत आहे कीं नाहीं, हें जाणण्याची विशेषतः आशियाई, आफ्रिकन वगैरे भिन्न वर्णीय राष्ट्रांना उत्सुकता लागून रहावी, हें साहजिकच होतें.

या हुकमी प्रश्नाला अमेरिकनांजवळ हुकमी उत्तर नव्हतें. अमेरिकेंत अद्यापहि कांहीं प्रमाणांत भेदाभेद आहे, हें नाकबूल करतां येत नव्हतें. पण त्याबरोबरच या बाबतींत परदेशीय लोकांत पसरलेला समज जुनापुराणा व विपर्यस्त आहे, हेंहि खोटें नव्हतें. म्हणून जगाला खरी परिस्थिति समजावून सांगण्याची जरूरी होती. " गेल्या कांहीं वर्षांत या बाबतींत परिस्थिति किती बदलली आहे हें तुम्ही समजावून घेतलें पाहिजे, " असें जगाला सुचविण्याची त्यांना इच्छा होती.

सन १९५० मध्यें अमेरिकेंतील नीग्रोंची संख्या दीड कोटीवर गेली. पण सन १९०० मध्यें ती नव्वद लाखांच्या आंतच असून यापैकीं नव्वद टक्के नीग्रो दक्षिण भागांत व नव्वद टक्क्यांपैकीं तीनचतुर्थांश लोक दक्षिण भागांतील खेड्यांत रहात असत. जवळ जवळ ४४·५ नीग्रो लोक अशिक्षित होते. बहुतेक नीग्रोंना अत्यंत ओंगळ, ओझ्याचें व घाणेरडें काम करावें लागे व त्याबद्दल त्यांना जें वेतन देण्यांत येई, तेंहि कमालीचें तुटपुंजे होतें. बहुतेक नीग्रो हे शेतावर मजूर म्हणून काम करत असून ते अत्यंत जुलमी अशा रयतपद्धतीखालीं भरडून निघत होते. अनेकांना कर्जबाजारीमुळें जवळजवळ तहहयात वेठबिगारी करावी लागे.

सन १९०० मध्यें आलाबामा येथील १,८१,४७१ प्रौढ नीग्रो पुरुषांपैकीं फक्त तीन हजार लोकांचीं नांवें मतदारांच्या यादींत होतीं. त्या वेळीं लोकांनीं कायदा हातांत घेऊन नीग्रोना ठार करण्याचें ( लिंचिंग ) प्रकार अनेक झाले. १९०० मध्यें ११५ नीग्रोंना ठार करण्यांत आले, सन १९०१ मध्यें तर या आंकड्यानें १३० चा उच्चांक गांठला होता. ( सन १९४० मध्यें हें प्रमाण वार्षिक चारपेक्षांहि कमी होतें. )

दक्षिण राज्यांच्या मानानें उत्तर व पश्चिम राज्यांतील नीग्रोंची परिस्थिति साधारणतः बरीच चांगली होती. याचें एक कारण म्हणजे तेथील वेतनाचें प्रमाण जरा बरचें होतें. शिक्षणाची सोय समाधानकारक होती. आरोग्य निवारण व्यवस्था दक्षिण राज्यांइतकी मागासलेली नव्हती. दुसरें कारण म्हणजे तिकडील गोऱ्यांना अद्याप नीग्रोंची तितकीशी धास्ती वाटूं लागली नव्हती. कांहीं ठिकाणीं तर नीग्रोंना गोऱ्यांइतकेंच समानतेनें वागविले जाई. पण उत्तर राज्यांतहि नीग्रो म्हणजे सामान्यतः अमेरिकन जीवनाच्या रंगभूमिवरील एक करमणुकीचें किंवा विनोदी पात्र समजले जाई.

दक्षिणी नीग्रोंना फार पूर्वींपासून उत्तर राज्यांत स्थलांतर करावें असें वाटे व ज्यांना तें शक्य होई, असे नीग्रो तिकडे जातहि. सन १९१५ मध्यें तर नीग्रोंच्या स्थलांतराला एखाद्या महापुराचेंच स्वरूप आलें. त्याचें कारण युद्धजन्य तेजीमुळें बिनकसबी कामगारांना उत्तर राज्यांत वाढती मागणी होती. पण उत्तर राज्यांतील नीग्रोंची संख्या फुगत गेल्यावर विशेषतः मोठमोठ्या शहरांत नीग्रोंचा खूप भरणा होऊं लागल्यावर दक्षिणी गोऱ्याप्रमाणेंच उत्तरेकडील गोऱ्यांनाहि नीग्रोंची धास्ती वाटूं लागली. या गोऱ्या लोकांनीं नोकऱ्यांच्या बाबतींत आपली मक्तेदारी निर्माण केली. नीग्रोंना त्यांच्या गलिच्छ वस्त्यांतूनच रहाणें भाग पाडलें. नीग्रोंविरुद्ध गोऱ्यांनीं उभारलेली अत्याचारी चळवळ ( कु क्लक्स क्लॅन ) त्यावेळीं दक्षिणी राज्यांतच जोरांत होती, असें नव्हे तर उत्तर राज्यांतील कांहीं भागांतहि तिचा जोर होता.

यानंतर आर्थिक मंदीचें जें अरिष्ट ओढवलें, त्यामुळें नीग्रोंची परिस्थिति आणखी केंविलवाणी झाली. या काळांत लाखों अमेरिकनांनाच आपल्या नोकऱ्यांबाबत शाश्वति वाटत नसे. मग नीग्रोसारख्या अगदीं खालच्या पायरीवरील लोकांच्या परिस्थितीबद्दल बोलावयासच नको. सन १९३५ मध्यें उत्तर राज्यांतील अनेक शहरांतील मध्यम वर्गीय नीग्रो कुटुंबांच्या उत्पन्नाची पहाणी करण्यांत आली. त्यांत त्यांचें उत्पन्न मध्यम वर्गीय गोऱ्या कुटुंबांच्या उत्पन्नाच्या साधारणतः निम्मे किंवा त्याहूनहि कमी असल्याचें आढळून आलें. दक्षिण राज्यांत तर हें प्रमाण त्याहूनहि खालीं होतें. तेथें मध्यम वर्गीय गोरें कुटुंब वार्षिक सरासरी १,४१९ डॉलर मिळवी, तर मध्यम वर्गीय नीग्रो कुटुंब अवघे ४८१ डॉलर मिळवी. आणि त्याच वर्षी उत्तर राज्यांतील जवळजवळ निम्मी नीग्रो कुटुंबें मदतीवर जगत होतीं.

कम्युनिस्टांनीं या परिस्थितीचा बभ्रा करण्याचा दांडगा प्रयत्न केला व त्यांत आश्चर्यहि नाहीं. नीग्रो लोक म्हणजे त्यांना पाहिजे तसाच सामान्य कामकरी वर्ग होता. पण

एकंदरींत नीग्रोमध्यें कम्युनिस्टांना फारच थोडे अनुयायी मिळाले. याचें एक कारण म्हणजे नीग्रो लोक एक वर्ग नसून एक जमात होती. खुद्द नीग्रो जमातींतहि भेदाभेद होते; त्यामुळें कम्युनिस्टांच्या तत्त्वज्ञानाचा त्यांच्यावर प्रभाव पडला नाहीं. दुसरें कारण म्हणजे एकंदरींत कम्युनिझम लोकांत अप्रिय होता. "आधीं काळें होण्याचें नशिबीं आलें आहे, त्यांत लाल (कम्युनिस्ट) होण्याची भर कशाला?" असे खुद्द एका नीग्रोचेच उद्गार आहेत आणि तिसरें कारण म्हणजे त्यांना स्वभावतःच कम्युनिस्ट तत्त्वज्ञान व चळवळ याबद्दल घृणा वाटत होती.

यानंतर दुसरें महायुद्ध आलें व आर्थिक परिस्थितींत झपाट्यानें सुधारणा झाली. महायुद्धामुळें जी वेतनवाढ झाली होती, तिचा फायदा नीग्रोंनाहि कांहीं प्रमाणांत मिळाला. पण चांगल्या चांगल्या नोकऱ्या स्वतःकरितां राखून ठेवण्याची गोऱ्यांची प्रवृत्ति मात्र पहिल्या महायुद्धांतील कालापेक्षांहि या दुसऱ्या महायुद्धांत विशेष रीतीनें दिसून येत होती.

यावेळीं दुसरीहि एक प्रवृत्ति काम करूं लागली होती. अमेरिकेंत एक दलित जमात अस्तित्वांत असावी, हा लोकशाहीकरितां लढणाऱ्या राष्ट्राच्या कीर्तीवर कलंक आहे, ही जाणीव असंख्य गोऱ्या नागरिकांना अस्वस्थ करत होती. त्यांच्या नैतिक अस्वास्थ्यांत भर टाकण्यासाठींच कीं काय नीग्रो पुढारी, सैन्यांत गोरे व काळे यांच्यांत कसा पक्षपात केला जातो व नीग्रोंना वेगळें काढून त्यांच्याकडून केवळ मोलकऱ्यांचींच कामें कशीं करून घेतलीं जातात हें निदर्शनास आणण्याची एकहि संधि दवडत नव्हते. या भेदाभेदाविरुद्धची चळवळ व युद्धकारखान्यांत समान वागणूक मिळण्याची नीग्रोंची मागणी यांना उत्तर राज्यांतीलच नव्हे तर दक्षिणी राज्यांतील गोऱ्यांचाहि जोराचा पाठिंबा मिळाला. ग्राहकांच्या एका मोठ्या संख्येला मुद्दाम दारिद्र्यांत लोटणें हा समाजावर मोठा आर्थिक भार आहे, याची त्यांना जाणीव झाली व दक्षिणी राज्यांतील नीग्रोंच्या दारिद्र्याचें व हालअपेष्टांचें उच्चाटन करण्याचे कळकळीचे प्रयत्न होऊं लागले.

पण या प्रयत्नांचा कांहीं काळ परिणाम दिसून आला नाहीं. गुमार मिरडॉल यानें युद्धकाळांत नीग्रो लोकांच्या परिस्थितीसंबंधीं "ॲन अमेरिकन डायलेमा" या नांवाचा एक प्रचंड व निपक्षपाती ग्रंथ लिहला आहे. या ग्रंथाचा समारोप करतांना मिरडॉल म्हणतो, "नीग्रो वर्तमानपत्रांतील बातम्या व त्याचप्रमाणें दक्षिण व उत्तर

राज्यांतील नीग्रोंच्या परिस्थितीची समक्ष पहाणी करून आलेले निरीक्षक यांनीं कथन केलेली माहिती यावरून माझी खात्री झाली आहे कीं, आज अमेरिकन नीग्रोमध्यें अतिशय तिरस्कार, संताप व असंतोष आढळून येतो." युद्ध संपल्यानंतर आणखी एक आर्थिक मंदी येईल, असा इतरांप्रमाणेंच मिरडॉल्चाहि कयास होता. तो म्हणतो, "या परिस्थितींत झगडा उद्भवून आतांपर्यंत नीग्रोंची जी प्रगति झाली आहे, तिला धक्का बसेल कीं काय अशी धास्ती वाटते."

२

पण युद्धोतर आर्थिक मंदी आली नाहीं आणि या काळांत अमेरिकन लोकांची अस्वस्थ सद्बुद्धि पद्धतशीर काम करतच होती. त्याचा परिणाम म्हणजे युद्धोत्तर काळांत नीग्रोंच्या परिस्थितींत विश्वास बसणार नाहीं, इतकी प्रगति झाली.

या काळांत वरिष्ठ न्यायालयानें ( सुप्रीम कोर्ट ) जे निकाल दिले, त्यामुळें त्यांच्या मतदानाच्या हक्कावरील व शैक्षणिक क्षेत्रांतील जाचक निर्बंध रद्द झाले. दुसऱ्या एका निकालानें मालमत्तेसंबंधीचे निर्बंधहि ढिले झाले. पूर्वीं दक्षिण राज्यांत मतदानावर कर होता. या करामुळें गरीब अशा गोऱ्या व काळ्या लोकांना मतदानाचा हक्क बजावतां येत नसे. पुढें बऱ्याच दक्षिणी राज्यांनीं हा कर काढून टाकला. त्याचा परिणाम म्हणजे सन १९४८ च्या अध्यक्षीय निवडणुकींत दक्षिण भागांतील दहा लाखांवर काळ्यांनीं मतें दिलीं. वैमानिक व आरमारी दलांतील भेदाभेदांचें धोरण रद्द करण्यांत आलें व त्या बाबतींत लष्करी रिवाजांतहि दुरुस्ती करण्यात आली. नोकरीच्या बाबतींत नीग्रोंना अनेक उत्तर राज्यांत समानतेनें वागविण्यात येऊं लागले व हॉटेलें, नाट्यगृहें वगैरे सार्वजनिक ठिकाणीं त्यांच्यावर असलेले बरेच निर्बंधहि रद्द झाले.

सन १९२० नंतर नीग्रो कलावंतांनीं कलेच्या, विशेषतः संगीताच्या क्षेत्रांत जी अमूल्य भर टाकली, ती अमेरिकन लोकांच्या वाढत्या कौतुकास पात्र झाली. विशेषतः जाझ संगीताचें तर नीग्रो कलावंत आद्य प्रवर्तक होते. आज अमेरिकेंत डयूक एलिंग्टन व लुई आर्मस्ट्रॉंग या जाझ कलावंताबद्दल हजारो गान-रसिकांत अत्यंत आदराची भावना आहे. मध्यंतरी राल्फ बंच या नीग्रो महापुरुषानें दुसऱ्या एका क्षेत्रांत कीर्ति प्रस्थापित केली. त्यानें पॅलेस्टाईनमध्यें मुत्सद्दीपणानें यशस्वी मध्यस्थी करून असंख्य गोऱ्या लोकांचा दुवा घेतला. पण याहिपेक्षां नीग्रोंचें नांव लाखो लोकांत कोणी दुमदुमून सोडलें असेल तर तें प्रख्यात मुष्टियुद्धा जो लुई यानें. "जो लुई म्हणजे आपल्या

जातीचें-मानवजातीचें भूषण होय," असें न्यूयॉर्क येथील एका क्रीडा संपादकानें सार्थ रीतीनें म्हटलें आहे. बेसबॉल चहात्यांचा अत्यंत आवडता खेळाडू जॅकी रॉबीनसन् हाहि नीग्रो असून उत्कृष्ट खेळ व आदर्श वागणूक यांचा त्याच्या ठिकाणीं मिलाफ झाला आहे.

श्रीमती एलिनॉर रूझवेल्ट यांनीं गोरे व काळे यांच्यांत समानता आपोआप कशी रूळत आहे, या बाबतींत एक उद्बोधक अनुभव दिला आहे. श्रीमती रूझवेल्ट म्हणतात, "सन १९४५ मधील गोष्ट. व्हाईट हौसमध्यें एक समारंभ होता. समारंभाकरितां बरेच पाहुणे आले होते. समारंभाचें निरीक्षण करण्याकरितां कांहीं संपादिकाहि आल्या होत्या. समारंभ संपल्यावर त्या मजजवळ येऊन म्हणाल्या, "पाहिलंत, गेल्या बारा वर्षांत किती फरक पडला आहे तो! जर १९३३ मध्यें नीग्रो लोक अशा रीतीनें सर्वांत मिसळले असते तर देशांतील प्रत्येक वृत्तपत्रानें त्याला प्रसिद्धि दिली असती. पण आज आम्हांला याचें मुळींच महत्त्व वाटत नाहीं व आम्हीं त्याचा उल्लेखहि करणार नाहीं."

आतां नीग्रो म्हणजे केवळ विनोदी पात्रें किंवा मोलकरी असें समजण्यात येत नाहीं. नीग्रोचें चित्र रंगविण्याची ही ठराविक ठश्याची पद्धत जवळ जवळ नाहींशी झाली आहे.

सर्वांत उल्लेखनीय बदल म्हणजे गोरे तरुण नीग्रो लोकांना त्यांचा वर्ण लक्षांत न घेतां आपल्यांत मिसळून घेऊं लागले. विशेषतः वरिष्ठ न्यायालयाच्या निर्णयानंतर दक्षिण व सरहद्द राज्यांतील अनेक विद्यापिठांतून नीग्रोंना प्रवेश देण्यांत आला. प्रथम प्रथम विद्यापीठांतील अधिकाऱ्यांना, गोऱ्यांतील कांहीं माथेफिरू विद्यार्थी अधिक उणा प्रकार करतील कीं काय, अशी भीति वाटत होती. पण तसा कांहीं प्रकार घडला नाहीं.

मध्यंतरीं दक्षिण राज्यांतील जुन्या आर्थिक रचनेंतील बदलामुळें नीग्रोंच्या भवितव्या-वरहि आणखी बराच परिणाम झाला. कापूस गोळा करण्याच्या व पिंजण्याच्या यंत्राचा शोध लागल्यामुळें आग्नेय विभागांतील "कापूस महाराजां"चें राज्य संपुष्टांत येत होतें व त्याबरोबरच पिळवणुकीवर उभारलेली प्राचीन रयतावा पद्धतहि नाहींशीं होत चालली होती. हळुहळू उत्तरेकडील राज्यांत यांत्रिकीकरणामुळें जमिनींच्या विस्तृत क्षेत्रांत कपाशीचें पीक माफक खर्चांत काढतां येऊं लागलें व त्याचा परिणाम म्हणजे दक्षिण राज्यांना कपाशीची लागवड करण्याचें सोडून दुधदुभतें, गुरेंढोरें पाळणें, भाजी-

पाला करणें वगैरे धंदे हातीं घ्यावे लागले. या बदलामुळें काळया व त्याचप्रमाणें गोऱ्या कुणब्यांचीहि उत्तरेकडील औद्योगिक शहरांकडे रीघ लागली.

सन १९५० च्या शिरगणतीच्या आंकड्यांवरून या स्थलांतराची कल्पना येईल. सन १९०० मध्यें अमेरिकेंतील सुमारें पंचाहत्तर टक्के नीग्रो दक्षिणेकडील ग्रामीण भागांत रहात असत. सन १९५० मध्यें नीग्रोंची ही संख्या वीस टक्क्यांखालीं आली. ( यांपैकीं कुळें निम्म्यांहूनहि कमी होतीं. ) याउलट निरनिराळया उत्तर राज्यांतील नीग्रोंची संख्याहि खूप वाढली.

आणि या नीग्रोंची आर्थिक परिस्थिति कशी होती ? दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत गुमार मिरडॉल लिहितो,

" नीग्रोंची आर्थिक परिस्थिति केविलवाणी आहे. उच्च किंवा मध्यम वर्गीय दर्जा मिळालेले मूठभर नीग्रो सोडले तर सारी अमेरिकन नीग्रो जनता कंगाल आहे. त्यांच्या घरांतील सामान अपुरें व मोडकेंतोडकें असल्याचें दिसतें. त्यांना पगार कमी व तोहि वेळेवर मिळत नाहीं. हातावर पोट आणि भावी काळाची तुटपुंजी तरतूद अशीं त्यांची परिस्थिति आहे. त्यांची सारी संस्कृति, व्यक्तिगत आशाआकांक्षा आणि धडपड मर्यादित चाकोरींतच असल्याचें आढळून येते. "

सन १९५० मध्येंहि या विधानांत बरेचसें तथ्य होतें. पण सन १९५० नंतर भरभराटीची जी लाट आली तीबरोबरच नीग्रो लोकहि बरेच पुढें ढकलले गेले.

सन १९४८ मध्यें मध्यमवर्गीय नीग्रो कुटुंबांचें उत्पन्न मध्यमवर्गीय गोऱ्या कुटुंबांपेक्षां ४७ टक्क्यांनीं कमी होतें. सन १९५० च्या राष्ट्रीय आर्थिक पहाणींत निरनिराळया उत्पन्न गटांतील ( इन्कम्-ग्रुप ) नीग्रोंचें प्रमाण बरेंच बदललें असल्याचें आढळून आलें. ज्यांचें उत्पन्न वार्षिक एक हजार डॉलरहूनहि कमी होतें, अशामध्यें ८३ टक्के गोरे व १५ टक्के नीग्रो होते. ( २ टक्के लोकांचे उत्पन्न नक्की मिळूं शकलें नाहीं. ) यानंतर १००० तें २००० डॉलर उत्पन्नाच्या गटामध्यें ८९ टक्के गोरे व १० टक्के नीग्रो होते. २००० तें ३००० डॉलर उत्पन्नाच्या गटामध्यें ९२ टक्के गोरे व ७ टक्के नीग्रो होते. आणि त्याहिपेक्षां वरच्या अशा ३००० किंवा अधिक उत्पन्नाच्या गटांत ९७ टक्के गोरे व ३ टक्के नीग्रो होते. या आंकडेवारीची छाननी करतांना देशांतील नीग्रोंची संख्या अवघी दहा टक्के आहे, ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. वरच्या उत्पन्नदारांच्या गटांत नीग्रोंची संख्या कमी, तर खालच्या गटांत

जास्त असल्याचें या आंकडेवारीवरून लक्षांत येतें, पण त्याचबरोबर खालच्या गटांतील उत्पन्नदारांत नीग्रोंचें प्रमाण वाजवीपेक्षां जास्त नसल्याचेंहि या आंकडेवारीवरून दिसून येतें. कुणबी पेशा सोडून औद्योगिक कारखान्यांत प्रवेश, दक्षिणी राज्यांतून देशाच्या इतर भागांत स्थलांतर व त्याचबरोबर गोऱ्या लोकांच्या वृत्तींत बदल यामुळें नीग्रोंच्या परिस्थितींत सुधारणा होऊं लागली होती.

याचबरोबर इतर दृष्टींनींहि त्यांची सुधारणा होऊं लागली होती. गेल्या पन्नास वर्षांत नीग्रोंतील निरक्षरतेचें प्रमाण ४४·५ टक्क्यांवर आलें होतें व नीग्रोंची सरासरी वयोमर्यादा २६ टक्क्यांनीं वाढली होती. लिंचिंग किंवा लोकांनीं कायदा हातांत घेऊन ठार करण्याची प्रथा जवळ जवळ बंद झाली होती. साऱ्या राष्ट्रांत १९४५ मध्यें फक्त एक, १९४६ मध्यें सहा, १९४७ मध्यें एक, १९४८ मध्यें दोन (पैकीं एक गोरा), असे लिंचिंगचे प्रकार झाल्याची नोंद आहे. थोडक्यांत हा रोग आतां देशांत दुर्मिळ झाला आहे.

सन १९५० च्या सुमारास अमेरिकन कॉलेजांत व विद्यापीठांत ९४,००० नीग्रो विद्यार्थी होते. अमेरिकेंतील एक नीग्रो स्त्री फ्रान्समध्यें प्राध्यापक आहे. ती मला एकदां म्हणाली, “ आपण नीग्रो आहोंत, याची जाणीवहि न होता अनेक नीग्रो लोक माझ्या-प्रमाणेंच अमेरिकेंत सन्माननीय जीवन कंठत आहेत, हें फ्रान्समध्यें मला वारंवार विशद करावें लागतें. ” दक्षिण राज्यांतील अनेक शहरांत वाढत्या प्रमाणांत नीग्रो पोलीसांची संख्या असून, गोऱ्या गुन्हेगारांना ते पकडत असल्याचें दृश्यहि वारंवार पहावयास मिळतें. शहर नगरपालिका वगैरेंवरहि नीग्रोंना प्रतिनिधि म्हणून निवडून देण्यांत येतें. आज खुद्द अमेरिकन लोकांच्या अंदाजापेक्षांहि नीग्रो लोकांची परिस्थिति खूपच सुधारली आहे, हें साधार दिसून येतें.

यापुढें लढ्याशिवाय नीग्रो लोकांची प्रगति होणें शक्य नाहीं, असें वाटत होतें. हा प्रश्न सामोपचारानें सुटण्याचीं मुळींच चिन्हें दिसत नव्हतीं. पण एकंदरींत लोकमत नीग्रोंच्या बाजूला झुकूं लागलें होतें. प्रख्यात नीग्रो पुढारी वॉल्टर व्हाईट यानें १९५१ मध्यें म्हटल्याप्रमाणें आपल्या लोकशाही परंपरेवरील अत्यंत काळा डाग पुसून काढण्यांत अमेरिका प्रगति दाखवत आहे. “ ही प्रगति गोगलगाईच्या गतीनें होत आहे, पण तरीहि ती खास प्रगतीच आहे. ”

---

# प्रकरण १३ : जलद, आणखी जलद

दर वर्षीं बाष्पशक्ति, विद्युत्शक्ति या क्षेत्रांत जी प्रगति होत आहे, तीबद्दल व रेडिओॲक्टीव्हिटीच्या शोधाबद्दल, हेन्री ॲडम्सनें सन १९०४ मध्यें अचंबा व्यक्त केला होता. त्यानें त्यावरूनच गतिवर्धनाचा सिद्धांत ( लॉ ऑफ ॲक्सिलेरेशन ) प्रतिपादन केला. त्याचें म्हणणें असें कीं माणसाला उपलब्ध अशा शक्तींत झपाट्यानें वाढ होत आहे. सन १८८० मध्यें कोळशाच्या एका टनापासून जितकी शक्ति मिळे, तीपेक्षां १९०० मध्यें तिप्पट-चौपट शक्ति अधिक मिळूं लागली, याचा अर्थ १८०० तें १९०० च्या दरम्यान जगांतील कोळशाचें उत्पादन करण्यांत आलेल्या शक्तीच्या रूपानें दुप्पट झालें, असें ठोकळ मानानें म्हणावयास हरकत नाहीं. त्याच्या मतें भावी काळांत अमेरिकन माणसाला उपलब्ध असलेल्या व होणाऱ्या शक्तींत इतकी वाढ होईल कीं, तो जवळ जवळ प्रति परमेश्वरच बनेल.

अॅडॅम्स पुढें म्हणतो, " सन १८०० पासून झालेल्या प्रगतीचा वेग पहातां सन २००० मधील मनुष्याला अमर्याद शक्तीवर कसें नियंत्रण ठेवावें, हें अवगत होईल. त्या वेळचा माणूस पूर्वींच्या समाजाच्या आटोक्याबाहेरील प्रश्न हाताळील. त्याच्या दृष्टीनें चवथें शतक काय किंवा एकोणिसावें शतक काय दोन्हींतील लोक सारखेच अजाण !

आपण पाहिलेंच आहे कीं, महायुद्धांच्या काळांत अमेरिकन उद्योगधंद्यांची उत्पादन शक्ति अक्षरशः चौखुरावर उधळली होती. उत्पादन खर्चाची तमा न बाळगतां झपाट्यानें जास्तींत जास्त उत्पादन करण्याबद्दलची सरकारची कारखानदारांकडे मागणी होती. आणि कारखानदारांनीं ही मागणी पुरविण्याची करामत करून जगाला थक्क करून सोडलें होतें. महायुद्धामुळें शास्त्रीय शोध व तांत्रिक बदल यांनाहि जोराची चालना मिळाली.

याचें एक अभिजात उदाहरण म्हणजे मॅनहॅटन येथील अणू कारखाना. सन १९३९ मध्यें अणूचें पृथक्करण; सन १९४० मध्यें त्याबाबतींत अमेरिकन शास्त्रज्ञांचे यशस्वी प्रयोग, त्यानंतर अब्जावधि डॉलर खर्च करून अणु कारखान्याची उभारणी; आणि ज्याला कदाचित् एक पिढीहि पुरली नसती, अशा अणुबॉंबची अवघ्या पांच वर्षांत निर्मिति ! संशोधन, यंत्रविद्या व कारखानदारीची ही अजब करामत होती.

युद्धाच्या आणीबाणीच्या परिस्थितीनें शास्त्रज्ञ, कारखानदार, लष्करी अधिकारी व राज्यकर्ते यांना प्रथम एकत्र आणून विचारविनिमय करावयास लाविलें. आतांपर्यंत

पदार्थविज्ञान शास्त्रज्ञ किंवा रसायन शास्त्रज्ञ विद्यापीठांतील आपल्या रसायन शाळेंत प्रयोग करण्यांत व्यग्र झालेले असत. आपल्या शोधांचा प्रत्यक्ष काय परिणाम होईल, याची ते पर्वा करत नसत व त्याबद्दल त्यांना अभिमानहि वाटे. पण याच शास्त्रज्ञांवर अत्यंत प्राणघातक अशा शस्त्रांची तांतडीनें निर्मिति करण्याची कामगिरी सोंपविण्यांत आली व त्यांना सेनापती, नौ–सेनापती, सरकारी अधिकारी, इंजिनियर व कारखानदार यांच्याशी विचारविनिमय करण्यासाठीं वॉशिंग्टनला धांवपळ करण्याची पाळी आली. त्या लोकांनाहि आतां शास्त्रज्ञांची संशोधन वृत्ति आपल्या दृष्टीनें अत्यंत उपयुक्त आहे, हें पटलें असल्यामुळें त्यांच्याविषयीं आतां आदर वाटूं लागला होता. कांहींना यामुळें शुद्ध शास्त्रीय संशोधनाचा दर्जा कमी होऊन विज्ञानाची प्रगति मंदावण्याची धास्ती वाटते. तें कांहींहि असो, युद्धकाळांत या निरनिराळया लोकांत सर्वांच्या दृष्टीनेंच उपयुक्त अशी विचारांची देवाण घेवाण होऊं लागली हें निश्चित.

सारांश युद्धकाळांत अमेरिकन तंत्रशास्त्रानें खूपच प्रगति केली आहे.

## २

युद्धकालीन भरभराटीमुळें अगदीं वेगळया क्षेत्रांतहि झपाट्यानें यांत्रिक बदल होऊं लागले होते. खिशांत पसा खुळखुळत होता, त्यामुळें असंख्य सामान्य अमेरिकन नागरिकहि विविध प्रकारचीं यंत्रें खरेदी करून वापरूं लागले होते. विजयदिनानंतर तर यंत्रें खरेदी करण्याकरितां मोठी धमाल उडाली.

विशेषतः प्रत्येकाला नवीन मोटारगाडी पाहिजे होती. युद्धकाळांत नव्या मोटारगाड्या मिळत नव्हत्या. मोटारगाड्यांच्या मागण्या इतक्या होत्या कीं मागणीप्रमाणें पुरवठा करण्याकरितां कांहीं वर्षे जावीं लागलीं. सन १९५० या एकाच वर्षी ऐंशी लाख मोटारी विकल्या गेल्या. पहिल्या महायुद्धाच्या शेवटीं अमेरिकेंत होत्या, त्यापेक्षां ही संख्या अधिक होती.

पण एवढ्यानेंच थांबलें नाहीं. या युद्धोत्तर काळांत शेतकऱ्यांनीं नवे ट्रॅक्टर, धान्य गोळा करण्याचीं यंत्रें ( कॉर्नपिकर ), दूध काढण्याचीं विद्युत् यंत्रें खरेदी केलीं. इतकेंच नव्हें तर यापुढें जाऊन त्यांनीं भागीदारींत शेतीकरितां लागणारीं अनेक यंत्रें जमविलीं. आर्थिक मंदीच्या काळांत न परवडणाऱ्या अनेक गोष्टी शेतकऱ्यांच्या घरांत आल्या. पांढरे चकचकीत रेफ्रिजरेटर दिसूं लागले. अद्यावत् धुलाईचीं यंत्रें आलीं. उपनगरांतील कुटुंबांच्या घरीं थाळया धुण्याचीं यंत्रें बसविण्यांत आलीं; विजेवर चालणारीं

गवत खुरपण्याचीं यंत्रें ( लॉनमॉवर ) वापरण्यांत येऊं लागलीं. शहरांतील अनेक कुटुंबांनीं आपल्या घरांत टेलिव्हिजन बसविलें. यापैकीं पुष्कळ यंत्रें बराच काल प्रचारांत असलीं तरी कांहीं अगदीं नव्यानेंच तयार करण्यांत आलीं होतीं. भरभराटी-मुळें त्यांचा सर्रास उपयोग केला जाऊं लागला होता. याच वेळीं अमेरिकन शेती पद्धतीचें विद्युतीकरण करण्याच्या दृष्टीनेंहि मोठी प्रगति झाली होती. सन १९३५ मध्यें फक्त दहा टक्के शेतीचें विद्युतीकरण झालें होतें. सन १९५० मध्यें विद्युतीकरण झालेल्या शेतीचें प्रमाण ८५ टक्क्यांवर गेलें.

दुसरी गोष्ट म्हणजे यंत्राचा फायदा घेण्याच्या दृष्टीनें शेती पद्धतीचीहि पुनर्घटना करण्यांत येऊं लागली होती. यंत्र म्हणजे घोडा किंवा मानवी श्रमाऐवजीं अविश्रांत व चोख काम देणारा बदलीच नसून, नव्या पद्धतीनें काम करण्याचें साधन असें शेतकरी मानूं लागले होते.

सन १९४० च्या सुमारास शेतमजूरांची संख्या पंचाण्णव लाखांवरून ८० लाखांवर आली होती. तरीहि शेतीमालाचें उत्पादन २५ टक्के वाढलें. या वाढीचीं दोन कारणें होतीं. एक म्हणजे देशांतील भरभराट आणि परदेशांतील धान्य टंचाईमुळें अमेरिकन धान्याला मिळालेली परदेशी बाजारपेठ. आणि दुसरें कारण म्हणजे इतर अमेरिकनांप्रमाणें शेतकरीहि शेतीकरितां यंत्रांचा अधिकाधिक वापर करूं लागले होते.

## २

जसजशी वेतनांत वाढ होऊं लागली तसतशी श्रमशक्तींत बचत करणारी उत्पादन पद्धतिहि शोधून काढण्याची धडपड सुरू झाली. यापैकीं कांहीं शोध अगदीं साधे व व्यावहारिक होते, तर कांहीं शास्त्रीय असून त्यांत जास्तींत जास्त गुंतागुंतीची अशी यांत्रिक जुळवाजुळव होती.

साध्या व्यावहारिक शोधांची एक लांबलचक यादीच होईल. यांत मालउचलू यंत्रें ( क्रेन्स ), विविध प्रकारचीं यानें ( कॉन्व्हेयर्स ), शक्तीवर चालणारी पक्कड यंत्रें ( पॉवर ग्रॅब्ज), निरनिराळीं हत्यारें, साफसफाईचीं यंत्रें वगैरेंचा समावेश होतो. दिसायला साधें पण उपयोगाच्या दृष्टीनें वैशिष्ट्यपूर्ण साधन म्हणजे फोर्कट्रक व दुसरें पॅलेट फोर्क. ट्रक म्हणजे एक दणगट लहान मोटार असून तिला चिमटा बसविलेला असतो व पॅलेट म्हणजे वहातुकीकरितां माल रचून ठेविण्याची बिछायत. ही मालमोटार माल

. उचलून ठिकठिकाणीं नेऊन काळजीपूर्वक ठेवतें व पुनः माल नेण्यास येते. दिसायला हें सर्व काम साधें दिसतें. पण मोटारींतून माल उतरून घेऊन तें लावून ठेविण्याचें जिकीरीचें काम पाहिल्यावर वरील दोन साधनांची कल्पना येते.

फोर्कट्रकचें मूलभूत तत्त्व कोणालाहि कळणें अवघड नाहीं. पण १९३५ तें १९५० च्या काळांत जीं अनेक अत्यंत नाजूक अशीं विद्युत्‌यंत्रें उपयोगांत आलीं, तीं मात्र सर्वसाधारण माणसांना थक्क करणारीं आहेत. या यंत्रासंबंधीची परिभाषा, यंत्राच्या कार्यपद्धतीइतकीच सामान्य लोकांना अनाकलनीय असली तरी तीं म्हणजे आश्चर्यें होत, याची कल्पना येणें कठीण नाहीं. हीं यंत्रें काय करूं शकत नाहींत ? तीं माल मोजूं व तपासूं शकतात, एकाद्या पोलादी पत्र्याची जाडी किंवा धातूंत असलेला दोष अगदीं कल्पनातीत बिनचुकपणें दाखवूं शकतात. मोठ्या यंत्राच्या कामावर अतिसूक्ष्म-किंवा अतिमानवी दृष्टीनें नजर ठेवून त्यांचें योग्य नियंत्रण करूं शकतात. आज अमेरिकेंतील अनेक कारखान्यांतून अशा यंत्रांचा प्रभाव व माणसांचा अभाव दिसतो.

श्रमशक्तींत बचत करणारीं हीं विविध यंत्रें उपयोगांत आणण्याचा परिणाम काय ? पहिला परिणाम म्हणजे बिनकसबी कामगारांची संख्या खूप रोडावली आहे. अमेरिकेंत सन १९०० मध्यें शेतमजूर धरून साधारणपणें एक कोटि दहा लाख बिनकसबी कामगार होते. सन १९५० पर्यंत हीच संख्या साठ लाखांखालीं आली. याउलट इंजिनियर व कसबी कामगार यांना मागणी वाढत गेली. विसाव्या शतकाच्या आरंभी रसायनिक इंजिनियरींगचा एक व्यवसाय म्हणून विकास झाला नव्हता. पण सन १९५१ मध्यें या बाबतींत काय स्थिति होती ? हॉर्वर्ड विद्यापिठाचा अध्यक्ष कोनान्ट म्हणतो, "गेल्या पांच वर्षांत १५,००० रसायनिक इंजिनियर शिक्षण घेऊन बाहेर पडले आहेत. तरी आजहि देशांत रसायनिक इंजिनियरांचा मोठा तुटवडा आहे." इंजिनियरांबद्दल सामान्यतः बोलावयाचें म्हणजे सन १९०० मध्यें अशा इंजिनियरांची संख्या चाळीस हजार होती, ती १९५० मध्यें चार लाखांवर गेलीं. तरीहि इंजिनियरांचा तुटवडा होताच.

"औद्योगिक संस्कृति पुढारली कीं लोक शेती सोडून कारखान्यांकडे धांव घेतात. आणि त्यानंतर कारखान्यांतून व्यापार, वहातूक करमणूक वगैरे व्यवसायांकडे वळतात," असें कॉलीन क्लार्क या अर्थशास्त्रज्ञानें निर्देशनास आणलें आहे. अमेरिकेंत अशी प्रवृत्ति खात्रीनें दिसून येते. सन १९०० पासून शेतींत गुंतलेल्या अमेरिकनांच्या संख्येंत

९८३९२
दि. ३।१।
६३४
२२।८।५५

मोठी घट झाली आहे. या काळांत कारखान्यांतील नोकरांच्या प्रमाणांत एकंदरींत फारसा बदल झालेला नाहीं, पण व्यवसायांत गुंतलेल्या लोकांत खूप वाढ झाली आहे. या अर्ध शतकांत हातांनीं काम करणाऱ्यांची संख्या कमी; तर टेबलावर काम करणाऱ्यांची संख्या अधिक; अंग मेहनत करणारे थोडे, तर बौद्धिक काम करणारे जास्त; जुजबी शिक्षणाची जरूरी असलेल्या नोकऱ्या कमी व पुढारलेल्या शिक्षणाची आवश्यकता असलेल्या नोकऱ्या जास्त; अशी परिस्थिति झाली आहे.

अर्थात् आजहि अमेरिकेंत कोंदट व भयाण दिसणाऱ्या अशा अनेक गिरण्या आहेत. आजहि तेथें अशा कांहीं नोकऱ्या आहेत कीं ज्या करतांना रक्ताचें पाणी होतें. अत्यंत स्वयंचलित (ऑटोमॅटीक) कारखान्यांतहि भंगी, झाडूवाले वगैरे कामगार नोकरीला ठेवावे लागतात. या लोकांच्या कामाचें फारसें यांत्रिकीकरण झालेलें नाहीं. यांत्रिक युगांतील सर्वसाधारण कामगार वर्ग (प्रोलेटरीएट) म्हणजे हेच भंगी, झाडूवाले वगैरे होत. पण एकंदरींत कांहीं असलें तरी कामगारांचा दर्जा वाढविण्याच्या दिशेनें पावलें पडत आहेत, हेंहि तितकेंच खरें.

४

आगे कूच करणाऱ्या फौजेपुढें हालचाली करणाऱ्या टेहेळ्यांप्रमाणें या काळांत विज्ञानशास्त्रज्ञ व इंजिनियरांचें कार्य चालूंच होतें. या पुस्तकाच्या आरंभींच्या एका प्रकरणांत एका कल्पनेचा उल्लेख आला आहे. या कल्पनेवर रसायनशास्त्रज्ञांचे एका पिढीहून अधिक काल प्रयोग चालू होते. ही कल्पना म्हणजे निसर्गाची केवळ नक्कल करण्यापेक्षां कृत्रिम (सिन्थेटिक) वस्तू अधिक चांगलें काम देऊं शकतात, इतकेंच नव्हे तर या वस्तू म्हणजे निसर्गांत सुधारणाच होय. अखेर दुसऱ्या महायुद्धापूर्वी किंवा अगदीं नक्की तारीख द्यावयाची म्हणजे ता. २५ ऑक्टोबर १९३९ रोजीं शास्त्रज्ञांनीं या कल्पनेचें भव्य प्रात्यक्षिक दाखविलें. या वेळीं बाजारांत प्रथमच निलॉनचे (उंची कृत्रिम रेशिम) पायमोजे बाजारांत विक्रीस आले. यापूर्वी सन १९३० पासूनच्या काळांत औद्योगिक तंत्रज्ञांनीं डिझेल इंजिनें बनविण्यांत यश मिळविलें होतें. हीं इंजिनें रेल्वेंत व कारखान्यांत अत्यंत उपयुक्त ठरलीं आहेत. तसेंच विमानांकरितां वापरण्यांत येऊं लागलेले गॅसोलिनहि तयार करण्यांत येऊं लागलें. कृत्रिम रबर तयार होऊं लागलें. युद्धकाळांतील साध्या रबराची टंचाई दूर करण्याकरितां कृत्रिम रबर उपयोगी पडतों असें नसून अलंकारिक भाषेंत बोलावयाचें म्हणजे

अमेरिकेसारख्या चाकांवरील राष्ट्राला तों नेहमींच उपयुक्त ठरतों, असें आढळून आलें आहे. वैद्यकीयदृष्ट्याहि या काळांत ऐतिहासिक महत्त्वाची अशी प्रगति झाली.

अणुशक्ति म्हणजे तर शास्त्रज्ञांची सर्वांत विराट कामगिरी. अणुशक्तीची भयंकर बाजु आपण यापूर्वींच पाहिली आहे. तिची चांगली बाजु अद्याप दिसून यावयाची आहे. पण ॲडॅम्सच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे ही शक्ति यथाकाळ माणसाच्या हातांत अमर्याद सत्ता देईल, असें म्हणावयास हरकत नाहीं.

आणि दुसऱ्या क्षेत्रांतहि संशोधनामुळें अमेरिकन उद्योगधंद्यांचें स्वरूप कसें पालटत आहे, याची प्रचीति येते. कॉर्निंग कांच कारखान्याचेंच उदाहरण घ्या. या कंपनीनें १९५० मध्यें जो माल विकला, त्यापैकीं पन्नास टक्के मालाचें नांवहि दहा वर्षांपूर्वी ऐकूं येत नव्हतें.

१९४० च्या सुमाराचा काळ म्हणजे रसायनशास्त्रज्ञ व रसायनिक इंजिनियर यांच्या कमाल उत्कर्षाचा काळ होता. कॅरोल विल्सन म्हणतो, "क्रूडाईलच्या एका पिंपांत इंधनापेक्षां कितीतरी अधिक मूल्यवान गोष्टी आहेत, हें तेल धंद्यानें निदर्शनास आणलें आहे. सन १९४२ पासून, तर तेलधंद्यानें अनेक रसायनिक कारखाने काढून एच. जी. वेल्सच्या अनेक अद्‌भुतरम्य कल्पनांची बरोबरी केली. "फॉर्च्युन" या नियतकालिकांचे संपादक सन १९५१ मधील आपल्या "यु. एस. ए. दि पर्मनंट रेव्होल्युशन," या ग्रंथांत लिहतात. "या कारखान्यांत एका टोंकाला कच्च्या मालाचा- द्रव पदार्थांचा किंवा गॅसचा–सतत प्रवाह वहात असतो, मध्यंतरी त्यावर अनेक प्रक्रिया होतात आणि दुसऱ्या टोंकाला विविध जिनसांचा लोंढा बाहेर येत रहातो." आणि खतांपासून साबणांपर्यंत, सौंदर्य प्रसाधनांपासून तो शीतसाधकांपर्यंत (रेफ्रिजरेंट) आणि कृत्रिम रबरांपासून तो छपाईच्या शाईपर्यंत या जिनसा तरी किती विविध!

पण रसायन शास्त्रज्ञांपेक्षां पदार्थविज्ञान शास्त्रज्ञांकडूनच किंवा पदार्थविज्ञान शास्त्रज्ञ, रसायन शास्त्रज्ञ, प्राणिशास्त्रज्ञ व गणोतज्ञ यांच्या एकसूत्री प्रयत्नांमुळेंच भावी काळांतील अत्यंत थरारून सोडणारे शोध लागतील, असें म्हणावयास हरकत नाहीं. सन १९४८ मध्यें रसायन शास्त्रानें सुखाचें साधन व वैद्यकीय सिद्धांताला धक्का देणारे कोर्टिझोन तयार केलें. आणि त्याच वर्षी पदार्थ विज्ञानशास्त्रज्ञांनीं निर्वात नळीवरहि (व्हॅक्युम टयुब) ताण करूं शकेल असें ट्रॅन्सिस्टर या नांवाचें एक छोटेसें उपकरण तयार केलें. तसेंच सन १९५० संपण्यापूर्वीच अनेक शास्त्रज्ञांनीं मिळून शेतीच्या दृष्टीनें अत्यंत

अमर्याद उपयुक्ततेचें क्रिलियम तयार केलें. आणि पुष्कळ लोकांची अशी श्रद्धा आहे कीं सर्व क्षेत्रांतील शास्त्रज्ञांच्या संयुक्त प्रयत्नामुळें आपल्याला वनस्पतीप्रमाणेंच प्रकाशापासून अन्न मिळण्याचा चमत्कारहि (फोटो सिन्थेसिस) साध्य झाल्याचें दिसून येईल.

एकंदरींत "सन २००० मधील प्रत्येक अमेरिकनाला अमर्याद शक्तीचें नियंत्रण कसें करावें, हें अवगत असेल," हें हेन्री ॲडॅम्सचें भविष्य चुकीचें ठरणार नाहीं, असें आतांपर्यंतच्या प्रगतीवरून दिसतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्र. क्र. ८६९३

# प्रकरण १४ : संख्या वाढली : आयुष्य वाढलें

सन १९३२ मध्यें कांहीं समाजशास्त्रज्ञांनीं अमेरिकन जीवनाची विस्तृत पहाणी करून " रिसेंट सोशल चेन्जीस " या नांवाचा एक प्रचंड अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालांत देशांतील लोकसंख्येंत किती वाढ होण्याची शक्यता आहे, याचा अंदाज करण्यांत आला आहे. हा अंदाज सावधगिरीनेंच करण्यांत आला आहे. जननसंख्येचें प्रमाण जरा मंदावलें आहे असें नमूद करून त्यांनीं सन १९४० मध्यें अमेरिकेची लोकसंख्या १३,२०,००,००० तें १३,३०,००,००० पर्यंत जाईल असा अंदाज केला होता. त्यांचा अंदाज चुकीचा नव्हता. सन १९४० मध्यें अमेरिकेची लोकसंख्या १३,१६,६९,२७५ असल्याचें आढळून आलें. पण सन १९५० मधील लोकसंख्येबाबतचा त्यांचा अंदाज मात्र साफ चुकला. त्यांचा अंदाज चौदा कोटि पन्नास लाखांपर्यंत होता, पण प्रत्यक्ष लोकसंख्या मात्र १५,०६,९७,३६१ झाली.

लोकसंख्या वाढण्याचें कारण म्हणजे सन १९४० मध्यें जननसंख्येंत मोठी वाढ झाली. कांहीं लोक म्हणतात त्याप्रमाणें या वाढीला केवळ युद्ध व भरभराटच कारणीभूत नव्हती. कारण पहिल्या महायुद्धांत अशी कांहीं वाढ झाली नव्हती, उलट पहिल्या महायुद्धांत आलेल्या भरभराटींत लोकसंख्या थोडीशी घटलीच होती.

सन १९३० तें १९४० या दशकांत जननसंख्येचें प्रमाण दर हजारीं १७ किंवा १८ च्या आसपास होतें. १९४२ मध्यें २०·९ व १९४३ मध्यें तें २१·५ वर गेलें. यानंतर त्यांत किरकोळ घट होत जाऊन तें १९४४ मध्यें २०·२ व १९४५ मध्यें १९·६ वर आलें. (कारण या वेळीं कित्येक संभाव्य पिते परदेशांत लढाईवर होते.) त्यानंतर सन १९४६ मध्यें हें प्रमाण अचानक २३·३ वर व सन १९४७ मध्यें २५·८ वर गेलें. त्यानंतर त्यांत पुनः किंचित् घट झाली. जननसंख्येचें प्रमाण सन १९४८ मध्यें २४·२, १९४९ मध्यें २४·१ व १९५० मध्यें २३·५ होतें.

ही वाढती जननसंख्या अमेरिकेंतील कुटुंबसंस्थेवरील नव्या विश्वासाची द्योतक आहे काय ? पुष्कळांना ही कल्पना पटणार नाहीं. कारण मोठ्या आर्थिक मंदीच्या काळांत जें विवाहप्रमाण मागें पडलें होतें, त्याच प्रमाणांत युद्धकाळांत व युद्धोत्तर काळांत जशी झपाट्यानें वाढ होत गेली, (सन १९४६ मध्यें विवाहसंख्येनें उच्चांक गांठला

होता. ) तशीच घटस्फोटांच्या प्रमाणांतहि वाढ होत गेली. या काळांत घटस्फोटांची संख्या मोठी होती, याचें एक कारण म्हणजे असंख्य जोडप्यांना युद्धकाळांत घाईघाईनें विवाह केल्याबद्दल नंतर पश्चात्ताप होऊन त्यांनीं घटस्फोट घेतले, हें होय. दुसऱ्या महायुद्धाच्या-पूर्वीं घटस्फोटांचें प्रमाण दर हजारीं पुढीलप्रमाणें होतें. सन १९००–०·७, सन १९१०–०·९, १९२०–१·६, १९३०–१·६. याच प्रमाणांत युद्धकाळांत व नंतरहि झपाट्यानें वाढ झाली. सन १९४० मध्यें २, १९४६ मध्यें ४·३ व सन १९४९ मध्यें २·६ असें हें प्रमाण होतें. विवाहांच्या व घटस्फोटांच्या या आंकड्यांवरून एकच तर्क संभवतो व तो म्हणजे विवाह शाश्वत आहेत, यावरील श्रद्धा कमी झाली असेल, पण विवाह संस्था आवश्यक आहे, याबद्दल मुळींच शंका वाटत नव्हती. एकंदरींत या आंकडेवारीवरून सन १९४० च्या नंतर अमेरिकन तरुणांना पूर्वींच्या दशकाप्रमाणें विवाह व कुटुंब संस्थेविषयीं अनादर वाटत नाहीं, असें दिसून येतें.

## २

सन १९४० नंतर लोकसंख्या झपाट्यानें वाढण्याचें दुसरें कारण म्हणजे मृत्यूसंख्येंत घट झाली. अमेरिकन राष्ट्र यापूर्वीं कधींच इतकें निरोगी नव्हतें.

या बाबतींत सन १९०० नंतर होत गेलेली प्रगति खरोखरीच अचाट आहे. सन १९०० मधील लोकांच्या छातींत धडकी भरविणारें मृत्युप्रमाण खूपच खालीं आणण्यांत आलें आहे. इन्फ्युएन्झा व न्यूमोनिया यांना पूर्वीं दर लाख लोकांमागे १८१·५ लोक बळी पडत, हें प्रमाण सन १९४८ मध्यें ३८·७ वर आलें. क्षयाचें प्रमाण २०१·९ वरून ३० वर आलें. विषमज्वराचें प्रमाण ३६ वरून ०·२ वर आलें घटसर्पाचें प्रमाण ४३·३ वरून ०·४ वर आलें. या काळांत हृदयविकार व व्रण ( कॅन्सर ) या रोगांचें मृत्यूप्रमाण वाढलें. पण एकंदरीं सन १९०० व १९५० या काळांत आयुर्मान डोळ्यांत भरण्याजोगें वाढलें. आयुमर्यादा ४९ वर्षांवरून ६८ वर्षांवर गेली.

हा चमत्कार कशामुळें घडून आला ? वैद्यकीय ज्ञान, वैद्यकीय शिक्षण, औषधोपचार, आरोग्याची व्यवस्था व उपाय, तसेंच सर्वसाधारण लोकांना आरोग्यविषयक तत्त्वांची माहिती वगैरे अनेक कारणें या प्रगतीला कारणीभूत आहेत. वैद्यकीय क्षेत्रांतील लोकांना निरनिराळ्या विकारांवरील खूप नव्या नव्या उपायांचें ज्ञान उपलब्ध झालें आहे. पण त्याशिवाय त्यांना सल्फानायलामाईड ( सन १९३५ ), पेनिसिलिन ( सन १९२९ सालीं शोधलेलें व सन १९४० मध्यें प्रथम उपयोगांत आणलेलें ), ऑरो-

मिसीन (अगदीं अलीकडचें), कार्टीझोन (सन १९४८ नंतर उपयोगांत येऊं लागलेलें), यासारखीं अत्यंत परिणामकारक व क्रांतिकारक औषधें उपयोगांत आणतां येऊं लागली आहेत. हिंवताप नाहींसा करण्यासाठीं जे डांसप्रतिबंधक उपाय योजण्यांत आले, ते इतके परिणामकारक ठरले आहेत कीं सन १९५० मध्यें मिसिसिपी राज्यानें, जो डॉक्टर आपल्या राज्यांत हिंवतापाचा नवीन रोगी दाखवील त्याला दहा डॉलर बक्षिस देण्याचें जाहीर केलें. आणि एकहि डॉक्टर हें बक्षिस मिळवूं शकला नाहीं !

अमेरिकन सैन्याला अलीकडे वैद्यकीय मदत कशी परिणामकारक मिळूं लागली होती, हेंहि सहज सिद्ध करतां येईल. स्पॅनिश–अमेरिकन युद्धांत विषमज्वरानें पछाडलेले रोगी घेऊन बाल्टीमोर स्टेशनावर एक सबंध गाडीच्या गाडी आली होती. ते रोगी, ती घाण व ती दुर्गंधि पाहून डॉ. हार्वे कुशींग यांना धक्काच बसला होता. पण त्यानंतर किती फरक पडला याविषयींची उद्बोधक आंकडेवारी नुकतीच " हार्वर्ड स्कूल ऑफ पब्लिक हेल्थ " चे प्रमुख ब्रिगेडियर जनरल सिमान्स यांनीं प्रसिद्ध केली आहे. स्पॅनिश अमेरिकन युद्धांत सैन्यांतील आजारानें मृत्यु पावलेल्यांचें प्रमाण दरसाल दर हजारीं सुमारें २५ होतें. पहिल्या महायुद्धांत हेंच प्रमाण सुमारें सोळावर आलें. दुसऱ्या महायुद्धांत हेंच प्रमाण दरसाल दर हजारीं अवघें ०·६ टक्के होतें."

संसर्गजन्य रोगांविरुद्धच्या परिणामकारक प्रतिकारामुळें सन १९५० नंतर वृद्ध लोकांच्या संख्येंत खूपच वाढ झाल्याचें दिसून आलें. मध्यंतरी जननसंख्येचें प्रमाण एकदम वाढलें व त्याचा परिणाम होऊन अगोदरच गर्दी झालेल्या प्राथमिक शाळांवर जादा ताण पडूं लागला. थोडक्यांत सन १९५० नंतर अमेरिकन श्रमजीवि लोकांपुढें आपल्यापेक्षां वयानें जास्त व वयानें कमी अशा अधिक लोकांना पोसण्याचा प्रश्न उभा राहिला आहे.

## ३

अमेरिकन लोक पूर्वींपेक्षां अधिक निरोगी आहेत, असें नाहीं तर त्यांचें हाडपेरहि पूर्वींपेक्षां वाढल्याचें दिसून आलें आहे. गेल्या दोन महायुद्धांतील वैद्यकीय नोंदीवरून हें ताबडतोब सिद्ध करतां येण्यासारखें नाहीं. कारण दोन्ही महायुद्धांत सैन्यांतील खास नोकऱ्यांकरितां भरती केलेल्या लोकांची सर्वसाधारण उंची अगदीं सारखीच म्हणजे ५ फूट ७॥ इंच होती. पण वजन सन १९१७-१८ मध्यें १४२ पौंड तर १९४१-४२ मध्यें १५० पौंड किंवा सरासरी ८ पौंड अधिक होतें. लष्करी

नोकरीकरितां मिळू शकतील अशा सर्वसाधारण माणसांची जी नोंद करण्यांत आली, तींत मात्र सर्वसाधारण उंची ५ फूट ८॥ इंच व वजन १५२ पौंड असल्याचें आढळून आलें. विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या उंचींत व वजनांतहि अशीच ठळक वाढ झाली.

मध्यंतरीं १९२० नंतर परदेशांतून येणाऱ्या स्थलांतरितांवर कडक नियंत्रणें घातल्यामुळें परदेशांत जन्मलेल्या पण अमेरिकेंत स्थायिक झालेल्या लोकांची संख्या रोडावत गेली. पूर्वीच्या स्थलांतरितांचे वंशज आज पक्के अमेरिकन बनले आहेत. त्यांनीं अमेरिकन रीतिरिवाज पूर्णपणें उचलले आहेत. आजच्या बऱ्याच अमेरिकनांचीं नांवें परदेशी वाटत असतील, पण ते प्रारंभींच्या अमेरिकनांइतकेंच अमेरिकन बनले आहेत.

# भाग ३ रा

# नव–अमेरिका

## प्रकरण १५ : रहाणीचें मान

आतां आपण विसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत प्रवेश करत आहोंत. या वेळीं आपल्या भोंवतालच्या परिस्थितीचें सिंहावलोकन करण्यापूर्वी प्रथम सधन व गरीब यांच्यामध्यें एके काळीं दिसून येत असलेल्या मोठ्या तफावतीचें काय झालें तें पाहूं.

पैशाच्या किंवा प्राप्तीच्या दृष्टीनें पाहिल्यास झालेला बदल मोठा नाहीं. आजहि अमेरिकेंतील बऱ्याच भागांत खूप दारिद्र्य दिसून येतें. असंख्य कुटुंबांना व लाखो माणसांना आजार, वृद्धापकाळ, प्रतिकूल परिस्थिति किंवा तुटपुंजी प्राप्ति यामुळें भिकार जीवन कंठावें लागतें. तरीहि गेल्या अर्धशतकांतील, विशेषतः १९४० नंतरच्या घडामोडी अतिशय डोळ्यांत भरण्याजोग्या आहेत. " नॅशनल ब्यूरो ऑफ इकॉनॉमिक रिसर्च " या संस्थेच्या डायरेक्टरांनीं या घटना म्हणजे " इतिहासांतील एक मोठी सामाजिक क्रांति " असें वर्णन केलें आहे.

अमेरिकन लोकांच्या सध्यांच्या उत्पन्नाचे आंकडे देतांना हे आंकडे म्हणजे केवळ अंदाज होत, असा वाचकांना प्रथमच इशारा दिला पाहिजे. तरीहि एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं जे आंकडे उपलब्ध झाले असते, त्यापेक्षां सध्यांची आंकडेवारी अधिक खात्रीशीर आहे यांत शंकाच नाहीं.

मी येथें जी आंकडेवारी देणार आहे, ती अमेरिकन कॉंग्रेसच्या संयुक्त समितीनें तयार केलेल्या आर्थिक अहवालावर आधारलेली आहे. या अहवालांत सन १९४८ मधील उत्पन्नाच्या विभागणीचा विचार करण्यांत आलेला आहे. त्यानंतर जानेवारी १९५१ मध्यें अमेरिकन अध्यक्षाला "आर्थिक सल्लागार मंडळा"नें जो अहवाल सादर केला, त्यांतील आंकडेवारीशीहि सदर १९४८ मधील आंकडेवारी जुळती असून ती बरीच खात्रीलायक वाटते.

( १ ) या आंकडेवारीप्रमाणें अलीकडच्या काळांत एकंदर अमेरिकन कुटुंबांपैकीं शेकडां १०·६ कुटुंबांचें वार्षिक उत्पन्न १,००० डॉलरहून कमी आहे. याचा अर्थ

असा कीं दहा कुटुंबापैकीं एक कुटुंब अगदीं अपुऱ्या उत्पन्नांत कशीतरी गुजराण करीत आहे.

( २ ) १४·५ टक्के किंवा प्रत्येक सात कुटुंबांतील एक कुटुंब वार्षिक १,००० तें २,००० डॉलर उत्पन्नावर निर्वाह करत आहे.

( ३ ) २०·६ टक्के किंवा प्रत्येक पांच कुटुंबांतील एका कुटुंबाचें वार्षिक उत्पन्न २,००० तें ३,००० डॉलरच्या दरम्यान आहे.

( ४ ) यापेक्षां बऱ्याच अधिक म्हणजे ३३·६ टक्के किंवा प्रत्येक तीन कुटुंबामागें एका कुटुंबाला वार्षिक ३,००० तें ५,००० उत्पन्न मिळतें.

( ५ ) फक्त १७·९ टक्के किंवा प्रत्येक सात कुटुंबांतील एका कुटुंबाचें वार्षिक उत्पन्न ५,००० तें १०,००० डॉलरचें दरम्यान आहे.

( ६ ) आणि एक अगदीं छोटा गट किंवा सुमारें २·९ टक्के किंवा चौतीस कुटुंबांपैकीं एक कुटुंब दहा हजार डॉलरपेक्षां अधिक उत्पन्नाच्या सदरांत येते.

अमेरिकेंत एकेकटेच रहाणारे असे कितीतरी लोक आहेत. सन १९४८ मध्यें अशा लोकांची संख्या सुमारें ऐंशी लाख होती! त्यांच्या उत्पन्नाचें प्रमाणहि सामान्यतः वरीलप्रमाणेंच आहे. फक्त खालच्या उत्पन्नदारांच्या लोकांत त्यांचा जास्त भरणा आहे एवढेंच.

प्रथम १,००० डॉलरहून कमी उत्पन्न असणाऱ्या पहिल्या गटाचा विचार करूं. या गटांत कोण लोक येतात? ( १ ) ज्यांना धान्य किंवा माल तोट्यांत विकावा लागला असे कांहीं शेतकरी, दुकानदार व त्याचप्रमाणें बरेचसे गरीब खेडूत. ( २ ) ज्यांची बचत किंवा कमाई अल्प पण ज्यांच्यावर बरींच माणसें अवलंबून असतात, असे वृद्ध लोक. ( ३ ) नवऱ्यांनीं टाकलेल्या बाया. ( ४ ) शारीरिक किंवा मानसिकदृष्ट्या काम करण्यास असमर्थ बनलेले लोक. ( ५ ) असाध्य रोगांनीं पछाडलेले रोगी, निराधार लोक व कामधंदा क्वचित् मिळणारीं माणसें. अर्थात गरीब खेडूत, म्हातारेकोतारे, वगैरेंत वाजवीपेक्षां जास्त प्रमाण नीग्रोंचेंच होतें, हेंहि येथें नमूद केलें पाहिजे.

दुसरा गट १,००० तें २,००० डॉलर उत्पन्न असलेल्या लोकांचा. या गटांतहि व्यापारी, शेतकरी, म्हातारेकोतारे, घटस्फोट घेतलेल्या किंवा टाकलेल्या बाया, निकामी लोक, वारंवार बेकारी सहन करावे लागलेले मजूर, तसेंच या सुबत्तेच्या काळांतहि

ज्यांना जेमतेम वेतन मिळून दारिद्र्याशीं सतत झगडावें लागतें असें इतर कांहीं लोक येतात. यांतहि नीग्रोंचेंच प्रमाण वाजवीपेक्षां जास्त आहे.

यानंतर २,००० तें १०,००० डॉलर उत्पन्न असलेले गट विचारांत घेऊं. सध्यांच्या भरभराटीची कल्पना येथेंच येते. दोन हजार डॉलरहून कमी उत्पन्न असलेलीं व दोन तें तीन हजार डॉलर उत्पन्न असलेलीं लाखो अमेरिकन कुटुंबें या वरच्या उत्पन्नदारांच्या गटांत गेलीं आहेत. हीं सुदैवी कुटुंबें निरनिराळे धंदे करून पैसे मिळवत आहेत. यांत कचेऱ्यांतील नोकरवर्ग आहे, डॉक्टर–प्राध्यापक वगैरे व्यवसायी लोक आहेत, कसबी औद्योगिक कामगार आहेत. पण या गटांत विशेष भरणा कोणाचा असेल तर तो पोलाद वगैरे कारखान्यांत काम करणाऱ्या औद्योगिक कामगारांचा. ज्या औद्योगिक कामगारांना पूर्वी वार्षिक २,५०० डॉलर वेतन मिळे, त्यांना सध्यां ४,५०० डॉलर वेतन मिळतें. अत्यंत कसबी कामगाराला तर पूर्वीच्या ३००० डॉलरऐवजीं ५,५०० डॉलर वेतन मिळूं लागलें आहे. पुढील महत्त्वाची आंकडेवारी पहा. सन १९५० मध्यें अमेरिकेंतील सर्व कारखान्यांतील कामगारांचें सरासरी साप्ताहिक वेतन ५९·३३ डॉलर होतें. गेल्या दशकांत वेतनवाढीच्या मागोमाग किंमतीहि वाढत गेल्या. तरीहि साधारणतः वेतन हें नेहमींच पुष्कळच आघाडीवर राहिलें आहे.

ही आंकडेवारी काय दर्शविते ? आमच्या औद्योगिक शहरांतील व खेड्यांतील लाखो कुटुंबें दारिद्र्यांतून वर आलीं असून मध्यम वर्गीय रहाणीचें मान उपभोगूं लागलीं आहेत. चांगले कपडे, चांगल्या मोटारी खरेदी करण्याची संधि, घरांत विजेवर चालणारे रेफ्रिजरेटर, व्यवस्थित स्वयंपाकगृहें, उत्तम वैद्यकीय मदत, विमा वगैरे अनेक गोष्टी त्यांनीं सुसाध्य करून घेतल्या आहेत.

या नवीन परिस्थितीचा फायदा मिळणाऱ्यांत शिक्षकांसारखे इतर बुद्धिजीवी वर्ग असते तर बरें झालें असतें. तरीहि ज्याला खालचा वर्ग समजण्यांत येत असे, तो वर्ग नाहींसा होण्याचाहि बाकींच्यावर ठळक परिणाम झाला आहे. कारण त्यांच्या कमाईंत वाढ झाल्यावर ते अधिक जिनसा खरेदी करूं लागले व त्यांच्या वाढत्या खरेदी-शक्तीमुळें व्यापाराला मोठी चालना मिळाली आहे. याचा परिणाम म्हणजे अमेरिका अधिकाधिक भरभराटत असून, गरिबी कमीकमी होत आहे. असो.

आतां वरच्या पांच टक्के किंवा ज्यांचें उत्पन्न ८,००० डॉलर किंवा अधिक आहे, अशा उत्पन्नदारांचा विचार करूं.

" नॅशनल इकॉनॉमिक रिसर्च ब्यूरो " चा सायमन कुझनेट यानें या बाबतींत परिश्रमपूर्वक पहाणी केली आहे. या पहाणीप्रमाणें दोन महायुद्धांच्या दरम्यानच्या काळांत हा सुखवस्तू वर्ग एकंदर राष्ट्रीय उत्पन्नांतील बराच मोठा भाग म्हणजे कर वजा जातां उरलेल्या उत्पन्नांतील २८ टक्क्यांपेक्षां अधिक भाग उपटीत असे. पण सन १९४५ च्या सुमारास त्यांच्या उत्पन्नाचें प्रमाण अठ्ठावीस टक्क्यांवरून सतरा टक्क्यांवर (कर दिल्यानंतर) आलें. सन १९४५ नंतर या वर्गाच्या परिस्थितींत थोडीशी सुधारणा झाली आहे, पण ती अगदींच किरकोळ आहे.

शेवटीं अगदीं वरच्या अधिक सुखववस्तू व सधन अशा एक टक्का किंवा १६,००० डॉलर किंवा अधिक उत्पन्न असलेल्या लोकांचा विचार करूं. सन १९४५ च्या सुमारास त्यांचा राष्ट्रीय उत्पन्नांतील वांटा कर दिल्यानंतर १३ टक्क्यांवरून ७ टक्क्यांवर आला होता.

किंमती वाढल्या होत्या, हें लक्षांत घेऊनहि सन १९२९ तें १९५० या काळांत सर्व अमेरिकन लोकांचें उत्पन्न ७४ टक्क्यांनीं वाढल्याचें दिसून येतें. ही वाढ मोठीच होती यांत शंकाच नाहीं.

या ठिकाणीं दुसरीहि एक उद्बोधक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. जरी वेतनांत मोठी वाढ झाली तरी, त्याबरोबरच नफ्यांत घट झाली नाहीं. इतकेंच नव्हें तर सन १९२९ च्या नफ्याची सन १९५० शीं तुलना केली तर असें दिसून येईल कीं या मधल्या काळांत एकंदर वेतन व पगार यापेक्षांहि नफ्यांत झपाट्यानें वाढ झाली. " चढती लाट सर्वच गलबतांना वर उचलते." प्रश्न एवढाच कीं नफ्यांत वाढ होऊनहि त्यामुळें धनिकांचे खिसे अधिक कां भरले जात नव्हते ?

याचें उत्तर हेंच कीं, जे नफे होत त्यापैकीं कांहीं भाग धंद्याच्या विकासाकरितां उपयोगांत आणण्यांत आला. भागीदारांना वाटण्याच्या नफ्याची अधिक व्यापक विभागणी झाली व त्याचप्रमाणें कराचें प्रमाणहि वाढलें.

## २

धनिक व गरीब यांच्या उत्पन्नांतील तफावत कमी झाली, यापेक्षांहि अधिक ठळकपणें दिसून येणारी गोष्ट म्हणजे त्यांच्या रहाणींतील विषमता कमी झाली.

उदाहरणार्थ पेहेरावच घ्या. सन १९०० मध्यें फ्रॉकचा कोट आणि रेशमी टोपी घातलेला पेढीवाला व त्याची अस्सल फ्रेंच पोषाखांतील बायको अगदीं लांबून

ओळखून येत. चाळीस पन्नास वर्षांपूर्वी शहरवासीयांना खेडूत अगदीं गांवढळ वाटत. पण आज एकादा कामगार किंवा कारकून व वरिष्ठ अधिकारी यांच्यामधील फरक सहजासहजीं लक्षांतच यावयाचा नाहीं. ज्यांच्या कारखान्यांत हजारों नोकर असून ज्यांची प्राप्ति लाखों डॉलर आहे, अशा महाभागांचे कपडे जरा चांगले शिवलेले असतील, पण एकंदरींत कपड्यांमुळें कांहीं त्यांच्याकडे मुद्दाम कोणाचें लक्ष जात नाहीं, तेहि इतर सर्वसामान्य लोकांप्रमाणेंच वाटतात.

स्त्रियांविषयीं बोलावयाचें म्हणजे कपड्यांवर दर वर्षी पांच हजार डॉलर खर्च करणारी बाई व अगदीं मोजके कपडे वापरणारी बाई यांच्यांतील फरकहि ठळकपणें दिसून येत नाहीं. फक्त एकादी बाई कपड्यांच्या बाबतींत किती चोखंदळ आहे, हेंच तिच्या पेहेरावावरून दिसून येतें. एकाद्या धनाढ्य बाईजवळ तीस पोषाख व गरीब बाईजवळ तीनच पोषाख असतील, पण रस्त्यांवरून जातांना कांहीं त्यांच्यांतील हा फरक दिसून येत नाहीं.

यानंतर पायमोज्यांतील फरक घ्या. १९ व्या शतकाच्या शेवटीं रेशमी पायमोजे म्हणजे एक चैनीची निशाणी होती. सन १९०० मध्यें अमेरिकेची लोकसंख्या साडेसात कोटि होती, त्या वर्षी रेशमी पायमोज्यांचे जोड फक्त १,५५,००० तयार झाले होते. सन १९४९ मध्यें अमेरिकेंत रेशमापेक्षां सरस नसले तरी त्याच्याच तोडीच्या निलॉन किंवा उंची कृत्रिम रेशमाचे चोपन कोटि तीस लाख पायमोजे जोड खपले, म्हणजे अमेरिकेंतील चौदा वर्षांपुढील प्रत्येक बाईच्या वांटणीस वर्षाला नऊ तें दहा जोड आले! अफाट उत्पादनाच्या तडफदार सिद्धांतांचेंच हें आणखी एक उदाहरण!

पूर्वी शेतकऱ्यांच्या बायका व शहरांतील स्त्रिया यांच्या पोषाखांत फरक दिसे. शहरांतील मुली कोणत्या व खेड्यांतील मुली कोणत्या हें ओळखूं येई. आज श्रीमंतीची फक्त एकच खूण दिसून येते व ती म्हणजे श्रीमंतांच्या बायकामुली मिंकच्या लोकरीचा उंची कोट घालतात.

पण यावरून कोणी असें समजूं नये कीं, जीवनांत एकसारखेपणा आणण्याचें आज अमेरिकेंत वारे वहात आहेत. आज स्त्रीपुरुषांच्या पोषाखांत कमालीचें वैचित्र्य दिसून येत आहे. मुद्दा एवढाच कीं या वैचित्र्यांत सांपत्तिक स्थितीपेक्षां आवड किंवा विशिष्ट चालीरीतीच विशेष करून प्रतिबिंबित होतात.

कपड्यांच्या बाबतींत वर्गभेद कोलमडून पडत आहेत ही खास गौण बाब नाहीं. आपण इतरांपेक्षां वेगळें दिसतों, ही भावनाच मुळीं विषमता निर्माण करते. याउलट आपण इतरांपेक्षां वेगळें नाहीं, ही जाणीव विषमतेवर प्रहार करणारी आहे.

कपड्यांवरून दैनंदिन वापरांतील वस्तूंकडे वळूं. १९४७ च्या " हार्पर्स " नियतकालिकांत प्रो. एच. गॉर्डन हेज यानें म्हटल्याप्रमाणें आज गरीब ज्या तऱ्हेच्या सिगारेटी ओढतात, तशल्याच सिगारेटी श्रीमंत लोकहि ओढतात. गरिबांच्या वस्तऱ्यांसारख्याच वस्तऱ्यांनीं श्रीमंत लोक दाढी करतात. टेलिफोन, रेडिओ, टेलिव्हिजन, दिवे वगैरे वस्तु वापरण्यांत श्रीमंत व गरीब हा भेद दिसून येत नाहीं. तसेंच श्रीमंत व गरीब यांच्या मोटारींत दिसून येणारा फरकहि किरकोळ आहे.

आज अमेरिकेंतील घरगुती नोकरचाकर वर्ग जवळजवळ नाहींसा झाला आहे. यामुळें कांहीं थोड्या कुटुंबांची गैरसोय झाली आहे. अशा कुटुंबांना स्वयंपाक, झाडझूड, धुणीभांडीं करणें यातायातीचें वाटतें. हे नोकरचाकर नाहींसें होण्याचें एक कारण हें कीं अमेरिकेंत फार दिवसांपूर्वी आलेला परदेशी स्थलांतरितांचा वर्ग आतां अमेरिकन समाजांत विलीन होऊन गेला आहे. तसेंच त्यामुळें धनिक व गरीब यांच्या रहाणींतील आणखी एक भेद गेला आहे.

धनिक व गरीब यांच्या रहाणींत समानता निर्माण होण्याची कारणें पूर्वीच्या प्रकरणांत निवेदन केल्याप्रमाणें अनेक आहेत. कांहीं कारणें–प्राप्तीवरील कर, कामगार संघटनेचें दडपण यासारखीं–आर्थिक व राजकीय आहेत, तर कांहीं सार्वजनिक उद्यानें, क्रीडांगणांची वाढ यासारखीं सामाजिक आहेत. सर्वांत मोठें कारण म्हणजे अफाट उत्पादनाचा तडफदार सिद्धांत. या सिद्धांतामुळें या ना त्या प्रकारच्या चैनीचा माल बाजारांतून जवळजवळ नाहींसा झाला आहे.

या बदलाचें आणखी एक महत्त्वाचें कारण म्हणजे शिक्षणाचा दांडगा प्रसार. सन १९०० मध्यें हायस्कूल शिक्षण घेण्यास पात्र असलेल्या दहा मुलांमुलींपैकीं फक्त एकजण हायस्कूलांत जाऊं शके. आज अशा दहा जणांपैकीं आठांहून अधिक मुलें हायस्कूलांत जातात. या मुलांना हायस्कूलांत फक्त पुस्तकी शिक्षण मिळतें, असें नसून समाजांतील निरनिराळीं कुटुंबें कशीं रहातात, याचें त्यांना सामाजिक शिक्षणहि मिळतें. अमेरिकन कॉलेजें, विद्यापिठें वगैरेंतील विद्यार्थ्यांची संख्या आज आठ पट वाढली आहे.

दुसऱ्या महायुद्धानेंहि एक मोठा बदल घडवून आणला आहे. त्यामुळें लाखों अमेरिकनांना परदेशांत संचार करण्याची संधि मिळाली. विशेषत: जिज्ञासूंना तिकडील रहाणीचा अभ्यास करतां आला. कांहीं अमेरिकनांना तर विमानदलांत मोठमोठ्या पगाराच्या जागा मिळून त्यांना कल्पनाहि नसेल अशा रीतीनें वरची रहाणी कंठण्याची संधि मिळाली.

अफाट खपाचीं मासिकें, चित्रपट, रेडिओ, टेलिव्हिजन यांच्या प्रभावी प्रचाराचाहि उल्लेख करणें अस्थानीं होणार नाहीं. त्यांनीं सर्व प्रकारच्या आर्थिक पातळीवरील अमेरिकन लोकांत समानतेची ईर्षा निर्माण केली.

गेलीं कांहीं वर्षे हीं नियतकालिकें लाखो अमेरिकन स्त्रियांना, अर्भकांची जोपासना कशी करावी, मुलांचें संगोपन कसें करावें, समतोल आहार कसा बनवावा, घराची आकर्षक सजावट कशी करावी, हिरवळी व बगीचे आकर्षक कसे करावेंत वगैरेंचे शिक्षण देत होतीं. त्यांची कांहीं शिकवण वाचून जुन्या मंडळींची करमणूक होत असेल. तसेंच त्यांत येणारी कांहीं माहिती म्हणजे जाहिरातदारांची भाटगिरी असेल व उथळहि असेल. पण ज्यांच्या आकांक्षा परिस्थितीनें जखडून ठेवल्या होत्या, त्यांच्यावर या शिकवणुकीचा एकदंरींत खूपच परिणाम झाला.

नियतकालिकांतील जाहिरातीहि, "अधिक वस्तू खरेदी करावयाच्या असतील तर अधिक काम करा," अशीच कामगारांना जणू काय प्रेरणा देत. पगारांत वाढ मिळाली कीं ढिलाई येते; इतर देशांतील कामगारांप्रमाणें अमेरिकन कामगारहि या नियमाला अपवाद नव्हते. पण अधिकाधिक सोयी उपलब्ध व्हाव्यात, या आशेनें सतत काम करण्याची वृत्ति दिसते, याचें मोठें श्रेय व्यापक प्रसिद्धितंत्राला आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं.

वृत्तपत्रीय अशी सार्वत्रिक शिक्षणाची पद्धत म्हणजे विसाव्या शतकांतील एक चमत्कारच होय. १९ व्या शतकाच्या शेवटीं दहा लाखांपर्यंत खप असलेलें एकहि नियतकालिक नव्हतें. सन १९४७ मध्यें प्रत्येकीं दहा लाखांवर खप असलेलीं ३८ नियतकालिकें होतीं.

आणि चित्रपट व रेडिओ ? उत्पन्नाच्या निरनिराळया गटांतील लोकांना त्यांच्यापासून सारखीच करमणूक व आनंद मिळतो. लोकांच्या सरसहा आवडीनिवडी लक्षांत घेऊनच चित्रपट तयार करण्यांत येतात व रेडिओ कार्यक्रम आंखण्यांत येतात.

धनिकांच्या उत्पन्नांतील घट व एक सामान्य रहाणीचें मान आणण्याची प्रवृत्ति यामुळें प्रतिष्ठित समाज नाहींसा झाला आहे, असें म्हणणें अतिशयोक्तीचें होईल. मानवी इतिहासांत सामाजिक इर्ष्या ही एक मोठी शक्ति आहे. कोणत्याहि समाजांत भेद व दांभिकपणा हे थोडेफार असावयाचेच. बहुतेक गांवांतून व लहान शहरांतून ही समाजरचना, जरी तिच्या घटनेंत इकडेतिकडे सतत बदल होत असले तरी ठराविकच असते. या समाजरचनेचें सर्वांत वरचें टोंक म्हणजे स्थानिक प्रतिष्ठित समाज. पण हीं लहान शहरें सोडून मोठ्या शहरांचें अवलोकन केलें तर तेथील समाजरचना अधिक क्लिष्ट, वैचित्र्यपूर्ण व फसवी असल्याचें दिसून येईल. विशेषतः तेथें व्यवसायी व उद्योग-धंदेवाल्यांचे जे गट असतात आणि मोठ्यामोठ्या उद्योगधंद्यांतील बड्या धेंडांच्या प्रभावळी सामाजिक संबंधांत जो भेदाभेद घुसडतात, त्यामुळें तेथील समाजरचनेच्या गुंतागुतींत आणखी भर पडते.

जुना-विशेषतः बडा प्रतिष्ठित समाज प्रामुख्यानें न्यूयॉर्कमध्यें आढळून येत असे. याच ठिकाणीं सुखवस्तू लोकांची गर्दी झालेली असून तेथें समाजांतील वेगवेगळे गट आढळून येतात. येथें पेढीवाले, दलाल, वकील व त्या सर्वांचीं कुटुंबें, प्रकाशक, लेखक, जाहिरातदार, रेडिओ व टेलिव्हिजन कार्यक्रमांत भाग घेणारे लोक, तसेंच घाऊक व किरकोळ व्यापारी, धर्मसंस्थांशीं संबंध असलेल्या व्यक्ति, समाजसेवक, कलावंत व कलेचे चहाते आढळून येतात.

अशा या बहुरंगी चित्रांत प्रतिष्ठित समाज अस्तित्वांत नाहीं, असें म्हणणें बरोबर होणार नाहीं. अनेक गर्भश्रीमंत व खानदानी कुटुंबांना असलें विधान मूर्खपणाचें वाटेल. पण अशा प्रकारचा प्रतिष्ठित समाज अस्तित्वांत आहे; हें त्यांच्याबाहेर इतरांना मात्र अज्ञातच आहे.

या प्रतिष्ठित समाजांतील कांहीं दुड्ढाचार्य आजच्या हॉटेलक्लबांना नाक मुरडू द्यात, पण त्यांचींच पोरेंबाळें प्रतिष्ठितांच्या मंडळांपेक्षां अशाच क्लबांचे सभासद होण्यांत अधिक भूषण मानतात. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे प्रतिष्ठित समाज अस्तित्वांत आहे, हें सर्वसाधारण लोकांना जवळजवळ माहीत नाहीं व त्याची कोणी दादहि घेत नाहीं.

या बदललेल्या काळाची कोणाला जाणीव असेल तर ती जाहिरातदारांना. ॲगनीस रॉजर्स म्हणतो, " आकर्षता ही वस्तू आज सर्वच अमेरिकन स्त्रियांना सहजसुलभ

झाली आहे. बाजारांत जाऊन भांड्यांतून एकादा जिन्नस आणण्याइतकेंच आकर्षता आणणें सोपें झालें आहे. आज कांहीं कारखानदारांची खात्री झाली आहे कीं, आपल्या मालाचा खप व्हावा, यासाठीं सामान्य स्त्रियांतहि आपण सधन व प्रतिष्ठित स्त्रियांच्या बरोबरीच्या आहोंत ही भावना निर्माण केली पाहिजे. आज अशी परिस्थिति आहे कीं कोणालाहि थोडासा पैसा व थोडेसे परिश्रम यामुळें आकर्षता आणता येते. थोडक्यांत आकर्षतेचेंहि आज लोकशाहीकरण झालें आहे. ''

आणि ते पूर्वीचे मोठमोठे इमले ? या इमल्यांत ऐटबाज धनिक लोक नबाबी इतमामानें रहात असत. पण जिंदगी-कर ( इस्टेट टॅक्स ) वगैरे करांमुळें बहुतेक इमले डबघाईला आले होते. अद्यापहि विशेषतः न्यूपोर्ट येथें कांहीं प्रतिष्ठित धनिक जणूं कांहीं झालेंच नाहीं, असें समजून पूर्वींच्याच थाटानें रहात आहेत. पण न्यूयॉर्क येथील परिस्थिति बदलली आहे. पूर्वी न्यूयॉर्क येथील फिफ्थ ॲव्हेन्यू म्हणजे लक्षाधीशांचा विभाग समजला जाई. तेथें विल्यम एच., विल्यम के., कॉर्नेलियस व्हॅन्डरबिल्ट वगैरे लक्षाधीशांचे अत्यंत प्रसिद्ध असे इमले होतें. पण आतां त्यांत व्यापारी कचेऱ्या ठेवण्याच्या दृष्टीनें बदल करण्यांत आले आहेत. इतर कांहीं इमारतींतूनहि मठ, मुलांचीं वसतिगृहें, शाळा व रुग्णालयें इत्यादि संस्था ठेवण्यांत आल्या आहेत. आणि अलीकडे कित्येक वर्षांपासून अशा इमारती बांधण्यांत येत नाहींत. एकतर सध्यां मजूरीचे दर वाढल्यामुळें त्यांची व्यवस्था ठेवणें भारी खर्चाचें होतें व दुसरी गोष्ट म्हणजे आजच्या धनिकांत नबाबी थाटानें रहाण्याची आवड एकंदरींत कमीच आहे.

आज लोकांच्या वागणुकींत मोकळेपणा आढळून येतो. तो इतका कीं, लोकांत जरा भारदस्तपणा येईल तर बरें होईल, असें क्षणभर वाटूं लागते. पण औपचारिकपणाच्या दिशेनें एक पाऊल टाकावयाचा अवकाश कीं स्वैर आचरणाच्या दिशेनें दोन पावलें पडतात.

आजच्या अमेरिकन पुरुषांकडे पहा. त्यांचे ते पूर्वींचे निरनिराळया आकाराचे कोट कोठें गेले ? कमरेच्याखालीं वक्र पद्धतीनें कापलेले ( कटवे ) कोट आतां मागें पडले आहेत. फक्त लग्नप्रसंगी कोणी ते ऊसनवारीनें किंवा भाड्यानें आणून वापरत असतील तेवढेंच. पूर्वींचे ते लांगूल कोट ( टेल कोट ) आतां फक्त कांहीं आंखडेबाज तरुणच समारंभ प्रसंगीं वापरतात. मेजवानीच्या प्रसंगीं घालण्याचे ते खास कोटहि ( डिनर कोट ) कमीकमीच वापरण्यांत येत आहेत. मेजवानीकरितां खास ठरलेला पेहेराव करून येणारे

लोक आतां जवळजवळ दिसेनातसे झाले आहेत. ती पूर्वीची ताठ कॉलर अजिबात गेली असून जाकिटें (वेस्ट कोट) जाण्याच्या मार्गावर आहेत. चाळिशीखालील कोणाहि माणसानें असा कोट घातला तर त्याच्यावर बुरसटलेपणाचा शिक्का बसतो. टोप्या सर्वच प्रकारच्या जात चालल्या आहेत. खेळाडूंच्या पोषाखांतहि फरक पडला आहे. ट्वीडची कुडतीं आणि फ्लॅनेलच्या किंवा खाकी विजारींची जागा आतां सुरेख शर्ट व विजारींनीं घेतली आहे. कामाच्या वेळीं घालावयाच्या कपड्यांतहि आटोपशीरपणा आला आहे. औपचारिक प्रसंग सोडले तर तरुणांनीं नेकटॉय वापरण्याचें सोडूनच दिलें आहे.

स्त्रीपुरुषांच्या परस्पर वागणुकीला हा मोकळेपणा योग्यच असल्याचें दिसून येते. नवराबायको आज पूर्वीपेक्षां एकमेकांच्या सहवासांत अधिक वेळ काढतात. नवरा स्वयंपाक, धुणींभांडीं, मुलांचें संगोपन या बाबतींत बायकोला मदत करतो. तसेंच मजूरीचे दर वाढल्यामुळें त्याला रंगसफाई, पडझड दुरुस्ती वगैरे बरींच कामें स्वतःच करण्याचा षोक लावून घ्यावा लागला आहे. त्यामुळें इच्छा असली तरी एकमेकांच्या हौसेसाठीं पोषाख करण्याची त्यांना संधि मिळत नाहीं. सहशिक्षणाच्या वाढत्या प्रसारामुळें मुलांमुलींना एकमेकांना काम करतांना व खेळतांना जवळून पहाण्याची संधि मिळाली आहे व त्या दृष्टीनेंच ते पोषाख करतात. हळुहळू पुरुषांच्या क्लबांत स्त्रियांना वाढता प्रवेश देण्यांत येऊं लागला आहे. अनाचारी समाजांत चैन करण्याच्या बाबतींत स्त्रिया व पुरुष हा विधिनिषेध सहसा नसतोच. पण हा अपवाद सोडला तरी एकंदरींत स्त्रिया व पुरुष यांच्या परस्पर वागणुकींत अधिकाधिक मोकळेपणा येऊं लागला, हेंहि स्पष्टच होतें.

मध्यंतरीं जसजसे नोकरचाकर दुर्मिळ होत गेले, तसतश्या त्या मोठमोठ्या मेजवान्या व नृत्य कार्यक्रमहि दुर्मिळ होत गेले.

या मोकळेपणाच्या वागणुकीविषयीं कोणाचें कांहींहि मत असो, त्यांत आजच्या अमेरिकन रहाणीचें व वागणुकीचें स्पष्ट प्रतिबिंब दिसून येतें.

———

# प्रकरण १६ : समाईक कंपन्या, नवी पद्धत

वस्तुतः समकालीन जीवन व संस्था यांचें निरीक्षण करण्याइतकें दुसरें कठीण काम क्वचितच असेल. आणि निरीक्षण केल्यानंतर त्याबद्दल सर्वसाधारण मत देणें हें तर अधिक अवघड. कारण अनेक वेळां त्यांचें वर्णन करावयास जुनाट ऐतिहासिक संज्ञांशिवाय आपल्याजवळ उचित असे शब्दच नसतात.

उदाहरणार्थ "भांडवलशाही" हा शब्दच घ्या. अमेरिकन आर्थिक रचना भांडवलशाही आहे, असें आपण ठोकळ मानानें म्हणतो. पण अमेरिकेंत भांडवलशाहीला पन्नास वर्षांपूर्वी जो अर्थ होता किंवा आजहि युरोपांत जो अर्थ आहे, तो आजच्या अमेरिकन उद्योगधंद्यांना मुळींच लागूं पडत नाहीं. तीच गोष्ट "अनिर्बंध आर्थिक रचना" व "समाजवाद" या शब्दांची. या प्रत्येक शब्दामागें परंपरागत अर्थांचें जें भलें दांडगें जंजाळ आहे, तें आजची आर्थिक व राजकीय परिस्थिति अचूक रीतीनें निवेदन करण्यास फारसें उपयुक्त ठरत नाहीं.

यानंतर समाईक कंपन्या घ्या. आज अमेरिकेंतील बहुतेक धंदे या समाईक कंपन्यांच्या हातांत आहेत. या समाईक कंपन्यांत एक माणशी कारभारापासून तो "जनरल मोटार्स"-सारख्या प्रचंड संघटनापर्यंत अनेक प्रकार आहेत. सन १९२० मध्यें अमेरिकन सरकारनें सैन्य व आरमार यावरील खर्चासह जो एकंदर खर्च केला त्याहूनहि "जनरल मोटार्स कंपनी" आज अधिक खर्च करते. अमेरिकेंतील एकंदर नोकरांपैकीं जवळजवळ निम्मे नोकर आज समाईक कंपन्यांच्या नोकरींत आहेत. पण अमेरिकन कंपन्यांचें आतांचें स्वरूप पहिल्यापेक्षां इतकें बदललें आहे कीं त्यांच्याकडे नजर टाकल्यावर सत्य परिस्थिति काय आहे याची कल्पना येणें कठीण पडतें.

हा झालेला बदल अत्यंत महत्त्वाचा आहे. याकरितां समाईक कंपन्यांचें नव्या दृष्टिकोनांतून सिंहावलोकन करूं.

प्रथम समाईक कंपन्याविषयींच्या कांहीं सर्वसाधारण गोष्टींचा विचार करूं. जे लोक कंपनींत पैसे घालतात व तिची वाढ करतात, अशांच लोकांचें सामान्यतः तीवर नियंत्रण असतें. हे लोक कंपनीचे रोखे खरेदी करतात व आपल्यातर्फे कंपनीचा कारभार करण्याकरितां डायरेक्टर निवडतात. डायरेक्टर लोक कंपनीचे प्रत्यक्ष काम करण्यासाठीं व्यवस्थापक नेमतात. अशा रीतीनें तत्त्वतः व कायद्यानुसार भागीदार हे सर्वांत वरिष्ठ

होत. अमेरिकेंतील बऱ्याच नवीन कंपन्यांबाबत अशीच परिस्थिति असल्याचें दिसतें. पण आज अमेरिकेंत यशस्वी रीतीनें चाललेल्या ज्या जुन्या कंपन्या आहेत, विशेषतः ज्यांच्या हातांत अमेरिकन धंद्यांचा मोठा हिस्सा आहे, अशा कंपन्यांत भागीदारांचें वास्तविक अर्थानें नियंत्रण राहिलेलें नाहीं. त्यांना अधिकार व महत्त्व या दोन्ही दृष्टींनीं व्यवस्थापकीय वर्गापेक्षां गौण स्थान आहे.

आज हा व्यवस्थापक वर्गच धोरण ठरवितो व निर्णय घेतो. अर्थात् महत्त्वाच्या निर्णयांना डायरेक्टरांची मान्यता घ्यावी लागते यांत वादच नाहीं; तसेंच अनेक डायरेक्टरांना आपल्या जबाबदारीची तीव्र जाणीवहि असते व अलीकडे ही जाणीव वाढत असल्याचींहि चिन्हें दिसतात. पण समाईक कंपन्यांच्या प्रत्यक्ष कारभारांत त्यांचा वांटा जवळजवळ नकारात्मकच असतो. याचें कारण फारच थोडे डायरेक्टर आपल्यापुढील प्रश्नांची दैनंदिन माहिती करून घेण्याकडे लक्ष देतात. यानंतर भागीदारांच्या बाबतींत कायदा असें सांगतो कीं कांहीं महत्त्वाच्या निर्णयांना भागीदारांची मान्यता घेतली पाहिजे. म्हणून कायद्यान्वयें भागीदारांची वार्षिक सभा बोलावून त्यांच्याकडून "सब ठीक"चा अभिप्राय घेण्याचा उपद्व्याप करावा लागतो. अशा रीतीनें भागीदारांची वार्षिक सभा म्हणजे सामान्यतः निव्वळ औपचारीक स्वरूपाची असतें.

समजा, एकाद्या भागीदाराला कंपनीचा कारभार आवडत नसेल तर? जर तो विक्षिप्त किंवा ध्येयवादी किंवा मुद्दाम खळबळ माजवूं पहाणारा राजकीय पुढारी नसेल तर मोठ्या कंपनीच्या व्यवस्थापक वर्गाला विरोध करणार नाहीं. त्याऐवजीं तो आपले रोखे विकून बाहेर पडेल.

पण एकंदरींत समाईक कंपन्यांचे व्यवस्थापक गेल्या शतकाच्या शेवटीं अल्प-संख्यांक भागीदारांना जसें वागवत, त्यापेक्षां आज अधिक आदरानें वागवितात. त्या वेळीं भागीदारांना कंपनीच्या प्रगतीचा कांहींच थांग लागूं दिला जात नसे किंवा फार तर त्यांच्यापुढें निर्जिव आंकडेवारी ठेवण्यांत येत असे. पण आज भागीदारांना कंपन्यांच्या कारभाराविषयीं इत्यंभूत अहवाल सादर करण्यांत येतात. या अहवालांत कंपनीच्या ठळक कार्यांचीं छायाचित्रें व खर्चाच्या तौलनिक आकृत्याहि खूपच असतात. आज जितक्या आदरानें ग्राहकांकडे पाहिलें जातें, तितक्याच आदरानें भागीदारांकडे पाहिलें जातें. भागीदारांना आज मालक समजण्यांत येत नसेल, पण त्यांनीं आपला आश्रय काढून घेऊं नये, यासाठीं त्यांची मनधरणी केली जाते.

रोख्यांच्या विक्री व्यवहारामुळें सर्व संभवनीय विरोध संपुष्टांत आला आहे व त्याचा परिणाम म्हणजे व्यवस्थापक वर्गाचें स्थान आज भक्कमच नव्हे तर बहुतेक मोठ्या कंपन्यांत अढळ झालें आहे. नाहींतर अमेरिकन टेलिफोन कंपनीसारख्या लाखो भागीदार असलेल्या कंपनीचा कारभार चालवितां तरी कसा येईल ?

अमेरिकन उद्योगधंद्यांचें हें अंग लक्षांत घेतां आजच्या आर्थिक रचनेला भांडवलशाही म्हणण्यापेक्षां व्यवस्थापकशाही ( मॅनेजमेन्टीझम ) म्हणणेंच अधिक सार्थ ठरेल.

बऱ्याच निरिक्षकांना या गोष्टीची जाणीव आहे. पण याच काळांत दुसरा जो एक बदल घडून आला तो मात्र लक्षांत येत नाहीं.

हा बदल पुढीलप्रमाणें आहे. आजच्या समाईक कंपन्यांचा विशेषतः मोठ्या कंपन्यांचा कारभार भागीदारांच्या हातांत आहे. एवढेंच नव्हें तर भांडवलासाठीं त्या पूर्वांइतक्या पेढीवाल्यांवरहि अवलंबून नाहींत. आजहि अनेक कंपन्यांना आणीबाणीच्या प्रसंगीं किंवा पुनर्घटनेसाठीं पेढीवाल्यांच्या मदतीची आवश्यकता असते, पण ते पूर्वीप्रमाणें कंपन्यांच्या कारभारांत दडपण आणूं शकत नाहींत. एकतर पेढीवाल्यांचे आपल्या ऋणकोबरोबरचे व्यवहार कायद्यानें नियंत्रित करण्यांत आले आहेत. आणि दुसरी गोष्ट म्हणजे सरकारी ' रिकन्स्ट्रक्शन फायनान्स कार्पोरेशन ' किंवा मोठ्या विमा कंपन्या किंवा संघटित भांडवलाच्या संस्था आज कंपन्यांना आर्थिक साहाय्य देण्याच्या बाबतींत बँकांना प्रतिस्पर्धी म्हणून आखाड्यांत उतरल्या आहेत.

आजच्या यशस्वी समाईक कंपन्या आर्थिक बाबतींत बऱ्याच प्रमाणांत स्वावलंबी आहेत. त्या स्वतःच भांडवल उभारतात. त्या आपल्या कमाईपैकीं कांहीं रक्कम भागीदारांना नफा म्हणून वाटतात व बाकीची रक्कम नवीन यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठीं किंवा नवे कारखाने उभारण्यासाठीं उपयोगांत आणतात. गेल्या शतकाच्या शेवटीं पेढीवाल्यांवर वरचष्मा करण्यास मोठ्या कंपन्या धजत नसत, पण आतां परिस्थिति बदलली आहे. व्हिशीनस्की मानतो, त्याप्रमाणें कोणताहि पेढीवाला आज कोणत्याहि यशस्वी कंपनीचीं सूत्रें हालवूं शकत नाहीं. या बाबतींत सोव्हिएट व त्याचप्रमाणें अमेरिकेविषयीं अढी बाळगणारे इतर देशांतील प्रचारक विपर्यास करतात व तोहि वीस वर्षांपूर्वीच्या परिस्थितीचा, असें दिसून येईल.

मग बड्या यशस्वी कंपन्या स्वतःच्याच तरी धनी आहेत काय ? सर्वस्वी नाहींत.

पहिली गोष्ट म्हणजे आजच्या कंपन्यांवर सरकारचीं कडक बंधनें आहेत. प्रो. सुमनेर स्लायशर म्हणतात, " गेल्या पन्नास वर्षांत घडून आलेला एक मूलभूत बदल म्हणजे अनिर्बंध आर्थिक रचना जाऊन सरकार-नियंत्रित अर्थरचना आली आहे." सरकार कांहीं मालाच्या किमान तर कांहीं मालाच्या कमाल किंमती ठरवितें. त्याचप्रमाणें मालाची प्रसिद्धि कशी करावी, माल कसा विकावा, समाईक कंपन्यांनीं कोणते उद्योगधंदे करावेत, नोकरांना पगार कसे द्यावेत, हेंहि सरकारकडून ठरविण्यांत येतें. कांहीं राज्यांत " न्याय्य रोजंदारी कायदे " ( फेअर एम्प्लॉयमेंट लॉज ) करण्यांत आले आहेत. त्यास अनुसरून कोणाला नोकरीवर ठेवावें, हा अधिकारहि सरकारनें आपणांकडे घेतला आहे. समाईक कंपन्यांनीं जमाखर्च कसे ठेवावेत, या बाबतींतहि सरकारचे कडक निर्बंध आहेत.

कामगार संघटनांच्या ताकदीमुळेंहि कंपन्यांवर खूप नियंत्रण आलें आहे. अर्थात् कामगार संघटनांची ताकद नकारात्मक आहे. कामगार संघटना कंपनीला जखडून ठेवूं शकते, पण ती स्वतः कंपनी चालवूं शकत नाहीं, इतकेंच काय पण ती कंपनीबरोबर झालेला करारहि अंमलांत आणूं शकत नाहीं. करार अंमलांत आणण्याचें काम शेवटीं तिला कंपनीवरच अवलंबून ठेवावें लागतें पण कामगार संघटनेची अडथळे आणण्याची शक्ति मात्र दांडगी असते. लोक म्हणत, व्यक्तिगत अधिकाराच्या बाबतींत अलीकडच्या काळांत जॉन. पी. मॉर्गनची जवळ जवळ बरोबरी करणारी व्यक्ति म्हणजे अमेरिकन कामगार फेडरेशनचा अध्यक्ष जॉन एल. ल्युइस, व तें फारसें चुकीचेंहि नव्हतें. कामगार संघटनांनीं अनेक करार करून नोकर नेमणें व कमी करणें, जेष्ठत्वाचे हक्क ( सिनीऑरिटी राईट्स ), तक्रारी मिटविणें, जादा कामाचा पगार, सुट्या वगैरे अनेक गोष्टी कामगारांना मिळवून दिल्या आहेत. थोडक्यांत पिटर एफ्. ड्रकर यानें म्हटल्याप्रमाणें " औद्योगिक कारखान्यांत व कचेऱ्यांत एक नवा सामान्य कायदा अस्तित्वांत आला आहे."

शेवटची गोष्ट म्हणजे कंपनीला नोकरवर्ग, भागीदार, ग्राहक व सरकार यांचाच विचार करून चालत नाहीं, तर सर्वसाधारण जनताहि डोळ्यांपुढें ठेवून आपला कारभार करावा लागतो. आपल्या कारभाराकडे लोकांचें बारकाईनें लक्ष आहे, हें त्यांना माहीत असतें. त्यांना आपल्या कामाचा तपशीलवार अहवाल निरनिराळ्या खासगी व सरकारी समित्यांपुढें ठेवावा लागतो.

एकंदरींत अमेरिकन कंपन्यांतील व्यवस्थापकांना कांहीं मर्यादेपर्यंत नोकर नेमणें व काढणें, मनाप्रमाणें खरेदी, उत्पादन व विक्री करणें वगैरे अधिकार असले तरी त्याचबरोबर त्यांच्यावर इतकीं विविध व कडक बंधनें आहेत कीं, ते अनिर्बंध कारभार करतात, असें म्हणणें वस्तुस्थितींपेक्षां अलंकारिकच ठरेल. कडक शिस्तीखालीं व लोकांच्या हिताकडे नजर ठेवूनच कंपन्यांना आपला कारभार करावा लागतो.

पण एवढ्यानें झालें नाहीं.

२

कारण अलीकडे समाईक कंपन्यांच्या कारभाराचें मूळ स्वरुपच बदललें आहे.

आज अमेरिकन उद्योगधंद्यांचें व्यवसायीकरण ( प्रोफेशनलायझेशन ) झालें आहे, असें म्हणणें अधिक सयुक्तिक होईल.

चालू शतकाच्या पहिल्या दशकांत हार्वर्ड विद्यापीठाच्या अध्यक्षानें नवीन 'हार्वर्ड ग्रॅज्युएट स्कूल ऑफ बिझीनेस ॲडमिनिस्ट्रेशन' या संस्थेचा व्यावसायिक शिक्षणसंस्था असा उल्लेख केला, तेव्हां कोण हलकल्लोळ करण्यांत आला! तत्कालीन कारखानदारांना ही कल्पनाच मुळीं हास्यास्पद वाटली. धंदा म्हणजे व्यवसाय! धंदा म्हणजे वास्तविक एक लढाई व या लढाईकरितां प्राध्यापकांनीं माणसें तयार करण्याची कल्पनाच मुळीं त्यांच्या दृष्टीनें मूर्खपणाची होती. पण हार्वर्ड येथील याच व्यावसायिक शाळेला पुढें सार्वत्रिक मान्यता मिळाली व बड्याबड्या कंपन्यांचें आर्थिक साहाय्यहि मिळूं लागलें. आज अनेक कंपन्या स्वतःच्या खर्चानें आपल्या अत्यंत होतकरू अशा अधिकाऱ्यांना या शाळेंतील तेरा आठवड्यांचा उच्च व्यवस्थापनाचा ( ॲडव्हान्स मॅनेजमेंट ) शिक्षणक्रम घेण्यास पाठवतात. याचा अर्थ व्यापारी शाळा चालविण्याकरितां एका मोठ्या विद्यापीठानें आपली ज्ञानोपासनेची परंपरा सोडली असा नसून आपल्या प्रमुख अधिकाऱ्यांमध्यें व्यावसायिक प्रावीण्य व पात्रता आली पाहिजे, ही गोष्ट महत्वाच्या अमेरिकन उद्योगधंद्यांना पटली आहे, असा करणें सयुक्तिक होईल.

केवळ पैसा हेंच ध्येय असलेले अनेक उद्योगपति आहेत. पैशाकरितां कोणालाहि लुबाडण्यास ते मागें पहात नाहींत. पण बहुतक समाईक कंपन्यांतील जबाबदार अधिकाऱ्यांना अनेक गुंतागुंतीच्या बाबींचा विचार करावा लागतो. त्यांना कंपनींतील नोकरवर्ग, सरकार, ग्राहक व सर्वसाधारण जनता याबरोबरच्या संबंधांचें स्वरूप सदैव

डोळ्यांपुढें ठेवावें लागतें, धंद्यांतील सर्व विभागांचें काम कार्यक्षम रीतीनें चालवावें लागतें. याचा परिणाम म्हणजे अत्यंत वाकबगार व कुशाग्र लोकांना उद्योगधंद्यांकडून वाढती मागणी येऊं लागली आहे.

या कालांत उद्योगधंद्यांत कितीतरी व्यावसायिक व निम-व्यावसायिक तऱ्हेच्या जबाबदाऱ्या येऊं लागल्या आहेत. उद्योगधंद्यांत पुष्कळ इंजीनियर नेमावे लागतात. याशिवाय आंकडेतज्ज्ञ, हिशोबनीस, हिशोब तपासनीस, अर्थशास्त्रज्ञ, वाण-नियंत्रण तज्ज्ञ ( क्वॉलिटी-कन्ट्रोल एक्सपर्ट ), गति निरीक्षण तज्ज्ञ ( मोशन स्टडी एक्स्पटर्स ), सुरक्षा व्यवस्था इंजीनीयर, डॉक्टर, कामगार संबंध तज्ज्ञ, सार्वजनिक संबंध अधिकारी, जाहिरात-तज्ज्ञ, बाजारपेठ निरीक्षक, संशोधन-सल्लागार, परराष्ट्रीय व्यापार सल्लागार, वकील, कर-तज्ज्ञ वगैरे कितीतरी व्यावसायिक नेमावे लागतात.

आजच्या कंपन्यांचें फक्त एकच अंग-उदाहरणार्थ संशोधन विचारांत घ्या. या शतकाच्या आरंभीं संशोधन शाळा असलेली समाईक कंपनी दुर्मिळ होती. पण सन १९४७ मध्यें " सायंन्टिफिक रिसोर्सीस बोर्ड "च्या अध्यक्षांनीं जो अहवाल प्रसिद्ध केला, त्यांत त्यावेळीं देशांत १,३७,००० शास्त्रज्ञ व संशोधक इंजीनियर असल्याचें नमूद केलें आहे. यापैकीं ३०,००० सरकारी नोकरींत, ५०,००० कॉलेजांत व विद्या-पीठांत व ५७,००० औद्योगिक संशोधन शाळांत काम करत होते.

आज कोणत्याहि मोठ्या कंपनींत नोकरीला असलेले निरनिराळे तज्ज्ञ इतर कंपन्यांतील तत्सम लोकांपासून फटकून असत नाहींत. त्यांच्या व्यावसायिक अशा संघटना असतात. त्यांच्या वारंवार बैठकी भरतात व ते आपल्या विशिष्ट क्षेत्रांतील प्रगतीचा आढावा घेऊन एकमेकांच्या कल्पनांची देवाण घेवाण करतात. सन १९४५ मध्यें अमेरिकन कॉंग्रेसनें नेमलेल्या एका समितीपुढें बोलतांना डॉ. जे. रॉबर्ट ऑपेन-हिमर म्हणाले, " एकत्र जमलेल्या शास्त्रज्ञांतील गप्पा विज्ञान शास्त्राचा प्राण होय. मला वाटतें विज्ञानाच्या इतर क्षेत्रांतहि तीच पद्धत असली पाहिजे. " ऑपेनहिमरनीं इतर व्यवसायी लोकांच्या बाबतींतहि असेंच विचार व्यक्त केले असते.

कल्पनांच्या देवाणघेवाणीवरून, अमेरिकन उद्योगधंद्यांबाबतची एक ठळक गोष्ट लक्षांत येते व ती म्हणजे अमेरिकन उद्योगधंद्यांत ' गुपित ' असें क्वचितच राखण्यांत येतें. यूरोपियन इतकेंच काय पण ब्रिटिश उद्योगपतींना याचें नेहमींच आश्चर्य वाटतें.

पण अशी वस्तुस्थिति आहे खरी. अमेरिकेंत माहिती व नव्या नव्या कल्पना यांबाबत उहापोह करून त्यांचा सर्वांनाच फायदा देण्याकडे सतत प्रवृत्ति दिसून येते.

ही देवाणघेवाण अनेक प्रकारांनीं चालते. एकच उदाहरण देतो. अमेरिकेंत मॅन्यु-फॅक्चरिंग असोसिएशन ' ही एक मध्यवर्ती संघटना आहे. या संघटनेवर कित्येक रासायनिक कारखान्यांचे प्रतिनिधि आहेत. या संस्थेच्या डायरेक्टरांची मासिक सभा भरते. या सभेंत त्या विशिष्ट धंद्यांतीलच नव्हे तर कारखानेनिहाय असे सुरक्षाविषयक तक्ते सादर केले जातात. यामुळें विशिष्ट कारखान्यांतील सुरक्षाविषयक तजविजींची इतर सर्वांनाच माहिती मिळते. अशी माहिती कां सादर केली जाते? कारण कारखान्यांतील सुरक्षा हा सर्वांच्याच जिव्हाळ्याचा प्रश्न आहे म्हणून स्पर्धा बाजूला ठेवून या बाबतींत जी काय माहिती मिळेल, ती सर्वांनाच हवी असते.

त्याचप्रमाणें नियतकालिकांच्या प्रकाशकांनीं कांहीं वर्षांपूर्वी प्रत्येक नियतकालिकाच्या खपाची कसून निःपक्षपाती चौकशी करण्यासाठीं व हे आंकडे सविस्तर प्रसिद्ध करण्यासाठीं " ऑडिट ब्यूरो ऑफ सर्क्युलेशन " नांवाची संस्था स्थापन केली. इतर कांहीं देशांत नियतकालिकांचे खपाचे आंकडे लपवून ठेवण्याची कोण धडपड असते ! पण अमेरिकेंतील जाहिरातदार, आपण दिलेल्या जाहिरातींचा कितपत उपयोग होईल हें कळणें सर्वांच्याच हिताचें आहे, असें मानतात. यामुळें प्रतिस्पर्धी नियतकालिकांना आपल्या खपाचे आंकडे कळले तरी चिंता नाहीं.

अमेरिकेंतील व्यापारी नियतकालिकांद्वारेंहि माहिती गोळा केली जाते. अशीं नियतकालिकें पुष्कळच असून यशस्वीपणें धंदा कसा करावा, याचें त्यामार्फत शिक्षण दिलें जातें. दुसऱ्या महायुद्धांत इटालीयन लष्करी विमान वहातुक अत्यंत मागासलेली होती, याचें एक कारण मुसोलिनीच्या फॅसिस्ट सरकारनें अमेरिकन व ब्रिटिश वैमानिक व्यापार-विषयक नियतकालिकांना इटालींत बंदी घातली होती, असें मला सांगण्यांत आलें व तें खरेंहि असावें. या बंदीमुळें इकडे उपलब्ध असलेली विपुल माहिती इटालियन इंजिनियरांना मिळूं शकली नाहीं.

पण माहिती एकत्र करणाऱ्यांपैकीं सर्वांत अत्यंत महत्त्वाच्या संस्था म्हणजे व्यापारी मंडळें. ' वॉल स्ट्रीट जर्नल ' च्या अंदाजाप्रमाणें सन १९३० मध्यें अमेरिकेंत अशा तऱ्हेचीं ४०० व्यापारी मंडळें होतीं. पण सध्यां त्याच ठिकाणीं १२,००० मंडळें आहेत. यापैकीं १,५०० राष्ट्रीय व १०,५०० राज्य किंवा स्थानिक मंडळें आहेत.

यापैकीं बऱ्याच मंडळांचे व्यवस्थापक पगारी आहेत. सन १९५१ मध्यें शिकॅगो येथें या व्यापारी मंडळाच्या व्यवस्थापकांच्याच संघटनेची बैठक भरली होती व तिला दोनशे व्यवस्थापक उपस्थित होते.

## ३

'फॉर्च्युन' नियतकालिकाच्या संपादकांनीं आपल्या "यू. एस्. ए., दि. पर्मनंट रेव्होल्युशन" या पुस्तकांत अद्यावत् अशा मोठमोठ्या धंद्यांपुढील प्रचलित व्यापारी परिस्थितीचें व अनेकविध प्रश्नांचें सिंहावलोकन केलें आहे. त्यांत त्यांनीं "व्यवस्थापन हा व्यवसाय बनला आहे," असे उद्गार काढले आहेत. इतकेंच नव्हे तर त्यांनीं एका जाहिरातींत स्पष्टपणें म्हटलें: "**बडीं धेंडें नामशेष झालीं.**"

बडीं धेंडें नामशेष झालीं ?—तसें म्हणणें जरा अतिरंजित होईल. पण एकंदरींत आज मोठ्या उद्योगधंद्यांत वरिष्ठ पदावर जाणारीं माणसें व पूर्वीचे उद्योगधंद्यांचे सूत्रधार यांत ठळक भेद आहे, हें नक्कीच.

आज प्रचंड बहुसंख्यांक उद्योगधंद्यांतील वरिष्ठ जागांवर पदवीधर आहेत व अनेकांनीं इंजिनियरिंगचें किंवा कायद्याचें उच्च शिक्षण घेतलेलें आहे.

उदाहरणार्थ मोटार धंदा घ्या. हा धंदा मोठा कठीण समजला जातो. पण "जनरल मोटर्स" चा मुख्य कार्यकारी अधिकारी चार्ल्स एर्वीन विल्सन हा "कार्नेगी इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी" चा पदवीधर आहे. त्यानें इलेक्ट्रिकल इंजिनियर या नात्यानें प्रारंभ केला होता. "क्रायस्लर" कंपनीचा अध्यक्ष लेस्टर कोल्बर्ट यानें प्रथम टेक्सास विद्यापीठांत व नंतर हार्वर्ड लॉ-स्कूलमध्यें शिक्षण घेतलें व त्यानंतर कामगारविषयक कायद्यांत प्रावीण्य संपादन केलें. फोर्ड कंपनीचा प्रमुख हेन्री फोर्ड (दुसरा) याची बाब जरा वेगळी आहे. वारसा हक्कानें धंद्यांत प्रमुखपद मिळालेल्या अगदीं थोड्या कार्यकारी प्रमुखांपैकीं तो एक आहे. आज एकाद्या घराण्याकडेच उद्योगधंद्यांचीं सूत्रें रहावीत, अशी प्रवृत्ति नसल्यामुळें ही गोष्ट जरा विलक्षणच आहे. तरीहि फोर्डनें येल विद्यापीठांत कांहीं वर्षें शिक्षण घेतलें होतें, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

केवळ मालमत्तेच्या दृष्टीनेंच विचार केला तर "स्टॅंडर्ड ऑईल" ही अमेरिकेंतील सर्वांत मोठी कंपनी आहे. या कंपनीच्या डायरेक्टर बोर्डाचा प्रमुख फ्रॅन्क व्हिटमोर आब्राम्स हा इंजिनियर आहे. त्याच कंपनीचा अध्यक्ष यूजीन होल्मन हाहि टेक्सास विद्यापीठाचा पदवीधर असून त्यानें भूगर्भशास्त्रज्ञ म्हणून प्रारंभ केला होता.

" यू. एस्. स्टील " कंपनीच्या बोर्डाचा अगदीं अलीकडच्या काळापर्यंत प्रमुख असलेला आयर्व्हिंग एस्. ओल्डस् यानें येल विद्यापीठांत व हार्वर्ड स्कूलमध्यें शिक्षण घेतलें असून तो वकील आहे. " अमेरिकन टेलिफोन अॅन्ड टेलिग्राफ " कंपनीचा निवृत्त झालेला प्रमुख वॉल्टर एस. गिल्फर्ड यानें हार्वर्ड स्कूलमध्यें शिक्षण घेतलें असून तो आंकडेशास्त्रज्ञ आहे. निवृत्तीनंतर त्याला ब्रिटनमधील अमेरिकेचा वकील म्हणूनहि नेमण्यांत आलें होतें. गिफर्डच्या मागून सदर कंपनीचा प्रमुख झालेला लिरॉय विल्सन यानें " रोज पॉलीटेक्निक इन्स्टिटयूट"मध्यें शिक्षण घेतलें असून तो इंजिनियर होता. गिफर्डच्या मृत्यूनंतर त्याची जागा मिझूरो विद्यापीठांत शिक्षण घेतलेल्या क्रिओ एफ्. क्रेगकडे गेली. क्रेग हा इलेक्ट्रिकल इंजिनियर आहे.

'स्टॅडबेकर' कंपनीचा प्रमुख पॉल हॉफमन याच्याकडे तर मार्शल योजनेची अंमलबजावणी करण्याची सर्वांत मोठी अशी राजकीय कामगिरी सोंपविण्यांत आली होती. या कामगिरीनंतर तो फोर्ड संस्थेचा (फोर्ड फौन्डेशन) प्रमुख झाला. फोर्ड संस्थेसारखीच ' कार्नेगी कार्पोरेशन ' नांवाची संस्था असून तिचा प्रामुख्यानें प्राध्यापकांशीं संबंध येतो. या संस्थेचा प्रमुख डेव्हरक्स सी. जोसेफ्स हा सन १९४८ मध्यें " न्यूयॉर्क लाईफ इन्शुरन्स कंपनी"चा अध्यक्ष झाला. याच विमा कंपनीच्या डायरेक्टर बोर्डाचा प्रमुख जॉर्ज लेस्ली हॅरिसन हा वकील असून न्यूयॉर्कच्या फेडरल रिझर्व बँक या निमसरकारी संस्थेचा गव्हर्नर होता.

येथें अमेरिकन जीवनाचें आणखी एक अंग पाहूं. अमेरिकेंत एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत विधायक कार्य करण्याकरितां अनेक खासगी, तसेंच राष्ट्रीय, राज्यनिहाय व स्थानिक संस्था काढण्यांत आल्या आहेत. आणि अशा बहुतेक संस्थांत उद्योगपति सक्रीय व बरेच वेळां प्रामुख्यानें भाग घेतात.

आयोवामधील सिडार रॅपीड्स या शहराचेंच उदाहरण घेऊं. या शहरांतील " सेंच्युरी इंजिनियरींग कंपनी "चा किथ डन हा उपाध्यक्ष आहे. पण या कंपनीचें काम संभाळून तो ' सिडार रॅपीड्स चेंबर ऑफ कॉमर्स'च्या अध्यक्षपदाचेंहि काम पहातो. तसेंच तो कम्युनिटी चेस्टसच्या सभांतूनहि भाग घेतो. त्याचप्रमाणें " गॅरन्टि बँक अॅन्ड ट्रस्ट कंपनी"चा अध्यक्ष व्हॅन व्ही. शॉफर हा चेंबर कोऑर्डीनेटिंग कमिटीचा प्रमुख, क्रू कॉलेजचा चिटणीस, सिडार रॅपीड्स कम्युनिटी फौंडेशनचा अध्यक्ष, स्थानिक हेल्थ कौन्सिलचा प्रमुख व आयोवा हेल्थ कौन्सिलचा सभासद असून शिवाय सेन्ट ल्यूक्स

हॉस्पिटल वगैरे इतर कांहीं संस्थांना आर्थिक मदत मिळवून देतो. थोडक्यांत आपल्या रोजच्या वेळेपैकीं एकतृतीयांशाहूनहि अधिक वेळ तो समाजकार्यास देतो. उद्योगपतींनीं दवाखान्यांच्या, शाळाकॉलेजांच्या किंवा धर्मादाय बोर्डांवर असणें किंवा त्यांच्या बायकांनीं स्त्रियांचे क्लब, पालकशिक्षक संघ वगैरेंत भाग घेणें यांत नवीन असें कांहींच नाहीं. पण यापैकीं कांहीं संस्था अलीकडे उद्योगपतींच्या सक्रीय मदतीनेंच वाढल्या आहेत, ही गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे. 'ख्रिश्चन सायन्स मॉनिटर' या नियतकालिकाचा संपादक एर्विन डी. केनहॅम यानें या प्रवृत्तीला "स्वखुषीची सामुदायिक वृत्ति" असें नांव दिलें आहे. तो म्हणतो, "या सामुदायिकीकरणांत मार्क्सवादी सामुदायिकीकरणापेक्षांहि कल्पनातीत अधिक तडफदार असें सामर्थ्य आहे."

या अमेरिकन सामुदायिकीकरणाचीं मी दोन उदाहरणें देतो. एक म्हणजे आर्थिक विकास समिति (कमिटी फॉर इकॉनॉमिक डेव्हलपमेंट). ही समिती केवळ व्यापरी हितसंबंध वाढविण्याकडेच लक्ष देते असें नसून आर्थिक घटनांचा व्यापक विचार करते. या समितींत व संशोधन गटांत केवळ कंपन्यांचेच प्रमुख नसून विद्यापीठांतील अर्थशास्त्रज्ञहि आहेत. दुसरी संस्था म्हणजे जाहिरातदार मंडळ (ॲडव्हरटायजिंग कौन्सिल). ल्युईस गॅलँटियर यानें वर्णन केल्याप्रमाणें हें जाहिरातदार मंडळ व्यवसायी लोकांचें असून, चांगल्या शाळा, सुरक्षित रहदारी, आगप्रतिबंधक उपाय, सरकारी रोखेविक्री, क्षयरोग आदिकरून रोगांविरुद्ध मोहीम, वगैरे अनेक बाबतींत राष्ट्राला मार्गदर्शन करतें. एकंदरींत आज अमेरिकेंत सुरळित धंदा व लोकांचें कल्याण हे विभक्त आहेत, असें मानलें जात नाहीं.

अमेरिकन उद्योगधंद्यांतील दुसरा एक प्रवाह म्हणजे वैयक्तिक व्यवस्थापनाऐवजीं सांधिक व्यवस्थापन रुढ होत आहे. उद्योगधंद्यांतील बडीबडीं धेंडें नाहींशी झालीं नसतीलहि. पण अमेरिकन टोबॅको कंपनीचा जॉर्ज वॉशिंग्टन हिल व मॉन्टगोमेरी वॉर्डचा स्युएल ॲव्हेरी यांच्यासारखीं हुकुमशाही धेंडें मात्र दिवसेंदिवस कमी होत आहेत, यांत शंका नाहीं.

या सर्व कंपन्यांत 'स्टँडर्ड ऑईल' कंपनीच्या कामकाजाची पद्धत असाधारण आहे. या कंपनीचे डायरेक्टर कंपनीचे पगारी नोकर आहेत. या डायरेक्टर बोर्डांची बैठक आठवड्यांतून एकदां भरते, तर पांच डायरेक्टरांच्या कार्यकारी मंडळाची बैठक दररोज घेण्यांत येते. एकंदरींत सांधिक कामाचें ही कंपनी आत्यंतिक पण उद्बोधक उदाहरण आहे.

या नवीन प्रकारच्या व्यवस्थापकांचा सार्वजनिक दृष्टिकोन कसा असतो ? जरा सावधगिरीनेंच मत दिलें पाहिजे. चकाकतें तें सर्व सोनेंच असें मानून चालणार नाहीं. तरीसुद्धां एकंदरींत येथेंहि कांहींतरी बदल झाल्याचें दिसून येते. पिटर एफ् ड्रकर यानें म्हटल्याप्रमाणें " परिणामी जें धोरण समाजाच्या फायद्याचें नसतें, तें धंद्यालाहि हितावह ठरत नाहीं, " हें उद्योगपति अनुभवानें शिकले आहेत. या बदलाला महायुद्धहि थोडे-फार कारणीभूत आहे. युद्धानें उद्योगपति, सरकारी नोकर, कामगार पुढारी, विज्ञान-शास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ व इतर अनेक व्यवसायी मंडळींना एकत्र आणून त्यांच्यांत एकमेकांची पात्रता व दृष्टिकोन समजावून घेण्याची वृत्ति निर्माण केली. अर्थात् आमचे सर्व उद्योगपति सद्गुणांचे पुतळे बनले आहेत, असें मला म्हणावयाचें नाहीं. पण " सेन्ट लुई पोस्ट डिस्पॅच "चा राल्फ कॉघलॅन यानें त्यांचें सन १९५१ मध्यें जें वर्णन केलें तें मला समर्पक वाटतें. कॉघलॅन म्हणतो,

" पूर्वीं अंतःकरणशून्य कंपन्या ही संज्ञा अगदीं रुळली होती. पण माझ्या हयातींतच या बाबतींत एक ठळक बदल झाला आहे. समाईक कंपन्या आतां सहृदय झाल्या आहेत, कीं नाहींत हें ठाऊक नाहीं. पण त्या निदान चाणाक्ष बनल्या आहेत, यांत वादच नाहीं. "

४

आजची अमेरिकन समाईक कंपनी मग ती लहान असो वा मोठी असो, केवळ एक आर्थिक घटकच नसून एक राजकीय घटकहि आहे. तीमधील नोकरवर्गाला निदान कामाच्या वेळांत तरी सरकारी सत्तेपेक्षां आपल्यावर कंपनीचीच सत्ता आहे, याची अधिक जाणीव असते. कंपनींतील वरिष्ठ अधिकारी मग तो अध्यक्ष असो कीं खात्याचा प्रमुख असो किंवा सुपरवायझर व फोरमन यापैकीं कोणीहि असो, तो म्हणजे त्यांना राज्याचा गव्हर्नर किंवा नगराध्यक्ष यापेक्षां अधिक नजीकची कार्यकारी सत्ता वाटते. आणि नगरपालिकेच्या किंवा सरकारच्या कायद्यांपेक्षां कारखान्यांतील नियमांचेंहि त्यांच्या जीवनाच्या व हक्कांच्या दृष्टीनें अधिक महत्त्व. हे नियम मालकांनीं केलेले असोत कीं मालक व कामगार संघटना यांच्यामधील करारानें अंमलांत आलेले असोत, त्यांचा नोकरांच्या कुटुंबाशींहि अप्रत्यक्ष संबंध पोहोंचतो.

आणि समाईक कंपन्या म्हणजे एका अर्थीं सामाजिक घटकहि होत. ओहायोहून फिलाडेल्फीयाला नोकरीकरितां आलेली मुलगी–तिला कंपनींतील आपल्या सहकाऱ्यांत

किंवा मित्रांतच आपला भावी पति मिळूं शकेल, याची तीव्र जाणीव असते. आपल्या इतर सहकारी मुलींबरोबर मधल्या सुटींत ती बाहेर उपहाराकरितां जाते, तेव्हां हळुहळू तिचा एका नवीन समाजांत प्रवेश होत असतो.

समाईक कंपनीला एका समाजाचें स्वरूप येणें हें बऱ्याच गोष्टींवर अवलंबून रहातें. एक म्हणजे तेथें एकत्र काम करणाऱ्या लोकांतील सामाजिक एकजिनसीपणा; दुसरी गोष्ट म्हणजे ज्या गांवांत सदर कंपनी असते, तेथें तिचें वर्चस्व आहे किंवा काय; तिसरी गोष्ट म्हणजे कंपनींतील बहुतेक नोकर लोक उपनगरांत रहाणारे असतात कीं नसतात, आणि चौथी गोष्ट म्हणजे कंपनीच्या इतर नोकरांबरोबर संबंध ठेवण्याबाबत अधिकाऱ्यांचें अनुकूल वा प्रतिकूल दडपण येते कीं काय? (बाहेरच्या लोकांशी संबंध ठेवणें अधिक हिताचें असून, सहकारी नोकरांबरोबर जेवणें म्हणजे व्यावसायिक आत्महत्या असेंहि कोणीतरी म्हटलें आहे). आमच्या बहुतेक कथा-कादंबऱ्यांतून जीवनाचें जें चित्र रंगविण्यांत येतें, त्यापेक्षां समाईक कंपन्यांतील सामाजिक जीवन हें अमेरिकन परिस्थितींतील अधिक महत्त्वाचें अंग आहे, असें एकंदरींत म्हणतां येईल. आणि कथा-कादंबऱ्यांतून हें जीवन रंगविणारे आहेत तरी कोण? तर ज्यांनीं त्याचा अनुभव घेतलेला नाहीं असे लेखक किंवा ज्यांनीं त्यांचा अनुभव घेतला आहे, पण स्वाभाविक अभिमानामुळें या जीवनाच्या विचारानें ज्यांचा पोटशूळ उठतो, असे लोक.

कांहीं समाईक कंपन्यांत या सामाजिक रचनेला मजेदार स्वरूप आलेलें असतें. सन १९५१ मध्यें ‘ फॉर्च्युन ’ या नियतकालिकानें दोन लेख प्रसिद्ध केले होते. त्यांत अधिकाऱ्यांच्या बायकांवर, समाजांत वागतांना पाळाव्या लागणाऱ्या कडक रीतिरिवाजामुळें, कसें दडपण पडतें, हें नमूद केलें आहे. असें दिसतें कीं, कांहीं कंपन्या तर आपले अधिकारी-त्यांच्या बायका कंपनीच्या सामाजिक जीवनांत योग्य रीतीनें सामावूं शकतात, असें आढळून आल्याशिवाय-निवडत नाहींत किंवा त्यांना बढति देत नाहीं.

कंपनींतील या सामाजिक जीवनांत कामगार संघटनेचें स्थान मात्र विसंवादी असतें. कामगार संघटनेला मूलतःच व्यवस्थापक-विरोधी, कंपनीविरोधी व धंदेविरोधी भूमिका घ्यावी लागते. कामगार पुढाऱ्याची परिस्थिति फार चमत्कारिक असते. ज्या सुधारणांसाठीं तो झगडत असतो त्या तो स्वतः अंमलांत आणूं शकत नाहीं. यामुळें त्याला आपल्या गाऱ्हाण्यांचें भांडवल करावें लागतें, अविश्वास चेतवावा लागतो आणि संपाचें

हत्यार सदैव परजून ठेवावें लागतें. ज्या कंपनीविरुद्ध लढा असेल त्या कंपनीला या संपाचा उपसर्ग पोहोंचतोच, पण ज्यांचा झगड्याशीं संबंध नाहीं, अशांनाहि त्याची झळ लागते.

संपाचा अधिकार हा आजच्या औद्योगिक समाजांतील मूलभूत स्वातंत्र्यापैकीं आहे, हें कोणीहि मान्य करील. त्याचप्रमाणें कामगार संघटना व त्यांचे पुढारी यांनीं रहाणीचें सर्वसाधारण मान सुधारण्यांत महत्त्वाचें कार्य केलें आहे व करत आहेत हेंहि कबूल करणें भाग आहे. त्यांनीं कंपन्यांतील कामासंबंधीचे जे कायदे करावयास लाविलें, त्यामुळें परिस्थिति खूपच सुधारली आहे. तसेंच सर्वांच्या हिताच्या दृष्टीनें कंपन्यांच्या आर्थिक व्यवहारांत संघटनेलाहि अधिकार असला पाहिजे, हेंहि वादातीत आहे. पण एकदरींत सार्वत्रिक ऐक्याची प्रवृत्ति दिसत असतांना उद्योगधंद्यांत मात्र मालक व कामगार यांनीं परस्पराविरुद्ध दंड ठोकून उभे रहावे, ही आमच्या औद्योगिक जीवनांतील एक विसंगतिच होय.

समाधानाची गोष्ट म्हणजे, अशा परिस्थितींतहि आज अमेरिकेंत आढळून येतात तशा अनेक अत्यंत कर्तबगार व जबाबदार अशा कामगार संघटना आहेत. तसेंच मालक व कामगार संबंधांच्या वाटाघाटींत दोन्ही पक्ष समजूतदारपणें वागत असल्याचें अनेक वेळां दिसून येतें. विमान अपघाताप्रमाणें संपांच्या बातम्यांना नेहमींच भडक प्रसिद्धि मिळते. पण असें अपघात व संप क्वचितच होतात. याउलट दैनंदिन अशा विमानांच्या ज्या हजारों फेऱ्या चालू असतात, त्यांना मात्र वर्तमानपत्रांत प्रसिद्धि मिळत नाहीं. तीच गोष्ट हरहमेश मालक–कामगारांमध्यें होणाऱ्या शेंकडो करारांची आहे. ब्रिटिश उत्पादन अभ्यास मंडळाच्या (ब्रिटिश प्रॉडक्टिव्हिटी टीम) अहवालांत अमेरिकेंतील मालक व कामगार उत्पादन वाढीसाठीं व कारभार सुधारण्याकरितां कसें सहकार्य करतात, याचा वारंवार उल्लेख आढळून येतो. या सहकार्याचें एक कारण म्हणजे आपली निष्ठा लढ्यांत कसाला न लावतां अधिक चांगलें काम देऊन अधिक सुख घेता येतें, हें व्यवहारी लोकांना पटलें आहे.

या जाणीवेमुळें अलीकडच्या काळांत संपाचें स्वरूप बदलत असल्याचें अलीकडे दिसून येऊं लागले आहे. अलीकडच्या काळांतहि भयंकर व प्रक्षोभक संप झाले, पण ते अपवादात्मकच. पूर्वींच्या संपांत व आजच्या बाकीच्या संपांत त्या दृष्टीनें मोठीच तफावत दिसून येते.

मध्यंतरीं मालक व कामगार यांच्यांतील विरोध कमी होऊन नवीन रचना अंमलांत येण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. सध्यां कामगारांचें वेतन हें उत्पादनाशीं निगडित करण्यांत आलें आहे. उत्पादन वाढीवर भर देणारी अशी अभिनव पारितोषकांची प्रथा सुरू करण्यांत आली आहे. नफ्यांत नोकरवर्गाला भागीदारी देणाऱ्या कंपन्यांची संख्या वाढत आहे व त्याचा आश्चर्यकारक सुपरिणाम दिसून येत आहे. त्याचप्रमाणें नोकरवर्गाला व जनतेला विश्वासांत घेण्याची अधिकाऱ्यांच्या ठिकाणीं तीव्र इच्छा दिसून येते. तसेंच कामगारांच्या सुखदुःखाची जी वारंवार पहाणी करण्यांत येते, तिचा अनुकूल परिणाम दिसून येऊं लागला आहे. कदाचित् पुढच्या पिढीपर्यंतच कामगार संघटनेचें विरोधी स्वरूप जाईल व ती म्हणजे अमेरिकन उद्योगधंद्यांच्या संघटनात्मक यंत्रणेचें प्रभावी अंग बनेल, असें वाटतें.

---

# प्रकरण १७ : काळाचा महिमा

हार्वर्ड विद्यापीठाचा अध्यक्ष ए. लॉवेल हा एक अत्यंत ओजस्वी वक्ता होता. कोणतीहि पूर्वतयारी न करतां, तो सार्वजनिक मेजवानीसारख्या प्रसंगीं उपस्थित राही, दोनतीन वक्त्यांचीं भाषणें ऐकून घेई व त्यांच्या भाषणावर मार्मिक कोट्या करीत करीत, आपल्या ओघवती वक्तृत्वशैलींत सुंदर समारोप करी. त्यांचा अमोघ वक्तृत्वाचें एक रहस्य म्हणजे अशा प्रसंगीं करावयाचीं अनेक वक्तव्यें त्याला तोंडपाठ असून त्यांत प्रसंगानुसार वैचित्र्य आणण्याची सुंदर कला साधली होती. व्याख्यानांचा त्याचा एक आवडता विषय म्हणजे ग्रीस व कार्थेज यांची तुलना. या दोन्ही संस्कृति एके काळीं वैभवाच्या शिखरावर होत्या. लॉवेल असें प्रतिपादन करी कीं; "या दोन्ही संस्कृतीपैकीं ग्रीसची संस्कृति टिकली असून आजहि तिचा सर्वांवर प्रभाव आहे. याउलट कार्थेजची संस्कृति ही व्यापारी संस्कृति असून तींत ज्ञानार्जन, तत्त्वज्ञान व कला यांना फारसें स्थान नव्हतें." भाषणाच्या ओघांत लॉवेल श्रोत्यांपुढें, "अमेरिकेचें कार्थेज होणार काय ?" असा सवाल टाकून विद्यापीठांचें मूलगामी व शाश्वत महत्त्व श्रोत्यांना अस्खलित वक्तृत्वांत विशद करी.

अमेरिका म्हणजे प्रति-कार्थेज असें समजणारे लोक पुष्कळ होते व अद्यापहि आहेत. गेल्या पन्नास वर्षांत रहाणीचें मान सुधारलें असलें तरी एकंदरींत अमेरिका कार्थेजच्या वाटेनें जात आहे, असें या लोकांना वाटतें. हे लोक म्हणतात, आज अमेरिका अफाट प्रमाणावर बाजारी संस्कृति प्रसवत आहे; या संस्कृतींत धर्म व तत्त्वज्ञान यांना ओहोटी लागली आहे; सामुदायिक करमणुकीच्या अमानुष मागणीमुळें कलेची कळचेपी होत आहे; व सामुदायिक मतांच्या निर्जीव दडपणाखालीं स्वातंत्र्याचा कोंडमारा होत आहे. थोडक्यांत या संस्कृतींत अध्यात्म प्रवृत्तीचा ऱ्हास होत आहे. अमेरिकेंत आज पुष्कळ लोक असे आहेत कीं ज्यांना अलीकडे आध्यात्मिक विकास करुन घेणें अधिक कठीण झालें आहे, असें वाटतें. आध्यात्मिक शांतीविना तांत्रिक व आर्थिक प्रगति व्यर्थ आहे, असें ते मानतात.

आजच्या अमेरिकन संस्कृतीविरुद्ध जे आक्षेप घेण्यांत येतात, त्यापैकीं कांहींचा विचार करण्याचीहि जरुरी नाहीं. उदाहरणार्थ पुष्कळांना भूतकाळ व वर्तमानकाल यांची तुलना करून भूतकाळाचे गोडवे गाण्याची संवयच असते. आजच्या अमेरिकन

जीवनाचें वैशिष्ठय म्हणजे लोकांपुढील संधीचें क्षेत्र अधिकाधिक विशाल होत आहे; पण नेमक्या याच वस्तुस्थितीशीं जुळतें घेण्याचें लोकांना कठीण पडतें.

या बाबतींत 'ट्वेन्टीएथ सेंचरी अन्‌लिमिटेड' या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेंत ब्रूस ब्लिव्हन यानें व्यक्त केलेलें मत उध्दृत करण्याजोगें आहे. ब्लिव्हन म्हणतो, "सन १९५० च्या आरंभी अनेक वर्तमानपत्रांनीं व नियतकालिकांनीं सन १९०० नंतरच्या काळाचा आढावा घेणारे विस्तृत लेख प्रसिद्ध केले. या लेखांतून मॅकीनलीच्या कारकिर्दीतील विचित्र पोषाख, आंखडबाज मिशांचे तमासगीर व चिखलांतून धडपडत जाणाऱ्या आरंभींच्या मोटारी वगैरे अनेक विपुल चित्रें होतीं. पण या काळांत नैतिक वातावरणांत जो वैशिष्ठ्यपूर्ण बदल होत गेला, त्याची मात्र कोणीच दाद घेतली नाहीं. हा बदल म्हणजे ओसंडून चाललेला आशावाद जाऊन निराशवादाचा प्रसार.

"हें जग कल्पनेबाहेर उत्कृष्ट आहे व तें मिनीटागणिक सुधारत आहे, अशी अर्ध शतकापूर्वीं जगभर विशेषतः अमेरिकन लोकांची समजूत होती. परमेश्वराची करणी अगाध आहे-पण एकंदरींत तो मानवजातीचें कल्याण, सुख व सतत प्रगति यांची काळजी वहातो, अशी लोकांची श्रद्धा होती."

ब्लिव्हन पुढें म्हणतो, "पण आज ही श्रद्धा मावळली आहे. युद्धें, अणूबॉंब यामुळें आपण नामशेष होऊन जाऊं कीं काय, अशी लोकांनीं धास्ती घेतली आहे. सार्वत्रिक हत्याकांडांत मानवी समाजाची अधोगति होणार, अशी त्यांना चिंता वाटूं लागली आहे."

याचा अर्थ आपण पाखंडी बनलो आहोंत काय? आपली सुकाणू नसलेल्या नौकेसारखी स्थिति झाली आहे का?

चर्चमध्यें जाणाऱ्यांची आंकडेवारी या प्रश्नाचें उत्तर देण्यास उपयुक्त ठरत नाहीं. लोकसंख्या ज्या प्रमाणांत वाढत गेली, त्या प्रमाणांत चर्चमध्यें जाणाऱ्यांची संख्याहि वाढली आहे. पण बरेच लोक असे असतात कीं जे चर्चच्या यादींत नांवें देतात, पण प्रत्यक्ष चर्चमध्यें अपवादात्मक प्रसंगाशिवाय जात नाहींत. माझी स्वतःची मात्र खात्री आहे कीं चालू अर्धशतकाच्या पहिल्या तीस चाळीस वर्षांत, चर्चमध्यें जाणाऱ्यांची संख्या रोडावत गेली. इतकेंच नव्हे तर या तीस चाळीस वर्षांत लोकांची धर्मावरील श्रद्धाहि कमीकमी होत गेली. शास्त्रीय-विज्ञानांत विशेषतः उत्क्रांतीच्या सिद्धांतांत परमेश्वराला स्थान नाहीं, असें लोकांना वाटूं लागलें होतें. चर्च जुन्या जमान्यांतील असून,

जग त्या मानानें फार पुढें गेलेलें आहे, असें लोक म्हणत. चर्चमध्यें जाण्यापेक्षां तो वेळ करमणुकींत काढणें अधिक श्रेयस्कर अशी प्रवृत्ति होऊं लागली होती.

रूढ धर्मांविरुद्धची ही भावना प्रचलित असो वा नसो, पण सन १९४० नंतर या देशांत एक प्रति चळवळ सुरू झाल्याचें दिसून आलें. लोकांना विशेषतः आपद्प्रसंगीं आपल्या जीवनांत कशाची तरी उणीव आहे, असें वाटूं लागलें होतें. अशा वेळीं त्यांना मनाला शांतता व सुरक्षितता देणारें कांहीं तरी श्रद्धास्थान हवें असतें. 'दि रोब', 'दि कार्डिनल', 'पीस ऑफ मांईड', 'दि सेव्हन स्टोरे मौंटन' यासारख्या धार्मिक पुस्तकांवर लोकांच्या ज्या उड्या पडूं लागल्या होत्या, त्यावरून लोकांची त्यासंबंधींची उत्कंठा व जिज्ञासा यांची प्रचीति येते. कांहीं लोकांनीं पुनः चर्चमध्यें जाण्यास सुरुवात केली तर बरेच नवे लोकहि चर्चकडे वळले. बऱ्याच कुटुंबांत तर यावेळीं गमतीदार प्रकार दिसून आले. या कुटुंबांतील ज्या आईबापांनीं धर्म ही बुरसटलेली बाब समजून चर्चमध्यें जाण्याचें सोडलें होतें, त्यांनाच आपलीं मुलें आपल्या पाखंडी-पणाविरुद्ध बंडाचा झेंडा घेऊन उभी राहिलीं असल्याचें दिसून आलें. अर्थात ही नवी लाट जुन्या लाटेपेक्षां कितपत जोरदार होती तसेंच ती कितपत टिकणारी होती, हें या अर्धशतकाच्या शेवटीं स्पष्ट झालेलें नव्हतें. पण एकंदरींत धार्मिक प्रवाहांत व संवयींत बराच गोंधळ निर्माण झाला होता, हें नक्की.

मध्यंतरीं ज्या कुटुंबांनीं चर्चशी संबंध सोडला होता, त्यांच्या बाबतींत एक वेगळाच प्रकार दिसून आला. चर्चशी फारकत झाल्यामुळें मुलांचा शिक्षणाचा एक सोज्वळ मार्ग नाहींसा झाला होता. कांहीं कुटुंबांत स्वतः आईबापांनींच ही उणीव भरून काढली. पण इतर अनेकांना तें जमलें नाहीं. मुलांना बायबलमधील वचनें तर कळत नाहींतच, इतकेंच नव्हे तर साधे नीति-नियमहि माहीत नाहींत, असा या आईबापांना अनुभव आला. या कुटुंबांच्या निरीक्षकांनीं, खरोखरीच नैतिक ऱ्हास झाला आहे, असा निष्कर्ष काढला असता तर त्यांत चूक काय झाली असती ?

पण असा निष्कर्ष काढणें जरा धाडसाचेंच होतें. रुढ धर्मांशी संबंध नसल्यामुळें पुष्कळ लोकांचा नैतिक पाया डळमळीत असेलहि, पण त्याचा अर्थ सार्वत्रिक आध्यात्मिक अधोगति झालीं, असें मात्र दिसून आलें नाहीं. उलट या सर्व काळांत लोकांत जो एक बदल घडून आला होता, तो अधिक महत्त्वाचा वाटतो. लोक आपल्या शेजाऱ्यांविषयीं अधिकाधिक उदार दृष्टिकोन व्यक्त करूं लागले होते.

या अर्ध शतकांतील इतर अनेक गोष्टीहि उल्लेखनीय आहेत. राष्ट्रीय उत्पन्नाची कल्पना पुढें येऊन या उत्पन्नाच्या विभागणीचाहि विचार करण्यांत येऊं लागला. प्रत्येक व्यक्तीच्या आर्थिक हालचालींचा राष्ट्रीय उत्पन्नावर कसा परिणाम होतो, हें पहाण्यांत येऊं लागलें. अमेरिकेंतील निरनिराळ्या गटांच्या सामाजिक परिस्थितीची पहाणी करण्याबाबत सार्वत्रिक आस्था दिसून येऊं लागली. शिक्षणांत सर्वांना सारखाच वाव मिळाला पाहिजे हें तत्त्व मान्य करण्यांत आलें. नीग्रोसारख्या प्रतिकूल परिस्थितींत असलेल्या लोकांविषयींच्या दृष्टिकोनांत कसा अनुकूल फरक पडत गेला, हें आपण पूर्वी पाहिलेंच आहे. तसेंच मोठमोठ्या कारखान्यांतील व्यवस्थापकांनाहि सर्वसामान्य लोकांविषयीं आपलें कांहींतरी कर्तव्य आहे, असें वाटूं लागलें. पुष्कळ स्त्रीपुरुष बहुविध विधायक कार्यांना जो वेळ देऊं लागले, त्याचें तर मोजमाप करणें अशक्य आहे. कांहीं कांहीं ठिकाणीं तर चर्चमध्यें जाणाऱ्या लोकांपेक्षां चर्चकरितां निधि गोळा करणाऱ्यांचीच संख्या अधिक आहे, असेंहि मला सांगण्यांत आलें.

अर्थात् या बदलाला कोठें कोठें तीव्र विरोध व्हावा, हें स्वाभाविकच होतें. लोकशाही तत्वप्रणालीमुळें मानवजातीच्या सहिष्णुतेवर व समजूतदारपणावर मोठाच ताण पडतो. आजहि अमेरिकेंत बऱ्याच ठिकाणीं भेदाभेद दिसून येतो. उपनगरांतून आशियाई लोकांविरुद्ध, औद्योगिक शहरांतून नीग्रोविरुद्ध जाणूनबुजून भेद केला जातो. लष्करांतील अनेक अमेरिकनांनाहि या भेदाभेदाच्या भावनेनें पछाडलें आहे.

पण या प्रतिकूल परिस्थितींतहि, डॉ. फ्रॅन्क टॅननबॉम यानें म्हटल्याप्रमाणें "आपण समानतेच्या...आध्यात्मिक समानतेच्या भावनेला बद्ध झालों आहोंत," ही जाणीव वाढत्या प्रमाणांत दिसून येते. मग या भावनेला धार्मिक भावना म्हणा नाहींतर इतर कांहींतरी नांव द्या. आम्ही अमेरिकन लोक समुच्चयानें "आपला प्रभु-परमेश्वर याच्यावर प्रेम कर" ही पहिली पवित्र आज्ञा कदाचित् पूर्वीप्रमाणें निष्ठेनें पाळत नसूं, पण "स्वतःइतकेंच शेजाऱ्यांवर प्रेम कर," ही दुसरी पवित्र आज्ञा मात्र आम्ही खपच आचरणांत आणीत आहोंत, हें वादातीत आहे.

## २

आतां आपणांपुढें दुसरा प्रश्न उपस्थित होतो. पंधराव्या प्रकरणांत मी ज्या सर्वंकष अमेरिकन रहाणीचा व संस्कृतीचा उल्लेख केला आहे, त्यामुळें दर्जा खालावला आहे

काय ? आज अमेरिका दुय्यम दर्जाचें शिक्षण, दुय्यम दर्जाची संस्कृति, दुय्यम दर्जाची विचारसरणीच भाराभर निर्माण करत आहे कां ?

प्रख्यात लेखक टी. एस्. एलियट म्हणतो, " आपला आजचा काळ अवनतीचा आहे. पन्नास वर्षांपूर्वीपेक्षां आज संस्कृतीची अधोगति झाली आहे. ही अधोगति मानवी जीवनाच्या प्रत्येक विभागांत दिसून येते. " कोणी विचारील हा झाला सर्व-साधारण आक्षेप, यांत अमेरिकेचा उल्लेख कोठें आहे ? पण एलियटला अमेरिकन प्रवाहहि पसंत नव्हता, याबद्दल अनेक उदाहणें देतां येतील. त्याला स्वतःला, ज्यांत खालचा वर्गहि अस्तित्वांत आहे, अशी क्रमशः समाजरचना हवी होती.

आजचे लेखक, चित्रकार, संगीतज्ञ, शिल्पकार, तत्वज्ञ, बौद्धिक व आध्यात्मिक नेते वगैरे प्रतिभासंपन्न लोकांना–यूजीन ओं'नीलच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे–अवकळा आली आहे, अशी टीकाकारांनीं जी टीका केली आहे, तिचा एक डोंगरच होईल. लॉईड मॉरीसच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे " जुन्या कल्पनेंतील परमेश्वराचा मृत्यु व नवीन परमेश्वर निर्माण करण्याच्या बाबतींत शास्त्रीय विज्ञानाची व आधि-भौतिकवादाची दिवाळखोरी यामुळेंच ही अवकळा आली होती. " या आरोपाचें तात्पर्य काय तर अफाट उत्पादनाच्या तडफदार सिद्धांतामुळें चांगल्या चांगल्या मोटारी व उंची कृत्रिम रेशीम यांची पैदास होऊं लागली, पण बौद्धिक मालाचा दर्जा मात्र खालावत गेला.

हा आरोप अर्थातच फार गंभीर आहे. पण त्याचें खंडन करण्यापूर्वी इतर अनेक गोष्टींचा विचार केला पाहिजे.

पहिल्या महायुद्धापूर्वीच्या नजीकच्या काळांत, अमेरिकन वाङ्मयांत निराशावादी दृष्टिकोन दिसून येत नव्हता. व्हेशेल लिंडसे, एडगर ली मास्टर्स, शेरवूड ॲन्डरसन, रिंग लार्डनर, कार्ल सॅन्डबर्ग वगैरेंच्या लिखाणांत कणखर आशावाद भरलेला होता. याच काळांत मॅक्स ईस्टमन व जॉन रीड यांनीं कामगारांच्या हक्कांचा, तर फ्लाईड डेलनें वाङ्मय स्वातंत्र्याचा जोरानें पुरस्कार चालविला होता. एकंदरींत त्यांच्यापुढें नव्या उज्ज्वल जगाचें चित्र उभें होतें.

पण पहिल्या महायुद्धानें मोठीच निराशा केली. लोकांच्या अपेक्षेप्रमाणें नव्या युगाची सुरवात यावेळीं झाल्याचें दिसलें नाहीं. साहजिकच प्रचलित मनोवृत्तींत पालट झाला. त्या वेळच्या कादंबरीकारांनीं समकालीन जीवनांतील क्षुद्रता व क्रौर्य रंगविण्या-

वरच भर दिला. एकंदरींत त्यांचा सूर निराशावादीच असे. मेन् केन, सिंक्लेअर लेवीस, स्कॉट फिट्झजीराल्ड, हेमिंगवे यांच्या कादंबऱ्या त्याच्या द्योतक आहेत.

या निराशावादाचा पगडा बराच काळ टिकला. त्यानंतर सन १९३० पासून आणखी एक भावनात्मक लाट आली. आर्थिक रचना ढांसळली होती, क्रांति हवेंत दरवळत होती (निदान अनेकांना त्या वेळीं तसें वाटत होतें,) व साहजिकच या वेळच्या अनेक लेखकांनीं निराशावाद टाकून लढाऊ बाणा पत्करला. याचा परिणाम म्हणजे कारखान्यांतील कामगार जीवनाचें ज्यांचें ज्ञान अगदींच मर्यादित, अशा कादंबरीकारांच्या कामगार जीवनावरील कादंबऱ्यांमागून कादंबऱ्या बाजारांत येऊं लागल्या. पण कामगार जीवनावर लिहिणारे हे कादंबरीकार, त्यांची भाषा मात्र कामगारांना दुर्बोध असे.

दुसऱ्या महायुद्धांत कामगारांचें समर्थन करण्याची प्रवृत्ति मागें पडून त्या ठिकाणीं लष्करी अरेरावीविरुद्ध सैनिकांची बाजू घेण्याची प्रवृत्ति आली. या वेळीं जगाचें उदास चित्र रंगविण्याच्या ऐवजीं लढायावर गेलेलीं माणसें किती रानटी बनतात, हें रंगविण्याची प्रवृत्ति दिसूं लागली. कांहीं अगदीं थोडे लोक सोडले तर इतर साऱ्यांना गुणाचें मोल वाटत नाहीं, या समजामुळें संस्कृतीच्या भवितव्याविषयीं निराशावाद पसरला. या निराशावादामुळें कशाहि प्रकारचें कां होईना सुसंस्कृत जीवन येवो, मग त्यासाठीं पराभव झाला तरी हरकत नाहीं, अशी विचारसरणी दृढ झाली.

डब्ल्यू. एच्. ऑडेन म्हणतो, " विद्यमान अमेरिकन कादंबरीकारांना,...तुम्ही फक्त दोन महायुद्धांच्या काळांतच उत्कृष्ट वाङ्मय निर्माण केलें आहे, असें उघड सांगणें मोठें काम आहे. माझें असें ठाम मत आहे कीं कोणाहि साहित्यिकानें कोणात्याहि काळांत व कोठेंहि आपल्या साहित्यांत इतका निराशावाद प्रगट केला नसेल. अमेरिका म्हणजे सर्वांत आशावादी, सर्वांत दिलदार व सर्वांत स्वतंत्र बाण्याचें राष्ट्र आहे, अशी जगभर ख्याति आहे. आणि याच राष्ट्रानें, आपल्या साहित्यिकांचा चष्मा डोळ्यांना लावून स्वतःला असाहाय्य लोकांचें, लफंग्यांचें व निर्वासितांचें राष्ट्र समजावें यापेक्षां अधिक आश्चर्याची गोष्ट कोणती ? "

अलीकडच्या काळांत, अमेरिकेंत कादंबऱ्यांचा खप निराशाजनक असल्याचें दिसतें. याचें एक कारण म्हणजे समकालीन वाचकांत विरक्ति यावयाच्या ऐवजीं लेखकांतच विरक्ति आली आहे. आज कदाचित् लेखकांपेक्षां वाचकच आघाडीवर असावेत !

दुसरी गोष्ट म्हणजे, दुर्बोध लिखाण म्हणजे चांगलें लिखाण अशी अनेक पुढारलेल्या लेखकांनीं जी कल्पना करून घेतली आहे, तीमुळें असंख्य सामान्य वाचकांशीं समरस होण्याच्या कलेकडे त्यांचें दुर्लक्ष झालें आहे. एकंदरींत साहित्यिकांत जी पराभवी वृत्ति फैलावली आहे, तीमुळें अमेरिकन संस्कृतीच्या भवितव्याविषयीं जे निष्कर्ष काढण्यांत आले आहेत, ते मान्य करणें अपरिहार्य झाल्यास आश्चर्य तें काय ?

एक दशकापूर्वी नियतकालिकें ग्रंथकर्त्यांना जो मोबदला देत असत, त्यापेक्षां आतां अधिक देऊं शकत नाहींत, हें मला स्वानुभवावरून माहीत आहे. याचें एक कारण म्हणजे या नियतकालिकांना आपल्या नोकरींत असलेल्या लोकांना पूर्वीपेक्षां कितीतरी अधिक वेतन द्यावें लागतें. अफाट खपाच्या नियतकालिकांचें यश आणि स्वतः संपादकीय वर्गाचेंच लिखाण असलेल्या नियतकालिकांचा उदय यामुळें ज्यांच्या लेखनांत लोकवाङ्मयीन गुणांचा अभाव आहे किंवा ज्यांना मागणी तसा पुरवठा या नात्यानें लिखाण लिहून लोकांना खूष करतां येत नाहीं, अशा लेखकांना–उत्पन्नाचा दुसरा हमखास मार्ग नसेल तर सुस्थितींत जगणें कठीण झालें आहे, हें खरें आहे. पण तसें पाहिलें तर लेखकांचे आर्थिक प्रश्न कधींच सोपे नव्हते. आज चांगलीं नियतकालिकें चालविणें अवघड जातें, याचें कारण त्यांना उच्च दर्जाचें लिखाण हमखास मिळूं शकत नाहीं. गेल्या कांहीं वर्षांपासून अशा तऱ्हेचें लिखाण मोठ्या खपांच्या नियतकालिकांतूनहि येऊं लागलें होतें. दुसरी गोष्ट म्हणजे आपल्या तत्त्वांना बाध न आणतां अशा मोठ्या खपांच्या नियतकालिकांतून लिखाण करून चांगली कमाई करणाऱ्या लेखकांची संख्याहि पूर्वीपेक्षां खूप अधिक आहे.

तीच गोष्ट पुस्तकांची. नव्यानें लिहिलेल्या व योग्य किंमतींत पुस्तकांच्या दुकानांतून विकल्या जाणाऱ्या मूळ पुस्तकांचा खप महायुद्धापूर्वीच्या काळापेक्षां कांहींसा जास्त आहे. पण मजूरीचे दर वाढल्यामुळें पुस्तकांच्या किंमती वाढल्या व त्यामुळें अनेक ग्रंथप्रेमी लोक पुस्तकें घेण्यास कचरूं लागले. यशस्वी लेखकांचा एकंदर मुशाहिऱ्यांतील हिस्सा वाढला, पण ज्यांचीं पुस्तकें जेमतेम कांहीं हजार खपतात, त्यांची परिस्थिति मात्र जरा बिकट झाली. (यांत बहुतेक सारे कवि येतात.) पण या बाबतींतहि परिस्थिति जितकी वाईट रंगविण्यांत येतें, तितकी ती खास वाईट नाहीं.

आणि अवघे २५ तें ३५ सेंट या दरानें विकलीं जाणारीं तीं कागदी बांधणीचीं पुस्तकें–त्यांच्या खपांत तर आश्चर्यकारक वाढ झाली आहे. सन १९५० मध्यें अशीं

एकंदर पुस्तकें २१ कोटि ४० लाख खपलीं, तर १९५१ मध्यें हाच खप २३ कोटि १० लाखांवर गेला होता !

या कागदी बांधणीच्या पुस्तकांपैकीं दोनतृतीयांश पुस्तकें म्हणजे कादंबऱ्या व रहस्यकथा होत्या. कांहीं पुस्तकें तर अगदींच भिकार होतीं. लैंगिक उन्माद किंवा अत्याचार किंवा दोन्हीहि दर्शविणारीं चित्रें पुस्तकांवर छापलीं कीं पुस्तक खपतें, हें कांहीं प्रकाशक अनुभवानें शिकले आहेत, असें एकानें मार्मिक उद्गार काढले आहेत. तरीहि कांहीं कागदी बांधणीच्या पुस्तकांचे खप (जानेवारी १९५२ मधील) लक्षांत घेण्याजोगें आहेत. टेनेसी विल्यमसचें ' ए. स्ट्रीटकार नेम्ड डिझायर ' हें नाटक-खप पांच लाखांवर; जॉर्ज ऑर्वेलचें ' नायन्टीन एटीफोर ' खप साडेसात लाखांवर; नॉर्मन मेलरचें ' दि नेकेड ॲन्ड दि डेड ' खप साडेबारा लाखांवर; रुथ बेनेडिक्टचें ' पॅटर्न ऑफ कल्चर ' खप चार लाख. इतकेंच काय पण ऑडिसी या उत्कृष्ट ग्रीक कलाकृतीच्या व मुखपृष्ठावर गूढ चित्र असलेल्या अनुवादाच्या ३,५०,००० प्रति खपल्या. बुकक्लब व नेहमींची पुस्तकांचीं दुकानें यामधील या पुस्तकांच्या नेहमींच्या विक्रीशिवाय हा खप आहे व तोहि मासिकांना अफाट वाचक असलेल्या राष्ट्रांत, ही गोष्टहि लक्षांत घेतली पाहिजे. अर्थात् कमी किंमतीच्या पुस्तकांवर लेखकांना मोबदलाहि कमी मिळतो. पण एक उद्बोधक गोष्ट म्हणजे वाचकांना परवडतील, एवढ्या किंमती ठेवल्या तर चांगल्या पुस्तकांना मोठी बाजारपेठ मिळूं शकते, हें सिद्ध झालें आहे.

यानंतर कलाक्षेत्राकडे वळूं. आजच्या चित्रकारांपुढें दोन मोठ्या अडचणी असतात. चित्रकाराला, कोणत्याहि संग्राहकास अगर संस्थेस एकाच वेळीं एकच मूळ कलाकृति विकतां येते, हजारों विकतां येत नाहींत. साहजिकच त्याला किंमत खूप ठेवावी लागते. आणि पैसेवाले संग्राहक तर दुर्मिळ असतात. दुसरी अडचण म्हणजे आजचे प्रतिभासंपन्न तरुण कलावंत गूढ कलेकडे वळले आहेत. आणि ग्राहकांना समकालीन काव्याचें जितकें गम्य, तितकेंच या गूढ कलेचें असतें. तरीहि एकंदरींत पहातां लोकांमध्यें कलेची खूपच आवड असल्याचें दिसून येतें. या बाबतींत फोर्बज् वॅटसन याचें मत अधिकृत मानण्यांत येतें. त्याच्या माहितीप्रमाणें अमेरिकेच्या सन १९४० पर्यंतच्या इतिहासांत जितकीं चित्रें खपलीं नसतील तेवढीं चित्रें सन १९४० नंतरच्या दशकांत खपलीं. सन १९४८ या एकाच वर्षी अमेरिकेंत शंभर कलाप्रदर्शनें भरलीं होतीं. हीं प्रदर्शनें पांच कोटींवर लोकांनीं पाहिलीं. याशिवाय

स्थानिक कलासंग्रहालयांची संख्या कितीतरी पट वाढली आहे. अनेक विद्यापीठें व कॉलेजें यामधून कलेला उत्तेजन देण्यांत येऊं लागलें आहे. कलाकृति मुद्रित करण्यांत आलेल्या पुस्तकांचा खप खूपच वाढला आहे. तसेंच सुटीच्या दिवशीं हौसेनें चित्रें काढणाऱ्यांच्या संख्येंतहि वाढ झाली आहे. लीमन ब्रायसनच्या अंदाजाप्रमाणें अमेरिकतील चित्रकारांची किमान संख्या तीन लाख तरी असावी. अमेरिकन व्यापारी खात्याच्या माहितीप्रमाणेंहि सन १९३९ मध्यें चाळीस लाख डॉलर किंमतीच्या कलाकृति खपल्या होत्या, पण सन १९४९ मध्यें हाच आंकडा चार कोटि डॉलरवर गेला. फारच मोठी प्रगति.

त्यानंतर संगीतक्षेत्र घ्या. येथेंहि आश्चर्यकारक प्रगति पहावयास मिळते. सन १९०० मध्यें अमेरिकेंत हाताच्या बोटांवर मोजण्याइतकें स्वरमेळ ताफे ( सिम्फनी ऑर्केस्ट्रा ) होते. मे १९५१ पर्यंत हीच संख्या ६५९ वर गेली होती. यापैकीं ३२ ताफे धंदेवाईक, ३४३ सामूहिक, २३१ विद्यालयीन व बाकीचे हौशी लोकांचे होते. आज अमेरिकेच्या पंधराशे शहरांतून वार्षिक संगीत महोत्सव होतात. याशिवाय उन्हाळयांत जे ठिकठिकाणीं जलशांचे कार्यक्रम होतात, त्यांनाहि खूप गर्दी होते. सेसिल स्मिथ म्हणतो,

" युरोपांतील अमेरिकन आर्थिक मदतीची जरुरी असलेल्या राष्ट्रांत कित्येक संगीत महोत्सव साजरे केले जातात. जे संगीत अमेरिकन प्रवाश्यांना घरीं ऐकावयास मिळत नाहीं, त्याचा त्यांना आस्वाद देण्यासाठीं हे महोत्सव साजरे करण्यांत येत नाहींत, तर युरोपांत संगीताचा अभाव आहे असें या अमेरिकनांनीं समजूं नये, हा त्यांत उद्देश असतो. अमेरिकेंतील संगीत कार्यक्रमांशीं स्पर्धा करण्याकरितांच युरोपांत कांहीं ठिकाणीं संगीताचे कार्यक्रम आंखण्यांत येत असतात. "

या आश्चर्यकारक प्रगतीचें बरेचसें श्रेय रेडिओला आहे. सन १९३८ मध्यें असें आढळून आलें कीं वॉल्टर डॅमरोश यानें रेडिओवर लहान मुलांकरितां चालविलेले संगीत कार्यक्रम सत्तर हजार शाळांतील सत्तर लाख मुलें ऐकत असत. सन १९४० नंतर टेलिव्हिजनच्या आश्चर्यकारक प्रगतीमुळें रेडिओवरील अभिजात संगीताचें कार्यक्रम थोडेसे मागें पडूं लागले. पण त्यापूर्वींच संगीताचा लोकांना आस्वाद देणारें आणखी एक साधन झपाट्यानें लोकप्रिय झालें होतें.

सन १९२० नंतर रेडिओच्या उदयामुळें फोनोग्राफच्या तबकड्यांचा (रेकॉर्डसचा) धंदा नामशेष होण्याची भीति निर्माण झाली होती. पण ती खोटी ठरून या तबकड्यांचा

धंदा वाढतच गेला. लोकांत संगीताची आवड वाढली होती, त्यांना पाहिजे त्या वेळीं विशिष्ट प्रकारचें संगीत देण्याचें फोनोग्राफ हेंच साधन होते. 'बिलबोर्ड' नियतकालिकानें सन १९५१ मध्यें फोनोग्राफच्या तबकड्यांचा जो खप झाला, त्याचा ढोबळ अंदाज प्रसिद्ध केला होता. या अंदाजाप्रमाणें त्या सालीं एकंदर एकोणीस कोटि किंवा अमेरिकेच्या एकंदर लोकसंख्येपेक्षां अधिक तबकड्या खपल्या. यापैकीं अभिजात संगीताच्या तबकड्यांचा खप दहा तें पंधरा टक्के किंवा दोनतीन कोटिपर्यंत झाला असावा.

पण कलाक्षेत्राचा समुच्चयानें विचार केला तर एकंदर चित्र जरा गोंधळाचेंच दिसतें. संगीताबद्दलच्या लोकांच्या आस्थेला भयंकर तेजी आली आहे, नव्या-जुन्या मुग्ध नाट्यप्रेमी प्रेक्षकांची संख्या वाढली आहे, रंगभूमीला बहर आलेला आहे, स्थानिक सार्वजनिक व कॉलेज रंगभूमीनें भर ज्वानींत प्रवेश केला आहे, पण त्याचबरोबर गेलीं अनेक वर्षें लाखों लोकांचें प्यार असलेल्या चित्रपट प्रेक्षकांची संख्या टेलिव्हिजनमुळें थोडी थोडी कमी होऊं लागल्याचें दिसून येऊं लागलें आहे. या काळांत अमेरिकन शिल्पकलेनें पूर्वींच्या युरोपियन शिल्पकलेची नक्कल करण्याचें सोडून देऊन उत्कृष्ट अशा भव्य इमारती बांधण्यास सुरवात केली होती, पण त्याबरोबर कांहीं हास्यास्पद अशीं अद्यावत निवासस्थानेंहि उभारण्यांत येऊं लागलीं होतीं. मोटारींचें शोभिवंत रस्ते झाले होते, तर त्याबरोबरच मोटारींचें तबेले, पेट्रोल पंप, मोटारींच्या सामानांचीं दुकानें वगैरे या शोभेंत बिघाड आणण्याच्या गोष्टीहि जिकडे तिकडे दिसूं लागल्या होत्या.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे एका महान् राष्ट्रानें एक अभूतपूर्व प्रयोग चालविला आहे. पूर्वींच्या अगदीं साध्यासुध्या व कलेच्या बाबतींत अनभिज्ञ किंवा कलाद्वेष्ट्या अशा असंख्य लोकांची आज पूर्वी कल्पनाहि नसेल इतकी भरभराट झाली आहे. हेच असंख्य लोक म्हणजे कलेचें मोठें गिऱ्हाईक होत. मात्र त्यांना आकलनीय व भरपूर करमणूक करणारी कलाच पुरविण्याची दक्षता घेतली पाहिजे. इतर देशांतील वाङ्मय व कलाशोकीन व अभ्यासू यांच्याशी या लोकांची तुलना करणें ढळढळीत अन्याय ठरेल. हे लोक प्रतिष्ठित लोकांपैकीं नसून वेगळेच आहेत. ठळकपणें सांगावयाचें म्हणजे अमेरिकेंतील **हें सारें नवीन आहे; पूर्वीं यासारखें कांहींहि नव्हतें.**

ज्यांना अमेरिका 'कार्थेज' न बनतां 'ग्रीस' बनावी असें वाटते, त्यांनीं सर्वसामान्य लोकांबरोबरच चोखंदळ लोकांकरितांहि व त्यांना परवडेल अशा रीतीनें उच्च

कलेचा विकास करण्याकडे लक्ष दिलें पाहिजे. हा प्रश्न आर्थिक व त्याचप्रमाणें कलात्मक आहे. तो कितपत सुटेल हें आजच सांगणें कठीण आहे. पण आज साहित्यिकांत जरी निराशा पसरली असली तरी जगांतील उत्कृष्ट वाङ्मयापैकीं बरेंचसें वाङ्मय अमेरिकेंतच निर्माण होत आहे. तसेंच अमेरिकन विद्यापीठें ज्ञानाच्या बाबतींत इतरांची केवळ अनुयायीच नसून, त्यांच्याकडे ज्ञानक्षेत्रांत आपोआपच नेतृत्व आलें आहे. तेथें निरनिराळ्या खंडांतून ज्ञानार्जनाकरितां विद्यार्थी येतात. आज जगाची सांस्कृतिक जबाबदारी अमेरिकेवर येऊन पडली आहे. आज अमेरिकेनें संगीत-षौकिनांची केवढी प्रचंड फौज निर्माण केली आहे हें पहाणेंहि उद्बोधक आहे. आर्थिकदृष्ट्या संशयाचें वातावरण असतांनाहि महान् कलेच्या क्षेत्रांत हा चमत्कार होऊं शकतो, तर इतर क्षेत्रांतहि तो कां होऊं नये ? थोडक्यांत अमेरिकन संस्कृति ही सर्वोत्कृष्टतेची शत्रू नसून त्याचा वाफा असल्याचें सिद्ध होईल.

आतां आणखी एक प्रश्न उद्भवतो.

माझें एकदां "भीतीच्या काळांत" या विषयावर व्याख्यान झालें होतें. या व्याख्यानांत मी असें प्रतिपादन केलें होतें कीं, अनेक लोकांना आपला सर्वनाश होणार, आपण प्रलयांत सांपडणार, अशी धास्ती वाटूं लागली आहे. त्या वेळीं मी जें कांहीं प्रतिपादन केलें होतें, तें या अर्ध शतकाच्या शेवटींहि समर्पक रीतीनें लागूं पडतें. पण माझें हें भाषण जून १९३८ मधील—म्हणजे अणू बॉंबच्या पूर्वींचेंच नव्हे तर दुसऱ्या महायुद्धापूर्वींचें होतें.

पण तसें पाहिलें तर या काळापूर्वींहि कित्येक वर्षांपासून अनेक अमेरिकन लोकांच्या मनांत मधूनमधून अस्वस्थतेची व निराशेची भावना उद्भवतच होती. या निराशावादी मनोवृत्तीचें एक कारण म्हणजे ग्रॅहम वॅलास यानें म्हटल्याप्रमाणें "महान् समाजांतील जीवनाच्या अनुरोधानें त्यांना व्यक्तिगत जीवनांत बदल करतां आला नाहीं." हा महान् समाज गुंतागुंतीचा आहे. या समाजांत कॅन्झस येथील शेतकऱ्याचें व सिरॅकस येथील औषधविक्रेत्यांचें जीवन न्यूयॉर्क येथील रोखे बाजारांतील उलथापालथ किंवा वॉशिंग्टन येथील सरकारी निर्णय किंवा कोरियांतील चढाई यांवर अवलंबून असतें. सन १९१४–१८ चें महायुद्धच घ्या. यूरोपांत सेरॅजिवो येथें कांहींतरी प्रकार घडला म्हणून दूरच्या अमेरिकन लोकांच्या जीवनांतहि केवढी उलथापालथ झाली ! यानंतर प्रचंड आर्थिक मंदी आली. ज्या स्त्रीपुरुषांना आपले व्यक्तिगत श्रम व कार्यक्षमता यांचें चीज झाल्या-

खेरीज रहाणार नाहीं, असें वाटत होतें ते आर्थिक मंदीच्या आरिष्टांत सांपडले. पुढें हिटलरशाहीचा मोर्चा सुरु झाला व दुसरें महायुद्ध आलें. यामुळें ज्यांचीं नांवेंहि माहीत नव्हतीं, अशा दूरदूरच्या ठिकाणीं जाऊन आमच्या तरुणांना भयंकर लढाया द्याव्या लागल्या. त्यानंतर सोव्हिएट रशियाचा अटळ असा धोका निर्माण होऊन कोणत्याहि क्षणाला नवीन महायुद्ध उद्भवेल कीं काय अशी धास्ती निर्माण झाली आहे व त्यांतच अणूबॉंबची भर. !

कल्पना करा. धुक्यांतून विमान घोंघावत चाललें आहे, या विमानांतील पट्ट्यानें जखडून ठेवलेल्या प्रवाश्याला जसें असाहाय्य वाटत असतें, तशीच कांहींशी स्थिति महान् घटनांच्या मगरमिठींत सांपडलेल्या प्रत्येकाची कधींना कधीं तरी होतेच. आगामी वर्षाचें अंदाजपत्रक किंवा दीर्घ मुदतीचा करार करूं पहाणारा व्यापारी, विवाहबद्ध होऊं पहाणारें तरुण जोडपें, आणि पुढें कोणता अभ्यासक्रम घ्यावयाचा हें ठरवूं पहाणारा कॉलेज–विद्यार्थी या प्रत्येकाच्या मनांत एक विकल्प असतो व तो म्हणजे, "अकस्मात आरिष्ट ओढवलें तर ? आज अमेरिकेंत गेल्या कांहीं वर्षांत खूप सुधारणा झाली आहे, असें म्हणावयाचा अवकाश कीं लोक चिडून विचारतात, 'तुम्ही असें कसें म्हणतां ? कशाचीहि शाश्वति राहिली नाहीं, सारखा आणीबाणीचा काळ, याला काय सुधारणा म्हणावयाची ?' थोडक्यांत कसल्या तरी अकल्पित संकटाच्या धास्तीनें आमचें जीवन काळवंडलें आहे–आणि तेंहि पूर्वी कधींहि नव्हतें एवढें.

सन १९३८ च्या माझ्या भाषणांत मी म्हटलें होतें कीं, "आपण आज घबराटीच्या कालांत वावरत आहोंत, आणि त्यामुळें आपण मतिभ्रष्ट बनलों आहोंत आणि अशा काळांत या परिस्थितीचें खापर कोणाच्या तरी डोक्यावर फोडण्याची लोक संधि पहात असतात. सोव्हिएट रशियाचे सन १९४६ किंवा १९४७ नंतरचे आक्रमक हेतू अमेरिकनांना स्पष्ट दिसून आल्यावर त्याचा प्रत्यक्ष अनुभव येत आहे. आपल्या सध्यांच्या परिस्थितीचें खापर ज्यांच्यावर फोडतां येईल, अशा अमेरिकन "बकऱ्यां"चा आपण तलास चालविला आहे. त्यांना एकदां शासन केलें कीं आपण निर्धास्त होऊं असें लोकांना वाटतें. या तंग व घबराटीच्या वातावरणांत आपल्या स्वातंत्र्याचा अमूल्य ठेवा आपण कितपत जतन करूं शकूं याची चिंता वाटूं लागल्यास नवल नाहीं.

अर्थात ही चिंता आजच्यापुरतीच नाहीं. कम्युनिझमबरोबरच्या कटकटींतून युद्धाच्या ज्वाळा भडकोत वा न भडकोत, पण ती कटकट पांचदहा पंचवीस वर्षें नव्हे

तर आपल्या तहहयात चालणार असें बहुतेक अमेरिकनांना वाटूं लागले आहे. त्याचा अर्थ सतत ताण, तंग वातावरण, अनिश्चिती व मतिभ्रष्टता तशीच चालूं रहाण्याचा धोका.

साप साप म्हणून भुई धोपटण्याचा जो प्रकार आम्ही सुरूं केला आहे, त्याचें एक निश्चीत कारण म्हणजे अमेरिकेंतील कम्युनिस्ट पक्षाचा इतिहास व घटना. अमेरिकेंत कम्युनिस्ट पक्षाला फारसे अनुयायी नाहींत, पण जे मिळाले त्यापैकीं बऱ्याच जणांनीं मोक्याच्या जागा मिळविल्या आहेत. हे अनुयायी बहुधा बुद्धिमान असल्यामुळें त्यांना सरकारी खात्यांतील किंवा प्रमुख संस्थांतील महत्त्वाच्या जागांवर शिरकाव करून घेता येतो किंवा कामगार पुढारी म्हणून संघटनांतून वर्चस्व मिळवितां येते.

सन १९४० मध्यें 'सीन्स येस्टरडे' या माझ्या पुस्तकांत मी पुढील विचार प्रदर्शित केलें होतें; "कम्युनिझम हाच अंतिम पर्याय आहे, असें वाटल्यावरूनच अनेक तरुण बंडखोरांनीं त्याला मिठी मारली किंवा त्याशीं कांहीं काळतरी लगट केली. हे लोक प्रथम, चालू रचना बरोबर काम देत नाहीं हें पहात, व या रचनेंत सुधारणा करण्याचा विचार करत. त्यानंतर अर्धवट उपायांनीं अमेरिकेचें पुनरुज्जीवन होणार नाहीं, असें ठरवून क्रांतिशिवाय तरुणोपाय नाहीं, असा निष्कर्ष काढत. आणि हा निष्कर्ष काढल्यावर त्यांच्या दृष्टीपुढें मार्क्स उभा राही. तसेंच अमेरिकन जीवनांतील सारी घाण काढून तें साफ करण्याची कम्युनिस्ट पक्षाची आश्वासनें तरळूं लागत. एकंदरींत आपल्याला जें नापसंत आहे, तें सारें भांडवलशाहीला चिकटविण्याचा मार्ग सोपा आहे खरा !"

कम्युनिस्ट पक्ष हा कटवाल्यांचा असून आपल्या सभासदांवर गुप्तता लादत असल्या-कारणानें त्यांना, या ना त्या धोरणाला पाठिंबा दिल्याबद्दल सरकारीं खातीं, विविध संस्था व कामगार संघटना यामधून, हुसकून लावणें कठीण आहे. याचा परिणाम म्हणजे हीं खातीं अगर संस्था अगर संघटना यांतून काम करणाऱ्या अनेक थोर देशभक्तांपैकींहि कांहीं जणांवर आळ येणें अपरिहार्य होतें. कम्युनिस्टांना आपल्या लाग्याबंध्याविषयीं बेछूट खोटें सांगण्याची संवय असल्यामुळें, स्वतःच्या निष्ठेची ग्वाही देणारे हे देशभक्तहि खोटें सांगत नसतील कशावरून असा प्रश्न साहजिकच उभा रहात असे. दुसरी गोष्ट म्हणजे कम्युनिझमचा स्वीकार केलेले बहुतेक जण जहाल असून, त्यांनीं जहाल किंवा प्रागतिक संघटनांत यशस्वीरीत्या शिरकाव करून घेतला असल्यामुळं कांहीं अविवेकी लोकांच्या संशयानें वेगळेंच स्वरूप धारण केलें. एकाद्यानें

जरा वेगळे विचार प्रदर्शित करण्याचा अवकाश कीं त्यांच्यावर कम्युनिस्टत्वाचा शिक्का बसूं लागला. या संशयी वातावरणाचा फायदा घेऊन कांहीं माथेफिरूंना व महत्वाकांक्षी राजकारणी लोकांना, अनेक सदाचारी व सभ्य नागरिकांना देशद्रोही ठरवून त्यांची इभ्रत कायमची खराब करण्याची संधि मिळाली. कम्युनिस्टांच्या 'गुप्तते'ची सांखळी अशा रीतीनें फार दूरवर जाऊन पोहोंचली होती.

पण हें प्रकरण येथेंच थांबलें नव्हतें. कॉंग्रेसच्या निरनिराळ्या समित्यांनीं केलेल्या चौकश्या, सरकारनें आपल्या नोकरवर्गाच्या निष्ठेची चालविलेली चांचपणी, आल्जर हिसचें अपूर्व प्रकरण, सिनेटर मॅकॉर्थीचे फुत्कार, होलिवूडच्या कांहीं भागांत जरब बसविण्याचे प्रकार, शाळां–कॉलेजांतील अध्यापकांविरुद्ध करण्यांत आलेले आरोप यामुळें अनेक चांगल्या चांगल्या व कार्यक्षम नागरिकांनीं हाय घेतली. भीतिमुळें अमेरिकन जीवनांतील बऱ्याच क्षेत्रांतील धाडशी व विधायक प्रवृत्ती दबली गेली.

तंग वातावरणांत रहावें लागत असल्यामुळेंच .जी निराशा आली, तीच वरील साऱ्या अस्वस्थतेचें कारण असल्याचें, सन १९५१ मध्यें जनरल मॅकॉर्थरला बडतर्फ केल्यानंतर जो हलकल्लोळ माजला त्यावरून सिद्ध झालें. या वेळीं जनरल मॅकॉर्थरचा पाठपुरावा न करणाऱ्या वृत्तपत्र संपादकांवर व रेडिओ निवेदकांवर विषारी पत्रांचा नु सता वर्षाव झाला. कोणालाहि वाटावें कीं विषाचा जणूंकाय एकादा झराच लागला आहे ! सर्वसाधारण आंतरराष्ट्रीय परिस्थिति व विशेषतः कोरियांतील युद्ध यामुळें अनेक लोकांच्या सहनशक्तीचा कसा कडेलोट झाला आहे, हें यावेळीं दिसून आलें. या लोकांना कशाचा तरी कोणावर कां होईना वचपा काढावयाचा होता. महत्वाचा प्रश्न एवढाच कीं ज्या राष्ट्राला परदेशांत प्रचंड व कल्पनातीत जबाबदारी वहावी लागते व त्याकरितां देशांतील लष्करी सामर्थ्यहि आहे तसेंच जय्यत ठेवावें लागते, त्या राष्ट्रांत आपण परस्पर विश्वास व आचारविचार स्वातंत्र्य अबाधित राखूं शकूं काय ?

आम्ही अमेरिकन लोक स्वभावतःच आशावादी लोक आहोंत. पण आजच्याइतका आमच्यावर कधींच ताण पडला नव्हता. आज आमची सहनशीलता, विनोदबुद्धि व धैर्य यांची कसोटीच आहे.

# प्रकरण १८ : आम्ही येथें काय मिळविलें ?

ता. ४ मार्च १९५१ च्या " धिस विक " या एक कोटिवर वाचक असलेल्या नियतकालिकाच्या अंकांत, त्याचा संपादक विल्यम आय. निकोल्स यानें " भांडवल-शाहीला नवीन नांव पाहिजे " या शीर्षकाखालीं एक लेख लिहिला होता. हाच लेख पुढें रिडर्स डायजेस्ट या मासिकांतहि प्रसिद्ध झाला होता. निकोल्स आपल्या लेखांत म्हणतो; " भांडवलशाही हा शब्द आमच्या सध्यांच्या अमेरिकन पद्धतीला समर्पक नाहीं. कारण भांडवलशाही हा शब्द उच्चारतांच अनेकांच्या मनांत विशेषतः जगाच्या इतर भागांतील लोकांपुढें एकोणिसाव्या शतकांतील अविकसीत अर्थरचना उभी रहाते. पण आजच्या अमेरिकन अर्थरचनेचें वर्णन त्या शब्दानें कसें करावयाचें ?...ही पद्धत अपूर्ण असेल, पण तींत सारखी सुधारणा होत आहे व होत राहील. या पद्धतींत सारे लोक सहकार्यानें उभारणी करतात, सहकार्यानें उत्पादन करतात व सहकार्यानेंच वाढलेल्या उत्पादनाचीं फळेंहि चाखतात. या पद्धतीला नवीन भांडवलशाही, लोकसत्ताक भांडवलशाही, आर्थिक लोकशाही, औद्योगिक लोकशाही, विभागणी, परस्परवाद, उत्पादनवाद वगैरे अनेक नांवें सुचविण्यांत आली आहेत. पण याहिपेक्षां अधिक समर्पक असें नांव कोणाला सुचत असल्यास सुचवावें. "

आश्चर्याची गोष्ट म्हणजे पंधरा हजार लोकांनीं निकोल्सच्या विनंतीला मान देऊन सूचना केल्या. आपल्या राष्ट्रांत योग्य रीतीनें चाललेली अशी समाजरचना अस्तित्वांत आहे, इतकेंच नव्हे तर ती भरधांव प्रगति करत असून, या समाजरचनेनें साऱ्या जुन्या कल्पना कोलमडून पाडल्या आहेत, अशी अमेरिकेंत सार्वत्रिक भावना असल्याचें यावरून सिद्ध झालें.

अनेक लोकांना असें कां वाटते ? पूर्वीच्या एका प्रकरणांत मी दिग्दर्शित केल्याप्रमाणें त्याचें एकच कारण संभवते : आम्ही अमेरिकेंत एक नवी समाजरचना उभारत नसून, जुनी समाजरचना अधिक चांगली चालावी, या दृष्टीनें तींत डागडुजी करतो व जरुर तेथें तिची क्रमशः फेररचना करतो.

ही डागडुजी कशी करण्यांत येते, हें मी पूर्वीच्या विविध प्रकरणांत दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. एकोणिसाव्या शतकांत, अमेरिकेंत मध्यवर्ती, राज्य व स्थानिक सरकारें अशी सत्तेची विभागणी होती. मध्यवर्ती सरकार त्या वेळी फार लहान व

त्याचें कार्यक्षेत्रहि मर्यादित होतें. यामुळें व्यापाराच्या बाबतींत पूर्ण मुभा होती. पुढें या सरकारांनीं उद्योगपतींना समाईक कंपन्या काढण्यास परवानगी दिली. या समाईक कंपन्यांना कांहीं खास अधिकार व सवलती देण्यांत आल्या. हे हक्क व सवलती यामुळें त्यांना आपली कर्तबगारी सिद्ध करण्यास जसें आश्चर्यकारक प्रोत्साहन मिळालें, तसेंच त्यांचें अकल्पित असे दुसरेहि परिणाम झाले. त्यामुळें ज्याचें उत्पन्न "वेतनाच्या लोखंडी सिद्धांता" नुसार ठरविण्यांत येई, अशा एकट्या दुकट्या कामगाराची असाहाय्य परिस्थिति होई. धंद्यांतील खूपच मोठा फायदा मालकांच्या खिशांत जाऊं लागला; त्याचप्रमाणें पेढीवाल्यांना अमर्याद सत्ता मिळून त्यांच्या सहकार्याशिवाय उद्योगपतींना धंदे चालविणें अशक्य होऊं लागले. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं अमेरिकेंत कसली धास्ती निर्माण झाली असेल तर ती लक्षाधीश अधिक गब्बर व निर्धन अधिक गरीब होण्याची. त्याचप्रमाणें भांडवलदारांची देशाच्या आर्थिक रचनेवरीलच नव्हें तर राजकीय रचनेवरील पकडहि अधिक घट्ट होण्याची धास्ती होती.

या परिस्थितीमुळें अमेरिकन लोकांच्या लोकशाही भावना व न्यायाच्या कल्पना यांना धक्का बसला. म्हणून या परिस्थितींत बदल घडवून आणण्याचा कार्यक्रम हातीं घेण्यांत आला. अर्थात हा बदल घडवून आणण्याचा मार्ग क्रांतीचा नसून प्रयोगात्मक व सुधारणावादी होता. सन १९३० च्या मोठ्या आर्थिक मंदींत अमेरिकन रचनेला बराच मोठा धोका पोहोंचला होता, तेव्हां उपायहि जरा जालीमच योजावे लागले. यापैकीं कांहीं उपाय मूर्खपणाचेहि असतील. पण एकंदरींत क्रांतिकारक व प्रयोगात्मक बदलाचें तत्व कायम होतें. पुढें कांहीं वर्षें लोटल्यावर आर्थिक रचनेचें इंजिन सुरळीत चालेलच याची खात्री वाटत नव्हती. पण दुसरें महायुद्ध सुरूं झाल्यावर सरकारनें ॲक्सिलरेटर (गतिवर्धक) दाबला व इंजिन सुरळीतपणेंच काय पण अधिक वेगानें धांवत असल्याचें आढळून आलें. पुढें दुसरें महायुद्ध संपलें व सरकारनें ॲक्सिलरेटरवरील पाय काढून घेतला तरी इंजिन चालूंच राहिलें. या आश्चर्यकारक घटनेचें रहस्य कोणतें?

हें रहस्य थोडक्यांत पुढीलप्रमाणें आहे. करविषयक कायदे, किमान वेतन कायदे, निरनिराळ्या प्रकारची मदत, हमी व नियम, कामगार संघटनांचें दडपण व नवीन व्यवस्थापकांचा दृष्टिकोन यामुळें 'वेतनाच्या लोखंडी सिद्धांता'ला मूठमाती मिळाली आहे. सुखवस्तू लोक व खालच्या पातळीवरील समाज यांच्यांत आपोआपच संपत्तीची फेरवांटणी झाली आहे. यामुळें यंत्र थांबलें नाहींच, उलट त्याची शक्ति वाढली आहे.

आम्ही एक नवीन वाट शोधून काढली आहे व ती म्हणजे गरीबांच्या खरेदी-शक्तींत वाढ.

महान् अमेरिकन शोधाचें हें सार आहे. या शोधाचा प्रतिसिद्धांत असा : खालच्या पातळीवरील लोकांना योग्य संधि दिली तर तिचे ते योग्य चीज करून दाखवून जबाबदार नागरिक बनतात.

२

सध्यांचे अमेरिकन सरकार खूपच व्यापक व बलाढ्य आहे. एकाद्या अटळ विकास तत्वाप्रमाणें त्याचा व्याप वाढतच असल्याचें दिसतें. याचें एक कारण म्हणजे महायुद्धानें व त्यानंतरच्या शीत युद्धानें आमच्यावर आलेली जबाबदारी व दुसरें कारण म्हणजे शहरांची वाढ व तेथील गुंतागुंतीच्या रचनेमुळें वाढत चाललेली परस्परावलंबिता. सरकारचें आज उद्योगधंद्यांवर अनेक प्रकारें नियंत्रण आहे. याशिवाय आर्थिक मंदीच्या दुर्दैवी काळांत मध्यवर्ती सरकारला आपल्यावर दोन जबाबदाऱ्या आहेत, हें मान्य करावे लागले होते. एक म्हणजे आर्थिक पेचांत सांपडलेल्या लोकांना त्यांचे आप्तेष्ट, किंवा स्थानिक वा राज्य सरकारांकडून साहाय्य मिळालें नाहीं, तर आपण साहाय्य केलें पाहिजे व दुसरी म्हणजे सारी आर्थिक रचना कांहीं झालें तरी कोलमडून देतां कामा नये.

याचकरितां सरकारनें राष्ट्रीय अर्थरचनेवर विशिष्ट प्रकारचें नियंत्रण ठेवलें आहे. कोरियन युद्धासारख्या आणीबाणीच्या प्रसंगीं हें नियंत्रण अधिक व्यापक केलें जातें. पण त्याबरोबरच सरकार स्वतः उद्योगधंदे चालविण्याचा प्रयत्न करत नाहीं. उद्योगधंदे खाजगी राहिले तर अधिक चांगले चालतात, असा आमचा अनुभव आहे. याला अपवाद म्हणजे अणू कारखान्यांसारखे धंदे. सुरक्षितेच्या दृष्टीनें अणू कारखाना म्हणजे खासगी धंद्यांच्या समुद्रांत समाजवादाचें बेटच होय.

सरकार जसे खासगी धंदे चालवावयास घेत नाहीं, त्याचप्रमाणें राज्य व स्थानिक सरकारांचे अधिकारहि आपणांकडे घेत नाहीं. मात्र मध्यवर्ती सरकारच्या मदतीशिवाय ज्या गोष्टी त्यांना करतां येत नाहीं, तेथें मध्यवर्ती सरकार मदत करतें. अशा रीतीनें सरकारी सत्तेची विभागणी झाली आहे.

यानंतर अमेरिकेंत सार्वजनिक काम करणाऱ्या अशा संस्था व मंडळें तरी किती विविध व विपुल आहेत ! विद्यापीठें, शाळा, चर्च, दवाखाने, वस्तुसंग्रहालयें, वाचना-

लयें व सामाजिक संस्था तेथें रेलचेल आहेतच, पण त्याशिवाय प्रत्येक बाबीच्या विकासा-करितां व संरक्षणाकरितां तेथें संस्था आहेत. तसेंच तेथें ध्येयवादांतून उदयास आलेल्या अनेक मदत संस्था ( फौंडेशन्स ) व मालमत्ता कर आहे. व्यापारी मंडळें, व्यावसायिक मंडळें, पदवीधर मंडळें, सेवा मंडळें व आरामगृहेंहि अगणित आहेत. राष्ट्र या दृष्टीनें अमेरिकन लोक समभावी, योजक, सेवाभावी, संरक्षक, सुधारक व प्रवर्तक आहेत.

दुसरी गोष्ट म्हणजे अमेरिकेंत ही सार्वजनिक संस्था व ही व्यापारी किंवा सरकारी संस्था असा भेद करणें सोपें नाहीं. तेथें एकाद्या सार्वजनिक संस्थेला समाईक किंवा मोटार कंपनीकडून आर्थिक मदत मिळत असते, खासगी विमानें सरकारी विमानमार्गा-वरून फेऱ्या मारतात, तर एकाद्या विद्यापीठाला अंशतः सरकार व अंशतः खासगी मदत मिळत असते. आणि विद्यापीठांतील एकादा संशोधन विभाग तर मध्यवर्ती सरकारच्या मदतीवर चाललेला असतो.

या परिस्थितींत अमेरिकेचें नैतिक व बौद्धिक सामर्थ्य सरकारप्रमाणेंच सार्वजनिक कार्याला वाहिलेल्या संस्थांवरहि अवलंबून आहे, असें म्हणणें सयुक्तिक होईल. या सार्वजनिक संस्थांचें कार्य सरकारी कार्यापेक्षां बऱ्हंशी भिन्न असें नसतेंच, उलट त्यांत अधिक विविधता व व्यापक दृष्टिकोन असून व्यक्तिगत बुद्धिमत्तेला व कर्तबगारीला ज्यास्त वाव मिळतो, असें दिसून आलें आहे. एकंदरींत आजची अमेरिका म्हणजे अनेक प्रकारच्या गोष्टींचें मिश्रणच. या रचनेवर एका विशिष्ट प्रकारचा छाप मारतां येत नाहीं यांतच तिचें सामर्थ्य आहे.

अमेरिकेच्या राष्ट्रीय आर्थिक रचनेंत बदल करण्याच्या ज्या ज्या सूचना केल्या जातात, त्या प्रत्येक सूचनेवर कडाक्याची चर्चा होते. अमूक एक सूचना काम, बचत, उद्योगधंदे व संशोधन यांना मारक ठरेल काय, अमक्या गोष्टीमुळें सरकारला अमर्याद अधिकार मिळतील काय, लोकांना व उद्योगधंद्यांना खरोखरीच मदतीची जरुरी आहे काय, सरकारला ते परवडेल काय वगैरे सर्व सूचनांचा साधक बाधक विचार केला जातो. आतां अमेरिकेपुढील कांहीं समस्या पहा.

* युद्धोत्तर काळांत चलनवाढ जरी तितकी तीव्र नसली तरी कायमच आहे. अमेरिकेच्या आर्थिक सुव्यवस्थेच्या दृष्टीनें ही गोष्ट मोठी विघातक आहे. चलनवाढ अस्तित्वांत असल्याशिवाय उत्पादनाचा वेग कायम राखतां येईल कीं नाहीं, हें आम्हांला माहीत नाहीं.

* कोरियन युद्धापूर्वींच देशांत कर आकारणीनें कमाल मर्यादा गांठली होती. यापेक्षां अधिक कर लादले तर ते असह्य होऊन अधिक उत्पादनाला मारक ठरतील व करचुकव्यांचाहि त्यामुळें सुळसुळाट होईल. पण कराचा हा बोजा कमी करतां येईल कीं, त्यापेक्षां उत्पादन झपाट्यानें वाढवून करवाढीचा प्रश्न परस्पर सोडवितां येईल, हें आम्हांला माहीत नाहीं.

* सोव्हिएट रशियानें आपलें धोरण बदलल्याची खात्री पटविली व आम्हांला लष्करी खर्च कमी करतां आला तर आर्थिक मंदीचें आरिष्ट कोसळूं नये, म्हणून झपाट्यानें अंतर्गत उत्पादन वाढवितां येईल कीं नाहीं, हें आम्हांला माहीत नाहीं.

* जर जगडव्याळ युद्ध पुनः सुरू झालें तर सरकारवरील राष्ट्रीय कर्जाचा बोजा अफाट होऊन सरकारची पत ढांसळेल कीं काय, हें आम्हांला माहीत नाहीं.

* सरकारनें आपल्या शिरावर अनेक आर्थिक जबाबदाऱ्या घेतल्यामुळें एक नवीन प्रकारची घबराट उडेल कीं काय, आर्थिक रचना कोसळेल कीं काय, हें आम्हांला माहीत नाहीं.

* त्याशिवाय गरजू लोकांना मदत करण्याचें जें धोरण आम्ही स्वीकारलें आहे त्यामुळें पुढेंमागें लोक हातपाय हालविण्याचें सोडून देऊन सरकारच्या मदतीवरच जगण्याइतपत लाचार होतील कीं काय हेंहि आम्हांला माहीत नाहीं. आपण ही मर्यादा ओलांडली आहे, असें कांहीं लोकांना खात्रीपूर्वक वाटते तर कांहीं लोक आपण ही मर्यादा ओलांडली नाहीं, अशी ग्वाही देतात.

पण राजकीय प्रचाराची राळ व कॉंग्रेसमध्यें येणाऱ्या निरनिराळ्या बिलांवरील कडाक्याचे वाद यामुळें एका महत्त्वाच्या गोष्टीकडे आपलें दुर्लक्ष होतें; व ती म्हणजे लोक संतापून बोलत असले तरी सध्यांच्या अमेरिकन रचनेंत खरोखरीच आमूलाग्र बदल व्हावा असें मनापासून फारच थोड्या अमेरिकनांना वाटते. मध्यवर्ती सरकारची सत्ता कमी करावी, सध्यांचे अनेक कायदे रद्द करावेत, नोकरशाहीचे अधिकार मर्यादित करावेत, मदतींत कपात करावी, असें म्हणणारे अनेक लोक आहेत. याउलट सरकारनें नवीन जबाबदाऱ्या शिरावर घ्याव्यात, वैद्यकीय विमा योजनेसारख्या मोठ्या योजना चालविण्याचे अधिकार आपणांकडे घ्यावेत, असें वाटणारेहि पुष्कळ आहेत. पण एकंदरींत प्रचंड बहुसंख्यांक अमेरिकनांचा दृष्टिकोन मात्र पुढीलप्रमाणें आहे. सरकारनें आर्थिक व्यवस्था समाधानकारक अंमलांत आणण्याची संपूर्ण जाबाबदारी घ्यावी, जरूर

तेथें स्वतःच्या जबाबदारीवर मदत द्यावी, कांहीं मर्यादेपर्यंत उद्योगधंद्यावर नियंत्रण व देखरेखहि ठेवावी, पण जो हस्तक्षेप करावयाचा तो मर्यादित प्रमाणावरच करावा व बहुतेक उद्योगधंदे खासगी मालकीचे ठेवावेत. कोणत्या गोष्टीची आपल्याला किती प्रमाणांत गरज यावर कडाक्याची चर्चा होते, पण त्या मानानें मतैक्याचें क्षेत्र खूपच व्यापक आहे: आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे खासगी उद्योगधंदे खासगी मालकीचेच राहिले पाहिजेत, याचाहि मतैक्याच्या क्षेत्रांत अंतर्भाव होतो.

याचें कारण? खासगी व्यवस्थेखालील उद्योगधंदे अधिक कार्यक्षमतेनेंच नव्हे तर त्यापैकीं सर्वच नसले तरी बहुतेक धंदे सार्वजनिक हिताची दृष्टि ठेवून चालविले जातात, अशी अमेरिकनांची अनुभवानें खात्री झाली आहे. यामुळें सरकारकडे उद्योगधंद्यांची मालकी देऊन जें साधावयाचें तें तर साध्य होत आहेच, पण त्याशिवाय सरकारी मालकीमुळें दडपशाही उद्भवण्याचा जो संभव असतो, तोहि टळला आहे.

थोडक्यांत अमेरिका समाजवादाकडेच नव्हे तर समाजवादाच्या पलीकडे गेली आहे, याबद्दल प्रचंड बहुसंख्यांक अमेरिकनांची अंतर्यामी खात्री झाली आहे.

३

अंतर्यामी खात्री झाली आहे, असें मी मुद्दाम म्हणतो. कारण मृगजळाप्रमाणें ठरलेल्या एका जुन्या विचारसरणीचा अद्यापहि लोकांच्या मनावर पगडा आहे. लोकांना अजूनहि जग समाजवादाकडे अपरिहार्यरीत्या चाललें आहे, असें वाटतें. सरकार सध्यां जें कांहीं करत आहे, त्यापेक्षां अधिक झालें पाहिजे, असें आर्जवी भाषेंत सांगणाऱ्यांना आपण प्रागतिक म्हणतो, त्याच बाबतींत आक्रमक वृत्ति ठेवणाऱ्यांना आपण जहाल म्हणतो. आणि उद्योगधंदे खासगी मालकीचेच असले पाहिजेत, असें वाटणारे लोक नम्र भाषेंत पुराणमतवादी ( कन्झरव्हेटिव्ह ) व जहाल भाषेंत प्रतिगामी ठरतात.

या बहुरंगी राजकीय देखाव्याला ऐतिहासिक पार्श्वभूमि आहे. गेल्या सुमारें एक शतकांत जे प्रमुख राजकीय बदल झाले, त्यांची दिशा एकच होती व ती म्हणजे लोकांच्या सामान्य हितासाठीं सरकारनें अधिकाधिक कांहींतरी केलें पाहिजे. ज्यांना सरकारनें तसें करूं नये असें वाटत होतें व ज्यांनीं त्या बाबतींत अडथळे आणण्याचें धोरण ठेविलें त्यांच्यावर पुराणमतवादी असा शिक्का बसणें सयुक्तिकच होतें. याउलट सरकारनें प्रत्येक बाबतींत हस्तक्षेप करावा, इतकेंच नव्हे तर प्रमुख खासगी धंद्यांची मालकी

आपणांकडे घ्यावी, असें म्हणणारे समाजवादी यांना सार्थ रीतीनें जहाल म्हणून ओळखण्यांत येऊं लागले. आणि ज्यांना सशस्त्र क्रांतिच्या मार्गानेंच प्रत्येक बाबीचा ताबा घ्यावयाचा आहे, असे कम्युनिस्ट लोक आत्यंतिक जहाल म्हणून ओळखण्यांत येऊं लागले. पण अमेरिका आज निश्चितपणें निदर्शनास आणते कीं; जींत सरकारची जबाबदारी व खासगी कर्तबगारी यांचा यशस्वी मिलाफ झाला आहे, जींत या दोन्ही पद्धतींतील दोष टाळण्यांत आले आहेत, जींत सरकारी ढवळाढवळ मर्यादित असून खासगी उद्योगधंदे आणि खासगी संस्था यांना बरेंचसें स्वातंत्र्य आहे अशीच पद्धत उत्कृष्टपणें चालूं शकते. या पद्धतीचा एक अत्यंत दांडगा फायदा म्हणजे तींत निर्णयात्मक अधिकार व त्याबरोबर उपलब्ध होणारी संधि यांचा व्यापक मिलाफ झालेला असतो. थोडक्यांत लोकांची कल्पना होती, त्यापेक्षां निराळया दिशेनें आज प्रगति चालूं आहे.

तरीहि, काळाचा ओघ समाजवादाकडेच नव्हे तर त्याहिपुढें कम्युनिझमच्या रोखानें चालूं आहे, असा अद्यापहि भ्रम आहे. तसें पाहिलें तर आमचें उत्पादन, आमची संपत्ति व आमचें रहाणीचें मान म्हणजे जगांतील एक आश्चर्य आहे; ऐझाबेल लुंडबर्गनें सन १९४७ मध्यें म्हटल्याप्रमाणें रशियन लोक आपण लोकांच्या ऐहिक सुखांत किती भर टाकली याची खूप जाहिरातबाजी करत असले तरी ते ज्या राष्ट्रांना सुतळीच्या तोड्याचीहि मदत करूं शकले नाहींत, त्याच राष्ट्रांना अमेरिकेनें अगणित सामुग्री व तांत्रिक मदत पुरविली आहे. प्रयोगांतून निर्माण झालेली आमची रचना म्हणजे जगांतील एक क्रांतिकारक शक्ति आहे. तरीहि लोकांच्या मनांत वरील भ्रम इतका दृढमूल झाला आहे कीं परराष्ट्रीय प्रश्न आमच्यासमोर उभे राहिले कीं आम्ही स्वतःला खुशाल पुराणमतवाद्याचें दोस्त समजतो व मानवी समाजाची सोज्वळ रहाणीची नैसर्गिक आकांक्षा जणूं काय आम्हांला दडपून टाकावयाची आहे, अशा रीतीनें पावलें टाकण्याची आमची प्रवृत्ति होते. साहजिकच परिवर्तनाला विरोध करण्यास आपण खडे रहातो. आपण अशी मूर्खपणाची समजूत करून घेतली आहे कीं सोव्हिएट रशिया—कीं ज्यानें जनतेचें जीवन सुधारण्याचें ऐतिहासिक कम्युनिस्ट ध्येय राष्ट्रीय महत्त्वाकांक्षेच्या आहारीं जाऊन पाशवी वृत्तीनें गाडून टाकले तो रशिया—व त्याचे साथीदार आणि हस्तक हेच क्रांतिकारक परिवर्तनाचे प्रतिनिधी आहेत आणि या परिवर्तनाला आपण छातीठोकपणें विरोध केला नाहीं तर एक वेळ रशियाच्या मार्गानेंच वहावत जावे लागेल. १९ व्या शतकांतील जे प्रश्न आम्ही यशस्वी रीतीनें सोडविले तेच प्रश्न सोडविण्याच्या

क्रांतिकारक प्रयत्नांतूनच उदयास आलेल्या मध्ययुगीन सत्तेपेक्षां सोटेशाही सोव्हिएट रशिया वेगळाच आहे, अशीच समजूत दिसतें !

अर्थात सोव्हिएट रशियाविषयींची ही समजूत आपण काढून टाकली पाहिजे. कम्युनिझमविरुद्धचा आपला लढा हा भूतकाळाविरुद्धचा आहे, भविष्यकाळाविरुद्धचा नाहीं, हें आपण लक्षांत घेतले पाहिजे. अमेरिकेंतील परिवर्तनाचीं पावलें समाजवाद किंवा कम्युनिझमच्या दिशेनें पडत आहेत, ही कल्पनाहि आपण मनांतून काढून टाकली पाहिजे. ही कल्पना आमची फसवणूक करणारी आहे व त्यामुळें नवीन विचार मांडणारी कोणतीहि व्यक्ति विध्वंसक प्रवृत्तीची असलीच पाहिजे, अशी चांगले चांगले लोकहि समजूत करून घेतात. तसेंच या समजुतीमुळें आपल्या कल्पकतेवर दडपण येऊन आपण भेकड होयबा होण्याची धास्ती आहे. यांतच मोठ्या विशेषतः अणू युद्धाच्या भीतिमुळें आमचा स्वतःवरील व भवितव्यावरील बेडर विश्वास ढळला तर नवल नाहीं.

आज जगांत अमेरिकेकडे नेतृत्व आलें आहे त्याचें कारण आपण निष्क्रीय नव्हतो, हें ओळखलें पाहिजे. आपल्याला आलेले कांहीं अनुभव खडतर असतील व भविष्यकाळाचें आपल्यापुढील चित्रहि अंधुक असेल, पण एकंदरींत विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात आपण अमेरिकन जीवनांत घडवून आणलेलें परिवर्तन खास डोळे दिपविणारे आहे. आणि आपण संशोधन, सुधारणा व परिवर्तन यांची आतांपर्यंतची प्रवृत्ति कायम ठेवली व निधड्या छातीनें कार्य करत राहिलों तर आतांपर्यंत झालेली प्रगति म्हणजे उत्तरार्धांतील प्रगतीची केवळ प्रस्तावना ठरेल. संकटें पुढें दिसतात म्हणून धैर्यवान माणसांप्रमाणेंच धैर्यवान राष्ट्रहि डरत नाहीं. उलट संकटांना तोंड देऊन त्यावर मात करण्यांतच पुरुषार्थ असतो.